REFBK-0008139

# आपली मुंबई

( १९५३ )

संपादक : प्रभाकर रानडे

ग्रंथ संग्रहालय
क्र. ७३९

: प्रकाशक :

प्रसन्न प्रकाशन

१७० व्हिन्सेंट रोड, एम्प्रेस महाल, बी. ब्लॉक, दादर, मुंबई १४

★

मूल्य ५ रुपये



**श्री. स. का. पाटील, एम्. पी.**

अध्यक्ष, मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटी

........ज्यांचें उत्तेजन

आम्हाला सदैव मार्गदर्शक झाले !

গ্রা· নং·
১৬৬৮৬
২৩/৩/৫৮

১২৬৬৮৬
গ্রঃ নং·
১২০
২৩/৩/৫৮

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रा. क्र. ८७३८

# आपली मुंबई

## "जिच्या पांचवीलाच भरभराट पूजलेली होती"

जगांतील एक अव्वल दर्जाचें बंदर, आशिया खंडांतील फार मोठी बाजारपेठ, नाना देशांच्या, नाना धर्मांच्या आणि नाना पंथांच्या लोकांचें निवासस्थान, आणि भारताचें प्रवेशद्वार इत्यादि विविध विशेषणांनीं आज मुंबापुरीचा-मुंबईचा-गौरवपूर्ण नामनिर्देश होत असला तरी हा सारा लौकिक तिनें अवघ्या तीन-चारशें वर्षांतच संपादन केलेला आहे, ही गोष्ट सांगूनसुद्धां अनेक जणांना खोटी वाटेल. पण ती सत्य आहे.

शंभर चौरस मैलांच्या आसपास विस्तार आणि तीस लक्षांचे वर लोकवस्ती असें हें मुंबईचें आजचें विशाल स्वरूप असलें तरी एके काळीं निरनिराळ्या आणि अलग अलग अशा लहानमोठ्या सात बेटांचा हा एक क्षुद्र समूह होता आणि त्याला 'हेपतानेशिया' म्हणून म्हणत असत हें तरी किती जणांना माहीत आहे ?

ता. १४ मे १४९८ रोजीं मसाल्याचे पदार्थांचा मागोवा काढीत काढीत आणि ख्रिस्तधर्मीयांचा शोध करीत करीत वास्को-द-गामा हा कालिकत बंदरावर उतरला आणि त्याच दिवशीं हिंदुस्थानच्या राजकीय व सामाजिक स्थित्यंतरास प्रारंभ झाला. या प्रारंभाचें स्वरूप प्रारंभीं प्रारंभीं तरी व्यापक नव्हतें, भासमान होणारेंहि नव्हतें ही गोष्ट खरी, तथापि त्याचा तडाखा पुढील अडीच तीन शतकेंपर्यंत इतक्या तीव्रतेनें बसत गेला कीं त्यामुळें एरवीं संथ दिसणाऱ्या हिंदी समाजजीवनांत केवढी तरी मोठी क्रांति झाली. हिंदुस्थानांत मन्वंतर घडून आलें.

हें मन्वंतर घडविण्यांत मुंबई शहराचाहि फार मोठा भाग आहे आणि त्याचेंच विविध दर्शन आपणांस व्यावयाचें आहे.

## मुंबईची कुळकथा

ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ शोधूं नये म्हणून म्हणतात, पण कोणी खटाटोपी व्यक्तीनें तसा खटाटोपच केला तर त्याला अनेकविध खडतर घटनांना तोंड द्यावें लागतें, किती तरी रोमांचकारी प्रसंग प्रत्यक्ष अनुभवावे लागतात आणि या शोधाची प्रदक्षिणा पुरी झाली कीं त्याला पृथ्वीप्रदक्षिणेचा आनंद लाभतो. तसेंच मुंबईच्या कुळकथेचा शोध घेणाऱ्याचेंहि पण झाल्याविना राहाणार नाहीं.

उत्तर कोंकणपट्टीवर मुंबईच्या आसपास अरबी समुद्रावर नजर टाकली असतां, आपणांस खांदेरी, घारापुरी (एलिफंटा), कारंजा, तुर्भे आदि जीं बेटें दिसतात तसेंच मुंबई हेंहि एक बेटच असल्याचें दिसून येईल. तें अक्षांश ७३° रेखांश १९° यावर वसलेलें आहे.

बृहन्मुंबई म्हणून आज जिला म्हणतात ती ता. १५ एप्रिल १९५० रोजीं अस्तित्वांत आली. पूर्व ऊर्फ कालची मुंबई म्हणून आपण जिला संबोधित असूं तिचा विस्तार दक्षिणेस कुलाबा, ससून धक्क्यापासून माहीम-वांद्रयाच्या खाडी-पर्यंत म्हणजे सुमारें अकरा साडेअकरा मैल लांब आणि दोन ते तीन मैल रुंद अशा सव्वीस चौरस मैलांचाच होता. तथापि, एवढा विस्तार होण्यापूर्वीसुद्धां मुंबईची अवस्था अगदीं विखुरलेली अशीच होती. तिला आपण पूर्व-प्राथमिक मुंबई असें म्हणूं. या पूर्व-प्राथमिक मुंबईत (१) कुलाबा (२) ओल्ड वुइमेन्स आयलंड (दक्षिण कुलाबा) (३) अपोलो बंदर (४) माझगांव (५) माहीम (६) शींव (७) वरळी अशीं सात निरनिराळीं बेटें होतीं आणि तीं एकमेकांपासून लहान लहान खाड्यांनीं विलग झालेलीं अशींच होतीं. विशेष हें कीं प्रारंभीच्या अवस्थेत "मुंबई" असा खास निर्देश होत नसे. झालाच तर तो "माहीम – मुंबई" अशा जोडनांवानें होई.

## मुंबई हें नाव पडलें तरी कसें ?

पण मग सात बेटांच्या या समूहाला मुंबई हें नांव पडलें तरी कसें ? 'हेपतानेशिया' या नांवानें या समूहाला फार फार प्राचीन काळीं संबोधिलें जात असे हें मागें सांगितलेंच आहे. इ. स. १५०८ पासून मात्र पोर्तुगीज खलाशी आणि प्रवाश्यांच्या पत्रव्यवहारांतून अपभ्रष्ट स्वरूपांत मुंबईचा नामनिर्देश होऊं लागल्याचें आपणांस आढळून येते. इ. स. १५०८ मध्यें गॅसपर कोरिया मुंबईचा उल्लेख बॅंबेम् ( Bombaim ) असा करतो तर तत्पूर्वी एक वर्ष अगोदर मिरात–ई–अहमदीनें त्याचा मनबाई ( Manbai ) अथवा मुंबे ( Mumbe ) असाहि उल्लेख केल्याचें आपणांस आढळून येतें. चांगलें बंदर ( Buonbahia ) अशा अर्थी पोर्तुगीजांनीं या स्थानास वापरलेल्या शब्दाचें बॅंबेम् हें अपभ्रष्ट स्वरूप असावें. इ. स. १६६७ सालीं म्हणजे सुरती रुपाया पहिल्या प्रथम पाडण्यांत आला. त्यावर बॉंबे ( Bombay) असा अगदीं स्पष्ट निर्देश आहे आणि तेव्हांपासूनच मुंबईस बॉम्बे ( Bombay ) असें इंग्रजींत संबोधावयास प्रारंभ झाला असें निश्चितपणें म्हणावयास हरकत नाहीं.

## मुंबादेवी–मुंबईची ग्रामदेवता

जगाच्या कानाकोपऱ्यांतील देशोदेशींचे लोक आज मुंबईत नांदत असलेले दिसत असले तरी मूळचे मुंबईकर म्हणजे कोळीच होत. कुलाबा, माझगांव, वरळी, शींव, माहीम इत्यादि बेटांवर वस्ती करून राहाणाऱ्या या सोनकोळ्यांचें सारें जीवन समुद्राशीं कसें अगदीं निगडित झालेलें होतें. दर्यावर जाऊन मच्छिमार करायची आणि तुफान असलें कीं थोडी भातजमीन, नारळीपोफळीची बागायती करायची असा या मुंबईकर कोळ्यांचा जीवनक्रम होता.

या कोळ्यांचें एक कुळदैवत होतें आणि तें म्हणजे मुंबादेवी. या कुळदेवतेच्या-ग्रामदेवतेच्या-नांवावरूनच मुंबई हें नांव पडलें असावें असा निश्चित निष्कर्ष काढतां येतो. देवीस अंबा म्हणून संबोधण्यांत येते. महा म्हणजे मोठी,

देवी म्हणजे अंबा, महा अंबा म्हणजे मोठी देवी. या महाअंबा या शब्दरूपास आई हा प्रत्यय लावल्यानें 'महाअंबाई' असें शब्दरूप झालें आणि त्याचेंच भ्रष्ट रूप म्हणजे मुंबई हें होय.

## इतर नांवांची कुळकथा

मुंबई या नांवाची कुळकथा शोधल्यानंतर मुंबईतील इतर अनेक स्थल-निर्दिष्ट नांवांचीहि कुळकथा शोधणेंच भाग आहे. मुंबईतील असंख्य स्थळांचें कूळ शोधणें हें खास इतिहासाचेंच कार्य आहे तथापि अगदीं कांहीं मोजक्या स्थळांची पूर्वपीठिका शोधणें ही मोठी मौजेचीच कामगिरी होईल. आपण कुलाबा, अपोलो बंदर, चर्चगेट, धोबी तलाव, मलबार हिल, माझगांव, भायखळा, डोंगरी, शिवडी, शीव, नायगांव, वरळी अशीं नांवें घेतो खरीं पण त्या प्रत्येकाच्या मागें कांहीं अर्थ आहे, इतिहास आहे याची आपणांस थोडीच जाणीव असते ?

कोळवण, कोलभाट म्हणजे कोळ्यांचें गांव तें कुलाबा या नांवाची पूर्व-पीठिका आहे. समुद्रात शिरणारें जमिनीचें एक टोंक अशा अर्थी अरबी भाषेंत 'कलबेह' नांवाचा एक शब्द आहे त्यावरूनहि कुलाबा हें नांव पडलें असावें.

पालवा (एक मोठें लढाऊ गलबत), पल्लव, पडाव या नांवांवरून 'अपोलो बंदर' हें नांव पडलें असावें असा कयास बांधण्यांत येतो. पालव्याचा अपभ्रंश पोलो आणि पोलोचा अपोलो अशी व्युत्पत्ति लावतां येईल. झाडाझुडपांचा समूह तें पल्लव, पल्लवाचा अपभ्रंश तो अपोलो असेंहि मानतां येईल.

मुंबईच्या दक्षिणेस किती तरी दूर अंतरावर मलबार प्रांत असतांना खुद्द मुंबईतील एका टेकडीस 'मलबार हिल' हें नांव तरी कसें पडलें ? दक्षिण हिंदु-स्थानांतील तेलीचेरीपासून चार मैलांवर असलेलें धर्मपट्टण, धर्मपट्टणपासून दक्षिणेस पंधरा मैलांवर असलेलें कोटाकुल आणि अलेप्पीपासून दक्षिणेस दहा मैलांवर असलेल्या पोर्का या तीन ठिकाणच्या मलबारी चाच्यांचा उपद्रव मुंबईस एके काळीं फार होत होता. त्यांचीं जहाजें या टेकडीच्या पायथ्याशीं

हल्लींच्या बॅक्बेच्या उत्तरेस नांगरून पडून असत म्हणूनच तिला मलबार हिल असें नामाभिधान प्राप्त झालें.

मच्छीमार लोकांचें गांव तें माझगांव होय. माजगांवाची व्युत्पत्ति दुसऱ्याहि अर्थानें लावतां येणें शक्य आहे. मराठींत घरच्या मधल्या भागास माजघर असें म्हणतात. 'माजगांव' म्हणचे मधलें गांव. कुलाबा ते माहीम एवढ्या टापूतील मधला भाग म्हणजे माजगांवच होय.

नायगांव हे नयाग्राम, न्यायग्राम याचें अपभ्रष्ट रूप आहे. राणा भीमदेवाचे वेळीं या भागांत त्याचा राजवाडा, न्यायसभा येथेंच होती. न्याय जेथें देण्यांत येतो तें न्यायग्राम——नायगांव होय.

माहीमचे मूळ नांव महिकावती होय. महिकावतीचा इतिहास आपण पुढें पाहाणारच आहोंत. याच महिकावतीचें संक्षिप्त रूप माहीम असें होय एवढेंच येथें नमूद केलें म्हणजे पुरें.

बिंबराजाची राजधानी माहीमला, न्यायसभा नायगांवांत आणि फौजफांटा माटुंग्याला होता. माटुंगा म्हणजे 'मत्तंगस्थान' म्हणजे हत्ती बांधण्याचें ठिकाण.

शींव या नांवावरूनच त्याचा अर्थ उघड होतो. शींव म्हणजे गांवाच्या शिवाराची किंवा गांवाची हद्द. पूर्वीचें मुंबई बेट व साष्टी बेट यांच्या सरहद्दीवरच हें गांव वसलें असल्यानें त्यास 'शींव' हें नांव पडलें.

जुन्या मुंबईबेटापेक्षां वरळीचा भाग थोडा उंचावर म्हणजे वर आहे म्हणून 'वरळी' हें नांव पडलें असावें.

## मुंबईचा प्राचीन इतिहास

मुंबई आणि तिच्यांतील कांहीं विशेषनांवें यांची कुळकथा शोधल्यानंतर आपणांस मुंबईच्या इतिहासाकडें नजर वळविली पाहिजे. मुंबईच्या इतिहासाचे ठोकळ मानानें ( १ ) प्राचीन इतिहास ( २ ) मुसलमानी इतिहास ( ३ ) पोर्तुगीज इतिहास ( ४ ) इंग्रज इतिहास आणि ( ५ ) इंग्रजोत्तर म्हणजे वर्तमान इतिहास असे पांच खंड पाडतां येतात.

मुंबईच्या प्राचीन इतिहासाचें दर्शन आपणांस करून घ्यावयाचें असेल तर

आपणांस खिस्तपूर्व काळांत प्रवेश केला पाहिजे. खिस्तपूर्व २५० च्या सुमारास उत्तर कोंकणावर ठाणें, चौल, सोपारा आदि महत्त्वाचीं ठाणीं होतीं. त्या वेळीं उत्तर कोंकणावर मौर्यांची अधिसत्ता होती. खि. पू. १८५ मध्यें मौर्य साम्राज्याचा ऱ्हास झाला आणि शातवाहनांनीं गोदावरीच्या कांठचा मुलूख एका निशाणाखालीं आणला. या शातवाहनांची सत्ता तीनशें वर्षांहून अधिक काळपर्यंत टिकली. या काळांत नाशिक ते सोपारा आणि जुन्नर–पुणें ते चौल, जंजिरा या मार्गांवर शातवाहनांनीं अनंत लेणीं कोरून ठेवलीं असलीं तरी त्यांचें लक्ष मुख्यत्वेंकरून मुंबई बेटाकडे वेधलें गेल्याचें दिसत नाहीं. कदाचित् त्या काळीं त्याचें एकंदर स्वरूप अगदींच भिकार आणि उपेक्षणीय असेंच असावें.

इ. स. २२० च्या सुमारास शातवाहनांची राजवट संपुष्टांत आली आणि मुंबईसह उत्तर कोंकणावर क्षात्रपांचें राज्य सुरू झालें; तें इ. स. ३०० मध्यें नष्ट झालें. चौथ्या आणि पांचव्या शतकांचा इतिहास अद्यापि फारसा उपलब्ध नाहीं. वैश्यकुलोत्पन्न इंद्रवर्म्याचा मुलगा रुद्रगण नांवाच्या राजानें क्षात्रपासारखीं नाणीं पाडलीं असें इतिहास सांगतो. पांचवे शतकांत त्रैकूटकांची सत्ता नष्ट होऊन मुंबईवर मौर्यांची सत्ता प्रस्थापित झाली. मुंबई व पश्चिम किनारा यावर शंभर वर्षें राज्य केल्यानंतर मौर्यांना दक्षिणेंतील चालुक्यांच्या हल्ल्यांना तोंड देण्याचा प्रसंग आला. इ. स. ५९० मध्यें गोवा व रत्नागिरी सर केल्यानंतर चालुक्यांनीं मुंबईवर हल्ला केला पण मौर्यांनीं मोठ्या शर्थीनें लढून तो परतवून लाविला. तथापि, इ. स. ६१० मध्यें पुन्हां चालुक्यांनीं शेंकडों जहाजानिशीं, त्या काळीं कोंकणच्या राजधानीचें आणि पश्चिम महासागरावरील वैभवशाली शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरी ऊर्फ ठाणें शहराचा ताबा मिळविला. या विजयामुळें इराणच्या आखातांतून पूर्ववत् व्यापारी दळणवळण सुरू झालें. इराणांत त्यांनीं आपली वकिलात पण स्थापन केली.

इ. स. ७५७ पर्यंत म्हणजे जवळ जवळ दीडशें वर्षें मुंबई व त्याचे आसमंतांतील टापू यांवर चालुक्यांच्या नाशिक येथील सरदारांची सत्ता होती. इ. स. ७५७ मध्यें राष्ट्रकूटांनीं चालुक्यांचा पाडाव केल्यानंतर विद्य–

मान नाशिक जिल्ह्यांतील मार्कंडेयाच्या डोंगरावरून राष्ट्रकूट स्वतः मुंबई व कोंकणचा कारभार पाहूं लागले. त्यानंतर इ. स. ८४३ च्या पूर्वी थोडीं वर्षें अगोदर शिलाहार घराण्याकडें मुंबई व कोंकणचा कारभार सोंपविण्यांत आला. इ. स. ८१० ते १२६० पर्यंत शिलाहारांनीं चालुक्याचें मांडलिकत्व पत्करून मुंबई व कुलाबा या टापूंवर राज्य केलें. मध्यंतरींचे काळांत म्हणजे अकराव्या शतकाच्या उत्तरार्धांत ( इ. स. १०७६ ) चालुक्यांचे घराण्यांत भाऊबंदकी सुरूं झाली आणि तिचा तडाखा शिलाहारांनाहि पण बसला. दुसरा सोमेश्वर व त्याचा धाकटा भाऊ सहावा विक्रमादित्य यांचेमधील यादवी–युद्धांत गोव्याचे कदंबाकडून शिलाहार राजाचा वध झाला आणि सर्व कोंकण त्यांचे ताब्यांत गेलें. या पराक्रमानें खचून न जातां ठाणें शाखेच्या आनंददेव शिलाहारानें चौल ते संजाण पर्यंतचा कोंकण मुलूख पुन्हां सर करण्यांत यश मिळविलें ( इ. स. १०९५ ) आणि शिलाहार पुन्हां ठाणें, मुंबई, कुलाबा या कोंकण प्रांताचे अधिपति बनले ( इ. स. ११३६ ).

याच सुमारास गुजराथच्या सोळंकी राजाची नजर कोंकणाकडे वळली. चालुक्य साम्राज्य ऱ्हास पावत असल्याची संधी साधून कुमारपाळ सोळंकीच्या सरदारानें मल्लिकार्जुन शिलाहाराचा पराभव केला व ठाणें-मुंबईवर सोळंकीची अधिसत्ता प्रस्थापित केली ( इ. स. ११६१ ). तथापि हा विजय अल्पकाळच टिकला. इ. स. ११८७ मध्यें दुसरा अपरादित्य शिलाहार यानें पुन्हां ठाणें-मुंबई सर करून शिलाहार राजवट सुरूं केली. इ. स. १२३० पासून देवगिरीच्या यादवांच्या हल्ल्यांना तोंड देणें शिलाहारांना भाग पडलें आणि अखेरीस इ. स. १२६५ मध्यें देवगिरीच्या महादेव यादवाकडून शेवटचा सोमेश्वर शिलाहार समुद्रावर मारला गेला.

## महिकावती ऊर्फ माहीमची स्थापना

या शिलाहार राजवटीचा काळ मोठा भरभराटीचा असा गेला. शिलाहार राजांनीं व्यापारास उत्तेजन दिलें. मुसलमान, ज्यू, पारशी या अन्य धर्मीयांची चौल, संजाण इत्यादि ठिकाणीं वस्ती होऊं लागली. खंबायत ते चौलपर्यंतचा

किनारा अगदीं गजबजलेला असे. त्या राजांनींच अंबरनाथ, वाळकेश्वर येथील मंदिरें बांधलीं.

यानंतरचा इतिहास अगदी त्रोटकच उपलब्ध आहे. इ. स. १२९४ चे सुमारास भीमदेव ऊर्फ बिंबराजा माहीमला आला व त्यानेंच महिकावतीची ऊर्फ माहीमची स्थापना केली (इ. स. १३००) म्हणून राजा बिंबानेंच मुंबईची खऱ्या अर्थानें स्थापना केली असें मानण्यांत येतें.

महिकावतीच्या बखरीवरून मात्र मुंबईच्या इतिहासाच्या घटना थोड्या निराळ्या घडून आल्या असाव्यात असें वाटतें.

जुन्या पालनपूर संस्थानांतील अहिनलवाडपाटण ऊर्फ अहीणलवाडपाटण ऊर्फ पट्टण ऊर्फ पाटण या शहरावर व त्याच नांवाच्या प्रांतावर सोळंकी नांवाचे राजे राज्य करीत होते. त्या प्रांतांतील चंपानीवर ऊर्फ चांपानेर पंचायशी महालांत बिंब या आडनांवाचें क्षात्रिय कुल होतें. पट्टणचे सोळंकी ऊर्फ चौलुक्य यांच्याप्रमाणेंच हें बिंबकुलहि मराठेंच होतें.

## प्रतापबिंबाचें माहीमला आगमन

इ. स. ११३८ मध्यें चांपानेर या छोट्याशा संस्थानांत गोवर्धनबिंब हा राजा राज्य करीत असे. या गोवर्धनबिंबाच्या धाकट्या भावानें म्हणजे प्रतापबिंबानें इ. स. ११३८ सालीं उत्तर कोंकणावर स्वारी करण्याची परवानगी मागितली. इ. स. ११४० च्या सुमारास प्रतापबिंबानें दमणच्या काळोजी सिरण्यावर स्वारी केली. तो ताबडतोब शरण आला. तेथून चाल करीत प्रतापबिंब महिकावतीस ऊर्फ माहिमास आला. तेथें विनाजी घोडेल हा राज्य करीत होता. त्याचा प्रतापबिंबानें पराभव केला. नंतर पुढें बाळकृष्णराव सोमवंशी या आपल्या मुख्य प्रधानास त्यानें वाळकेश्वराच्या दिशेनें पाठविलें. ठाण्याचा यशवंतराव शिलाहार ठार मारला गेला; कळव्याचा कोकाट्या शरण आला. बाळकृष्णराव वेसावें-जुहू करीत वाळकेश्वरीं आला. अशा रीतीनें दमणपासून वाळकेश्वरापर्यंत बिंबोपनामक प्रतापानें समुद्रीय राज्य स्थापन केलें. तें सुमारें शंभर वर्षेंपर्यंत टिकलें. या बिंबघराण्यांतील प्रतापबिंबानें नऊ वर्षें,

महीबिंबानें पासष्ट वर्षें, केशवदेवबिंबानें १२ वर्षें राज्य केल्यावर त्याची गादी त्याचा प्रधान जनार्दन याजकडे गेली. इ. स. १२४१ मध्यें घणदीवीचा वैश्यराजा नागरशा माहीमचा राजा झाला व त्यानें जनार्दनासच प्रधानपद दिलें. नागरशा माहिमास राजमहालीं राहात असे.

नागरशानें जेव्हां प्रथम कोंकणावर स्वारी केली त्या वेळीं त्याचेबरोबर तीन मेहुणे होते. त्यानंतर नागरशास त्रिपुरकुमार नांवाचा पुत्र झाला व तो वयांत आल्याबरोबर बापास राज्यकारभारांत मदत करूं लागला. आपल्या योगक्षेमाची कांहींतरी तरतूद लाविली पाहिजे हें जाणून नागरशाच्या मेहुण्यांनीं त्याच्याकडें ठाणें, मालाड व मरोळ या तीन गांवांची मागणी केली. पण नागरशानें ती फेंटाळून लावली म्हणून नाराज होऊन ते मेहुणे देवगिरीच्या रामदेवराव याधवाकडें आश्रयार्थ गेले. इ. स. १२७१ मध्यें रामदेवरावानें ठाण्यावर स्वारी केली. पण तींत त्याचा पराभव झाला. या रामदेवरावाचा पुत्र बिंबदेव उद्गीर येथें होता. त्यानें साल्हेरमुल्हेर, नंदुरबार, वडानगर बाजूनें इ. स. १२९४ मध्यें ठाणें–कोंकणांत प्रवेश केला. इ. स. १२९४ पासून इ. स. १३०३ पर्यंत तो माहीमप्रान्तांत स्थिरावला होता. त्याने इ. स. १२९५ मध्यें माहीम येथें राजधानी वसविली. इ. स. १३०३ मध्यें बिंब ऊर्फ भीम वारल्यानंतर त्याचा पुत्र प्रतापशा हा गादीवर आला. प्रतापशानें तीस वर्षें राज्य केल्यानंतर चौलचा अधिपति नगरदेव यानें त्याचा खून केला.

## मुसलमानी सत्तेचा उदय

या वेळपर्यंत गुजराथेंत मुसलमानांची सत्ता उदयास आली होती. इ. स. १३१८ मध्यें गुजराथचा पहिला मुबारक शहा यानें माहीम (मुंबई) व साष्टी घेतली. त्यानें मुंबादेवी, महालक्ष्मी यांच्या देवळांची खूपच नासधूस केली व हिंदूंचा अनन्वीत छळ केला.

यानंतर कांहीं वर्षें माहीम–मुंबई–ठाणें आदि कोंकणपट्टीवर नगरदेव याची मोडकळीस आलेली राजवट चालू होती. इ. स. १३४७ च्या सुमारास नाथलाल सिंघा भोंगले नांवाच्या सरदारानें मुसलमानांचें सैन्य मुंबईवर

आणविलें. नगरदेवाच्या गैरहजेरींत त्याच्या राणीनें मुसलमान सैन्याला चांगलेंच तोंड दिलें. भायखळ्याजवळ तुंबळ युद्ध झालें; राणीनें आपल्या पराक्रमाची शिकस्त केली पण अखेरीस याच लढाईंत तिचा वध झाला. मुंबईवर मुसलमानांची सत्ता दुसऱ्यांदां प्रस्थापित झाली. गुजराथच्या सुलतानांची राजवट सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं फिरोजशहानें जाफरखान याची उत्तर कोंकणचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. दिल्लीच्या खिलजी बादशहांनीं माहीम व नवसारी येथें जे दोन सुभेदार नेमले होते त्यांचा कांटा या जाफरखानानें पहिल्या प्रथम काढला व गुजराथच्या सुलतानांना मानणाऱ्या सुभेदाराची तेथें नेमणूक केली. मलिक-उस-शराक नांवाच्या एका गुजराथच्या सरदाराची माहीम येथें योजना करण्यांत आली होती व त्यानेंच माहीमची व्यवस्थित पाहणी, मोजणी करून जमिनमहसुलाची पद्धतहि पण सुधारली. १४ व्या शतकाच्या अखेरीस माहिमांत भंडारी सरदारांनीं बंड केलें; मुसलमानांच्या तुकडीला पळवून लाविलें व माहीमवर आपली सत्ता प्रस्थापित केली.

पण त्यांचा हा विजय अल्प काळच टिकला. इ. स. १४२९ मध्यें अहमदशा ब्रहामनीनें खलाफ हसन बसरी याचे नेतृत्वाखालीं सैन्य देऊन त्याची उत्तर कोंकणावर रवानगी केली. आपला गेलेला मुलूख परत मिळविण्याची ही नामी संधी आहे हें पाहून गुजराथच्या सुलतानांनीं जाफरखानाचें अधिपत्याखालीं भलें मोठें सैन्य दिलें. बसरी आणि जाफरखान या उभयतांचे सैन्यामध्यें खूपच निकराचा संग्राम झाला व त्यांत जाफरखान विजयी झाला. कांहीं वर्षांनीं माहीमचा सरदार कुतुबखान हा मरण पावल्यावर ब्रहामनीनें मागच्या पराभवाचें उट्टें काढण्याकरितां मलिक-उल् तुज्जार या सरदाराच्या अधिपत्याखालीं मोठें सैन्य देऊन त्यास ठाणें-मुंबईवर पाठविलें. ब्रहामनींचा हा हल्ला थोपवून धरण्यास्तव गुजराथच्या सुलतानांनीं आपला मुलगा आणि इफ्तिकार-उल्-मुल्क या नांवाचा एक सरदार अशा उभयतांची माहीमकडें रवानगी केली. मुखलिक-उल्-मुल्क नांवाच्या एका दर्यासारंगाचे अधिपत्याखालीं गुजराथच्या सुल्तानाचें आरमार दीव येथें होतें. तोहि माहिमास

येऊन दाखल झाला. ठाण्यावर जमीन व समुद्र अशा दोन्ही बाजूंनीं मारा सुरू झाला. कोतवाल नांवाच्या एका सरदाराचे नेतृत्वाखालीं ठाण्यांतील शिबंदीनें तीन दिवसपर्यंत मोठ्या शर्थीनें लढा दिला. पण शत्रूपुढें त्याचा टिकाव लागेना. त्यानें ठाणें शहर खालीं केलें. ठाणें पडल्यावर मलिक-उल्-तुज्जारनें माहीमपर्यंत पिछेहाट केली. गुजराथचा राजपुत्र जाफरखान त्याचे पाठीवर होताच. मलिक-उल्-तुज्जारनें माहीम बेटाभोंवतीं कांटेरी झाडा—झुड-पांचें कुंपण घातलें आणि मोठ्या निकरानें लढा दिला; पण त्यांत त्याला अपयशच आलें.

पंधरावें शतकामध्यें गुजराथच्या सुलतानाकडेंच मुंबईचा कबजा होता. पंधराव्या शतकाचे उत्तरार्धांत बहामनी सत्तेला तडे जाऊं लागले. इ. स. १४७८ मध्यें बहादुरखान जिलानीनें दाभोळ सर करून कोंकणपट्टीवर ताबा मिळविला. अहमदनगर येथें आदिलशाही यांची स्थापना झाली व त्यांचेकडून मुंबई व उत्तर कोंकणास उपसर्ग पोहोंचूं लागला. इ. स. १४९३ मध्यें बहादुरखान जिलानीनें गुजराथच्या किनाऱ्यावरील बंदरांना सताविण्यास प्रारंभ केला व माहीमच्या खाडींत आपलें नाविकदलहि पण ठेवले. गुजराथचा सुलतान महंमद बेगडा यानें दाभोळ सर करून बहादुरखान जिलानीचा कोल्हापूरनजिक पराभव केला.

## फिरंग्यांचा उपद्रव

याचा सुलतान महंमद बेगडा याचें राजवटींत मुंबई, साष्टी व वसईमध्यें फिरंग्यांनीं म्हणजे पोर्तुगीजांनीं डोकें वर काढलें.

इ. स. १५०८ च्या डिसेंबर महिन्यामध्यें गोव्याचा पहिला पोर्तुगीज राजप्रतिनिधी ( व्हाइसरॉय ) डॉन फ्रॅन्सिस्कोडी अलिमडा यानें कॅनानूर बंदरांतून १९ गलबतें आणि १६०० सैनिक यांचेसह दीवच्या रोखानें आपलें नौदल हांकारलें. ता. ३० डिसेंबर १५०८ रोजीं त्यांनीं दाभोळची लूट केली. ता. ५ जानेवारी १५०९ रोजीं त्यानें दाभोळ सोडलें तें ता. २१ जाने-

वारी १५०९ रोजीं आपल्या गलबतावर रसद भरून घेण्यासाठीं म्हणून पहिल्या प्रथम वांद्र्याच्या खाडींत आले. यानंतर ता. २ फेब्रुवारी १५०९ रोजीं त्यांनीं दीववर हल्ला करून तें सर केलें. फिरंग्यांनीं दीव येथें किल्ला बांधण्याचा मनसुभा रचिला त्यावेळीं गुजराथच्या सुलतानांनीं त्यांस माहीम (मुंबई) देऊं केलें; पण पोर्तुगीजांनीं तें त्यावेळीं घेतलें नाहीं. इ. स. १५१७ मध्यें डॉम जॉओ डी मन्रोयो यानें पुन्हां नौदलानिशीं माहीमवर हल्ला केला व तेथें सुभेदाराचा पराभव केला. इ. स. १५२२, १५२४, १५२८, १५२९ या काळांतहि फिरंग्यांचा मुंबई व त्याचे आसपासचा टापू यांस सतत उपसर्ग पोहोंचत असे.

इ. स. १५३०–३१ मध्यें पुन्हां फिरंग्यांनीं दीववर हल्ला करण्याचें ठरविलें. गुजराथच्या सुलतानानें दीवच्या सुभेदारास बडतर्फ केलें होतें; म्हणून तो गोव्याचा व्हाइसरॉय न्यूनो डी कुन्हा यास येऊन मिळाला व त्या उभयतांनीं मिळून दीववर हल्ला करावयाचा बेत रचिला. ३६०० सैनिक, १४०० पोर्तुगीज खलाशी, २००० मलबारी व कारवारी लोक, ८००० गुलाम, ५००० देशी खलाशी, ३००० (मस्केटीयर्स) आणि ४०० लहानमोठीं जहाजें एवढ्या मोठ्या प्रचंड सामुग्रीनिशीं फिरंगी मुंबई बंदरांत येऊन दाखल झाले. हल्लींच्या आझाद मैदानावर या सर्व नौदलाची मोठी थोरली कवाईत झाली. या कवाइतीनंतर फिरंग्यांनीं प्रथम दमणवर हल्ला करून तें सर केलें व मग दीववर मोर्चे लाविले. इ. स. १५३१ च्या मार्च, एप्रिल महिन्यांत फिरंगी दर्यासारंग ॲंटोनियो साल्ढाणा यानें घोघा, तारापूर, आगाशी, सुरत सर केली, तर डिगोडी सिल्व्हेरा यानें ठाण्याची लुटालूट केली. इ. स. १५३३ च्या जानेवारीमध्यें न्यूनो डी कुन्हा यानें वसई सर केल्यानंतर मुंबई, माहीम, वांद्रा आदि टापू परकीयांच्या अंमलाखालीं गेला. फिरंग्यांचें हें वाढतें प्राबल्य ध्यानीं घेऊन गुजराथच्या सुलतानांनीं त्यांस वसई, त्याचा समुद्र, बेटें इत्यादि देऊं करून मोगल बादशहाविरुद्ध त्यांची मैत्री संपादन केली. ता. २३ जानेवारी १५३४ रोजीं हा वसईचा तहनामा झाला.

## धर्मवेड्यांची सत्ता

पोर्तुगीजांचा मुंबईवर सुमारें सव्वाशें वर्षेच अंमल होता. या सव्वा शतकाच्या राजवटीचें वर्णन 'धर्मवेड्यांची सत्ता' असेंच केलें पाहिजे. राजसत्ता आपल्या हातीं आल्याचें पाहून फिरंगी पाद्र्यांनीं सारा मुलूख व्यापला, भलेबुरे मार्ग आचरून लोकांना सक्तीनें ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली. माहीम, वांद्रा, शींव, दादर इत्यादि भागांत प्रार्थनामंदिरें उभारण्यांत आलीं. धर्मांतराच्या सक्तीमुळें लोक 'त्राहि भगवान्' झाले. हिंदूंच्या मंदिरांचा आणि मुसलमानांच्या मशिदींचा नाश झाला. या राजवटीमध्यें पाद्र्यांच्या या धर्मछळाचा एवढा विपरीत परिणाम झाला कीं, "हिंदुस्थानांतील आपल्या राजवटीचे जर सर्वांत मोठे वैरी कोण असतील तर ते आपलेच लोक होत" अशी कबुली गोव्याच्या आर्चबिशपला पोर्तुगीज राजाजवळ इ. स. १६२९ सालीं द्यावी लागली.

## मुंबईवर इंग्रजांची नजर

जनतेंतील या असंतोषाचा फायदा स्वाभाविकपणेंच इतर युरोपियन राष्ट्रांनाहि मिळाला. फादर थॉमस स्टिफन्स या पहिल्या इंग्रज पाद्र्याचे पत्रावरून हिंदुस्थानबरोबरच्या व्यापारास फार मोठा वाव आहे असें इंग्रज व्यापाऱ्यांना वाटूं लागलें. इ. स. १५८३ सालीं चौघे इंग्रज गोव्यांत येऊन दाखल झाले. इ. स. १५९३ व १५९६ सालीं कांहीं इंग्रज व्यापाऱ्यांची गलबतें हिंदुस्थानाकडें निघालीं पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. यानंतर इ. स. १६०० सालीं इंग्लंडांत हिंदुस्थानबरोबर व्यापार करण्यासाठीं म्हणून एका व्यापारी संघटनेची स्थापना करण्यांत आली. १६०४ सालीं हॉकिन्स व इ. स. १६१२ सालीं सर हेन्री मिडल्टन याचें नेतृत्वाखालीं इंग्रज व्यापारी सुरतेस येऊन दाखल झाले. सुरतेस फॅक्टरी स्थापन करण्यामध्यें हॉकिन्सला जरी अपयश आलें तरी सर हेन्रीनें मात्र पोर्तुगीजांचे विरोधास न जुमानतां मोगल बादशहाकडून "सुरतेस फॅक्टरी स्थापन करण्यांत यावी" अशी परवानगी मिळविण्यांत यश मिळविलें. इ. स. १६१३ मध्यें स्वालीची लढाई झाली व मग हळूंहळूं इंग्रजांचे पाय हिंदुस्थानांत बळकट रोंविले गेले.

खालीची लढाई झाली त्या वेळेसच इंग्रजांनीं मुंबईचें आरमारी महत्त्व जाणलें होतें म्हणूनच हरएक प्रयत्न करून मुंबई हस्तगत करण्याचा त्यांचा इरादा होता. इ. स. १६२६ सालीं इंग्रज मुंबईंत उतरले आणि त्यांनीं कांहीं घरांची जाळपोळ केली. इ. स. १६३२ सालीं सुरत कौंसिलनें पोर्तुगीजांकडून मुंबई बेट खरेदी करण्यांत यावें, असा ठराव केला. इ.स. १६५४ सालीं ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनीं मुंबई बंदराविषयींचें महत्त्व क्रॉम्वेलचे मनांत बिंबविण्याचा प्रयत्न केला. डचांचें वाढतें प्राबल्य आणि शहाजहानच्या मृत्यूनंतर देशांत निर्माण झालेली अस्वस्थतेची परिस्थिति पाहून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील एकादें महत्त्वाचें ठाणें आपल्याहि ताब्यांत असणें अगत्याचें आहे, असें ईस्ट इंडिया कंपनीस वाटूं लागलें होते. दंडराजापुरी अथवा वेसावें–मुंबई यांपैकीं एकादें ठाणें पोर्तुगीजांचेकडून संपादन करावें असा रिपोर्ट तिनें १६५९ सालींच केला आणि इ. स. १६६१ सालीं इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याचा विवाह पोर्तुगीज राजकन्या इन्फंटा डोना कॅथेराईन हिच्याबरोबर झाला. त्या वेळीं पोर्तुगीजांचेकडून आंदण म्हणून मुंबई बेट इंग्रजांना मिळून त्यांची मनांतील इच्छा पूर्ण झाली.

## इंग्रजांची राजवट

इ. स. १६६१ पासून ता. १५ ऑगस्ट १९४७ सालापर्यंत इंग्रज राजवट हिंदुस्थानांतून नष्ट होईपर्यंत सतत पावणेतीनशें वर्षेपर्यंत मुंबापुरीनें इंग्रजांच्या राज्यांत दिवस काढले. इंग्रजांची राजवट मुसलमान अथवा पोर्तुगीजांचेसारखी धर्मवेडी नव्हती. तिनें धर्माचा आसूड घेऊन प्रजेचा छळ केला नाहीं या गोष्टी खऱ्या, तथापि तिनें एका नव्याच आर्थिक साम्राज्यवादाचा आणि तदनुषंगिक प्रादेशिक पिळवणुकीचा अंगिकार करून मुंबई व हिंदुस्थानवर तीन शतकें अप्रतिहत सत्ता गाजविली. या सत्तेचे हिंदुस्थानवर झालेले भलेबुरे परिणाम, त्यांतून निर्माण झालेली लोकजागृति आणि तिनेंच इंग्रज साम्राज्यशाहीचा केलेला अंत यांचा विस्तृत विचार करण्याचें, अथवा विवेचन करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. तथापि या ब्रिटिश साम्राज्यशाहीचे नाशास

मुंबईनेंहि आपला भरपूर वांटा उचलला आहे एवढें मात्र येथें अवश्य नमूद केलें पाहिजे.

या इंग्रज राजवटीमध्येंच आधुनिक मुंबईचा विशाल पाया घालण्यांत आला असें म्हटल्यास ती गोष्ट अयोग्य ठरणार नाहीं. इंग्रजांकडें ज्या अवस्थेंत मुंबई आली आणि इंग्रजांचे हातून ती गेली या दोन अवस्थांमध्यें केवढी तरी मोठी तफावत आहे. मूळच्या विखुरलेल्या सात बेटांचें एकीकरण झालें व त्यास एक-जिनसीपणा प्राप्त झाला. व्यापार, उद्योग, वाहतूक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक चळवळी, किंबहुना जीवनाच्या प्रत्येक अंग-प्रत्यं-गाची येथें वाढ झाली असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति ठरणार नाहीं.

## मुंबई हातची न जाऊं देण्याचा फिरंग्यांचा निर्धार !

ता. २३ जून १६६१ रोजीं चार्लस दुसरा व कॅथेराईन यांच्या विवा-हाच्या करारनाम्यानुसार पोर्तुगीजांचेकडून इंग्रजांना मुंबई मिळाली खरी पण तिचा ताबा प्रत्यक्ष मिळवीपर्यंत इंग्रजांना नाकीं नऊ आले. अर्ल ऑफ् मार्लबरो व सर अब्राहम शिपमन या दोघा इंग्रजांना मुंबईचा कब्जा घेण्यासाठीं पाठ-विण्यांत आलें. ते उभयतां गोव्याचा पोर्तुगीज व्हाइसरॉय ॲंटोनियो डीमेलो डी कॅस्ट्रो यांचेसहवर्तमान १६६२ च्या सप्टेंबर महिन्यांत मुंबईत येऊन दाखल झाले. त्या वेळचें मुंबईचें एकंदर भिकार स्वरूप पाहून या इंग्रज अधि-कार्‍यांची दारुण निराशाच झाली ! अगदीं भरभराटीस आलेलें मुंबई बंदर आपणांला अनायास मिळालें म्हणून इंग्रजांना प्रारंभीं जो हर्षवायु झाला होता तो बेटाचें एकंदर स्वरूप पाहूनच एकदम ओसरला. " आपणांला पोर्तुगीजांनीं बनविलें ", अशीहि तक्रार करण्यास त्यांनीं सुरुवात केली.

या क्षुद्र आंदणाबद्दल इंग्रज जरी कमालीचे नाराज होते तरी राजाज्ञेप्रमाणें त्यांना मुंबईचा ताबा मिळविणेंच भाग होतें. इकडे पोर्तुगीजांनाहि पण मुंबई हातची जाणार म्हणून एकसारखी रुखरुख लागली होती. " इंग्रज ज्या दिवशीं मुंबई बेटावर पाय टेवील त्या दिवशीं पोर्तुगीजांची हिंदुस्थानांतील सत्ता नष्ट पावली म्हणून समजा " असें ॲंटोनियो ओरडून सांगत होता.

तरी बंदा गुलाम हुकुमाचा ताबेदार या नात्यानें त्यानें पण मुंबईचा ताबा इंग्रजांना देण्याची तयारी सुरू केली.

पण या सत्तांतरांतहि त्यानें बराच घोळ घातला. " इंग्लंडच्या राजेसाहेबांच्या सही-शिक्क्याचें अगदीं अलीकडचें पत्र हवें. पावसाळा संपण्यापूर्वी मुंबईचा ताबा देतां येणार नाहीं ", अशा सबबी त्यानें पुढें केल्या. राजेसाहेबांचें पत्र सर अब्राहाम याचेजवळ होतें. तो मुंबईस एक महिन्यानें येऊन दाखल झाला. मध्यंतरींचे काळांत अर्ल ऑफ मार्ल्बरोस मोठ्या मिनतवारीनें बंदरांत उतरण्याची परवानगी मिळाली पण तीहि आपले सैनिक निःशस्त्र उतरविण्याच्या अटीवरच. सर अब्राहाम मुंबईंत येऊन दाखल झाल्यावर, " आम्हांला पोर्तुगीज राजांचेकडून नेहमीं ज्या मायन्यांत व स्वरूपांत पत्रें येतात तशासारखें हें पत्र दिसत नाहीं. नवें रीतसर पत्र हवें ", अशा नव्याच सबबीवर त्यांनीं मुंबई इंग्रजांच्या हवालीं करण्यांत पुन्हां टाळाटाळ सुरू केली. पोर्तुगीजांचेकडून सुखासुखी मुंबई मिळण्याची आशा समूळ नष्ट झाल्यावर निराश होत्साता अर्ल ऑफ मार्ल्बरो ता. १४ जानेवारी १६६३ रोजीं इंग्लंडकडें निघून गेला आणि सर अब्राहाम शिपमन हा गोव्याचे नजिकच असलेल्या एका बेटावर मुक्काम करून राहिला. या बेटाच्या वाईट हवेचा परिणाम सर अब्राहाम याचे प्रकृतीवर होऊन तो तेथेंच मरण पावला.

सर अब्राहामच्या आजारपणांतच तुम्ही " पोर्तुगीजांचेकडून मुंबईचा ताबा घ्यावा ", असें इंग्लंडच्या राजेसाहेबांचें फर्मान त्याचे नांवें आलें होतें. सर अब्राहामच्या मृत्यूनंतर या हुकुमाची प्रत्यक्ष तामिली कशी करावयाची हा प्रश्न पुन्हां पडला. सर अब्राहाम यानें आपला वारस म्हणून हंफ्रे कूक या आपल्या चिटणीसाची नेमणूक केली होती, पण त्यास सुरतेच्या वकिलातीनें अथवा पोर्तुगीजांनीं तो पावेतों मान्यता दिली नव्हती. म्हणून मुंबई प्रत्यक्ष कोणाच्या हवालीं करावयाची हा प्रश्न उपस्थित झाला. बऱ्याच वाटाघाटी आणि पत्रव्यवहारानंतर ता. १८ फेब्रुवारी १६६५ रोजीं हंफ्रे कूक व पोर्तुगीज प्रतिनिधी यांचेमध्यें डी. इग्नीस डी मिरांडा या बाईचे घरीं

अनुक्रम
विभाग

मुंबईच्या सत्तांतराच्या करारनाम्यावर सह्या झाल्या. मुंबई आंदण दिल्याचा करारनामा आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांचेमध्यें हा जो चार वर्षांचा कालावधि लोटला त्याचा हा असा मनोरंजक इतिहास आहे.

एवढें झाल्यावर देखील पोर्तुगीजांनीं आपली खटपट चालूंच ठेवली. "साष्टी बेट स्वतंत्र आहे, तें मिळणार नाहीं. माजगांव, परळ, वरळी, शींव, धारावी, वडाळा यांचा संबंध माहीम बेटाशीं येतो. मूळ करारनाम्यानुसार तुम्हांला मुंबई बेट दिलें आहे. माहीम बेट स्वतंत्र असल्याकारणानें तें देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं", असा फसवा युक्तिवाद त्यांनीं करावयास प्रारंभ केला. प्रत्यक्ष करारनाम्यांतहि त्यांनीं अशीं कांहीं कलमें घुसडून दिलीं कीं मिळाल्या त्या मुंबई बेटावरहि त्यांचें सार्वभौमत्व सिद्ध होईना. कूकनें कांहीं अपमानास्पद अटी कबूल केल्या म्हणून इंग्लंडच्या राजानें सर गर्व्हीस ल्युकॉस याची मुंबईचा गव्हर्नर व सेनापती म्हणून नेमणूक करून त्यास इकडे पाठविलें. हंफ्रे कूक यानें आपल्या अल्पकालीन कारकीर्दींत परस्थ व्यापाऱ्यांना मुंबईत येऊन स्थायिक होऊन राहाण्याप्रीत्यर्थ उत्तेजन दिले व माहीम, शींव, धारावी आणि वडाळा मूळ मुंबई बेटास जोडण्यांत यश मिळविलें.

## दहा पौंड खंडानें मुंबई घेतली

यापुढील दोन अडीच वर्षें मुंबईचा कारभार इंग्रज राजाच्या नांवें चालला खरा पण त्यांत अनेक कटकटी निर्माण झाल्या. सुरतेच्या वखारीच्या कक्षेंत जो मुलूख येई त्याबद्दल मोगल बादशहा कंपनीस जबाबदार धरी; आणि प्रत्यक्ष मुंबईवर तर कंपनीची कांहींच हुकमत नव्हती. त्यामुळें घोटाळेहि पण निर्माण होऊं लागले. अखेरीस ता. २७ मार्च १६६८ रोजीं कंपनी व इंग्रज सरकार यांचेमध्यें एक करारनामा होऊन वार्षिक दहा पौंड खंडानें मुंबईचा ताबा कंपनीकडे आला. या करारनाम्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी ता. २३ सप्टेंबर १६६८ रोजीं होऊन सर जॉर्ज ऑग्झेंडन हा कंपनीचा पहिला गव्हर्नर म्हणून मुंबईचा कारभार पाहूं लागला.

इ. स. १६६८ पासून इ. स. १८५८ पर्यंत म्हणजे कंपनी सरकारची सत्ता नष्ट होऊन राणीसरकारचा अंमल हिंदुस्थानावर प्रस्थापित होईपर्यंतचा काल म्हणजे हिंदुस्थानांतील स्थित्यंतराचा काल होय. या दोन शतकांचे कालांत इंग्रजांनीं आपल्या सत्तेचा पाया हिंदुस्थानांत दृढ रोविला. मराठेशाही, मोगल बादशाही खलास करून सारा मुलुख एकछत्री अंमलाखालीं आणला. इंग्रजी राजाच्या या विस्ताराचा विचार हा कांहीं या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय नव्हे. केवळ मुंबईच्या इतिहासापुरतेंच बोलावयाचें झालें तर प्रथम इंग्रजांनीं जंजिऱ्याचे शिद्दी, कुलाब्याचे आंग्रे यांचा शेवट केला. प्रारंभीं प्रारंभी मराठ्यांचेबरोबर दोस्तीचे संबंध राखून नंतर त्यांचाहि नाश करण्यास कमी केलें नाहीं.

या काळांत मुंबईची वाढ मात्र सतत एकसारखी होतच राहिली. मि. जिरॉल्ड ऑंजिर याचें कारकिर्दीतील मुंबईचें व तेथील लोकस्थितीचें जें वर्णन उपलब्ध झालेलें आहे त्यावरून मुंबई हें बेट त्या वेळीं ( १ ) कुलाबा अथवा अलओमनीस ( २ ) मुंबई, माझगांव, परळ, माटुंगा, शींव धारावी ( ३ ) कसबा आणि ( ४ ) वरळी अशा चार बेटांचें मिळून झालेलें एक शहर म्हणून समजण्यांत येई. या शहराचे मुंबई व माहीम असे दोन विभाग पाडलेले होते. मुंबई विभागात कुलाबा, मुंबई, माझगांव व परळ आणि माहीम विभागांत माहीम, शींव, धारावी, वरळी यांचा समावेश होई.

इंग्रज व्यापारांत आणि सैन्यांत असत. रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती लोक प्रामुख्येंकरून शेती करीत होते, कित्येकजण सैन्यांत चाकरीस होते आणि कांहीं थोडे व्यापारही पण करीत. मुसलमान लोक खलाशी, विणकर, शिंपी, पावरोटी भाजणारे बेकरीवाले असें होते. बनिये लोक व्यापार व दलाली करीत. ब्राह्मण भिक्षुकी करीत. प्रभु शेती आणि खंड गोळा करीत. शेणवी शेती आणि व्यापार करीत. भंडारी ताडी-माडी गाळीत. कोळी मच्छिमारी करीत कांहीं थोडेसे पारशी होते ते प्रामुख्येंकरून व्यापारांतच होते.

इंग्रजांपूर्वी मुंबईचा व्यापार म्हटला म्हणजे नारळांचा. त्यानंतर मात्र सुरत, भडोच, खंबायत, दाभोळ, केळशी, राजापूर इत्यादि ठिकाणीं त्यांचें व्यापारी

दळणवळण सुरू झालें आणि मीठ, नारळ, सुपारी, तांदूळ, हस्तीदंत, कापड-चोपड इत्यादि वस्तूंचा व्यापार सुरू झाला.

इ. स. १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध समाप्त होईपर्यंत कंपनीसरकारचा मुंबईवर अंमल सुरू होता. या राजवटींत तिनें शिद्दी, आंग्रे आणि मराठेशाहीचा नाश केला. मुंबईचें महत्त्व क्रमाक्रमानें वाढतच होतें. या काळांतील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या अशा दोन घटनांचा निर्देश करणें अगत्याचें आहे. कान्होजी आंग्रे यांचेबरोबर इंग्रजांच्या चकमकी सुरू असतांना रामा कामत यानीं फितूर होऊन इंग्रजांचेविरुद्ध कारवाया केल्या म्हणून त्यांचा अमानुष छळ करण्यांत आला. रामा कामत हे कंपनीच्या विश्वासांतील असें एक वजनदार गृहस्थ होते. तरीहि इ. स. १७१८ सालीं त्यांनीं कान्होजी आंग्र्यास पत्र लिहून मुंबईची समग्र माहिती दिली असा आरोप त्यांचेवर करण्यांत आला. रामा कामत यांच्या कारकुनाचा भयंकर छळ करण्यांत येऊन त्याचेकडून सक्तीचे कबुलीजबाब घेण्यांत आले. राजद्रोहाच्या आरोपावरून रामा कामत यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्यांची सुमारें ४०,००० रुपये किंमतीची मालमत्ता जप्त करण्यांत आली. दादबा नांवाच्या एका भंडाऱ्यासहि पण अशी शिक्षा सुनावण्यांत आली. इंग्रज राजवटीविरुद्धचा पहिला बंडखोर म्हणून रामा कामत यांचा मोठ्या अभिमानानें उल्लेख केला पाहिजे.

दुसरी घटना म्हटली म्हणजे १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांतील होय. उत्तरेंत बंडाचा वणवा भडकला असतांना मुंबईकर इंग्रजांना जिवाची काळजी वाटणें स्वाभाविकच होते. त्या काळीं मि. फोर्जेट नांवाचा एक इंग्रज पोलीस अंमलदार होता. बंडवाल्यांना साहानुभूतीपर असें कोणी बोलूं लागला कीं ताबडतोब त्याची उचलबांगडी होई. गंगाप्रसाद नांवाचे एका गृहस्थाचे घरीं कांहीं शिपाई एकत्र जमून बंडाचा कट शिजवीत असल्याची बातमी ऐकल्याबरोबर मि. फोर्जेटनें गंगाप्रसादच्या घरास गराडा देऊन शिपायांची धरपकड केली. या शिपायांपैकीं दोघांजणांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें आणि बाकीच्या

शिपायांना जन्मठेप काळ्या पाण्याच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. पहिल्या स्वातंत्र्ययुद्धांतील मुंबईचे हेच दोन हुतात्मे होत !

## मुंबईची विलक्षण वाढ व तिचीं कारणें

इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर मुंबईची विलक्षण वाढ झाली. इ. स. १६८० सालीं सर वॉल्टर फ्रियर याचे अमदानींतच आधुनिक मुंबईचा प्रारंभ झाला असें मानण्यांत येतें. इ. स. १८५३ चे शेवटीं शेवटीं मुंबई-पासून ठाण्यापर्यंत हिंदुस्थानांतील पहिली रेल्वे सुरू झाली. इ.स. १८६३ च्या एप्रिल महिन्यांत बोरघाट सुरू झाला. इ. स. १८६० ते इ. स. १८६४ पर्यंत बी. बी. सी. आय. रेल्वे क्रमाक्रमानें मुंबईस येऊन दाखल झाली. इ. स. १८६९ सालीं सुवेझ-कालवा सुरू झाल्याकारणानें परदेशाबरोबरचा व्यापार सुकर झाला आणि अनेक परदेशी आगबोट कंपन्यांचीं जहाजें मुंबई बंदरांत येऊन नांगरूं लागलीं. इ. स. १८७० सालीं सुवेझ ते मुंबईपर्यंतची पहिली समुद्रान्तर्गत केबल टाकण्यांत आली. वाहतुकीच्या या जलद साधना-बरोबरच आणखी एक कारण असें घडून आलें कीं त्यामुळें मुंबईची कमालीची वाढ झाली. तें म्हटलें म्हणजे अमेरिकेचें यादवी-युद्ध होय. अमेरिकन यादवी-युद्धामुळें अमेरिकेंतून विलायतेस जाणाऱ्या कापसाची निर्यात एकाएकीं खंडित झाली आणि हिंदी कापसाला एकदम मागणी येऊन,बाजार तेजींत आला.नागपूर, गुजराथ, वऱ्हाड आदि कर्नाटक भागांतील कापसाला विलक्षण भाव आला. मुंबईच्या गोद्या कापसाच्या गांसड्यांनीं भरून गेल्या, त्यांची परदेशाकडे द्रुत-गतीनें रवानगी होऊं लागली. मालाची प्रत पाहण्यास, भाव ठरविण्यास लोकांना मुळीं उसंतच नव्हती. " भाव येतो आहे ना, करा मग कापूस निर्यात. मग तो कसाहि असला तरी चालेल " असा एकच विचार मुंबईकर बनियांच्या दलालांच्या डोक्यांत घट्ट ठाण देऊन बसला होता. चुटकीसरसें श्रीमंत होण्याची किमया त्यांना लाभली होती. नव्या नव्या कंपन्या निघाल्या, त्यांचे शेअर्स भलत्या भावांत विकले जाऊं लागले; मुंबईच्या घराघरांतून सोन्याचा धूर निघूं लागला.

इतक्यांत अमेरिकन यादवी थांबली. लिव्हरपूल बाजारांतील कापसाच्या किंमती कोसळल्या. मुंबईतील सटोडियांचें धाबें दणाणलें; कंपन्यांनीं दिवाळीं काढलीं, बँका बंद पडल्या; तात्पुरत्या तेजीमुळें मुंबईकरांच्या डोळ्यांवर जी धुंदी चढली होती ती ताडकन उतरली.

मुंबापुरींत लक्ष्मीचा संचार सुरू असतांना मात्र तिच्या वैभवाचा पुरेपूर उपयोग करून घेण्याच्या योजना आंखल्या जात होत्या. जुन्या मुंबईत मैलापाण्याच्या निकालाची कांहींच सोय नव्हती. वाढत्या लोकवस्तीस वास्तव्यासाठीं म्हणून असंख्य निवासस्थानांची वाण होती. पण ती उभारण्यास जागेचीच चणचण होती म्हणून सर वॉल्टर फ्रियरनें कोटाभोंवतींची जुनी तटबंदी पाडून टाकून बरीच मोकळी जागा तयार केली. समुद्र मागें हटवून अपोलो बंदर ते फ्रियर रेक्लमेशनपर्यंतचा पांच मैलांचा टापू, आणि कुलाबा ते मलबार हिलपर्यंतचा भू-प्रदेश संपादन केला. समुद्र मागें हटविण्यापर्यंतच्या या योजनेमुळें मुंबईच्या भू-विस्तारांत चार चौरस मैलांची भर पडली. एस्प्लनेड, हॉर्न्बी, कॅर्नाक, मस्जीद व एलफिन्स्टन पूल हीं कामेंहि पण याच कालांत पुरीं झालीं.

## राष्ट्रसभेचा जन्म

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर कंपनी सरकारची राजवट संपुष्टांत येऊन राणीसरकारच्या नांवें ग्वाही फिरविण्यांत आली आणि वर वर पाहाणाऱ्यांना इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानांत अधिक दृढमूल झाल्याचें दिसून आलें. तथापि, या घटनेनंतर अवघ्या पाव शतकाचे आंतच राष्ट्रसभेचा जन्म झाला आणि तीच राष्ट्रसभा इंग्रज राजसत्तेच्या मुळावर आली. इंग्रजी राज्याचे सुपरिणाम जसे झाले तसेच दुष्परिणामहि पण झाले. या दुष्परिणामांचा निरास सनदशीर मार्गानें करून घेण्यास्तव ह्यूम, वेडनबर्ग, बॅनर्जी प्रभृति इंग्रज व हिंदी लोकनेत्यांनीं हिंदी राष्ट्रसभेची स्थापना केली. या संघटनेच्या जन्मग्रामाचाहि पण मान मुंबईसच मिळाला. वस्तुतः हिंदी राष्ट्रसभेचें पहिलें अधिवेशन इ. स. १८८५ सालीं पुण्यास भरावयाचें, पण त्या वेळीं प्लेगनें पुण्यास कहर उडविल्याकारणानें अगदीं ऐन वेळीं पुण्याऐवजीं मुंबईस हें अधिवेशन भरविण्याचा

निर्णय घ्यावा लागला आणि ता. २८ डिसेंबर १८८५ रोजीं गोवालिया टँकवरील गोकुळदास तेजपाल हॉलमध्यें हें अधिवेशन पार पडलें. इंग्रज राज्यकर्ते आणि हिंदी जनता यांचेमधील परस्पर संबंधांत अगदीं निराळेंच वळण या घटनेनें लागलें.

राष्ट्रसभेच्या स्थापनेनंतरची, मुंबईच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाची घटना म्हटली म्हणजे, असहकारितेच्या घोषणेची. पहिल्या महायुद्धाचे काळांत श्री. मोहनदास करमचंद गांधी यांनीं हिंदी राजकारणांत प्रवेश केला. श्री. गांधी यांनीं आपल्या ऐन तारुण्यांत दक्षिण आफ्रिकेंतील गोरे विरुद्ध गोरेतरांच्या लढ्यांत जातीनें भाग-घेऊन निःशस्त्र प्रतिकाराचें-सत्याग्रहाचें नवतंत्र निर्माण केलें होतें. सत्याग्रहाच्या नवतंत्राकडे हिंदी जनता अधिकाधिक आकृष्ट होऊं लागली होती आणि याच शस्त्राचे जोरावर आपण हिंदी जनतेला पारतंत्र्यांतून सोडवूं शकूं असा जबरदस्त आत्मविश्वास श्री. गांधी यांना वाटूं लागलेला होता. म्हणून ता. १ ऑगष्ट १९२० रोजीं लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचें मुंबईसच देहावसान झालें त्याच दिवशीं श्री. गांधींनीं लोकमान्यांचे पुण्यात्म्यास साक्षी ठेवून असहकारितेची घोषणा केली.

आतांपर्यंत मुंबई शहराचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास आपण वाचला असालच परंतु याहीपुढें या आदर्श नगरीची घडण घडविण्यांत कोणकोणत्या गोष्टी प्रामुख्यानें कारणीभूत झाल्या त्यांचा मनोज्ञ व श्रुतिरंजक इतिहास जाणून घेण्यास आपण उत्सुक झाला असालच !

लक्षांत राहण्यास कठीण अशीं सकृत्दर्शनीं वाटणारीं अनेक नांवें वेगवेगळ्या रस्त्यांना व विभागांना कशीं पडलीं हा इतिहास मोठा मनोरंजक आहे. त्याचा अभ्यास केल्यास जीं निरनिराळीं कारणें सांपडतात **त्याचें वर्गीकरण खालीलप्रमाणें करतां येईल :**

( १ ) नैसर्गिक विभाग.

( २ ) शेतीवाडी.

( ३ ) जलाशयें.

(४) विशिष्ट भागांत होत असलेला विशिष्ट व्यवसाय.

(५) आदिवासी लोक.

(६) सतराव्या शतकांत व त्यानंतर आलेल्या लोकांच्या वसाहती व त्यांचे व्यवसाय.

(७) मागाहून आलेले लोक.

(८) धर्मस्थानें.

(९) श्रीमंत वसाहतिकांच्या राहाण्याचीं ठिकाणें.

(१०) प्रसिद्ध अधिकारी, इंजिनिअर, शिक्षणतज्ज्ञ, उद्योगपति यांच्या नांवांवरून मुंबईच्या रस्त्यांचीं नांवें ठेवण्याचीं कला पूर्णपणें विकसित झाली होती. याच्या पुराव्यासाठीं 'दुभाष गल्ली' (दुभाष लेन), 'प्रेम–कुंज' (लव्ह ग्रोव्ह) सारखीं नांवें सूचक आहेत.

(११) सतराव्या शतकापूर्वीच्या जमीनदारावरून पडलेलीं नांवें.

या विभागाचा परिचय करून देतांना एका ठळक गोष्टीकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक वाटतें.

अनेक वेळां हल्लीचे उत्साही नगरपिते राजकारणामुळें रस्त्यांचीं नांवें बदलण्यांत फार उत्साह दाखवतात पण ही वृत्ति शहराच्या इतिहासावर अत्याचार करणारी आहे. 'शहराचा इतिहास भावी पिढीसाठीं जतन केला पाहिजे' असें कांहींचें मत आहे तर कांहींचें मत असें आहे कीं, 'जुन्या गुलामीचा इतिहास अगदीं पुसून टाकावा, रस्त्यांचीं नांवें बदलावीत, सर्व पुतळे उचलून (राष्ट्रीय पुढाऱ्यांचे सोडून) म्युझियममध्यें नेऊन ठेवावेत'. परंतु हें मत-प्रदर्शन व त्याचें व्यावहारिक दृष्ट्या मूल्यमापन खात्रीनें कमी होणें हें क्रम-प्राप्तच आहे. मुंबईच्या रस्त्यांचा, कांहीं विभागांच्या नांवांशीं भूतकाळांत घडलेल्या गोष्टींवरून कसा संबंध येतो हें नमूद करणें रास्तच होईल.

या बेटांच्या सभोंवतालच्या कांहीं खडकांवरून व इतर साधनांवरून यांचा आरंभकाल निश्चित करतां येत नाहीं. एल्फिन्स्टन व फ्रियरचा काळ हा मुंबई-

च्या विकासाचा व भरभराटीचा होऊन गेला. 'मुंबईच्या इतिहासांतील तें सुवर्णयुग होतें !' हा काळ म्हणजे प्रसिद्ध शिल्पकार, इंजिनिअर व उद्योगपतींच्या कसोटीचा काळ होता. समुद्राच्या कांठीं भरणी घालून वाढलेल्या प्रदेशावर नव्या रस्त्यांची आंखणी करून व पुनर्रचनेची योजना अंमलांत आणून कोळी, आगरी सारख्या जातींच्या लोकांची वसाहत असलेलीं हीं लहानशीं बेटें भारतांतील एक पुढारलेलें शहर म्हणून पुढें आलीं तें केवळ त्यांनीं केलेल्या श्रमाचें फळ होय.

मुंबईचीं सात बेटें खालीलप्रमाणें होतीं :

( १ ) कुलाबा ( २ ) अलओमानीस ( ३ ) मुंबई ( मध्य टापू ) ( ४ ) माझगांव ( ५ ) परळ ( ६ ) माहीम ( ७ ) वरळी.

लहान लहान खाड्यांमुळें हीं सात बेटें एकमेकांपासून विभक्त झालेलीं होतीं. मधल्या खोलगट जमिनीवर भरतीचें पाणी येत असें. हळूहळू गाळ व रेती यांनीं खाडीचा भाग भरून आला. खोलगट भागावर रेती पसरत गेली व मानवी बुद्धि व सामर्थ्यानें हा सबंध भाग राहाण्यास योग्य व उपयुक्त असा केला.

## ( १ ) कुलाबा :

या बेटाचा लांब टोंकदार भाग समुद्रांत पसरलेला होता. भरतीच्या वेळीं कुलाबा व अलओमानीस या बेटांवर समुद्राचें पाणी येत असे. या बेटांवर कोळी लोकांची वस्ती होती व ते लोक मच्छिमार करून आपला चरितार्थ चालवीत.

## ( २ ) अलओमानीस :

येथील कोळी लोक जवळच्या खोल अशा समुद्रांत मासे मारण्यास जात म्हणून या बेटांचें नांव अलओमानीस असें पडलें. नंतर म्हातारीचें बेट ( Old Women's Island ) या नांवानें तें ओळखलें जाई. दोरखंडाच्या व मचव्याच्या साहाय्यानें इतर बेटांत ये जा होत असे. कुलाबा व या बेटांमधील अंतर हळूहळू भरून निघालें. १८३४ मध्यें कुलाबा हें बेट

मुख्य बेटाशीं कॉजवेनें जोडण्यांत आलें. हा बांध १८६३ त पुन्हां बांधण्यांत आला. कुलाबा कॉजवे, कोळी गल्ली व कोळी लोकांची वस्ती हे अवशेष अजूनहि शिल्लक आहेत. कुलाब्याचीं कांहीं विशिष्ट ठराविक स्थळें येणेप्रमाणें :

दीपगृह, पायलट बंदर, कॅरनॅक बंदर, व्हिक्टोरिया बंदर, गन् कॅरेज बंदर, आर्थर बंदर, युरोपियन बरॅक, कॉनॉट क्लब व वेड्यांचे इस्पितळ. इ. स. १८४४ सालीं जुनें कॉटन ग्रीन कुलाब्यावर नेण्यांत आलें व त्याच्या शेजारी ट्राम डेपो बांधण्यांत आला.

**( ३ ) मुंबई** ( बंदर व मूळ शहर )

अलओमानीस बेटावरून मुंबई बेटावर दृष्टिक्षेप केल्यास तें इंग्रजी H च्या आकाराप्रमाणें दिसे. त्याच्या पश्चिमेस विशाल मैदान व पश्चिम टोंकाला भूशिर, पूर्वेस खोलगट जमीन व ईशान्येस टेंकड्यांची रांग होती. त्याच्या दक्षिण किनाऱ्यावर पाल्याचे झुपके व झाडी होती. यावरून या भागास पाला-पालवा बंदर असें नांव पडलें व पुढें इंग्रजांचें अमदानींत तें अपोलो बंदर म्हणून ओळखलें जाऊं लागलें. पश्चिमेकडील विशाल मैदानांत ताड व चिंचेचीं झाडें होतीं. या झाडींत भंडारी व आगरी लोक राहात. मागाहून या मैदानाचें नांव 'एस्प्लनेड' म्हणून पडलें. कूकनें सुरू केलेलें व सर ग्रेनें चालू ठेवलेल्या 'फोर्ट' ला अपोलो गेट, चर्च गेट, व बझार गेट असे तीन दरवाजे होते. जुन्या किल्ल्याच्या विशिष्ट भागांवरून पडलेलीं बेरॅक, बेस्टन, रेव्हलीन इत्यादि नांवें तत्कालीन 'फोर्ट' ची आठवण करून देतात.

इ. स. १८४४ पर्यंत कॉटनग्रीन हें हल्लींच्या एल्फिन्स्टन सर्कल बागेजवळ होतें. इ. स. १६७५ नंतर चर्च बांधण्यास सुरुवात झाली व इ स. १७१८ त त्याचें उद्घाटन करण्यांत आलें. मेनडाम पॉइंट (१६७२), आइस हाउस (१८४६), मापलापोर (१६७६) हीं स्थळें मुख्य बेटाच्या दक्षिणेकडील प्रसिद्ध ठिकाणें म्हणून ओळखलीं जातात.

इ. स. १६७५ पूर्वी टाउन हॉल नव्हता. १६७७ त मापलापोरचा टाऊन हॉल म्हणून उपयोग करीत. तदनंतर म्हणजे इ. स. १८१२ पर्यंत

रामा कामत यांच्या घराचा उपयोगहि टाउन हॉल म्हणून करण्यांत आला. शेवटीं इ. स. १८३३ सालीं हल्लींचा टाउन हॉल बांधण्यांत आला.

इ. स. १६७० मध्यें कचेऱ्या स्थापन झाल्या. इ. स. १६७६ मध्यें ऑन्गीरनें गन बो स्ट्रीटमध्यें मुख्य न्यायालयाची स्थापना केली. इ. स. १७२० पर्यंत न्यायालयाचें सर्व कामकाज याच ठिकाणीं चाले.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत चलन-पद्धति संमिश्र स्वरूपाची होती. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनें टांकसाळ बाधण्याचा ठराव मांडला व बहुमतानें तो मंजूर होऊन १८२५ त बांधकाम सुरू झालें. १८३० मध्यें शिक्के वगैरे पाडण्यांत आले व १८६४ मध्यें टांकसाळीचें बांधकाम पूर्ण झालें व साधन-सामुग्रीहि वाढविण्यांत आली.

हल्लीं ज्याला आपण कस्टम्स हाऊस म्हणून म्हणतो तें इ. स. १६५५ मध्यें बांधलें. इ. स. १७७० सालीं फोर्बससारखे सरकारी नोकर तेथें राहात. व्हार्फ बंदर व गेटवे दोन्ही जवळ जवळ होती. समुद्रमार्गें येणाऱ्यास उतरण्याचें तें एक प्रमुख ठिकाण होते. मूळ शहर व फोर्ट मधील पश्चिमेकडील मैदान ' एस्प्लनेड ' म्हणून ओळखलें जाई. त्याचा विस्तार थेट समुद्रकिनाऱ्यापर्यंत होता. किनाऱ्याला लागून चालणें म्हणजे अत्यंत जोखमीचें होतें.

मलबार पॉइंटपर्यंत लांबलेला किनारा—बॅक बे म्हणून ओळखला जाई व सध्यांहि त्याचें तेंच नामाभिधान आहे. वर कोठें कोठें गटारें होतीं. १५७५ मध्यें सोनापूर खुलें झालें. ख्रिस्ती लोकांचें कबरस्थान इ स. १७६० मध्यें पाद्री बरोचें गोडाउन म्हणून ओळखलें जाई. पुढें चार मोठ्या रस्त्यांचें एकत्रीकरण होऊन तें ठिकाण ' चौपाटी ' म्हणून ओळखलें जाई. लहान लहान मचवे याच ठिकाणीं आपला माल उतरीत व त्यास लकडी बंदर म्हणत.

' मुंबई ' बेटांतील आंतील टापू अत्यंत सुपीक असा होता. भंडारी, आगरी व इतर लोकांच्या तेथें वाड्या होत्या व कांहींचीं शेतेंहि होतीं. खेतवाडी, कांदेवाडी, केळेवाडी, जांभुळवाडी, पिंपळवाडी, पोफळवाडी, बोरभाट व मुगभाट हीं नांवें वरील विधानास पूरक अशींच आहेत. पश्चिमेकडील

टेंकडीच्या पायथ्याजवळील वसाहत गिरीग्राम व तेंच इल्लीं गिरगांव म्हणून उल्लेखिलें जातें. तेथें ग्रामदेवी--गांवदेवीचें मंदीर होतें.

मुख्य टापूच्या मध्य भागांत मारवाडी व गुजराथी व्यापारी राहात. त्यांचीं घरें काळबादेवीच्या दोन्ही बाजूस होतीं. कोट विभागांत जाणारे लोक येथें उत-रून आपले पाय वगैरे धूत असत म्हणून त्या विभागास पायधुणी हें नांव पडलें. जरा पुढें कांहीं अंतरावर भेंडीवाडी होती यावरून भेंडीबाजार हें नांव पडलें. शेजारींच खाडी होती व तिच्या कांठीं उंबराचीं पुष्कळशीं झाडें होतीं व लोक तिला ' उमरखाडी ' म्हणूं लागले. पूर्वेकडे डोंगरी व खडकाळ भाग होता व एक जेल होता. पूर्वेकडील समुद्र किनाऱ्यांतर्गत चिंचेचीं बरींच झाडें होतीं यावरून या भागास ' चिंचबंदर ' हें नांव पडलें.

डोंगरी विभागांत मुसलमान, पारशी, भंडारी व कोळी या लोकांची वस्ती होती. या बेटाच्या पश्चिमेकडे मलबार हिलवर दाट जंगल होतें. तेथें मलबारी चांचे लोक राहात. मलबार पॉइंटच्या अन्तिम टोंकाला एक दगडी चिराड—श्रीगुंडी होती. श्री छत्रपति शिवाजी, सरदार आंग्रे व रघुनाथराव पेशवे यांतून गेले होते. नंतर सैनिकांसाठीं येथें रक्षणस्थळें बांधण्यांत आलीं. बाणगंगा तलावाजवळील वालुकेश्वर मंदिराचे कांहीं खांब शिलाहार युगाचे अवशेष होत. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला येथें ' विल्डर नेस्त ' व ' बी हाइव्ह ' हे दोन बंगले होते. सर रिचर्डसन टेंपल यानें आपलें निवासस्थान परळहून मलबार पॉइंटला आणलें. टेंकडीवरून खालीं उतरावयाला एक वाट (सिरी रोड) होती. जवळच बाभळीचीं अनेक झाडें होतीं. तेथेंच नंतर बाबुलनाथ हें दुसरें मंदिर बांधण्यांत आलें. हा डोंगर संपतांच दुसरी एक टेंकडी होती. या टेंकडीच्या शेजारील तळ्यांत पुष्कळ कमळें मिळत त्यावरून त्या टेंकडीला कंबाला—खंबाला हिल हें नांव पडलें.

**( ४ ) माजगांव :**

फिग–क्रीक ( अंजीर-खाडी ) च्या मागें माजगांव बेट होतें. या बेटांत एक लहानसें खेडें होतें. तेथें भंडारी व आगरी लोकांनीं लावलेली अंजीरवाडी व

ताडवाडी अशा दोन वाड्या होत्या. पश्चिमेकडील खोलगट जमीन हळुहळु राहाण्यालायक झाली. आगरी लोकांच्या वसाहतींत नागाचें एक मंदिर होतें. त्याच विभागाला हल्लीं आपण नागपाडा असें म्हणतो. याच आगरी जमातीची दुसरी मोठी वसाहत 'आग्रीपाडा' वायव्येस होती. उत्तरेस पुढें गेल्यास भाया नांवाच्या आग्र्याचें खळें होतें. त्यावरून त्या जागेला 'भायखळा' ही संज्ञा प्राप्त झाली. पुढें पुढें चिंचेचीं दाट झाडें होतीं. आज त्या जागेस 'चिंचपोकळी' म्हणून म्हणतात. पूर्वेकडे उंच जागेवर एक सुंदर बंगला होता. भंडारवाडा टेंकडीवर प्रसिद्ध 'बेल वेडोर' बंगला होता. या बंगल्याशीं अनेक प्रेमकथा निगडीत आहेत. १७६५ ते १७६८ ते १७७२ चे दरम्यान तेथें एलायझा ड्रेपर राहात असे. १८६४ त हा बंगला जमिनीस भर घालण्यासाठीं पाडण्यांत आला. माजगांव टेंकडीच्या उतारावर "बेल मौंट" बंगला होता तेथून सुंदर दृश्य दिसत असे. दुसऱ्या एका उंच टेंकडीवर 'मार्क हाउस' होतें. समुद्राच्या पाण्याखालील खडकापासून लहान मचव्यांच्या बचावासाठीं या बंगल्याला सफेत रंग देण्यांत आला होता. इ. स. १७५८ मध्यें श्री. बायफीलनें हा बंगला भाड्यानें घेतला. माजगांवांतील दुसरा प्रसिद्ध बंगला म्हणजे बमनजी वाडियाचा ( १७५८ ते १८१६ होता १८११ त तेथें सर जेम्स मॅकिन्टॉश राहात असे.

## ( ५ ) परळ :

'माझगांव' या बेटाच्या मागच्या बाजूस हें बेट होतें. राजा भीमदेवाबरोबर जे लोक आले ते येथें स्थायिक झाले. त्यांनीं आपलीं घरें व देवळें येथें बांधलीं. येथें एक महादेवाचें मंदिर आहे. 'न्यायग्राम' जेथें भीमदेवाचा दरबार होता ते मचव्यांसाठीं प्रसिद्ध होते. पूर्वेकडील लहान टेकडीवर शिवाचें मंदिर होतें व हें ठिकाण शिववाडी — शिवडी — म्हटलें जाऊं लागलें. उत्तरेकडे वडाच्या झाडांची दाटी होती म्हणून या भागाला लोक 'वडाळा' म्हणूं लागले. जवळच पश्चिमेस हत्तींचा तबेला ( मातंग आलय ) होता. हे तबेले राजा भीमदेवाच्या हत्तींचें होते व आज या जागेला 'माटुंगा' असें संबोधण्यांत येते.

अंतिम सीमेवर असलेलें गांव शींव ( सीमा ) होय. आज पण ' शींव ' या नांवावरून तत्कालीन कल्पना येते. तेथें एक कॉजवे —डंकन कॉजवे— आहे. हा रस्ता मुंबईचा त्या वेळचा गव्हर्नर जोनाथन डंकन ( १७९५ ते १८११ ) याच्या हुकुमावरून बांधला गेला. १७९७।९८ त तो बांधण्यास सुरुवात झाली व १८०३ ते १८०५ चे दरम्यान तो पूर्ण झाला.

**( ६ ) माहीम :**

माहीम हें सहावें बेट होय. राजा भीमदेवाची राजधानी महिकावती, पण आज त्याचे कांहीं एक अवशेष शिल्लक नाहींत. मात्र माहीम नांवांत त्याची स्फूर्ति आहे. भीमदेवानें एके काळीं या भागाचा फार विकास केला होता. इ. स. १८४५ मध्यें माहीम व वरळीमधल्या खाडीवर बांधावरील रस्ता ( कॉजवे ) तयार करण्यांत आला, त्याचा सर्व खर्च श्रीमान् जमशेटजी जिजिभॉय् यांनीं सोसला व त्या वेळेपासून रस्त्याचें नांव जमशेटजी जिजिभॉय् असें पडलें. दादरला या नांवाचा रस्ता या बाईची आठवण करून देतो.

**( ७ ) वरळी :**

माहीमच्या दक्षिणेचें शेवटचें बेट म्हणजे ' वरळी '. तेथील वडांच्या झाडां-मुळें ' वरळी ' हें नांव त्या विभागाला ठेवण्यांत आलें. कांहीं विद्वान लोकांच्या मतें त्याचें नांव 'वरली' ( वरचें ) पडलें, कारण मुख्य बेटाच्या उत्तरेकडे हें बेट आहे. या बेटावर कोळ्यांची वसाहत होती. वरळी व महालक्ष्मीच्या मध्यें खाडी होती व त्यामुळें माझगांव व मुख्य बेटाच्या सखल भागांत समुद्राचें पाणी येत असे. हॉर्न्बीच्या आधीं तेथें बांध बांधून रस्ता बांधण्यांत आला होता. पण तो समुद्राच्या पाण्यानें मोडून पडला. दुसरा बांध हॉर्न्बी वेलार्ड—हॉर्न्बी नांवावरून १७७६—१७८० त बांधण्यास प्रारंभ होऊन इ. स. १८८४ त पूर्ण झाला.

## आदिवासी व नंतर झालेल्या वसाहती

**( १ ) कोळी :**

खिस्ती युगाच्या प्रारंभापूर्वी कोळी जातीचे लोक येथें येऊन राहिले व बहु-

तेक तेच येथील पहिले रहिवासी होत. हे लोक काळे, चपळ व द्राविडी वंशाचे होते. लहान लहान झोंपड्यांमधून हे लोक राहात व समुद्रावर मच्छिमार करीत. कुलाबा, अलओमानीस, मांडवी, डोंगरी, नायगांव, शींव, माहीम व वरळी येथें या लोकांच्या वसाहती होत्या.

या समाजाच्या वस्तीच्या ठळक खुणा म्हणून वरील प्रत्येक भागांत "कोळीवाडा" नांवाचें एकादें ठिकाण अजूनहि सांपडेल. मुंबई या मुख्य बेटांत या लोकांची मोठी वसाहत कावेल (कलवार) अजूनहि आहे. जवळच असलेल्या कोलभाट व कोळ्याची वाडी (फणसवाडींतील) अद्यापहि त्यांची आठवण करून देतात. हळुहळू या भागांत येणाऱ्या नवीन नवीन लोकांत ते मिळून गेले.

बोरीबंदरजवळील फांसी तलाव (Gibber Pond) च्या मागें देवी मुंबा (महा-अंबा) चें मंदिर होतें हें मंदिर मुबारकचा (१३१७–१३२०) पराभव झाला त्या वेळीं पुन्हां बांधलें गेलें. पण १७६६ त किल्लेबंदी झाल्याकारणानें तें दुसरीकडे नेण्यांत आलें. माजगांवांत 'घोडपदेव' नांवाचें दुसरें मंदिर होतें. आजहि त्या विभागाला 'घोडपदेव' म्हणतात.

(२) आगरी :

या भागांत दक्षिणेकडून आगरी लोक हे वसाहत करण्याकरितां मागाहून आले. त्यांनीं या भागांतील जमिनी नांगरण्यास व त्यांची मशागत करण्यास सुरुवात केली व अल्पावधींतच केळी, फणस, जांभूळ इत्यादि झाडें लावून बागा तयार केल्या. मुंबई या मुख्य बेटाच्या सखोल भागांतील महालक्ष्मी या विभागांत त्यांची सर्वांत मोठी वसाहत होती. परळ भागांत ठाकूर व भोई या जाती व त्यांच्या पोटजाती स्थिर झाल्या. परळला आजहि ठाकूरवाडी व भोईवाडा हे विभाग अस्तित्वांत आहेत. आगरी समाजाच्या इतर लहान लहान व किरकोळ वसाहती एस्प्लनेड व मलबार हिलच्या झाडींत होत्या.

राजा भीमदेवाबरोबर प्रभु, पांचकळशी, पळशीकर व इतर भिन्न भिन्न जातींचे लोक येथें आले.

**( ३ ) ब्राह्मण :**

भीमदेवाबरोबर आलेल्या ब्राह्मणांनीं परळला भीमदेवाच्या दरबाराजवळ. राहावयास सुरुवात केली. त्या विभागांत ब्राह्मणांचा विस्तार आजदेखील 'बामणाळी' म्हणून ओळखला जातो. तेथें एक महादेवाचें मंदिर बांधण्यांत आलें. मंदिराच्या सभोंवतालचा प्रदेश परळी ( वैजनाथ ) महादेवास्मृतिप्रीत्यर्थ 'परळी' म्हणून ओळखला जाऊं लागला व आजहि लोक त्यास 'परळ' म्हणूनच ओळखतात.

**( ४ ) भंडारी :**

शेषवंशी किंवा भंडारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जातीच्या लोकांनीं या बेटावर सर्वत्र ताडांचें वृक्षारोपण केलें. आजहि भंडारवाडा, ताडवाडी, दोन ताड, सात ताड ह्या त्यांच्याच स्मृति होय. कमल टेकडी ( खंबाला हिल ) च्या पायथ्याशीं त्यांच्या पूज्य देवाचें मंदिर होतें. हा विस्तार म्हणजे आजचें ताडदेव होय.

**( ५ ) प्रभू :**

शिलाहार युगांत कांहीं प्रभू येथें येऊन राहिले असावेत कारण शिलाहार राजाचे हे अधिकारी होते. राजा भीमदेवाबरोबर आलेले प्रभू माहीमला येऊन राहिले. त्यांतील बहुतेकांचा व्यापारी पेशा होता. प्रभादेवीचें मंदिर बांधण्यास त्यांनीं सहाय्य केलें. फिरंगीच्या काळांत हे महसूल वसूल करीत.

सोमवंशी पांचकळशी हे सुदृढ लोक म्हणून ओळखले जात व इतरांप्रमाणें त्यांनींहि परळला आपली वसाहत स्थापन केली.

**( ६ ) शेणवी :**

शेणवी लोक व्यापारी पेशाचे व कलेंत निपुण होतें. त्यांच्या वंशजांनीं, वाळकेश्वर, बाबुलनाथ व भुलेश्वर हीं मंदिरें बांधण्यास आपल्या कलेचा यथार्थ उपयोग केला. आजहि 'शेणवीवाडी' ही त्यांच्या मूळ वसाहतीची निदर्शक आहे.

### (७) मुस्लिम :

'मुस्लिम युग' दरम्यान कोंकणी मुसलमानांचे पूर्वज माहीमला राहात होते. कांहीं कोंकणी मुसलमान डोंगरी भागांत राहात. फिरंगी लोकांच्या आधिपत्याखालीं वाडीबंदरजवळ त्यांच्या कांहीं वाड्या होत्या व मुख्य बेटावरहि त्यांच्या कांहीं वसाहती होत्या.

### (८) धेड (भंगी) :

डॉ. गारसीया डा. आर्टाच्या माहितीप्रमाणें वसईला 'डेर' नामक लोक राहात. हे 'डेर' म्हणजे गुजराथी लोक ज्याला 'धेड' म्हणतात तेच होत. हा वर्ग नीच व हलक्या जातीचा होता व लोक या वर्गाकडे तिरस्कारानें पाहात. दुसऱ्याच्या घरांतील मैला (मल-मूत्र) घेऊन जाण्याचें काम हे लोक करीत व याच व्यवसायासाठीं फिरंगी लोकांच्या काळांत शींव, परळ, माजगांव व मुख्य बेटावर ते लोक राहात.

### (९) मागाहून आलेले लोक :

मुसलमान व फिरंगी लोकांच्या कडक अमदानींत मुंबई बेटावर फार थोडे लोक येऊन राहिले. इंग्रजांनी सत्ता हस्तगत केल्यानंतर व कंपनीच्या स्वाधीन हीं बेटें केल्यानंतर त्यांच्या उदार राजनीतीमुळें अनेक लोक येथें स्थायिक झाले.

### (१०) पारशी :

सुमारें इ.स १६७५ मध्यें मुंबईच्या मुख्य बेटावर कांहीं पारशी कुटुंबें राहात होतीं. फ्रायरनें मलबार हिलवरील 'दमखा' चा उल्लेख केला आहे. मोदी हिरजी वाच्छानें या समाजासाठीं १६७१ त एक अग्यारी बांधली.

### (११) वाणी :

१६७७ त इतर व्यापाऱ्यांबरोबर नमा पारेख हे मुंबईला आले व धोबी तलावाजवळ येऊन राहिले. त्या भागाला वाणियावाडी म्हणून ओळखतात. रूपजी धनजी व काटेवाडांतील इतर वाणी इ. स. १६५६ मध्यें येथें येऊन राहिले.

**( १२ ) आर्मेनियन :**

आर्मेनियम व्यापारी फोर्टच्या ज्या विभागांत येऊन राहिले त्या विभागाला आर्मेनियन स्ट्रीट असें संबोधण्यांत येतें.

**( १३ ) कामाठी :**

मुंबई बेटावर हे लोक १८ व्या शतकांत येऊन राहिले. हे लोक मोल-मजुरी करून आपला चरितार्थ चालवितात. त्यांचें राहाण्याचें स्थान आज पण त्यांच्याच नांवावरून ओळखलें जातें. हॉर्नबी वेलॉर्डच्या कामामुळें या लोकांस येथें वसाहत स्थापन करण्यास उत्तेजन मिळालें.

**( १४ ) बेनेइस्राईल :**

मुंबई इंग्रजांच्या हातांत गेल्यानंतर हे लोकं येथें आले. आज पण त्यांची पूर्वींची राहाण्याची जागा इस्राईल मोहोल्ला म्हणून प्रसिद्ध आहे.

अशा प्रकारें फ्रायर मुंबईत आला त्या वेळीं मुंबईची लोकवस्ती ६०,००० होती. इ. स. १८८६ पर्यंत ठाणें व चेऊलहून विणकर ( रेशीम विणणारे ) मोठ्या प्रमाणांत आले. आजहि त्यांचेच नांवावरून मुंबईतील चेऊलवाडी प्रसिद्ध आहे.

इ. स. १८३८ मध्यें चिनी लोक या बेटावर आले व अद्यापहि कामाठी-पुरा विभागांत ते वस्ती करून आहेत.

## व्यापार

( अ ) मुंबईतील कांहीं रस्त्यांचीं नांवें त्या भागांत चालणाऱ्या व्यापारा-वरून पडलीं आहेत उदाहरणार्थः—

अत्तरगल्ली, भांगवाडी, भाजीपाला लेन, भातबाजार, चणाशेरी, चंदनवाडी, चिंधीगल्ली, घासगल्ली, चोर बाजार ( १८८३ त हा भाग कोटांत होता ), कॉटनग्रीन ( एल्फिन्स्टन सर्कल ), गुलालवाडी, हमाम स्ट्रीट, काथ्या-बाजार, खांडबाजार, खोकाबाजार, कोळसा मोहोल्ला, जव्हेरी बाजार, मिरची गल्ली, मोदीखाना, मटन स्ट्रीट, पानगल्ली, प्ले हाउस, थिएटर रोड, तवा स्ट्रीट तेलवाडी, शेअरबाजार इत्यादि

( ब ) व्यापारासाठीं निरनिराळ्या जातींचे लोक येऊन राहिल्यामुळें त्या जातींच्या नांवांवरून रस्त्यांचीं नांवें पडलीं. तीं अशीं:—भोईवाडा, बोराबझार चांभार बाग, गोला स्ट्रीट, हजाम गल्ली, धोबीवाडा, कसाई मोहोल्ला, कासार गल्ली, पिंजारा गल्ली, शिंपी चाळ, सुतार चाळ, लोहार चाळ, कुंभार तुकडा, चोर गल्ली, व छाकटावाडी,

## राज्यकर्त्यांच्यावरून पडलेलीं नांवें

( अ ) ' मुंबई ' हें प्रांताचें राजधानीचें शहर असल्यामुळें येथें मोठे सरकारी अधिकारी, राजकारणी पुरुष, उद्योगपति, डॉक्टर, साहित्यिक, शिक्षणतज्ञ, समाजसेवक, आदींचा मुंबईस लाभ झाला व त्यांचीं नांवें रस्ते, उद्यानें, पूल, कॉजवे, रेल्वे स्टेशनें, शिक्षणसंस्था, खेळांचीं मैदानें आदींना लाभलीं.

* मुंबईतील, भूतपूर्व गव्हर्नरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कांहीं रस्त्यांना त्यांचीच नांवें देण्यांत आलीं. तीं येणेंप्रमाणें :

ह्यूजिस, हॉर्नबी, मेडोज, डंकन, नेपियन, एल्फिन्स्टन, क्लेअर, ग्रान्ट, कार्नाक, आर्थर, क्लार्क, फॉकलंड, फ्रेअर, वुडहाउस, फर्ग्युसन, रे, हॅरिस, सँडहर्स्ट, नॉर्थकोट, लॅमिंग्टन, विलिंग्डन व ब्रेबॉर्न इत्यादि.

* म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे चेअरमन, प्रमुख व मेयर यांनीं केलेल्या सत्कार्यामुळें त्यांचें स्मरण राहावें म्हणून कांहीं रस्त्यांना त्यांचीं नांवें देण्यांत आलीं. तीं अशीं :

हेन्री, हेनकॉक, मंडलिक, साउटर, खोटे, मेहता, मूरलॅन्ड, मर्झबान, सायानी, इब्राहीम रहीमतुल्ला, रेज्ज वाच्छा, बारभाया, विगास, दाभोळकर, विठ्ठलभाई पटेल, देशमुख इत्यादि :

## * कांहीं म्युनिसिपल कमिशनरांची यादी ( नांवें )

पेडर, ऑलीवन्ट, अॅक्वर्थ, हार्वे, शेफर्ड व कॅडेल.

( ब ) मुंबईची वस्ती जसजशी वाढूं लागली तसतशी येथील श्रीमंत लोकांनीं जमीन घेण्यास सुरुवात केली. कांहींनीं येथें येऊन पैसा मिळविला व

जमिनी खरेदी केल्या. अशा हिंदु, मुसलमान, पारशी व ख्रिस्ती जमीनदारांच्या नांवांवरून कांहीं विभागांना नांवें मिळालीं अशांचीं नांवें येणेप्रमाणें :

अब्दुल रहेमान, अंतोबा, आनंदराव, भास्कर, बाळाराम, बापू खोटे, बाबा ढबु, बेहेरामजी, होमजी, कॉवसजी पटेल, घोघा, धनजी, डुंगरिया, दादी संतोक, होर्मसजी कूपर, जिजिभाई दादाभाई, जीवाजी माणेकजी जहांगीर, खंबाटा, जीवन कीका, गोवर्धनदास, खटाव, माणेकजी मिस्त्री, नारायण दाभोळकर, मेरवानजी पांड्ये, मोरोबा पोपट, सुखलाजी, बनातवाला, विश्वनाथ झावबा इत्यादि.

( क ) घरें, धर्मशाळा, पुतळे इत्यादि :–

कांहीं जुनीं घरें, त्यांत राहाणाऱ्या प्रसिद्ध व्यक्तींमुळें प्रसिद्धीस आलेलीं आहेत. त्यांचीं नांवें अशीं : बी हाईव्ह, विल्डरनेस, ब्रीच, हर्मिटेज, टँकर व्हिला, बेलवेडर, खंबाला हॉटेल वॉटसन हॉटेल, ॲडेल्फी. इ. स. १८५० च्या सुमारास मलबार हिलवर दोन प्रसिद्ध बंगले होते, त्यांचीं नांवें बी हाइव्ह व विल्डरनेस हीं होत.

मुंबईचे सरसेनापती जनरल वॉट मलबार हिलवरील ‘ विल्डरनेस ’ मध्यें राहात असत. मलबार हिलवरील एका रस्त्यास त्यांचेंच नांव देण्यांत आलें आहे.

भंडारवाडा हिलवर बेल्वेडोर हा बंगला होता. श्रीमती ड्रेपर या बंगल्यांतून पळून गेल्या होत्या. यावरून अजूनहि तेथील एका रस्त्यास त्यांचेंच नांवें संबोधण्यांत येतें.

हर्मिटेज बंगला गोवालिया टँक, पेडर रोड या भागांत असल्यामुळें तो भाग हर्मिटेज म्हणून ओळखला जाई. सर चार्लस चेंबर्स, डॉ. डग्लस व सर विश्वनाथ मंडलीक येथें राहात. वॉर्डन रोड व वेलॉर्ड रोडच्या जंक्शनवर ‘ ब्रीच ’ नांवाचा एक बंगला होता. कांहीं लोक ब्रीच-कँडी नांवाशीं याचा संबंध जोडतात पण तें खरें नव्हे.

* मुंबईंतील कांहीं प्रसिद्ध क्लबांच्या नांवांचाहि कांहीं रस्त्यांशीं निकटवर्ती

संबंध आहे. भायखळा क्लबवरून त्या रस्त्यास क्लब रोड हें नांव पडलें. प्राचीन मुंबईचे कांहीं प्रसिद्ध क्लब्स म्हणजे बॉम्बे क्लब, रॉयल ऑल्फ्रेड यांचा क्लब, रिपन क्लब, कार्लेटन क्लब इत्यादि. गोवालिया टॅंकजवळ खंबाला हॉटेल नांवाचें एक प्रसिद्ध हॉटेल होतें. हल्लीं त्या हॉटेलची इमारत म्हणजे पारशी जनरल हॉस्पिटलचा तो एक भाग आहे.

१८७० मध्यें वॉटसनने एक इमारत बांधली व तेथें एक हॉटेल सुरू केलें. तें काळा घोड्यासमोर होतें. हल्लीं त्यास एस्प्लनेड मॅन्शन म्हणतात.

१८६० पूर्वी माजगांवचे 'हॉप हॉल' बड्या पाहुण्यांच्या मनोरंजनाचें सुंदर ठिकाण होतें. बेलासीस रोड व डंकन रोडच्या संगमावरील 'ॲडेल्फी' इ. स. १८५९ मध्यें बांधलें. प्रसिद्ध पालनजी डोसा हे त्याचें मालक होतें.

कांहीं धर्मशाळा, आरोग्यधाम (सॅनिटोरियम) व मुसाफरखाने फार प्रसिद्ध होते व त्यावरूनच तेथील लोकवस्तीचा भाग ओळखला जाई. हिराबाईच्या नांवावरून बांधलेल्या भागास हिराबाग म्हणून संज्ञा दिली गेली. धर्मशाळेवरून त्या भागाची ओळख पटते.

ज्या थोर व्यक्ति मुंबईच्या औद्योगिक, शैक्षणिक व सामाजिक विकासास कारणीभूत झाल्या त्यांचे संगमरवरी, प्लॅस्टरचे व ब्रॉंझचे पुतळे उभारण्यांत आले. त्यावरून तो तो भाग ओळखला जातो.

घोड्यावर स्वार झालेले राजे एडवर्ड यांचा पुतळा बोएमनें १८७६ मध्यें तयार केला व आल्बर्ट ससूननें तो मुंबईस भेट दिला. त्या पुतळ्यावरून (Statue) तो भाग "**काळा घोडा**" म्हणून आजहि प्रसिद्ध आहे.

करसनजी माणेकजींचा पुतळा पूर्वी बेलासिस रोड व डंकन रोडच्या नाक्यावर होता; नंतर तो भायखळा पुलावर हलविण्यांत आला. बेलासिस रोड व डंकन रोडच्या केंद्रबिंदूवर आजहि तो पुतळा "**खडा पारशी**" या नांवानें प्रसिद्ध आहे.

## जलाशयें

मुंबईच्या सागरी बेटांवर नैसर्गिक तळीं होतीं. परंतु जसजशी वस्ती वाढत

गेली तसतसा पाण्याचा प्रश्नहि उभा राहिला. श्रीमंत लोकांनीं व जमीनदार वर्गांनीं त्यासाठीं अनेक विहिरी व तळीं बांधलीं व बांधवून घेणाऱ्यांचे स्मृति-प्रित्यर्थ त्या त्या तळ्या-विहिरींवर नांवें घालण्यांत आलीं. आज जरी त्या वेळच्या विहिरी व तलाव आस्तित्वांत नाहींत तरी त्यांचीं नांवें मात्र अजरामर झालीं आहेत.

मेजर कॉविलच्या रिपोर्टवरून १९२८ मध्यें ९० तळीं व गिरण भागांतील २१२ धरून २४२९ विहिरी मुंबईंत होत्या. या रिपोर्टाच्या आधीं अनेक विहिरी बुजवल्या गेल्या होत्या. शेफर्डच्या मतें त्यानंतरहि १२३२ विहिरी बुजवल्या गेल्या.

## कांहीं प्रसिद्ध तलाव

बाणगंगा, बाबुला तलाव, कॉवसजी पटेल तलाव, धोबी तलाव, गोवालिया (टँक) तलाव, गोपी तलाव, हंसाळी तलाव, जांभळी तलाव, गिल्डर तलाव, खांडीचा तलाव, मस्तान तलाव, नबाब तलाव, नाखोदा तलाव, फांसी तलाव, सांखळी तलाव. बाणगंगा तलावासंबंधीं अनेक दंतकथा प्रचलित आहेत. जे. जे. हॉस्पिटलजवळील बाबुला तलाव १८४९ मध्यें बांधला गेला. इ. स. १९०० मध्यें तो बुजविला गेला.

इ. स. १७८० त शहराच्या मध्यभागीं सी. पी. टॅन्क बांधलें. त्यांतील पाणी आटत गेल्यामुळें फ्रामजी कॉवसजीनें मुगभाटकडून पाणी आणण्याचा प्रयत्न केला.

डंकन रोडजवळील दोन टांकी हीं दोन लहान लहान जलाशयें होतीं. श्री. सुखलालजी सुलेमानजींनीं १८२६ मध्यें तीं बांधिलीं. यांत नळ आणून पाणी वाढविण्याचा प्रयत्न फ्रामजी यांनी केला.

फ्रामजी कॉवसजीनें इ. स. १८३१ मध्यें '**धोबी तलाव**' बांधविला, या तलावाचा उपयोग म्युनिसिपल कचेरीपासून जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्च्या भागांतील सर्व धोबी लोक करीत. बोरीबंदरच्या टापूंत धोबीघाट होता. मैदा-

नावर मिलिटरीच्या विहिरी होत्या. भाजीपाल्याचे बाग व इतर बागाहि होत्या. अजूनहि ' किचन गार्डन लेन ', वरील गोष्टीचें स्मरण करून देते.

खंबाला हिल्च्या पायथ्याशीं दोन तळीं होतीं. त्यांतील एक गोवालिया तलाव. त्याचा उपयोग प्रामुख्यानें गवळी लोक करीत. तो तलाव १९१२ मध्यें बुजविण्यांत आला.

हल्लींच्या बोरीबंदरजवळ ' गिब्रेट पाँड ' किंवा ' फांसी तलाव ' होता. मुंबादेवीचें मूळ मंदीर तेथें होतें. खुनी लोकांना येथें फांशीं देण्यांत येत असे. १८०५ मध्यें गिब्रेट या ठिकाणीं होता.

आजचें मुंबादेवीचें तळें पुतळीबाई नांवाच्या हिंदु बाईनें इ. स. १८३० मध्यें बांधविलें. पुढें १८५६ मध्यें महंमदअल्ली रोगे यांनीं ' नाखुदा ' तलाव बांधविला.

मुंबईतील कांहीं रस्त्यांचीं नांवें अनेक विहिरीवरून देखील पडलेलीं आहेत. ' गनबो ' स्ट्रीटवरील ' गनबो विहीर ' फार प्रसिद्ध होती.

रामलाल नांवाच्या एका मारवाड्यानें एक विहीर मैदानाच्या दक्षिण भागांत बांधविली. तिचें पाणी पिण्यासाठीं दूरदूरचे लोक येत असत. अजून देखील हायकोर्टाकडे जाणारे लोक या विहिरीचें पाणी पिऊन आपली तहान भागवितात.

मुंबईत अनेक प्रेक्षणीय कारंजी आहेत. त्या कारंज्यांच्या नांवांवरून तो तो विभाग ओळखला जातो. त्यांपैकीं प्रसिद्ध कारंजीं येणेप्रमाणें होत —

(१) वेलिंग्टन फाउंटन (१८६५)
(२) फ्लोरा फाउंटन; रतनशी मूळजी फाउंटन (१८९४)
(३) केशवजी नायक फाउंटन (१८७६)
(४) हेन्री मेमोरियल फाउंटन (१८७८)
(५) बमनजी वाडिया फाउंटन (१८८०)
(६) फिटजी रॉय फाउंटन, व जनरल जेकब फाउंटन (१८६७)

# धार्मिक स्थळें

निरनिराळ्या जातींचे लोक मुंबईत जसजसें येत गेले तसतशीं त्यांनीं आपल्या जातींचीं धर्मस्थानें ( देवालयें ) बांधलीं. त्यांतील कांहीं देवालयें येणेप्रमाणें होत :

हिंदूंचीं प्रमुख देवालयें :—वाळकेश्वर, महालक्ष्मी, प्रभादेवी, बाबुलनाथ, गांवदेवी, काळबादेवी, ठाकुरद्वार, मुंबादेवी, भुलेश्वर, दुर्गादेवी, नागदेवी व घोडपदेव.

**वाळकेश्वराचें** मूळ मंदिर मलबार हिलच्या दक्षिण टोंकाला कोंकणच्या शिलाहार राजानें १३ व्या शतकांत बांधविलें. कांहीं लोकांच्या मतें **बाबुलनाथ मंदिराचें** नांव त्याच्या सभोंवतीं असलेल्या बाभळीच्या झाडांवरून पडलें व कांहींच्या मतें ज्यानें तें बांधविलें त्याच्याच नांवावरून तें पडलें. इ. स. १८४० मध्यें या मंदिराचें बांधकाम पूर्ण झालें. हल्लींचें मंदिर १९०० मध्यें बांधलें.

प्रभू बाळाजी भिकाजीनें **गांवदेवी** मंदीर बांधले व बापूजी म्हात्रे यांनीं १६६१ नंतर तींत मूर्तीची स्थापना केली. हें मंदीर टेंकडीच्या पायथ्याशीं असून ' लिलावती ' देवीची त्यांत स्थापना झाली व सभोंवतालचा भाग गांवदेवी म्हणून ओळखला जाऊं लागला.

रस्ता रुंद करण्यासाठीं सरकारनें १९ व्या शतकांत **काळबादेवी** मंदिर पुन्हां बांधविलें. इ. स. १८३६ पूर्वी गिरगांवांतील ठाकूरद्वार मंदिर बांधलें गेलें.

जुन्या ' फांसी तलावा' जवळ मूळ **मुंबादेवीचें** देवालय होतें. कोळी लोकांच्या मुंबा – आई यावरूनच मुंबई हें नांव पडलें असावें. इ. स. १७३७ सालीं किल्ल्याचा विस्तार वाढविण्यासाठीं हें देवालय मोडण्यांत आलें व पांडू सोनार नांवाच्या गृहस्थानें त्याची प्रस्थापना हल्लींचे जागेंत केली.

**भुलेश्वर मंदिर :**

कांहीं लोकांच्या मतें कोणा परदेशी भैय्याच्या नांवावरून व कांहींच्या मतें भोलिया कोळ्याच्या नांवावरून हें नांव आलें. हल्लींचें मंदीर १८३० मध्यें बांधण्यांत आलें. मूळ मंदिराची स्थापना २०० वर्षांपूर्वीच झाली.

दुर्गा व नाग पूजकांनीं **दुर्गादेवी** व **नागदेवी** हीं मंदिरें बांधविलीं.

मच्छिमारी लोक घोडपदेव मंदिराचा खर्च भागवीत असत. या भागांतील कोळी व भंडारी लोकांनीं मिळून या मंदिराची उभारणी केली.

या बेटावर राहाणाऱ्या मुसलमान लोकांनींहि अनेक मशीदी बांधल्या त्यांतील प्रमुख म्हणजे — जुम्मा मशीद, रातवाड मशीद, जकेरिया मशीद, इस्माईल हबीब मशीद, शेख मिश्री व मामा हाजी दर्गा वगैरे.

**जुम्मा मशीद** — ही सर्वांत जुनी मशीद इ. स. १८०२ मध्यें बांधली गेली. इ. स. १८३७ मध्यें महंमदअली रोग यानें त्याच्या दुरुस्तीचें काम करवून घेतलें.

मशीदबंदरजवळील सात ताड भागांत सात ताड मशीद आहे. खडकजवळ हाजी जकेरियानें जकेरिया मशीद बांधली. वडाळयाजवळ शेख मिश्रीचा दर्गा आहे. याचप्रमाणें सय्यद बद्रुद्दीन, निजामुद्दीन व आशिकशाहाच्या मशीदी आहेत. हॉर्नबी वेलॉर्डच्या टोंकाला मामा हाजियानी मशीद आहे.

माहीमच्या पूर्व टोंकावर मखदुम फकीह अलीचा दर्गा आहे. त्याची गणना येथें आलेल्या सुरुवातीच्या मुस्लिम राजांचा अवशेष म्हणून करण्यांत येते. इ. स. १४३१ मध्यें शेख अलि पारु—मखदुम फकीह मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूनंतर लौकरच मशीद बांधण्यांत आली. इ. स. १६७४ त तिची दुरुस्ती करण्यांत आली व १७४८ त सुधारणा करण्यांत आली.

इतर जातींच्या मानानें ख्रिस्ती लोकसुद्धां मागें नाहींत. इ. स. १५३४ मध्यें अन्तोनिओ दो पार्टोनें सेंट माईकेल चर्च बांधलें. त्यानंतर अनेक वेळां त्याची पुनर्रचना करण्यांत आली.

इ. स. १५९६ मध्यें बोरीबंदरजवळ 'एसपरनका' चर्च फ्रेंच लोकांनीं बांधलें. इ. स. १७६० मध्यें त्याचा नाश झाला व क्रॉसजवळ तें पुनः बांधण्यांत आलें. १८०३ मध्यें भुलेश्वर येथील कबुतरखान्याजवळ पुन्हां बांधण्यांत आलें. परंतु थोड्याच वर्षांपूर्वी तें पाडून टाकण्यांत आलें.

इ. स. १५७२ पासून ग्लोरिया चर्च हें डिसोझा कुटुंबाचें चर्च होतें.

त्यानंतर १५९६ मध्यें तें पाद्रीच्या स्वाधीन करण्यांत आलें व इ. स. १७९४ मध्यें त्या भागांत तें एकमेव मुख्य चर्च बनलें. १९१२ मध्यें भायखळा स्टेशन-समोर तें पुन्हां बांधण्यांत आलें.

फ्रान्सिस्कनांनीं परळ येथें चर्च बांधलें व १६२० मधें जेसुइटांनीं तें ताब्यांत घेतलें. १६६५ मधें त्याचा नाश झाला. इ. स. १७१९ मधें सरकारनें त्याचा कब्जा घेतला व सरकारी निवासस्थान (Government House) म्हणून वापरलें. नंतर १८८५ मधें सर जेम्स फर्ग्युसनच्या अमदानीनंतर सरकारी निवासस्थान म्हणून त्याचा उपयोग बंद झाला. हल्लीं तेथें 'हाफ्किन इन्स्टिटयूट' आहे.

इ. स. १६७५ पर्यंत इंग्रजांचें एकहि चर्च नव्हतें. त्यानंतर फोर्ट चॅपल हें इंग्रजांचें चर्च बनलें. सर ऑक्सेंडेननें चर्च बांधण्यास सुरुवात केली. जिरॉल्ड ऑन्गीरनें इ. स. १६७२ व १६७४ मध्यें कंपनी सरकारशीं वाटाघाटी चालू केल्या. सर जॉन चाईल्ड गव्हर्नर असतांना (१६८१–१६९०) बांधकाम जोरांत चालू झालें. रेव्हरंड रिचर्ड कोब १७१४ मधें मुंबईस आले. १७१५ मध्यें त्यांनीं प्रथम उपदेश केला. अखेर चार्लस बूचनें १७१८ त चर्चचें उद्‌घाटन केलें. ज्या रस्त्यावर हें देऊळ आहे त्याचें नांव, किल्ल्याच्या ज्या दरवाज्याजवळ हें देऊळ आहे त्याचें नांव व शेवटीं बांधण्यांत आलेल्या रेल्वे स्टेशनचेंसुद्धां नांव यावरून पडलें. (चर्चगेट)

पारशी लोकांचे पण आतश बेहराम व दमखा आहेत. १६७५ मध्यें डॉ. फ्रायरनें लिहिलेल्या पत्रांत पारश्यांच्या दमखांचा उल्लेख आहे. इ. स. १६७२ व १६७५ च्या दरम्यान पहिलें 'दमखु' बांधण्यांत आलें. इ. स. १६७२ किंवा १६७३ मध्यें तें मोदी हिरजी वाच्छानें बांधलें. माणेकजी शेटचें 'दमखु' १७५० च्या सुमारास बांधलें. अंजुमनचें १७७९ मध्यें बांधलें. बनाजीचें 'दमखु' १८३२ त बांधण्यांत आलें व बिस्नीचें १८४४ त वाळ-केश्वराच्या बंगल्यांत १८८६ मधें मंचरजी रेडीमनीनें बांधविलें व १७९८ मध्यें तेथेंच दादीशेट घराण्याचें दमखु बांधलें.

१७०९ मध्यें बमनजी लिमजीने कोटांतील अग्यारी बांधविली.

यावरून दिसून येते कीं प्रत्येक जातीच्या व धर्माच्या लोकांनीं मुंबईच्या रस्त्यांच्या व स्थळांच्या नांवानें आपला वांटा उचलला आहे.

**मुंबईची स्थापना, वाढ, संपन्नता यांना कारणीभूत झालेल्या कांहीं प्रमुख व्यक्ति :**

( १ ) राजा दुसरा चार्लस ( १६३०–१६८५ )

( २ ) राणी कॅथेराईन ( १६३८–१७०५ )

( ३ ) सर माउण्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ( १७७९–१८५९ )

( ४ ) सर हेन्री बार्टल एडवर्ड फ्रीयर, बॅरोनेट ( १८१५–१९०४ )

( ५ ) डॉ. रामकृष्ण विठ्ठल लाड, भाऊ दाजी ( १८२१–१८७४ )

( ६ ) सर जॉर्ज खिस्तोफर मोल्सवर्थ बर्टवुड, के. टी ( १८३४–१९१७ )

( ७ ) सर जमशेटजी जिजिभॉय् ( १ ला बॅरोनेट ) ( १७८३–१८५९ )

( ८ ) सर आदमजी पीरभाई, जे. पी. ( १८४६–१९१३ )

( ९ ) सर करीमभाई इब्राहीम ( १ ला बॅरोनेट ) ( १८४०–१९२५ )

( १० ) रेव्ह. डॉ. जॉन विल्सन ( १८०४–१८७५ )

( ११ ) दोस्त महंमद अल्लाना ( १८६८ ते १८९९ )

( १२ ) आगाखान नामदार इमाम आगा हसनअली शाह-अल-हुसेनी ( १८०० तें १८८१ )

( १३ ) आगाखान नामदार इमाम आगाअली शाह-अल-हुसेनी २ रा ( १८३१ ते १८८५ )

( १४ ) डॉ. आत्माराम पांडुरंग ( १८२३–१८९८ )

( १५ ) ॲक्टन स्मी आयर्टन ( १८१६–१८८६ )

( १६ ) सर जॉर्ज ऑर्थर बॅरोनेट ( १७८४–१८५४ )

( १७ ) सर जोसेफ अर्नाल्ड ( १८१४–१८८६ )

( १८ ) सर इब्राहीम रहिमतुल्ला कादर,

( १९ ) एडवर्ड हॅमिल्टन ॲटकिन ( १८५१-१९०९ )

अनुक्रम ४३

(२०) सर होर्मसजी कॉवसजी दिनशा (एडनवाला), के. टी., ओ. बी. ई.
(२१) सर फ्रँक फोर्बेस अॅडॅम, के टी. बार्ट (१८४५-१९२७)
(२२) एस्. एम्. एडवर्ड्स (१८७३-१९२७)
(२३) सर जॉर्ज विल्यम एंडरसन (१७९१-१८५७)
(२४) रेव्ह. फिलिफ एंडरसन (१८१६-१८५७)
(२५) थॉमस ची शोलम एन्स्टे (१८१६-१८७३)
(२६) सर रॉबर्ट एब्रर कोम्ब्री (१७४०-१८२७)
(२७) जेम्स क्लॅडियस अर्स्कीन (१८२१-१८९३)
(२८) विल्यम अर्स्कीन (१७७३-१८३२)
(२९) ला ओनेल रॉबर्ट अॅशबर्नर (१८२०-१८८३)
(३०) सर जॉन व्हीवर ऑल्ड्री (१७९५-१८७८)
(३१) सर एडवर्ड चार्लस कॅयल ऑलिव्हंट (१८४६-१८९८)
(३२) कम्मु सुलेमान (१८२९-१८८६)
(३३) रुस्तम पेस्तनजी करकरिया
(३४) करसनदास मूळजी (१८३२-१८७५)
(३५) डोसाभाई फ्रामजी कराका (१८१९-१९०२)
(३६) करीमभाई, इब्राहीम, सर (महंमदभाई) २ रे बॅरोनेट
(३७) कैखुश्रु नवरोजी काबराजी (१८४२-१९०४)
(३८) खरशेटजी रुस्तमजी कामा (१८३१-१९०९)
(३९) पेस्तनजी होर्मसजी कामा (१८१७-१८९३)
(४०) राईट रेव्ह. थॉमस कार (१७८८-१८५९)
(४१) बळवंत पांडुरंग किर्लोस्कर (१८४३-१८८५)
(४२) थिओडॉर कूक
(४३) हेन्री कुरवेन (१८४५-१८९२)
(४४) सर एडवर्ड टाउन्सहॅंड कॅन्डी (१८४५-१९३९)

(४५) सर मायकेल कॅव्हेनॉघ केनेडी (१८२४–१८९८)
(४६) वान्स केनेडी (१७१४–१८४६)
(४७) सर डेव्हिड कॅपॉन (१७९३–१८६९)
(४८) सर जेम्स मॅकनॅब कॅम्पबेल (१८४७–१९०३)
(४९) लेडी मेरिया केलकोट (१७८५–१८४२)
(५०) अॅन्ड्र्यू कॅसल्स (१८१२–१८८६)
(५१) वॉल्टर रिचर्ड कॅसल्स
(५२) सर एडमंड सिकोक्स
(५३) सर जॉर्ज कॉटन (१८४२–१९०५)
(५४) जॉन कॉनन
(५५) रेव्ह. रिचर्ड कोब (१६८७–१७६९)
(५६) सर जोसेफ आर्चर क्रेव्ह (१८२५–१८९६)
(५७) आर्थर टी. क्रॉफर्ड (१८३५–१९११)
(५८) चार्लस कॅमलीन
(५९) सर जॉर्ज रसेल क्लार्क (१८०० तें १८८९)
(६०) जॉन फिटजागिवन क्लॅर (१८९२–१८५१)
(६१) खटाव मकनजी (१८१८–१८७६)
(६२) डी. ए. खरे
(६३) मिर्झाअली महंमदखान (१८७४–१९३०)
(६४) रघुनाथ नारायण खोटे (१८२१–१८९१)
(६५) कॉवसजी एदलजी खंबाटा (१८३०–१९१६)
(६६) त्रिभुवनदास के. गजर (१८६२–१९२०)
(६७) एडवर्ड गाईल्स
(६८) नवरोजी जहांगीर गामडिया (१८४५–१९१६)
(६९) जेम्स गिब्स (१८२५–१८८६)
(७०) अलेक्झांडर गिल्सन (१८००–१८६७)

(७१) राइट रेव्ह. आल्बन गुडीयर एस्. जे.
(७२) गोकुळदास तेजपाल (१८२२–१८६७)
(७३) अर्देशर बरजोरजी गोदरेज (१८६७–१९३६)
(७४) फ्रान्सिस फ्रेड्रिक गॉर्डन
(७५) हेन्री एडवर्ड गोल्डस्मिथ (१८१२–१८५५)
(७६) गोविंदजी ठाकरसी मूळजी (१८४९–१९००)
(७७) सर अलेक्झांडर ग्रँट (१७७९–१८३८)
(७८) सर जॉन पिटर ग्रॅन्ट (१७७४–१८४८)
(७९) सर रॉबर्ट ग्रॅन्ट (१७७९-१८३९)
(८०) ग्रेटन ग्रिअरी
(८१) जेम्स गिब्ज (१८२०–१८८१)
(८२) जॉन ग्रॅहॅम (१८०५–१८३९)
(८३) सर चार्लस हारकार्ट चेंबर्स (१७८९–१८२८)
(८४) डोसाभाई रुस्तमजी चोकशी
(८५) जावजी दादाजी चौधरी, जे. पी. (१८३९–१८९२)
(८६) तुकाराम जावजी चौधरी जे. पी. (१८६४–१९१८)
(८७) सर नारायण गणेश चंदावरकर (१८५५–१९२३)
(८८) दादाभाई नसरवानजी (१८२४–१८८४)
(८९) छबीलदास लल्लूभाई
(९०) जामास्पजी मिनोचेरजी जामास्पसाना (१८३०–१८९८)
(९१) सर जॉन जॉर्डिन
(९२) हर्बर्ट जॉन जिरॉल्ड (१८१७–१८८८)
(९३) लेडी आवाबाई जमशेटजी जिजिभाई (१७९३–१८७०)
(९४) करसेटजी (सर जमशेटजी जिजिभाई) २ रे बॅरोनेट (१८११–१८७१)

(९५) माणेकजी (सर जमशेटजी जिजिभाई) ३ रे बॅरोनेट

(९६) कॉवसजी ( ,, ,, ) ४ थे बॅरोनेट (१८५२–१९०८)

(९७) रुस्तमजी ( ,, ,, ) ५ वे बॅरोनेट (१८७८–१९३१)

(९८) ऑनरेबल बेहरामजी जिजिभाई (१८२२–१८९०)

(९९) रुस्तमजी जमशेटजी जिजिभाई (१८२४–१८७२)

(१००) रेव्ह. एच्. जुरगेन्स (१८७४ ते १९१६)

(१०१) सर लॉरेन्स ह्यू जेन्किन्स

(१०२) सर हेन्री इव्हॅन मर्किसन जेम्स

(१०३) जेराजभाई पीरभाई (१८३२–१८८७)

(१०४) दिवाण बहादुर पुरुषोत्तम बी. जोशी, जे. पी. (१८५६–१९२९)

(१०५) जमशेटजी नसरवानजी टाटा (१८३९–१९०४)

(१०६) सोराबजी जमशेटजी जिजिभाई (१८२५–१८४८)

(१०७) सर दोराबजी जमशेटजी टाटा (१८५९–१९३२)

(१०८) सर रतन जे. एन्. टाटा (१८७१–१९१८)

(१०९) नारायण वामन टिळक (१८६२–१९१७)

(११०) हेन्री पेंडॉक टुकेट सेंटजॉर्ज (१८२३–१९०५)

(१११) मेजर हॅक्टर टुलोल

(११२) सर रिचर्ड टेंपल बॅरोनेट (१८२६–१९०२)

(११३) रावबहादुर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले (१८५३–१९११)

(११४) सर आर्थर चार्लस ट्रेव्हॉर

(११५) ठाकरसी मूळजी (१८०६–१८८७)

अनुक्रम ...... ४७

(११६) जेम्स डग्लस (१८२६–१९०४)
(११७) राईट रेव्ह. हेन्री अलेक्झांडर डग्लस (१८२३–१८७६)
(११८) जे. गॅर्सन डी. कुन्हा (१८४२–१९००)
(११९) जॉर्ज डिक् (१७३९–१८१८)
(१२०) डॉ. ए. डी. मोन्टे
(१२१) डी. जे. डी. मोन्टे ऊर्फ दिनु पटेल
(१२२) सर हेन्री डोविसन
(१२३) राइट रेव्ह. थिओडॉर डेल्हॉफ (१८३७–१९०६)
(१२४) जोनाथन डंकन (१७५६–१८११)
(१२५) रेव्ह. डूकमन (१८४०–१९१७)
(१२६) एलिझाबेथ ड्रेपर (१७४४–१७७८)
(१२७) एदलजी दोराबजी तल्टी (१८४९–१९२९)
(१२८) खानबहादुर पेस्तनजी जहांगीरजी तल्यारखान
(१२९) काशीनाथ त्र्यंबक तेलंग (१८५०–१८९३)
(१३०) ऑनरेबल नारायण वासुदेव दाभोळकर (१८३३–१८७४
(१३१) दादाभाई नवरोजी (१८२५–१९१७)
(१३२) दामोदर ठाकरसी मूळजी (१८४७–१८९३)
(१३३) कॉवसजी नानाभाई दावर (१८१४–१८७३)
(१३४) जस्टिस सर दिनशा धनजीभाई दावर (के. टी.)
(१८५६–१९१६)
(१३५) ऑनरेबल फैजहसन बसरुद्दीन (१८४४–१९०६)
(१३६) फ्रामजी एदलजी दिनशा (१८७२–१९३६)
(१३७) द्वारकादास वसनजी (१८३५–१८८०)
(१३८) रेव्ह. धनजीभाई नवरोजी
(१३९) धरमसी पुंजाभाई (१८१६–१८८८)
(१४०) धरमसी अबदुल्ला मेहेरअल्ली (१८५७–१८९७)

(१४१) डॉ. सर जेहमुलजी भिकाजी नरीमन, के. टी.
(१४२) नवरोजी फरदुनजी (१८१७–१८८५)
(१४३) जस्टिस श्री. नानाभाई हरीदास (१८३२–१८८९)
(१४४) जमशटजी दोराबजी नायगांववाला (१८०४–१८८२)
(१४५) हेन्री स्टॅफोर्ड नॉर्थकोट (१ ला बॅरोनेट)
(१४६) कॉवसजी रुस्तमजी पटेल (१७४४–१७९९)
(१४७) दोराबजी रुस्तमजी दोराबजी नानाभाई पटेल (१७५४–१८०४)
(१४८) फ्रामजी नसरवानजी पटेल (१८०४–१८७२)
(१४९) खानबहादुर बमनजी बेरामजी पटेल, जे. पी. (१८४९–१९०८)
(१५०) नारायण एस्. परमानंद (१८३८–१८९३)
(१५१) करसनजी फरदुनजी पारेख (१८१२–१८९०)
(१५२) जमशेटजी फरदुनजी पारेख (१८१४–१८६०)
(१५३) पीटर पीटरसन (१८४७–१८९९)
(१५४) सर दिनशा माणेकजी पेटिट, बॅरोनेट
(१५५) नसरवानजी एम्. पेटिट (१८२७–१८९१)
(१५६) सर जेम्स वेईथ वेईट पेईल
(१५७) सर थॉमस अर्स्किन पेरी (१८०६–१८८२)
(१५८) पेस्तनजी बमनजी (१८५७–१९३८)
(१५९) सर डेव्हिड पोलोक (१७८०–१८४७)
(१६०) रेव्ह. जॉर्ज पोर्टर डी. डी. (१८२५–१८८९)
(१६१) दादाभाई रुस्तमजी पंडोल (१८३६–१९२५)
(१६२) मेरवानजी फ्रामजी पांडे (१८१२–१८७६)
(१६३) प्रेमचंद रामचंद दीपचंद (१८३१–१९०६)
(१६४) सर जेम्स फर्ग्युसन, ६ वा बॅरोनेट

(१६५) सर विल्यम रॉबर्ट सिमोर वेसी फिट्झिराल्ड (१८१८–१८८५)

(१६६) सर आर्थर उपटीन फेनशा

(१६७) सर चार्ल्स फ्रेड्रिक फॅरन, के. टी.

(१६८) ल्युईस बेन्टिंक कॅरी फॉकलंड (१० वा व्हायकाउंट) (१८०३–१८८४)

(१६९) एमिलिया फॉकलंड (व्हायकाउंटेस) (१८०३–१८५८)

(१७०) आर्थर डब्ल्यू. फोर्ड

(१७१) चार्ल्स फोर्जेट (१८१०–१८९०)

(१७२) सर चार्ल्स फोरस, बॅरोनेट (१७७४–१८४९)

(१७३) अलेक्झांडर किनलोक फोर्ब्स (१८२१–१८६५)

(१७४) जेम्स फोर्ब्स, एफ. आर. एस. (१७४९–१८१९)

(१७५) जॉर्ज विल्यम फॉरेस्ट

(१७६) रेव्ह. विल्यम क्यू. फ्रेचर

(१७७) पालनजी नसरवानजी फ्रेंचमन (१८२८–१९१४)

(१७८) खरसेटजी कॉवसजी बनाजी, जे. पी. (१७९४–१८४७)

(१७९) दादाभाई रुस्तुमजी बनाजी

(१८०) फ्रामजी कॉवसजी बनाजी (१६५४–१७३४)

(१८१) बनाजी लीमजी बनाजी (१६५४–१७३४)

(१८२) माणकजी रुस्तमजी बनाजी

(१८३) मंचेरजी नवरोजी बनाजी (१८३७–१८९०)

(१८४) जेम्स बर्कली (१८१९–१८६२)

(१८५) डॉ. जेम्स बर्जेस

(१८६) क्रिस्टोफर बर्टवुड (१८०७–१८८२)

(१८७) हर्बर्ट मिल्स बर्टवुड

(१८८) डॉ. जेम्स बर्न्स एल. एल. डी., एफ. आर. एस्. (१८०१–१८६२)

(१८९) हेन्री एलमस्ली बस्टीड

(१९०) डॉ. कैखुश्रु नसरवानजी बहादुरजी, एम्. डी. (१८६०-१८९८)

(१९१) जमशेटजी करसेटजी बाटलीबॉय (१८०६-१८८१)

(१९२) रेव्ह. जॉर्ज बार्न्स (१७८६-१८४९)

(१९३) खरसेटजी एस्. बाटलीवाला (१८५३-१९१२)

(१९४) अब्बासअली मिरजा बेग

(१९५) जोसेफ बाप्तीस्ता (१८६४-१९३०)

(१९६) जॉन ऑर्कीबाल्ड बेलार्ड (१८३०-१८८०)

(१९७) सोराबजी शापूरजी बेंगाली (१८३१-१८९३)

(१९८) डॉ. जॉर्ज बुईस्ट (१८०५-१८६०)

(१९९) डॉ. जोहन जॉर्ज बुईलर (१८३७-१८९८)

(२००) जोसेफ बोडने

(२०१) हेन्री जॉर्ज ब्रिग्झ (१८२४-१८७२)

(२०२) डॉ. थॉमस ब्लेनी (१८२३-१९०३)

(२०३) मॅडम हेलेना पेट्रोव्ना ब्लॅवेटस्की (१८३१ ते १८९१)

(२०४) सर शापूरजी बरजोरजी ब्रोचा, के. टी. (१८४५-१९२०)

(२०५) जगनमोहन वृंदावनदास भाई शेठ, जे. पी.

(२०६) डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर (१८५२ ते १९२४)

(२०७) सर मंछेरजी मेरवानजी भावनगरी के. सी. आय. ई. (१८५१-१९३३)

(२०८) डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर (१८३७-१९२६)

(२०९) गोविंद नारायण माडगांवकर (१८१५-१८६५)

(२१०) सर मनमोहनदास रामजी (१८५७-१९३४)

(२११) कैकोबाद बेहरामजी मर्झबान (१८६७-१९३३)

(२१२) फर्दुनजी मर्झबान

७९३९

(२१३) रॉबर्ट झेवियर मर्फी (१८०३–१८५७)
(२१४) बेहरामजी मेरवानजी मलबारी
(२१५) बेजनजी फर्दुनजी मादन (१८७३–१९२९)
(२१६) माधवदास रघुनाथदास (१८३०–१८९१)
(२१७) भोसाभाई फ्रामजी भामा (१७९७–१८५४)
(२१८) माणेकजी करसेटजी (१८०८–१८८७)
(२१९) माणेकजी बरजोरजी मिनोचेर होमजी (१८४०–१८९८)
(२२०) राईट ऑनरेबल सर दिनशा फरदुनजी मुल्ला (पी. सी., सी. आय्. ई..) (१८६८–१९१४)
(२२१) मुल्ला फिरोजबीन मुल्लाकांऊस (१७५८–१८३०)
(२२२) डोसाभाई सोराबजी मुन्शी (१७८६–१८७०)
(२२३) मूळजी जेठा (१८१०–१८८९)
(२२४) रे० डंकन मॅक्फर्सन (१८३७–१८८८)
(२२५) माईकेल मॅक्मिलन
(२२६) जेम्स मॅकेंझी मॅक्लीन (१८३५–१९०६)
(२२७) सर जेम्स मॅकिन्टोष (१७६५–१८३२)
(२२८) सर विल्यम् मेडोज (१७३८–१८१३)
(२२९) विल्यम् फ्रेड्रिक मॅरिअेट
(२३०) ऑर्थर मॅलेट (१८०६–१८८८)
(२३१) ऑनरेबल सर फेरोजशहा मेरवानजी मेहता (१८४५-१९१५)
(२३२) सर बेजनजी दादाभाई मेहता (१८४०–१९२७)
(२३३) वामन आबाजी मोडक (१८३५–१८९७)
(२३४) शम्स उल अलेमा. डॉ. सर जीवनजी जमशेटजी मोदी के. टी. (१८५४–१९३३)
(२३५) विरोशा बी. मोदी (१८५९–१९२३)
(२३६) बरजोरजी रुस्तमजी मोदी (१८२८–१८९५)

(२३७) सर जेम्स मॉन्टीथ

(२३८) फर्दूनजी मर्झबान मोबोद (१७८७–१८४७)

(२३९) कॅप्टन सर हेन्री मोरलँड (१८३७–१८९१)

(२४०) चार्ल्स मोरफेड (१८०७–१८८२)

(२४१) मोरारजी गोकुळदास, सी. आय. ई. (१८३४–१८८०)

(२४२) सर मंगळदास नानूभाई रामदास (१८३२–१८९०)

(२४३) सर विश्वनाथ नारायण मंडलीक (१८३३–१८८९)

(२४४) सर जॉन म्यूर, बॅरोनेट (१८२८–१९०३)

(२४५) राईट रेव्ह. लिओ. म्यूरीन डी. डी. (१८२५–१८९५)

(२४६) सर विल्यम यार्डली (१८१०–१८७८)

(२४७) महादेव गोविंद रानडे (१८४२–१९०१)

(२४८) सर जेम्स रिवेट कर्नाक, बॅरोनेट (१७८५–१८४६)

(२४९) लॉर्ड डोनॉल्ड मॅक् रे, ११ वा बॅरोनेट

(२५०) सर कॉवसजी जहांगीर रेडिमनी (१८१२–१८७८)

(२५१) हिरजी जहांगीर रेडिमनी (१८०८–१९०१)

(२५२) सर कॉवसजी जहांगीर रेडिमनी, बॅरोनेट (१८३५–१९३४)

(२५३) महंमदअली रोगे (नाखुदा) (१८४८–१९१०)

(२५४) एमा रॉबर्टस (१७९४–१८४०)

(२५५) डॅनियल रोस (१७८०–१८४९)

(२५६) डॉ. जे. सी. लिस्बोआ (१८२२–१८९७)

(२५७) सर विल्यम् लिबोर्नर (१८४६–१९१४)

(२५८) लॉर्ड चार्ल्स वॉलेस अलेक्झांडर नेपीयर क्रॉमरेन बेईली लॅमिंग्टन, २ रा बॅरोनेट

(२५९) परवेझजी दादाभाई वजीफदार (१८४५–१९०९)

(२६०) वरजीवनदास माधवदास (१८१७–१८९३)

(२६१) फ्रामजी बहेरामजी वसईगरा (१८५७–१९३८)

(२६२) रेव्ह. जे. ए. वायली (१८२४–१८९७)
(२६३) सर दिनशा एदल्जी वाच्छा, नाईट, जे. पी. (१८४४–१९३६)
(२६४) रतनजी फ्रामजी वाच्छा (१८१५–१८९३)
(२६५) अरदेशर खरशेटजी रुस्तुमजी वाडिया (१८०८–१८७७)
(२६६) अरदेशर होर्मसजी वाडिया (१८१२–१८८२)
(३६७) खरसेटजी रुस्तुमजी वाडिया (१७८८–१८६३)
(२६८) दादाभाई पेस्तनजी वाडिया (१८०२–१८८५)
(२६९) जमशेटजी धनजीभाई वाडिया (१८२९–१८९५)
(२७०) जमशेटजी बमनजी लवजी वाडिया (१७५६–१८२१)
(२७१) जहांगीर नवरोजी जमशेटजी वाडिया (१८२१–१८६६)
(२७२) फ्रामजी माणेकजी लवजी वाडिया (१७४९–१८०४)
(२७३) नवरोजी जमशेटजी बमनजी वाडिया (१७७४–१८६०)
(२७४) ऑनरेबल नवरोजी नसरवानजी वाडिया, सी. आय. ई. (१८४५–१८९९)
(२७५) नवरोजी माणेकजी वाडिया, सी. आय. ई. (१८३७-१९०९)
(२७६) पेस्तनजी अरदेशर होरमस्जी वाडिया (१८५९–१९२४)
(२७७) पेस्तनजी नसरवानजी वाडिया (१८४८–१९२३)
(२७८) बमनजी होर्मसजी वाडिया (१८०८–१८६७)
(२७९) माणेकजी लवजी वाडिया (१७२६–१७९२)
(२८०) मोटलीबाई जहांगीर वाडिया (१८११–१८९७)
(२८१) लवजी नसरवानजी वाडिया
(२८२) हिरजीभाई मेहरवानजी वाडिया (१८१७–१८८३)
(२८३) होर्मसजी बमनजी वाडिया (१७६६–१८२६)
(२८४) डॉ. ए. जी. विगास (१८५६–१९३३)
(२८५) सर विठ्ठलदास दामोदरदास ठाकरसी (१८७३–१९२२)

(२८६) जहांगीर जमशेटजी (विमा दलाल) (१८७०–१९३१)
(२८७) ॲन्ड्र्यू विल्सन (१८३१–१८८१)
(२८८) विल्यम् मार्टिन वूड
(२८९) सर फिलिप एडमंड वुडहाउस (१८११–१८८७)
(२९०) सर एडवर्ड वेस्ट (१७८२–१८२८)
(२९१) सर रेमंड वेस्ट (१८३२–१९१२)
(२९२) सर माईकेल रॉबर्ट वस्ट्रोव्ह (१८१७–१८९०)
(२९३) गजानन भास्कर वैद्य (१८६७–१९२१)
(२९४) जॉन वॉलेस (१८४२–१९२१)
(२९५) जिजीभाई दादाभाई शेठ (१७८६–१८४९)
(२९६) ऑनरेबल सर फिरोजशा खरशेटजी सेठना (१८६६-१९३८)
(२९७) जगन्नाथ शंकरशेठ (१८०३–१८६५)
(२९८) डॉ. सखाराम अर्जुन (१८३९–१८८५)
(२९९) ऑनरेबल रहिमतुल्ला महम्मद सयानी (१८४७–१९०२)
(३००) डॉ. नसरवानजी फकीरजी सर्वेयर (१८६४–१९२१)
(३०१) सर फ्रँक एच्. साऊटर (१८३१–१८८८)
(३०२) सर चार्ल्स सार्जेंट (१८२१–१९००)
(३०३) सर आल्बर्ट अब्दुल्ला ससून, १ ला बॅरोनेट (१८१७-१८९६)
(३०४) एलिआस डेव्हिड ससून (१८२०–१८८०)
(३०५) सर जेकब एलिआस ससून, १ ला बॅरोनेट (१८४४-१९१६)
(३०६) डेव्हिड ससून (१७९२ ते १८६४)
(३०७) फरदा (फ्लोरा) सालोमन डेव्हिड ससून (१८५९–१९३६)
(३०८) सर ससून, डेव्हिड ससून, १ ला बॅरोनेट (१८४९–१९१६)
(३०९) सॉलोमन डेव्हिड ससून (१८४१–१८९४)
(३१०) सर मॅथ्यू रिचर्ड सोझा (१८०९–१८६७)

( ३११ ) शम्स-उल्-दस्तुर उलेमा डॉ. पेशॉतन बेहरामजी संजाणा (१८२९–१८९८)

( ३१२ ) लॉर्ड विल्यम् मॅन्स्फील्ड सॅंडहर्स्ट, २ रा बॅरोनेट

( ३१३ ) जॉन स्कीनर

( ३१४ ) रेव्ह. जॉन स्टीव्हन्सन डी. डी.

( ३१५ ) सर जॉन स्कॉट ( १८४१–१९०४ )

( ३१६ ) सर विल्यम गुथेर हंटर

( ३१७ ) वॉल्डेमर मोर्डेकाई वॉल्फ हाफ्कीन

( ३१८ ) राईट रेव्ह. जॉन हार्डीज डी. डी. ( १८०५–१८७४ )

( ३१९ ) राईट रेव्ह. डॉ. एनाक्टेसियर हार्टमन ( १८०३–१८६६ )

( ३२० ) जॉर्ज रॉबर्ट कॅनिंग हॅरीस, ४ था बॅरन

( ३२१ ) लॉर्ड विल्यम् ब्राव होकली ( १७९२–१८६० )

( ३२२ ) सर थिओडर क्रेक्रोफट होप

( ३२३ ) सर वॉल्टर चार्ल्टन ह्युजीस, के. टी., सी. आय. ई.

( ३२४ ) रेव्ह. रॉबर्ट ए. ह्यूम., एम. ए. डी. डी.

## विद्यमान् व्यक्ति

( १ ) सर विठ्ठल चंदावरकर

( २ ) एस्. के. पाटील

( ३ ) श्री. नानासाहेब मोडक

## प्रमुख दिवंगत व्यक्ति व त्यांचीं स्मारकें

( १ ) एडविन् एस्. मॉंटेग्यु

हिंदुस्थानचे मुख्य मंत्री १९१७ ते १९२२

**स्मारकः**— मरीन लाईन्स मैदान

( २ ) लॉर्ड हार्डिंज

व्हाईसरॉय व गव्हर्नर जनरल १९१० ते १९१६

**स्मारकः**— अपोलो बंदर

(३) आल्बर्ट एडवर्ड, प्रिन्स ऑफ वेल्स

हिंदुस्थानांत प्रिन्स ऑफ वेल्स आले होते त्या वेळचें स्मारक १८७५–१८७६

**स्मारकः**— एस्प्लनेड रोड व रामपार्ट रोच्या मध्यें

(४) डॉ. थॉमस ब्लानी

आदर्श समाजसेवक. जन्म २४ मे १८२३. मृत्यू १ एप्रिल १९०३

**स्मारकः**— भाटिया बाग

(५) सर पेट्रिक ए-केली-नाईट

मुंबईचे पोलीस कमिशनर (१९२२ ते १९३३)

**स्मारकः**— बॉम्बे रोड, पो. हे. क्वार्टर्सच्या समोर

(६) लॉर्ड नॉर्थ ब्रूक

व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल

**स्मारकः**— नॉर्थ ब्रूक गार्डन

(७) कॅप्टन जी. एफ्. हेन्री

**स्मारकः**— डॉकयार्ड, माझगांव

(८) डब्ल्यू. एल. हार्वे

१८९८ ते १९०५ म्यु. कमिशनर

**स्मारकः**— आर्थर क्रॉफर्ड मार्केट

(९) सर बार्टली फ्रीयर

**स्मारकः**—फोर्ट जंक्शन व चर्चगेट स्ट्रीट

(१०) ड्युक ऑफ वेलिंग्टन

**स्मारकः**—न्यू कौंसिल ऑफिस समोर

(११) सर सिमोर फिटगेरॉल्ट

इ. स. १८७६ सालीं मुंबईचे गव्हर्नर

**स्मारकः**–धोबी तलाव, म. गांधी रोड व एस्प्लनेड रोडच्या जंक्शनवर

( १२ ) न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, एम्. ए., एल्. एल्. बी.
**स्मारकः**—कुपरेज मैदान

( १३ ) जे. एन्. टाटा
**स्मारकः**—एस्प्लनेड जंक्शन व मेयो रोड

( १४ ) सर फेरोजशहा मेहता
**स्मारकः**—क्रुकशांक रोड

( १५ ) सर दिनशा माणेकजी पेटीट
**स्मारकः**—क्रुकशांक रोड

( १६ ) धरमशी मूळजी
**स्मारकः**—फ्रियर रोड जंक्शन व मिंट रोड

( १७ ) डॉ. दादाभाई नौरोजी, एम्. पी.
**स्मारकः**—एस्प्लनेड रोड व मेयो रोडचें जंक्शन

( १८ ) बमनजी होर्मसजी
**स्मारकः**—बझारगेट स्ट्रीट

( १९ ) ए. जी. विगास, जे. पी.
**स्मारकः**—धोबी तलाव, ४२ महालाजवळ

( २० ) सर दिनशा वाच्छा
**स्मारकः**—चर्चगेट स्ट्रीट जंक्शन व कीन्स रोड

( २१ ) खानबहादुर कॉवसजी जेवरीगरा
**स्मारकः**—धोबी तलाव जंक्शन व गिरगांव रोड

( २२ ) केशवजी नायक
**स्मारकः**— डोंगरी स्ट्रीटवरील जहांगीर कारंजावर

( २३ ) शेठ जाधवजी राघवजी
**स्मारकः**—फॉकलंड रोड

( २४ ) देविदास प्राणजीवनदास मेहता
**स्मारकः**—गोवालिया टँक रोड

( २५ ) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

स्मारकः—चौपाटी ( मुंबई )

( २६ ) फुरसेतजी माणेकजी

स्मारकः—बेलासिस रोडवरील जाहीर कारंजावर

( २७ ) मंचेरजी एदलजी जोशी

स्मारकः—जामा जमशेद रोड, पारशी कॉलनी

( २८ ) व्हिक्टोरिया आल्बर्ट म्यूझियम

( २९ ) माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन

स्मारकः—१८६०

( ३० ) चार्लस जेन अलेकेनिंग

व्हाईसरॉय व गव्हर्नर जनरल १८६४

स्मारकः— कौंसिल हॉल

( ३१ ) जॉर्ज एफ. हेन्री

म्युनिसिपल कॉर्पोरेशन प्रमुख १८७३ ते १८७५

टाऊन काउंसिल प्रमुख १८७५ ते १८८०

( ३२ ) ई. सी. के. ऑलविन्ट

म्युनिसिपल कमिशनर १८८१ ते १८९०

( ३३ ) फ्रँक एच्. साउटर नाईट

पोलीस कमिशनर १८६४ ते १८८८

( ३४ ) हेन्री आर्बुथनोट ॲक्वर्थ

म्युनिसिपल कमिशनर १८९० ते १८९५

( ३५ ) पी. आर. कॅडेल

म्यु. कमिशनर १९१० ते १९१६

( ३६ ) थॉमस ब्लानी

म्यु. कॉर्पोरेशन प्रमुख १८८१ ते १८९३

मुंबईचे शेरीफ १८७५ ते १८८७
,, कॉरोनर १८७५ ,, १८९३

( ३७ ) विल्यम डिस्त्ररी शेफर्ड
म्यु. कमिशनर १९०५ ते १९१०


**कादा बटाटा घरपोंच पुरविण्याची अभिनव योजना**

**योग्य भावांत चोख माल! हॉटेल्स, कॅन्टीन्स, व पार्टीज-करितां भरपूर सवलतीचे दर**

त्वरित भेटा अथवा लिहा ! —

बिझिनेस ऑफिस :
**जॉय कॉर्पोरेशन लि.**
ॲग्रिकल्चरल् ॲन्ड फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टर्स
C/o औंध स्टेट प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि., जिजी हाऊस, १५ रॅव्हेलिन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

**दि. दि. मानवतकर**
मॅनेजिंग डायरेक्टर

## या महान् नगरीची वाढ कां व कशी झाली ?

### कॉर्पोरेशन, मध्यवर्ती व राज्य सरकार

इ. स. १८६० मध्यें जागतिक कापूस बाजारांत मुंबईस स्थान मिळालें. मोठाल्या इंजिनिअरिंग व रेक्लमेशन योजना पार पाडण्यांत आल्या. मोठाल्या इमारती बांधल्या गेल्या. शहराचा व्यापार भराभर वाढूं लागला. 'मिल' उद्योगाबद्दल मुंबईचें स्थान भारतांत प्रथम श्रेणीचें आहे. आज या गिरण्यांत हजारों कामगारांना रोजंदारी मिळत आहे. लाखों वार कापड दर महिन्याला बाहेर पडत आहे. मुंबईच्या उपनगरांनीं तिच्या भव्यतेंत भर घातली आहे. येथील इलेक्ट्रिक लोकल ट्रेन्स मुंबईचें वैशिष्ठय आहे. मुंबईच्या बसेस भारतांतील कोणत्याहि शहरापेक्षां सोयिस्कर आहेत. मुंबईच्या ट्रामच्या रुळांच्या जाळ्यांवरून धांवणाऱ्या ट्राम गाड्या मुंबईकरांना येथून तेथें नेऊन सोडणारें स्वस्त वाहन आहे.

मुंबई म्युनिसिपॉलिटी भारतांतील अग्रगण्य म्युनिसिपॉलिटी आहे. सर फेरोजशा मेहता व विठ्ठलभाई पटेलांसारखे तिचे प्रमुख होऊन गेले आहेत. आजची मुंबई माहीमपर्यंतच नाहीं तर १९४९ त अमलांत आलेल्या बृहन्मुंबई ( Greater Bombay ) योजनेमुळें वेस्टर्न रेल्वेवर जोगेश्वरी उपनगरापर्यंत व सेंट्रल रेल्वेवर भांडुप या उपनगरापर्यंत वाढली आहे.

इ. स. १९१४–१९१८ चें १ लें महायुद्ध व १९३९ सालांत सुरू झालेल्या २ ऱ्या महायुद्धांत ( युद्धकाळांत ) मुंबईकडे खेडेगांवांतून मोठ्या प्रमाणांत लोक येऊं लागले. मुंबईत पुष्कळ घरें असून व आणखी त्यांत भर पडत असून देखील मध्यम स्थितींतल्या लोकांनासुद्धां घरांचा तुटवडा भासत आहे.

# मुंबईची वाढ–संपूर्ण माहिती

**पण या शहराचा अशा प्रकारें विकास व्हायला कोण कारणीभूत झाले ?**

## मुंबई कॉर्पोरेशनचा उगम व विकास

मुंबई शहराचा हा सर्वांगीण विकास व्हावयास जर कोणत्या एका संस्थेचे श्रम विशेष कारणीभूत झाले असतील तर ते मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचेंच होय. बृहन्मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचें आज जें विशाल आणि व्यापक असें स्वरूप आपणांला दिसत असलें तरी तिचा उगम अगदीं लहान अशा अवस्थेंत झाला. पण तिनें आपल्या जन्मापासून आजपावेतों धीमेधीमे एवढी मोठी थोर कामगिरी बजावली आहे कीं, एकादा स्वतंत्र ग्रंथच तिच्या उगम व विकासाच्या इतिहासासाठीं लिहिला पाहिजे.

मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनची प्रत्यक्ष स्थापना होऊन तिच्यामार्फत नगराचा कारभार सुरू होईपर्यंतच्या इतिहासाचें विहंगमावलोकन केलें तर आपणांस असें दिसून येते कीं अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत कंपनीच्या फॅक्टरीचा अध्यक्ष व त्याचें कारभारी मंडळ ( कौंसिल ) मुंबई नगराची व्यवस्था पाहात असे. प्रत्यक्ष कारभार कोणातरी अधिकाऱ्यामार्फत हांकला जाई. मैल्याची

> इंग्रज सरकारनें सर हेन्री ग्रे याला इ. स. १६६७ मध्यें गव्हर्नर म्हणून नेमलें होतें. तोच मुंबईचा पहिला मुख्य न्यायाधीश होता. त्याच्या कारकिर्दींत एक हास्यास्पद प्रकार घडला. तो असा कीं त्यानें एका इसमास त्याच्या कोर्टांत शुक्रवारी हजर राहाण्याचा हुकूम केला. तो हजर राहूं शकला नाहीं, कारण त्याच्याच हुकुमावरून आदल्या मंगळवारींच त्याला फांशीं देण्यांत आलें होतें.

व्यवस्था नीट होत नसे म्हणून शहर स्वच्छ ठेवण्यासाठीं घरपट्टी आकारून, जनावरें व वाहनें यांचेवर कर बसवून पैसा गोळा करावा आणि तें काम करण्यासाठीं म्हणून एका खास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत यावी असें

कंपनीनें इ. स. १७५२ सालीं ठरविलें. इ. स. १७९२ पर्यंत ही व्यवस्था टिकली. त्यासालीं पार्लमेन्टनें एक नवा कायदा केला. त्याअन्वयें प्रेसिडेन्सी टाऊन जस्टिसिस् ऑफ पीस नेमण्याचा अखत्यार गव्हर्नर जनरलना देण्यांत आला. रस्ते साफसूफ करणें, त्यांची दुरुस्ती करणें इत्यादि कामांसाठीं भंग्यांची नेमणूक करण्याचा अधिकार या जस्टिस ऑफ दि पीसना देण्यांत आला. घर-भाड्याच्या वार्षिक उत्पन्नापैकीं बारावा हिस्सा करपट्टी बसवून या कामाच्या खर्चाची पण तरतूद करण्यांत आली होती. हें काम करण्याचे कांहीं खास नियम असे नव्हते. इ. स. १८१२ सालीं मुंबई बेटाचे स्थानिक स्वराज्य आणि सुव्यवस्था एवढ्यासाठीं म्हणून आणखी एक कायदा पास करण्यांत आला. या कायद्यान्वयें जस्टिस ऑफ दी पीसना आणखी कांहीं अधिकार प्राप्त झाले. इ. स. १८२७ सालीं जो कायदा पास करण्यांत आला, त्यामुळें मुंबईचा जमीनमहसूल ठरविणें व तो वसूल करणें, कर बसविणें व ते वसूल करणें या संबंधीचे नियम निश्चित करण्यांत आले. पण त्यामुळें मुंबईचा अधि-कारी वर्ग आणि जस्टिस ऑफ दी पीस यांचेमध्यें मतभेद निर्माण होऊं लागले. म्हणून मुंबईच्या स्थानिक स्वराज्यासाठीं लागणारा पैसा योग्य रीतीनें उभारून त्याचा व्यवस्थित विनियोग करण्यासाठीं म्हणून इ. स. १८४५ सालीं एक नवाच कायदा पास करण्यांत आला. दोन युरोपियन, तीन तद्देशीय, जस्टिस ऑफ दी पीस, मुंबईचा कलेक्टर व ज्येष्ठ पोलीस मॅजिस्ट्रेट अशा सात जणांचें एक मंडळ ( बोर्ड ऑफ कॉन्झर्व्हन्सी ) नेमण्यांत आलें. पोलीस मॅजिस्ट्रेटच या मंडळाचा अध्यक्ष असे. या मंडळामार्फत शहराचा कारभार कांहीं नीट हांकला जाईना म्हणून इ. स. १८५८ सालीं एका नव्या कायद्यान्वयें तीन म्युनिसिपल कमिशनरांची नेमणूक करण्यांत आली. त्यांपैकीं एकाची नेमणूक सरकार करी आणि दुसऱ्या दोघांची नेमणूक जस्टिसिस ऑफ दी पीस मार्फत होई. म्युनिसिपल कमिशनरांच्या नेमणुकीनें खर्च मात्र वाढला. कारभारांत सुसूत्रता कांहीं निर्माण झाली नाहीं. म्हणून १८८६ सालीं आणखी एक नवा कायदा करण्यांत येऊन जस्टिस ऑफ दी पीसचें कायम मंडळ स्थापन

करण्यांत आलें. कर व खंड बसविणें, ते वसूल करणें, जमिनीच्या तारणावर कर्जें उभारणें इत्यादि कामें करण्याचा अधिकार या मंडळाला देण्यांत आला. सर्व दैनंदिन कारभार हांकण्याची जबाबदारी मात्र एका म्युनिसिपल कमिशनराकडे सोंपविण्यांत आली. अंदाजपत्रक तयार करून तें जस्टिस ऑफ दी पीसच्या मंडळापुढें मांडणें, तें मंजूर करून घेणें ही कामें म्यु. कमिशनरनें करावयाचीं होतीं. या कायद्यान्वयें म्युनिसिपल कमिशनरांच्या हातीं अमर्याद सत्ता आली आणि तिच्यावर जस्टिस ऑफ दी पीस वा सरकार यांचेपैकीं कोणाचेंच नियंत्रण नव्हतें.

## लोकनियुक्त प्रतिनिधींना कारभारांत वाव

म्युनिसिपल कमिशनरांच्या अनागोंदी कारभारामुळें जनतेंत तीव्र असंतोष निर्माण झाला व या कारभारांत लोकप्रतिनिधींनाहि थोडासा वाव असावा अशी तिच्याकडून मागणी येऊं लागली. म्हणून सरकारनें इ. स. १८७२ सालीं कर भरणाऱ्या नागरिकांना मताधिकार देऊन प्रातिनिधिक मंडळाची स्थापना करण्याचें ठरविलें. कॉर्पोरेशन व टाउन कौंसिल अशीं दोन मंडळें स्थापन करण्यांत आलीं. ६४ जणांच्या कॉर्पोरेशनपैकीं निम्मे करदात्यांनीं निवडलेले आणि बाकीच्या बत्तिसांपैकीं सोळा सोळा सभासद जस्टिस ऑफ दी पीस व सरकारनें नियुक्त केलेले असें असत. कर निश्चित करणें, अंदाजपत्रकास मंजुरी देणें आणि टाउन कौंसिलवरील सभासदांची निवड करणें अशासारखीं कामें कॉर्पोरेशनकडे सुपूर्द करण्यांत आलीं होतीं. टाउन कौंसिलमध्यें बारा सभासद असत.

१८८२ मध्यें वाढत्या नागरिकत्वाच्या जाणिवेनें गांवांची रमणीयता वाढविण्याची इच्छा होऊं लागली व त्या वेळचा गव्हर्नर लॉर्ड रिपन यानें नागरिकांना जादा हक्क दिले. १८८८ मध्यें आणखी दुसरा कायदा पास झाला. त्यानें निर्माण केलेल्या समान दर्जाच्या तीन जबाबदार संस्था अजून चालू आहेत. कॉर्पोरेशन, स्टँडिंग कमिटी व म्युनिसिपल कमिशनर ! शहराचे वॉर्डस पाडण्याचें काम त्यांनींच सुरू केलें, १ ला म्युनिसिपल कायदा १८६५

मध्यें पास झाला. त्याअन्वयें सर्व सत्ता कमिशनरच्या हातीं गेली. सन १८७२ मध्यें दुसरा कायदा पास होऊन त्यांतूनच बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनचा उगम झाला. प्रथम ६४ सभासदांपैकीं ३९ सभासद निवडले गेले. परंतु जे तीस रुपयापासून अधिक कर भरत त्यांनाच मत देण्याचा अधिकार होता. १८२७ मध्यें प्रथम कर लादला गेला. वर उल्लेखिलेल्या टाउन कौंसिलच्या १२ सभासदांपैकीं ८ जण कॉर्पोरेशननें निवडलेले व बाकीचे चौघे जण सरकारनें नियुक्त केलेले असें असत. या बारा सभासदांतून एकाची निवड सरकार चेअरमन म्हणून करी. सभासदांनीं बैठकींना हजर राहावें म्हणून तीस रुपये साप्ताहिक मुशाहिराहि पण त्यांना देण्यांत येत असे.

यानंतर अनेक घटनांमधून कॉर्पोरेशनचें आजचें स्वरूप अत्यंत सुव्यवस्थित, नियमबद्ध असल्याचें आपणांस दिसून येईल. लोकांचे प्रतिनिधी (निवडून दिलेले) त्याचप्रमाणें सरकारतर्फे चेंबर्स ऑफ कॉमर्स, ट्रेड यूनियन्स, मिल-ओनर्स असोशिएशन, युनिव्हर्सिटी वगैरेंच्या तर्फे प्रतिनिधी असतात. नियमित बैठका होऊन, त्यांत अनेक प्रश्नांचा खल होऊन चालू गोष्टींवर निर्णय घेण्यांत येतो. म्यु. कमिशनरला भरपूर अधिकार देण्यांत आलेले असून तोच कॉर्पोरेशनला जबाबदार असतो. अनेक समित्या व निरनिराळीं खातीं सुव्यवस्थित काम करीत आहेत.

उपसमित्या, मंडळें नेमून त्यामार्फत प्रत्येक खात्याचा कारभार प्रमुख खातीं आपापल्या जबाबदाऱ्या खालीं दिलेल्या वर्णनावरून कशीं पार पाडतात तें दिसून येईल.

पुढील समित्यांचें प्रामुख्यानें नांव ऐकूं येतें :

( १ ) स्टॅंडिंग कमिटी ( २ ) सुधारणा समिती ( ३ ) शिक्षण समिती ( ४ ) वीज व वाहन समिती (B. E. S. T. Committee)

## प्रमुख खातीं

निरनिराळ्या वॉर्डांमधून त्यांचें कार्य चालू असतें.

( १ ) **आरोग्य, साफसफाई** ( Health & Conservancy )

करण्यांत आलें. कर व खंड बसविणें, ते वसूल करणें, जमिनीच्या तारणावर कर्जें उभारणें इत्यादि कामें करण्याचा अधिकार या मंडळाला देण्यांत आला. सर्व दैनंदिन कारभार हांकण्याची जबाबदारी मात्र एका म्युनिसिपल कमिशनराकडे सोंपविण्यांत आली. अंदाजपत्रक तयार करून तें जस्टिस ऑफ दी पीसच्या मंडळापुढें मांडणें, तें मंजूर करून घेणें ही कामें म्यु. कमिशनरनें करावयाचीं होतीं. या कायद्यान्वयें म्युनिसिपल कमिशनरांच्या हातीं अमर्याद सत्ता आली आणि तिच्यावर जस्टिस ऑफ दी पीस वा सरकार यांचेपैकीं कोणाचेंच नियंत्रण नव्हतें.

## लोकनियुक्त प्रतिनिधींना कारभारांत वाव

म्युनिसिपल कमिशनरांच्या अनागोंदी कारभारामुळें जनतेंत तीव्र असंतोष निर्माण झाला व या कारभारांत लोकप्रतिनिधींनाहि थोडासा वाव असावा अशी तिच्याकडून मागणी येऊं लागली. म्हणून सरकारनें इ. स. १८७२ सालीं कर भरणाऱ्या नागरिकांना मताधिकार देऊन प्रातिनिधिक मंडळाची स्थापना करण्याचें ठरविलें. कॉर्पोरेशन व टाउन कौंसिल अशीं दोन मंडळें स्थापन करण्यांत आलीं. ६४ जणांच्या कॉर्पोरेशनपैकीं निम्मे करदात्यांनीं निवडलेले आणि बाकीच्या बत्तिसांपैकीं सोळा सोळा सभासद जस्टिस ऑफ दी पीस व सरकारनें नियुक्त केलेले असें असत. कर निश्चित करणें, अंदाजपत्रकास मंजुरी देणें आणि टाउन कौंसिलवरील सभासदांची निवड करणें अशासारखीं कामें कॉर्पोरेशनकडे सुपूर्द करण्यांत आलीं होतीं. टाउन कौंसिलमध्यें बारा सभासद असत.

१८८२ मध्यें वाढत्या नागरिकत्वाच्या जाणिवेनें गांवांची रमणीयता वाढविण्याची इच्छा होऊं लागली व त्या वेळचा गव्हर्नर लॉर्ड रिपन यानें नागरिकांना जादा हक्क दिले. १८८८ मध्यें आणखी दुसरा कायदा पास झाला. त्यानें निर्माण केलेल्या समान दर्जाच्या तीन जबाबदार संस्था अजून चालू आहेत. कॉर्पोरेशन, स्टँडिंग कमिटी व म्युनिसिपल कमिशनर ! शहराचे वॉर्डस पाडण्याचें काम त्यांनींच सुरू केलें. १ ला म्युनिसिपल कायदा १८६५

मध्यें पास झाला. त्याअन्वयें सर्व सत्ता कमिशनरच्या हातीं गेली. सन १८७२ मध्यें दुसरा कायदा पास होऊन त्यांतूनच बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनचा उगम झाला. प्रथम ६४ सभासदांपैकीं ३९ सभासद निवडले गेले. परंतु जे तीस रुपयापासून अधिक कर भरत त्यांनाच मत देण्याचा अधिकार होता. १८२७ मध्यें प्रथम कर लादला गेला. वर उल्लेखिलेल्या टाउन कौंसिलच्या १२ सभासदांपैकीं ८ जण कॉर्पोरेशननें निवडलेले व बाकीचे चौघे जण सरकारनें नियुक्त केलेले असें असत. या बारा सभासदांतून एकाची निवड सरकार चेअरमन म्हणून करी. सभासदांनीं बैठकींना हजर राहावें म्हणून तीस रुपये साप्ताहिक मुशाहिराहि पण त्यांना देण्यांत येत असे.

यानंतर अनेक घटनांमधून कॉर्पोरेशनचें आजचें स्वरूप अत्यंत सुव्यवस्थित, नियमबद्ध असल्याचें आपणांस दिसून येईल. लोकांचे प्रतिनिधी ( निवडून दिलेले ) त्याचप्रमाणें सरकारतर्फे चेंबर्स ऑफ कॉमर्स, ट्रेड यूनियन्स, मिल-ओनर्स असोशिएशन, युनिव्हर्सिटी वगैरेंच्या तर्फे प्रतिनिधी असतात. नियमित बैठका होऊन, त्यांत अनेक प्रश्नांचा खल होऊन चालू गोष्टींवर निर्णय घेण्यांत येतो. म्यु. कमिशनरला भरपूर अधिकार देण्यांत आलेले असून तोच कॉर्पोरेशनला जबाबदार असतो. अनेक समित्या व निरनिराळीं खातीं सुव्यवस्थित काम करीत आहेत.

उपसमित्या, मंडळें नेमून त्यामार्फत प्रत्येक खात्याचा कारभार प्रमुख खातीं आपापल्या जबाबदाऱ्या खालीं दिलेल्या वर्णनावरून कशीं पार पाडतात तें दिसून येईल.

पुढील समित्यांचें प्रामुख्यानें नांव ऐकूं येतें :

( १ ) स्टॅंडिंग कमिटी ( २ ) सुधारणा समिती ( ३ ) शिक्षण समिती ( ४ ) वीज व वाहन समिती (B. E. S. T. Committee)

## प्रमुख खातीं

निरनिराळ्या वॉर्डांमधून त्यांचें कार्य चालू असतें.

( १ ) **आरोग्य, साफसफाई** ( Health & Conservancy )

(२) **फायर ब्रिगेडः**—आगी विझविणें, आगप्रतिबंधक योजना अमलांत आणणें.

(३) **मार्केट्स व स्लॉटर हौसिंग खातेंः**— मार्केट्सवरील करांची वसुली, स्वच्छता वगैरे राखणें.

(४) **स्पेशल इंजिनियर खातेंः**—निरनिराळ्या विकास योजना व शहर आंखणी (मेकॅनिकल इंजिनियर यांच्या हाताखालीं काम करतो).

(५) **बागिचे व उद्यानें**—

(६) **स्मशानें, कबरस्थानें व टॉवर्स ऑफ सायलेन्स**—

(७) **ड्रेनेज**—

(८) **वीजपुरवठा व वाहतुक** (B. E. S. T. Undertaking)

(९) **शिक्षणः**—(सर्वत्र निरनिराळ्या भाषेंतील प्रायमरी शाळा अत्यल्प खर्चानें चालविल्या जातात (प्रायमरी व सेकंडरी एज्युकेशन)

(१०) **पाणीपुरवठाः**—(Hydraulic Engineer) वॉटर वर्क्स

(११) **ॲसेसमेंट व कलेक्शन खातें**

(१२) **टाउन ड्यूटि व इलेक्शन खातें**

(१३) **स्टोअर खातें**

(१४) **लीगल असिस्टंटचें खातें**

(१५) **कॉर्पोरेशन व स्टँडिंग कमिटी व म्युनिसिपल सेक्रेटरीचें खातें**

(१६) **म्युनिसिपल कमिशनरचें खातें**

(१७) **ऑडिट्स व अकाउंट्स–चीफ अकाउंटंटचें खातें**

(१८) **म्युनिसिपल चीफ ऑडिटरचें खातें**

(१९) **लायसेन्स खातें**

(२०) **शॉप्स व एस्टॅब्लिशमेन्ट्स खातें**

(२१) **म्युनिसिपल प्रिंटिंग प्रेस**

(२२) सिटी इंप्रूव्हमेंट खातें

(२३) दी के. ई. एम्. हॉस्पिटल व शेठ जी. एस्. मेडिकल कॉलेज खातें

(२४) बाई यमुनाबाई नायर हॉस्पिटल डेन्टल कॉलेज, नायर हॉस्पिटल, टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज

(२५) म्युनिसिपल ग्रूप हॉस्पिटल्स, शींव

## म्युनिसिपालिटीचीं प्रमुख कार्यालयें

(१) म्युनिसिपल ऑफिसेस्, हॉर्नबी रोड, व्ही. टी. स्टेशनसमोर

(२) म्युनिसिपल कॉर्पोरेशन हॉल, क्रुकशांक रोड, बोरीबंदर, मुंबई १

(३) सेक्रेटरी, म्युनिसिपल स्कूल्स कमिटी, गिल्डर टँक बिल्डिंग, लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ८

(४) लीगल डिपार्टमेंट — इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बिल्डिंग, नेपियर रोड, मुंबई १

(५) इलेक्शन अॅन्ड टाऊन ड्युटि डिपार्टमेन्ट, शॉप्स अॅन्ड एस्टॅब्लिशमेन्ट डिपार्टमेन्ट, वॉटर वर्क्स डिपार्टमेन्ट — इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बिल्डिंग, नेपियर रोड, मुंबई १

(६) रेव्हेन्यू ऑडिट ऑफिसेस्, 'ग्लेरोज', मेरेवेद्र रोड, अपोलो बंदर, मुंबई १

(७) सिटी वॉटरसप्लाय, इंजिनियर्स ऑफिस अँड कम्प्लेंट डिपार्टमेंट, बाबुला टँक रोड

(८) लायसेन्स डिपार्टमेंट, इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट बिल्डिंग, महात्मा गांधी रोड, मुंबई १

(९) मार्केट डिपार्टमेंट, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई २

(१०) फायर ब्रिगेड, हेडकार्टर्स, भायखळा पूल, भायखळा, मुंबई ८

(११) असिस्टंट हेल्थ ऑफिसर (मलेरिया), फोर्ट मार्केट बिल्डिंग, मिंट रोड, फोर्ट, मुंबई १

(१२) हेड सुपरवायझर, अॅनेस्ली रोड, ऑफ लॅमिंग्टन रोड, मुंबई ८

(१३) सुपरिंटेन्डेन्ट ऑफ व्हॅक्सीनेशन, सेंट्रल व्हॅक्सीनेशन डेपो, दादर मेन रोड, पोयबावडी, मुंबई १२

(१४) मेडिकल ऑफिसर, म्युनिसिपल स्कूल्स, गिल्डर टँक बिल्डिंग, लॅमिंग्टन रोड.

(१५) सिटी इंजिनिअर्स— हॉर्न्बी रोड, फोर्ट, मुंबई १

## नगरपालिकेची 'वॉर्ड' वार विभागणी

मुंबई नगरपालिकेनें आपल्या कामाच्या सोयीसाठीं शहराची विभागणी केली असून त्या प्रत्येक विभागाला 'वॉर्ड' संबोधण्यांत येतें व या वॉर्डांतून नगरपालिकेच्या प्रत्येक खात्याच्या उपकचेऱ्या कार्य करीत असतात. त्यांची यादी व विभाग—

| वॉर्ड | वॉर्डांमधील भाग |
|---|---|
| 'ए' | कुलाबा आणि फोर्ट |
| 'बी' | मांडवी आणि प्रिन्सेस डॉक |
| 'सी' | भुलेश्वर |
| 'डी' | गिरगांव<br>मलबार हिल व खंबाला हिल<br>ताडदेव |
| 'ई' | माजगांव व भायखळा |
| 'एफ्' | परेल आणि शिवडी<br>दादर आणि नायगांव<br>मिठागर<br>माटुंगा आणि शीव |
| 'जी' | लोअर परळ आणि वरळी<br>माहीम<br>धारावी |

## मुंबई नगरपालिका क्षयरोग निवारण केंद्रें

वेळ : सकाळीं ८ ते ११ व सायंकाळी ४ ते ६

( १ ) प्रिन्सेस स्ट्रीट—सर्व कामांच्या दिवशीं
( २ ) फोरास रोड—सोमवार बुधवार, शुक्रवार
( ३ ) लालबाग—मंगळवार, शनिवार, गुरुवार ( सुट्टीचे दिवस खेरीज करून )
( ४ ) शिवडी—शिवडी रेल्वे स्टेशनजवळ

## मुंबई नगरपालिका मोफत रुग्णालयें

( १ ) सिटी फिव्हर हॉस्पिटल, ऑर्थर रोड, मुंबई
( २ ) ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स फॉर टी. बी., शिवडी, मुंबई
( ३ ) किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल, परेल
( ४ ) यमुनाबाई एल्. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, परेल, मुंबई
( ५ ) म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल, सायन, मुंबई
( ६ ) बी. पी. ए. म्युनिसिपल, फ्री आय हॉस्पिटल, कामाठीपुरा
( ७ ) के. बी. भाभा हॉस्पिटल, वेक्फिल्ड रोड, वांद्रा, मुंबई २०
( ८ ) खानबहादूर, ए. के. भाभा हॉस्पिटल, कुर्ला

## मोफत शुश्रूषागृहें

५५ राजवाडकर स्ट्रीट, कुलाबा, मुंबई ५
२५९ सॅन्डहर्स्ट रोड, भेंडी बाजार ट्रॅम जंक्शन, मुंबई ३
२६४ चर्नीरोड, सेंट्रल सिनेमाशेजारीं, मुंबई ४
१४३ फोरास रोड ट्रॅम जंक्शन
२५४ H. I. धारावी रोड
२१३ C. डिलाईल रोड
४५ बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई १८
२५४ ग्रेलासिस रोड, मुंबई ८

## प्रसूतिगृहें

( १ ) महंमद हाजी साबू सिदिक मॅटर्निटी होम, २३४ बेलासिस रोड, मुंबई ८
( २ ) कमर खानूम मॅटर्निटी होम, ४ व्हिक्टोरिया रोड, ३ री क्रॉस लेन, मुंबई
( ३ ) महंमद हाजी साबु सिदिक प्रसूतिगृह, २७ इमामवाडा, मुंबई
( ४ ) महंमद हाजी साबू सिदिक प्रसूतिगृह, वरळी जंक्शन ऑफ न्यू प्रभादेवी ॲन्ड कॅडेल रोड
( ५ ) सोराबजी शापूरजी इंजिनिअरिंग मॅटर्निटी होम, १५ खेतवाडी १ ली गल्ली, मुंबई
( ६ ) खरशेटजी बेहरामजी भाभा हॉस्पिटल, वॉटरफील्ड रोड, वांद्रा
( ७ ) खानबहादूर एच्. के. भाभा हॉस्पिटल, कुर्ला
( ८ ) म्युनिसिपल मॅटर्निटी होम, चेंबूर
( ९ ) शामबाई विठ्ठलदास खिमजी म्युनिसिपल मॅटर्निटी होम, घाटकोपर

## म्युनिसिपल जनरल डिस्पेंसरीज

( १ ) ५५ राजवाडकर स्ट्रीट, कुलाबा
( २ ) ३०३ फ्रियर रोड, फोर्ट
( ३ ) २५९ सॅन्डहर्स्ट रोड, डोंगरी
( ४ ) २१२ ( १ ) पांजरापोळ स्ट्रीट, भुलेश्वर
( ५ ) २६४ चर्नीरोड, गिरगांव
( ६ ) एच्. सी. ऑफ डिस्पेंसरीज, १५।१७ खेतवाडी, १ ली गल्ली
( ७ ) १ साउटर स्ट्रीट, भायखळा
( ८ ) १४३ फोरास रोड
( ९ ) बाई गवराबाई डिस्पेंसरी, कामाठीपुरा, ८ वी गल्ली
( १० ) बाई गुलाबबाई चोक्शी डिस्पेन्सरी, डिसिल्वा रोड, दादर मुंबई २८

( ११ ) बी. डी. डी. चाळ नं. ४५, वरळी
( १२ ) २१३ ( सी ) डिलाईल रोड
( १३ ) २४५ ( H ) ( I ) धारावी रोड
( १४ ) न्यू प्रभादेवी रोड व कॅडेल रोड जंक्शन
( १५ ) मूळजी भुवन, शिवडी न्यू रोड
( १६ ) न्यू चाळ, आंग्रेवाडी, परेल टॅन्क रोड
( १७ ) १६० / १६० A न्यू डिलाईल रोड ( फर्ग्युसन रोड )
( १८ ) ताडदेव फ्लॅट्स, महालक्ष्मी
( १९ ) कॉनॉट रोड
( २० ) चेंबूर डिस्पेन्सर्स, चेंबूर
( २१ ) डिस्पेन्सर्स फॉर बेगर्स अॅट दी किंग जॉर्ज दी फिफ्थ इन्फर्मरी, महालक्ष्मी
( २२ ) पलटण रोड डिस्पेंसरी, म्युनिसिपल स्टेबल्स, पलटन रोड
( २३ ) दादर मेन रोड, म्युनिसिपल चाळ नं. १

## फायर ब्रिगेड

( १ ) हेड क्वॉर्टर्स, भायखळा ब्रिज, फोन ७२२७५
( २ ) अलेक्झांड्रा डॉक्स — फ्रियर रोड
( ३ ) गोवालिया टॅन्क रोड — गोवालिया टॅन्क रोड, गांवदेवी
( ४ ) शिवडी कॉटन डेपो — शिवडी
( ५ ) फोर्ट — गनब्रो स्ट्रीट, फोर्ट
( ६ ) कुलाबा — थॉमस स्ट्रीट, कुलाबा
( ७ ) शिवाजी पार्क — २ शिवाजी पार्क रोड
( ८ ) दादर — व्हिन्सेंट रोड
( ९ ) मेमनवाडा — सँडहर्स्ट रोड ( पूर्व )
( १० ) मांडवी — सँडहर्स्ट रोड ( पूर्व )
( ११ ) वरळी — बॅगॉल केमिकल्सजवळ

## फायर साल्वेज कोअर

फायर इन्शुअरन्स असोसिएशननें चालविलेले पण फायर ब्रिगेडच्या हुकुमतीखालीं चालणारें हें कोअर, शिवडी फायर स्टेशनला जोडून आहे.

## फायर ब्रिगेड ॲम्ब्युलन्स स्टेशन

( १ ) भायखळा ब्रिज–( फक्त अपघात वगैरेसाठीं )

फोन नं. २९६।४१७४४

( २ ) ,, ,, ( फक्त मॅटर्निटी केसीस ) फोन नं. ४१७४४

( ३ ) ,, ,, ( सर्व रुग्ण केसीस ) फोन नं. ४१७४४

( ४ ) अलेक्झांड्रा डॉक्स, फ्रियर रोड

( ५ ) दादर विन्सेन्ट रोड – दादर

( ६ ) मेमनवाडा – सॅन्डहर्स्ट रोड (पूर्व)

फायर ब्रिगेडची स्थापना सन १७७७ मध्यें झाली. १८ व्या शतकाच्या शेवटीं पोलीस कमिशनरकडे हें खातें होतें. १८४९ मध्यें म्यु. कमिशनरनें त्या खात्याचा कारभार हातात घेतला. मिस्टर एडिंग्टन यांस शिक्षणाप्रित्यर्थ इंग्लंडांत पाठविण्यांत आलें. १८८७ मध्यें हें एक निराळेंच स्वतंत्र खातें निर्माण झालें. या खात्यांत अनेक माणसें नेमण्यांत आलीं व त्यांना नोकरी, फंड वगैरे सवलती देण्यांत आल्या. आज या खात्यांत १२ इंजिनें असून शहराच्या प्रत्येक भागांत फायर अलार्म ठेवण्यांत आले आहेत; त्यांची संख्या आज मितीस १९५ वर आहे.

## मुंबईतील प्रमुख दवाखाने व रुग्णालयें

( १ ) सेंट जॉर्ज हॉस्पिटल—फक्त स्त्रियांकरितां

( २ ) जमशेटजी जिजिभाई हॉस्पिटल—राणीबाग, मुंबई २७

( ३ ) सर कॉवसजी जहांगीर ऑप्थेल्मिक हॉस्पिटल, डंकन रोड, मुंबई ( डोळ्यांचा दवाखाना )

( ४ ) बाई मोतीबाई ऑब्स्टेरिक हॉस्पिटल ( स्त्रियांचा दवाखाना )– जे. जे. हॉस्पिटलच्या पूर्व बाजूस, राणीबाग, मुंबई २७

अनुक्र

( ५ ) नॉर्थकोट पोलीस हॉस्पिटल— ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजजवळ

( ६ ) कामा हॉस्पिटल अॅन्ड आल्ब्लेस हॉस्पिटल, कुकशाक रोड, आझाद मैदान, मुंबई

( ७ ) गोकुळदास तेजपाल जनरल हॉस्पिटल— क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई

( ८ ) कुलाबा ल्युनॅटिक असायलम्— कुलाबा पॉईंटजवळ ( वेड्यांचें इस्पितळ )

( ९ ) अॅक्वर्थ लेपर असायलम् ( महारोग्यांसाठीं )—माटुंगा रोड

( १० ) किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल—परळ

| क्र. | चित्रपटगृह व पत्ता | फोन नं | वेळा. |
|---|---|---|---|
| १ | आरोरा—किंग्ज सर्कल | ६१४९१ | ४, ६॥, ९ |
| २ | ब्रॉडवे—ट्रॅम टर्मिनस, दादर | ३१३०२ | ३, ६, ९ |
| ३ | कॅपिटॉल—बोरीबंदर | २०४२२ | ३, ६, ९ |
| ४ | सेंट्रल—चर्नी रोड, गिरगांव | २७७८७ | ३॥, ६॥, ९॥ |
| ५ | इरोस—चर्चगेट स्टेशन समोर | २२५११ | ४, ६॥, ९। |
| ६ | एक्सेलसियर— | २०२८८ | ४, ६॥, ९। |
| ७ | कमल—सँडहर्स्ट रोड, गोलपिठा | ४०४५५ | ४, ६॥, ९॥ |
| ८ | कोहिनूर—रानडे रोड, दादर | ६०१६२ | ३।, ६।, ९। |
| ९ | कृष्ण—न्यू चर्नी रोड, गिरगांव | ४२३६६ | २॥, ५॥।, ९ |
| १० | लॅमिंग्टन—लॅमिंग्टन रोड | ४१२७० | ३॥, ६॥, ९॥ |





विमान छाप शुद्ध एरंडेल,
निलगिरी, काजळ,
गुलकंद

**काकडे अँड सन्स**

२८ सदाशिव, पुणें २

बाहेरगांवीं स्टॉकिस्ट पाहिजेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | मॅजेस्टिक—गिरगांव रोड | २४२२० | ३॥, ६॥, ९॥ |
| १२ | मेट्रो—धोबी तलाव | ३१०४५।२४४१२ | ४, ६॥, ९॥ |
| १३ | न्यू एंपायर—बोरीबंदर | ३१३८७ | ४, ६॥, ९। |
| १४ | नॉव्हेल्टी—ग्रँट रोड | ४०१०६ | ३, ६, ९ |
| १५ | ऑपेरा हाऊस—चौपाटी | २१२०० | ३, ६, ९ |
| १६ | प्लाझा—टिळक ब्रिज ( दादर ) | ६०४४४ | ३॥, ६।, ९। |
| १७ | रिगल—म्युझियमसमोर, कुलाबा | ३५०१७ | ४, ६॥, ९। |
| १८ | रॉक्सी—न्यू क्वीन्स रोड | २१६६६ | २, ५॥, ८॥। |
| १९ | स्वस्तिक—लॅमिंग्टन रोड | ४१५६१ | ३॥, ६॥, ९॥ |
| २० | चित्रा—व्हिन्सेंट रोड, दादर | ६१२६४ | ३।, ६।, ९। |
| २१ | सिटी लाईट—ले. ज. रोड, माटुंगा | ६१२०४ | १२॥,३॥,६॥,९॥ |
| २२ | इंपिरिअल—लॅमिंग्टन रोड, | ४१३२३ | ३, ६, ९ |
| २३ | जयहिंद—भायखळा | ४१६६६ | ११॥।,३।,६।,९। |
| २४ | लिबर्टी—मरीन लाईन्स | २३३०५ | २॥, ६, ९। |
| २५ | मिनर्व्हा—लॅमिंग्टन रोड | ४१३०४ | ३॥, ६॥, ९॥ |
| २६ | पॅलेस—भायखळा | ४२२३५ | ३।, ६।, ९। |
| २७ | पॅरेडाईज—ले. ज. रोड, माहीम | ८८०२६ | १२॥,३॥,६॥,९॥ |
| २८ | रिवोली—माटुंगा बी. बी. | ६१४८० | १०॥,२,५॥,८॥। |
| २९ | सुपर—ग्रँट रोड | ४११५१ | ३।, ६।, ९। |
| ३० | स्ट्रँड—आर्थरबंदर रोड, कुलाबा | ३६२३६ | ४, ६॥, ९। |

( ३१ ) श्री—लेडी हार्डीज रोड, माटुंगा ( ३२ ) कुमकुम—वरळी-नाका ( ३३ ) नाझ—लॅमिंग्टन रोड ( ३४ ) भारतमाता—लालबाग ( ३५ ) हिंदमाता—नायगांव ( ३६ ) आल्फ्रेड—फॉक्लंड रोड ( ३७ ) एडवर्ड—काळबादेवी, ( ३८ ) किस्मत—कॅडेल रोड ( ३९ ) डायना—ताडदेव ( ४० ) ताज—ग्रँटरोड कॉर्नर ( ४१ ) डर्बी—नवरोजी हिल रोड, डोंगरी ( ४२ ) दीपक—डिलाईल रोड ( ४३ ) दौलत—ग्रँट रोड

( ४४ ) न्यू रोशन—फॉक्लंड रोड ( ४५ ) नॅशनल—गोलपिठा ( सँड. रोड ( ४६ ) प्रकाश—डिलाईल रोड ( ४७ ) रेडियो—पलटण रोड, क्रॉफर्ड मार्केटच्या मार्गे ( ४८ ) रेक्स—फोर्ट स्ट्रीट, फ्रियर रोड ( ४९ ) रॉयल—ग्रँटरोड ( ५० ) स्टार—डॉकयार्डसमोर ( ५० ) सिल्व्हर टॉकीज—गोलपिठा ( ५२ ) शिरीन—जेकब सर्कल ( ५३ ) रेजिमेंटल—आर. सी. चर्च

## बृहन्मुंबई व उपनगर

### थिअेटर्स

( १ ) न्यू टॉकीज—हिल रोड, वांद्रा ( २ ) वांद्रा टॉकीज—घोड बंदर रोड, वांद्रा ( ३ ) नेपच्यून टॉकीज—टर्नर रोड, वांद्रा ( ४ ) रूप टॉकीज—नेहरू रोड, सांताक्रूझ ( ५ ) लिडो टॉकीज—जुहु रोड, जुहू, मुंबई २३ ( ६ ) राधेश्याम टॉकीज—विले पार्ले ( ७ ) व्यंकटेश टॉकीज विले पार्ले ( ८ ) उषा टॉकीज—अंधेरी ( ९ ) गोरेगांव टॉकीज—गोरेगांव ( १० ) कस्तुरबा टॉकीज—स्टेशन रोड, मालाड ( ११ ) भारत चित्र मंदीर टॉकीज—कुर्ला ( १२ ) उदय टॉकीज—घाटकोपर ( १३ ) ऑल्वीन टॉकीज—कल्याण ( १४ ) कृष्ण टॉकीज—कल्याण ( १५ ) न्यू मॉडेल टॉकीज—ओल्ड आग्रा रोड, कुर्ला ( १६ ) पॅरेमाउंट टॉकीज—

आपल्याला सुका मेवा पाहिजे ना ? मग आजच भेटा
**रमणलाल विठ्ठलदास आणि कं.**
— सुकामेव्याचे व्यापारी —
जुम्मा मशीदजवळ, मरचा गल्लीचा नाका, मुंबई २
( टे. नं. २८९१६ )

कल्याण ( १७ ) प्रभात टॉकीज—ठाणें ( १८ ) प्रकाश टॉकीज-कल्याण ( १९ ) विजय टॉकीज—चेंबूर.

मुंबई हें हिंदुस्थानांतील १ ल्या क्रमांकाचें व जगांतील २ ऱ्या क्रमांकाचें चित्रपट निर्मितीकेंद्र आहे. हें सांगून खरें वाटणार नाहीं कीं एकट्या मुंबईत २६ स्टुडिओज असून सर्वत्र कमिजास्त उत्साहानें चित्रपटनिर्मिती सुरूं असते. हजारो नट, नटी, कलावंत, तंतज्ञ, निर्माते यावर पोट भरत असून, चित्रपट वितरक प्रसिद्धी प्रमुख इत्यादि त्यावर अवलंबित असें लोकसुद्धां आहेत. तथापि सामान्य लोकांना, विशेषतः परगांवच्या कांहीं लोकांना या चित्रपट सृष्टीबद्दल फार कुतुहल वाटतें. फिल्म स्टुडिओच्या दाराशीं लोक आपला वेळ सुद्धां खर्च करतात. उद्देश हा कीं चुकून एकादा नट वा नटी दिसल्यास त्यांना बरें वाटतें. आम्हीं खालीं अशा स्टुडिओंचे पत्ते देत आहोत. कदाचित ते आपल्याला उपयुक्त वाटतील.

( १ ) श्री साऊंड स्टुडिओ, गोकुळदास पास्ता रोड, चित्रा टॉकीजजवळ दादर, मुंबई १४
( २ ) रणजित स्टुडिओ, दादा फाळके रोड, दादर, मुंबई १४
( ३ ) अमर स्टुडिओ, दादा फाळके रोड, दादर, मुंबई १४
( ४ ) फेमस स्टुडिओ, कॅडेल रोड, प्रभादेवी, मुंबई २८
( ५ ) ईस्टर्न स्टुडिओ, लव्ह ग्रोव्ह रोड, वरळी, मुंबई १८
( ६ ) सेंट्रल स्टुडिओ, ताडदेव, मुंबई ७
( ७ ) फेमस सिने लॅबोरेटरीज ॲन्ड स्टुडिओ—महालक्ष्मी, मुंबई ११
( ८ ) करदार स्टुडिओ, गव्हर्मेंट गेट रोड, परळ
( ९ ) राजकमल कला मंदीर, 'शान्ताश्री' गव्हर्मेंट गेट रोड, परळ
( १० ) ज्युपिटर स्टुडिओ, परेल व्हिलेज रोड, परळ, मुंबई १२
( ११ ) फिल्मिस्तान स्टुडिओ, गोरेगांव, ( मुंबई सबर्बन )
( १२ ) बॉम्बे टॉकीज स्टुडिओ, हिमांशु रोड, मालाड, ( मुंबई सबर्बन )
( १३ ) जाग्रति स्टुडिओज, चेंबूर

(१४) बसंत स्टुडिओज, चेंबूर
(१५) श्रीकांत स्टुडिओ, चेंबूर
(१६) आर. के. फिल्म स्टुडिओ, चेंबूर
(१७) चंदू स्टुडिओ, कालिना, सांताक्रूझ, मुंबई २५
(१८) मिनर्व्हा स्टुडिओज, शिवडी, मुंबई १५
(१९) 'हिंदुस्थान इन्फर्मेशन स्टुडिओ', शीव, मुंबई २२
(२०) म्हैसूर सोप स्टुडिओ, शीव, मुंबई २२
(२१) ज्योति स्टुडिओ, केनेडी ब्रिज, मुंबई ७
(२२) अशोक स्टुडिओ, अंधेरी
(२३) मोहन स्टुडिओ, अंधेरी (पूर्व)
(२४) एम्. ॲंड टी. स्टुडिओ, अंधेरी (पूर्व)
(२५) मॉडर्न स्टुडिओ, अंधेरी (पूर्व)
(२६) नवबहार स्टुडिओ, अंधेरी (पश्चिम)

## मुंबईतील प्रसिद्ध नाट्यगृहें, सभागृहें व मैदानें

(१) सुंदराबाई हॉल—क्वीन्स रोड, मरीन लाईन्सजवळ
(२) भारतीय विद्या भवन—चौपाटी, मुंबई नं. ७
(३) कॉवसजी जहांगीर हॉल—अपोलो पिअर, मुंबई १
(४) युनिव्हर्सिटी कॉन्व्होकेशन हॉल—म. गांधी रोड, मुंबई १.

**यशोधन आणि कंपनी**

**प्रिंटिंग मशीनरी, पेपर, प्रिंटिंग इंक्स, इ. मालाचे**
**विक्रेते व एजन्टस्**

१६३।१६७ हाजी इस्माईल चॅरिटी ट्रस्ट बिल्डिंग, दुकानः—५ काऊलेन, कांदेवाडी, मुंबई ४ | एन्.जी.पिकले प्रोप्रायटर

( ५ ) कामा ओरिएंटल इन्स्टिटयूट हॉल—लायन गेट, मुंबई १.
( ६ ) टाऊन हॉल—एल्फिन्स्टन सर्कल, मुंबई १.
( ७ ) फोर्बस हॉल—विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई ४
( ८ ) जीना हॉल—काँ. हाऊस, वि. पटेल रोड, मुंबई ४.
( ९ ) मारवाडी विद्यालय हॉल—सँडहर्स्ट रोड, मुंबई ४.
( १० ) सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी हॉल—सँड्हर्स्ट रोड, मुं. ४.
( ११ ) प्रार्थना समाज हॉल,—गिरगांव.
( १२ ) आर्य महिला समाज हॉल—माधवबाग, मुंबई.
( १३ ) मराठी साहित्य संघ मंदीर—केळेवाडी.
( १४ ) मराठा मंदीर हॉल—ठाकूरद्वार, मुंबई २.
( १५ ) कित्ते भंडारी हॉल—गोखले रोड, दादर.
( १६ ) धुरू हॉल—छबीलदास रोड, दादर.
( १७ ) वनमाळी हॉल—,, ,, दादर.
( १८ ) शिवाजी मंदीर हॉल—दादर, प्लाझा टॉकीज समोर
( १९ ) वनिता समाज हॉल—शिवाजी पार्क, दादर.
( २० ) लक्ष्मी नारायण बाग हॉल—,, ,, दादर.
( २१ ) शारदाश्रम हॉल—भवानीशंकर रोड, दादर.
( २२ ) नागपाडा नेबरहूड हाऊस हॉल—नागपाडा, भायखळा मुं. ८
( २३ ) कोंकणनगर हॉल—पितळेवाडी, माहीम, मुंबई १६.
( २४ ) सी. के. पी. हॉल—तुळशी पाईप रोड, दादर, मुंबई २८.
( २५ ) सारस्वत को. ऑ. सोसायटी हॉल—माहीम, शितळादेवी टेंपल रोड
( २६ ) जी. ई. इन्स्टिटयूट गर्ल्स स्कूल हॉल—तुळसी पाईप रोड, दादर
( २७ ) बंगाली हॉल—चित्रा सिनेमासमोरच्या गल्लींत.
( २८ ) कोंकण एज्यु. सोसायटी स्कूल हॉल—पोर्तुगीज चर्च स्ट्रीट, दादर, मुंबई २८.
( २९ ) आस्तिक समाज हॉल—माटुंगा स्टेशन समोर ( जी. आय. पी )

(३०) पोदार कॉलेज हॉल—पोदार कॉलेज, माटुंगा (जी. आय्. पी)
(३१) लक्ष्मी बाग हॉल—सायन, मुंबई २२
(३२) राष्ट्रीय मिल मजदूर संघ हॉल—गव्हर्मेंट गेट रोड, परळ.
(३३) प्रिन्सेस थिएटर—भांगवाडी, काळबादेवी रोड.
(३४) बॉम्बे थिएटर—फॉक्लंड रोड
(३५) दामोदर हॉल—परळ
(३६) नॅशनल लायब्ररी हॉल—घोडबंदर रोड, वांद्रा
(३७) टिळक मंदीर हॉल—टिळक मंदीर रोड (पूर्व), विलेपार्ले
(३८) ऋग्वेदी ब्राह्मण संघ—हनुमान रोड, विलेपार्ले
(३९) हिरावती मनसुखलाल हॉल—टागोर रोड, सांताक्रूझ
(४०) विद्या मंदीर हॉल—१७ वा रस्ता, खार
(४१) ब्राह्मण सभा (सभागृह)—प्रार्थना समाजजवळ, गिरगांव.
(४२) ब्राह्मण सेवा संघ—भवानीशंकर रोड, दादर, मुंबई २८
(४३) हरी महादेव वैद्य हॉल—पद्माबाई ठक्कर रोड, दादर, मुं. २८
(४४) शिवाजी पार्क मैदान—शिवाजी पार्क, दादर
(४५) चौपाटी मैदान—चौपाटी, मुंबई ७
(४६) डी सिल्वा हायस्कूल मैदान—दादर, मुंबई २८
(४७) नरे पार्क—परळ
(४८) कामगार मैदान—परळ
(४९) नप्पू गार्डन—माटुंगा, मुंबई १९
(५०) आझाद मैदान—धोबी तलाव
(५१) कुपरेज—चर्चगेट, फोर्ट
(५२) गिल्डर टॅंक मैदान—गोवालिया टॅंक रोड
(५३) गोवालिया टॅंक मैदान—गांवदेवी, मुंबई ७
(५४) एलि कदुरी हॉल—माझगांव, मुंबई १०

सुप्रसिद्ध रोजनिशीकार ' सॅम्युअल पेपी ' यानें १८६० मध्यें या महान् शहराबद्दल पुढील भविष्य वर्तवून ठेविलें होतें.

" एक सामान्य, लहानसें, मच्छिमारी करणाऱ्या लोकांचें आणि जेथील हवा परदेशीयांना मानवणार नाहीं असें लहानसें बेट "

हवामानाशिवाय त्यांत केवढा प्रचंड बदल झाला, पण तो कसा ?

## प्रमुख राजकीय संस्था

( १ ) **बॉम्बे प्रॉव्हिंशियल कॉंग्रेस**—कॉंग्रेस हाऊस, मुंबई ४.
( २ ) **प्रजा सोशालिस्ट पक्ष**—नायगांव, मुंबई १४.
( ३ ) **कम्युनिस्ट पार्टी**—खेतवाडी मेन रोड, मुंबई ४.
( ४ ) **शेतकरी कामकरी पक्ष**—पोयबावडी, परळ.
( ५ ) **हिंदू सभा**—गिरगांव रोड, मांगलवाडीसमोर, मुंबई ४.
( ६ ) **जनसंघ**—मुंबई १६.
( ७ ) **रामराज्य परिषद**—फोर्ट.
( ८ ) **मुस्लीम लीग**—मुंबई ३.
( ९ ) **रा. स्व. संघ**—वेस्टएन्ड कम्पाऊंन्ड, लॅमिंग्टन रोड, गिरगांव.

## अध्यात्मिक उन्नति करूं इच्छिणाऱ्या संस्था

( १ ) रामकृष्ण मिशन आश्रम—१२ वा रस्ता, खार, मुंबई २१.
( २ ) चैतन्य धर्म मंडळी,— ,, ,, ,, ,,
( ३ ) श्री. कयुबाबांचा मठ—गोरेगांव ( बी. एस. डी. )
( ४ ) नित्यानंद स्वामी,—वजेश्वरी.

( ५ ) अक्कलकोटस्वामी महाराज मठ—डी. एल. वैद्य रोड, दादर; कांदेवाडी, गिरगांव; व चेंबूर.

( ६ ) विवेकानंद सोसायटी—न. चिं. केळकर रोड, दादर.

( ७ ) रामतीर्थ योगाश्रम—उमेश धाम, व्हिन्सेंट स्क्वेअर, दादर, मुं. १४

( ८ ) श्री साईनाथ आश्रम—फोर्जेट हिल, मुंबई ७.

( ९ ) संन्यासाश्रम—विलेपारले.

( १० ) कैवल्यधाम—चौपाटी, गिरगांव, मुंबई ४.

( ११ ) प्रार्थना समाज—गिरगांव, मुबई ४.

## मुंबई व बृहन्मुंबईतील लोकोपयोगी संस्था

( १ ) आगरीपाडा रहिवासी सेवा मंडळ ( १९४६ ), ब्लॉक नं. २, वायली स्ट्रीट, मुंबई ११

( २ ) मांडवी 'बी' वॉर्ड डिस्ट्रिक्ट भाडुत संघ, २५६।५८ नरसी नाथा स्ट्रीट भातबाजार, मुंबई ९

( ३ ) माजगांव–ताडवाडी म्युसिनिपल चाळ भाडुत असोसियेशन, ब्लॉक नं. २, रुम नं. ४०, मेरीन रोड, माजगांव, मुंबई १०

( ४ ) नागपाडा नेबरहुड हाऊस, न्यू नागपाडा रोड, भायखळा.

( ५ ) नायगांव सोशल सर्व्हिस सोसायटी, १६ ए., बी. बी. डी. चाळ, नायगांव, दादर, मुंबई १४

## आर्थिक, शारीरिक व शिक्षणविषयक कार्य करणाऱ्या संस्था

( ६ ) पारशी पंचायत फन्ड्स ॲंड प्रॉपर्टीज ( १८२३ ), २०९ हॉर्नबी रोड, फोर्ट ( फोन २०२१८ व ३२४८१ )

( ७ ) रिसेटलमेंट ॲंड एम्प्लॉयमेंट ब्यूरो, हसन चेंबर्स, पारशी बझार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

( ८ ) यंग वुईमेन्स ख्रिश्चन असोसियेशन, १८ मेयो रोड, मुंबई १

( ९ ) दादर चॅरिटी फंड, ( जे. एच्. कामा ) दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

( १० ) इन्स्टिटयूट इराणी फंड, सर फेरोजशा मेहता रोड, फोर्ट, मुंबई

( ११ ) दाउदी वहोरा सोसायटी, महंमदअली रोड, मुंबई ३
( १२ ) गुरुसिंह सभा, २६४ फ्रियर रोड, मुंबई १
( १३ ) केनी चॅरिटी स्ट्रट फंड, पी.ए. वाडिया होमेंस व्हिला, खंबाला हिल, मुंबई २१
( १४ ) जामे जमशेद चॅरिटी फंड, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई १
( १५ ) मराठा मंदीर, ३२० गिरगांव रोड, ठाकुरद्वार, मुंबई
( १६ ) प्रौढ शुभेच्छक फंड, ५४२ सॅंडहर्स्ट ब्रिज, मुंबई ७
( १७ ) नवजीवन संघ, गोपाळ निवास, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २
( १८ ) पटेल चॅरिटी फंड, एस्प्लनेट रोड, मुंबई १
( १९ ) रामकृष्ण मिशन आश्रम, १२ वा रस्ता, खार, मुंबई २१
( २० ) दादर–माटुंगा कीर्तन मंडळ, १५३ अ, गोविंद धाम, रुईय कॉलेज जवळ, माटुंगा, जी. आय. पी.
( २१ ) सर रतन टाटा इन्स्टिटयूट फॉर पारसी वुईमेन, ह्युजीस रोड, मुं.७
( २२ ) वनिता समाज, कॅडेल रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई २८
( २३ ) विला थेरेसा, ६६ पेडर रोड, मुंबई २६
( २४ ) बॉम्बे महिला समाज, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, सॅंडहर्स्ट रोड, मुंबई ४
( २५ ) कर्नाटक फ्री नाईट हायस्कूल, १७ कुमठा स्ट्रीट, मुंबई १
( २६ ) महाराष्ट्र हायस्कूल, लोअर परेल, मुंबई १३
( २७ ) शीव शिशु विकास मंडळ, लक्ष्मीबाग, शिव, मुंबई २२
( २८ ) टाटा इन्स्टिटयूट फॉर सोशल सायन्सेस्, १०५।१०९ घोडबंदर रोड, अंधेरी
( २९ ) बाबू पन्नालाल जैन हायस्कूल, तांबाकाटा, मुंबई ३.
( ३० ) सर रतन टाटा चॅरिटीज, बॉम्बे हाऊस, ब्रूस स्ट्रीट, मुंबई १.
( ३१ ) सरैय्या चॅरिटी ट्रस्ट, १३२ क्वीन्स रोड, मुंबई १
( ३२ ) दादर पारशी वेल्फेअर सेंटर, ६१४-जामा जमशेद रोड, दादर, मुंबई १४.

( ३३ ) गुजराथी हिंदु स्त्री मंडळ, १२३ अमरेली हाऊस, विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई ४.
( ३४ ) गांधी सेवा सेना, एडनवाला मॅन्शन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.
( ३५ ) जैन महिला समाज, मंगलोर मॅन्शन, बोराबझार, मुंबई
( ३६ ) कुमारिका व स्त्री मंडळ, भगिनी सेवा समाज, सरोजिनी रोड, विलेपार्ले, मुंबई २४.
( ३७ ) सोशल सर्व्हिस लीग, सँडहर्स्ट रोड, मुंबई ४.
( ३८ ) सेवासदन सोसायटी, हार्वे रोड, गांवदेवी.
( ३९ ) साल्वेशन आर्मी, मोरलँड रोड, भायखळा, मुंबई २७.
( ४० ) सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, सँडहर्स्ट रोड, प्रार्थना समाज-नाका, मुंबई ४.
( ४१ ) मुंबई उपनगर जिल्हा ग्रामोद्योग संघ, ३९५ काळबादेवी-रोड, मुंबई २.
( ४२ ) वैश्य समाज, वैश्य सभागृह, शेणवी वाडी, खाडीलकर रोड, गिरगांव.
( ४३ ) कुडाळ देशकर गौड ब्राह्मण विद्या वृद्धिसमाज, कुडाळ देशकर ब्राह्मण निवास, मॅजिस्टिक सिनेमासमोर, गिरगांव, मुंबई ४.
( ४४ ) तळवलकर्स फिझिकल कल्चर होम, चर्नी रोड स्टेशन समोर.
( ४५ ) मॉडर्न फिजिकल कल्चर होम, पोदार कॉलेजसमोर. माटुंगा.
( ४६ ) समर्थ व्यायाम मंदीर, रानडे रोड, दादर, मुंबई २८
( ४७ ) श्री शिवाजी व्यायाम मंदीर, वाय रोड, रुबी मिलजवळ, दादर, मुंबई २८
( ४८ ) नॅशवल बाटबेल क्लब, शितळादेवी टेंपल रोड, माहीम, मुंबई १६.
( ४९ ) माने मास्तर तालीम, डिलाईल रोड, मुंबई १३
( ५० ) साबे फिजिकल कल्चर होम, गिरगांव, मुंबई
( ५१ ) फिजिकल कल्चर होम, पारेख स्ट्रीट, गिरगांव पोलीस कोर्टाचेमागे

( ५२ ) कैवल्यधाम, चौपाटी सी फेस, मुंबई ४
( ५३ ) गव्हर्नमेन्ट इन्स्टिटयूट फॉर फिजिकल कल्चर, कांदिवली
( ५४ ) श्री गोवर्धन संस्था, गोवर्धन भुवन, खेतवाडी, मेनरोड, मुं. ४

## सामाजिक सुधारणांचें कार्य करणाऱ्या संस्था

( १ ) अखिल भारतीय स्त्री परिषद, ४१ क्वीन्स बरॅक, फोरशोअर रोड
( २ ) डिप्रेस्ड मिशन सोसायटी ऑफ इंडिया, ११२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १
( ३ ) धारावी लोकसेवा संघ, काळा किल्ला, धारावी, मुंबई १७
( ४ ) भारत स्त्री सेवा संघ, भारतीय विद्याभवन, चौपाटी, मुंबई ७
( ५ ) बॉम्बे सिटी ॲडल्ट एज्युकेशन कमिटी, भाटिया मित्र मंडळ भवन, जी. पी. ओ. समोर, मुंबई १
( ६ ) बॉम्बे लीगल एड सोसायटी, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १
( ७ ) बॉम्बे व्हिजिलन्स असोसिएशन, १२८ दादर मेन रोड, मुंबई १४
( ८ ) इंडियन कॉन्फरन्स ऑफ सोशल वर्क ( १९०० ), नागपाडा नेबरहुड हाउस, भायखळा, मुंबई ८
( ९ ) महिला मंडळ, शीव, मुंबई २२
( १० ) सेवा मंडळ संयुक्त सामिति ( १९४८ ), लक्ष्मी बाग, शीव
( ११ ) कस्तुरबा महिला मंडळ ( १९४३ ) ' जीवन प्रकाश ', तुळशी पाईप रोड, माटुंगा बी. बी., मुंबई १६
( १२ ) राज पिपळा विभाग सेवा समाज ( १९३६ ), वाच्छा बिल्डिंग, डिलाईल रोड, मुंबई १३
( १३ ) दी बडायता समाज ( १९१२ ), २४ न्यू चर्नी रोड, मुंबई ४
( १४ ) श्री बडायता स्त्री मंडळ ( १९२९ ), २४ न्यू चर्नी रोड
( १५ ) माटुंगा जिमखाना ( १९२७ ), लक्ष्मी नथु रोड, माटुंगा
( १६ ) पंचमहाल शिक्षण प्रचारक मंडळ, १० चर्चगेट स्ट्रीट, मुंबई १
( १७ ) आर्य समाज, आर्य समाज लेन, मुंबई ४

(१८) घी वडायता युवक संघ, (१९३२), २४ न्यू चर्नी रोड,

(१९) श्री वडायता भुवन मंडळ (१९४५), २४ न्यू चर्नीरोड, मुंबई.

(२०) मित्र-मंडळ (१९४५), शान्ताक्रूझ, चुनाभट्टी, घोडबंदर रोड

(२१) पाठारे प्रभु समाज—ठाकूरद्वार, गिरगांव, मुंबई ४

(२२) सारस्वत ब्राह्मण समाज—चिकित्सक समूह हायस्कूल, कांदेवाडी गिरगांव, मुंबई ४.

(२३) ब्राह्मण सभा—प्रार्थना समाजजवळ गिरगांव व भवानीशंकर रोड, दादर

(२४) हेटकरी भंडारी महाजन सभा—रानडे रोड, दादर

(२५) सी. के. पी. समाजहितवार्धिनी सभा—डी. एल्. वैद्य रोड, दादर

(२६) समाज शिक्षण समिति—भाटिया बिल्डिंग, बोरीबंदर

(२७) सुवर्णकार—ह. म. वैद्य हॉल, पदमसी ठक्कर रोड, दादर बी. बी.

(२८) कऱ्हाडे ब्राह्मण संघ—C/o श्री. काका तांबे, गिरगांव रोड, मुं. ४

(२९) सहकारी मनोरंजन मंडळ—दामोदर हॉल, परळ

(३०) ब्रिटिश वुईमेन्स ॲसोशिएन—(मेरी ई. वेबर, सेक्रेटरी) C/o युनायटेड किंग्डम सिटिझन्स ॲसोशिएशन, ३२ निकोल रोड, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट मुंबई

(३१) महाराष्ट्र उत्कर्ष मंडळ, लॅमिंग्टन चेंबर्स, २ रा मजला, लॅमिंग्टन रोड, (३२) उत्तर भारतीय संघ—परळ (३३) समाज सेवा संघ—परळ, (३४) लोकसेवासंघ—बुरोंडी, (३५) लोकमान्य सेवा संघ विलेपार्ले, (३६) वंदेमातरमूनाट्यसंस्था—वाळकेश्वर. (३७) किर्तेभंडारी—गोखले रोड, दादर. (३८) महिला विकास मंडळ—कुलाबा, (३९) दादर महिला मंडळ—दादर. (४०) फोर्ट हिंदू महिला संघ—मिंट रोड. (४१) सत्यशोधक विद्यार्थी संघ—परळ, (४२) संत सेवा मंडळी—वरळी.

## तरुणांचा उत्कर्ष साधण्याचें कार्य करणाऱ्या संस्था

(१) सोसायटी ऑफ पीस ॲन्ड प्रोग्रेस, नवा नागपाडा, मुंबई ८

( २ ) झरथोस्ती उन्नति द्वार, बॉम्बे हाऊस, ब्रूस स्ट्रीट, मुंबई १

( ३ ) बाल्कन-जी-बारी, ४३ टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई १

( ४ ) वाय. एम्. सी. ए., लॅमिंग्टन रोड, मुंबई ४

( ५ ) यंगमेन्स हिन्दु असोसियेशन, विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई

## शैक्षणिक संस्था

( १ ) हिंदी विद्या प्रचार समिति, घाटकोपर

( २ ) ज्ञानलता मंडळ, गिरगांव, मुंबई ४

( ३ ) बंबई हिन्दी विद्यापीठ, डॉ. देशमुख लेन, गिरगांव, मुंबई नं ४

( ४ ) कामा मेमोरिअल फंड, ५६ बेहरामजी जिजिभाई, वांद्रा, मुंबई २०

ध्येयः—पारशी, शालेय व विश्वविद्यालयांतील गरीब विद्यार्थ्यांना मदत

( ५ ) दाभोळकर स्कॉलरशिप फंड, २२ एलफिन्स्टन सर्कल, मुंबई १

ध्येयः—गौड सारस्वत ब्राह्मण जातीच्या समाजांत शैक्षणिक प्रचार व मदत

( ६ ) डायमंड ज्युबिली ट्रस्ट, हासम प्रेमजी हाउस, ५ घोघा स्ट्रीट, मुं. १

ध्येयः— हिज हायनेस आगाखान अनुयायांची सामाजिक व शैक्षणिक उन्नति करणें

( ७ ) हिंद महिला समाज, सँडहर्स्ट रोड, मुंबई ४

ध्येयः— स्त्रियांमध्यें सहकारी तत्त्वाची भावना जागृत करणें व समाजसेवा करणें

( ८ ) कांगा चॅरिटी ट्रस्ट, ३६ वॉर्डन रोड, मुंबई २६

ध्येयः—शैक्षणिक प्रचार व मदत

( ९ ) पाठारे महिला समाज, ३३३ ठाकुरद्वार रोड, मुंबई २

ध्येयः—पाठारे प्रभु ज्ञातीच्या स्त्रियांची सामाजिक उन्नति साधणें

( १० ) धी जे. एन्. टाटा एन्डोव्हमेंट फॉर फायर एज्युकेशन, ब्रूस स्ट्रीट, मुंबई १. ध्येयः— उच्च वर्गातील विद्यार्थ्यांना विज्ञान व औद्योगिक विषयांचें शिक्षण देणें

( ११ ) टाटा मेमोरियल ट्रस्ट, ब्रूस स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १
ध्येयः—वैज्ञानिक शोध लावणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या

( १२ ) सर दोराबजी टाटा ट्रस्ट, ब्रूस स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १
ध्येयः—शिक्षण देणाऱ्या संस्था, व हॉस्पिटल्सना मदत; आग, भूकंप, दुष्काळ वगैरे सारख्या आपत्तींत सापडलेल्यांना मदत.

## शास्त्र, कला, विज्ञान, शिक्षण, समाज इ. विषयक प्रमुख संस्था

**( १ ) फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी वुईमेन इन् इंडिया**—देशांतील युनिव्हर्सिट्यांच्या स्त्रियांच्या संस्थांना एकत्रित आणणारी एकमेव संस्था. हिंदुस्थानांतील विद्यापीठांतील सर्व जमातींच्या स्त्रियामध्यें सलोखा, प्रेमभाव वाढविणें व हितसंबंधीं बाबींचे निरीक्षण करणें. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी वुईमेन या संस्थेशीं संलग्न. ऑनररी जनरल सेक्रेटरी—मिस् टी. भरूचा ६ अलेक्झांड्रा रोड, न्यू गांवदेवी, मुंबई ७

**( २ ) रॉयल एशियाटिक सोसायटी**—( मुंबई शाखा ) टाउन हॉल, मुंबई १. स्थापना : इ. स. १८०४. पौर्वात्य कला, शास्त्र व वाङ्मय यांचें संशोधन व त्यांना प्रोत्साहन देणें. वार्षिक वर्गणी रु. ६०

**( ३ ) बॉम्बे आर्ट सोसायटी**—स्थापना : इ. स. १८८८. चित्रप्रदर्शनें व इतर कलात्मक वस्तूंचीं प्रदर्शनें भरवून त्यायोगें एक कायमचें संग्रहालय निर्माण करणें. सभा, व्याख्यानें घडवून आणणें. अध्यक्ष—सर कॉवसजी जहांगीर; सेक्रेटरी—श्री. व्ही. व्ही. ओक. ऑफिस व सलून—ससून बिल्डिंग, ६ राम्पार्ट रो, फोर्ट, मुंबई १

**( ४ ) बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी**—ऑफिस, ११४ अपोलो स्ट्रीट, मुंबई १. स्थापना : इ. स. १८८३. सर्व जगांत जवळ जवळ १४०० सभासद. १९२१ मध्यें प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमची व्यवस्था सोसायटीकडें देण्यांत आली व सोसायटीचे सर्व मौल्यवान संग्रह म्युझियममध्यें समाविष्ट करण्यांत आले. संस्थेचें मुखपत्र वर्षांतून तीनदां प्रसिद्ध होते व त्यांत संबंधीं लेख प्रसिद्ध होतात. संस्थेच्या वाचनालयांतून पुस्तकें मिळूं शकतात.

(५) दाऊदी बोहरा लिटररी आणि वेल्फेअर सोसायटी—५२ ए. अब्दुल रेहमान स्ट्रीट, मुंबई ३. स्थापना : इ. स. १९२१. इस्लामी धर्म व संस्कृतीचा प्रचार व अरेबिक व उर्दू भाषेचा प्रसार. मासिक मुखपत्र, गुजराथी ' उम्मीद '. सभा, व्याख्यानें आदि गोष्टींनीं प्रचार करणें. अध्यक्ष **वाय्. टी. वकील**; ॲडव्होकेट. सेक्रेटरी बॅ. झेड. एफ्. झाकी



## वाचनालयें व शैक्षणिक संस्था

१ ब्रिटिश इन्फर्मेशन सर्विसेस, नोटावाला चेंबर्स, सर फेरोजशा मेहता रोड, फोर्ट मुंबई १

२ चुनीलाल श्रॉफ वाचनालय, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

३ लोकमान्य सेवा संघ, टिळकमंदीर, राममंदीर रोड, विलेपार्ले ( पूर्व )

४ महाराष्ट्र मित्र मंडळ, लालबाग, मुंबई १२

५ पीपल्स फ्री रीडिंग रूम ॲन्ड लायब्ररी, रेव्हेलीन स्ट्रीट, हॉर्नबी रोड

६ युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सार्विस, ३ क्वीन्स रोड, मुंबई १.

७ आदर्श शिक्षण संस्था १९४३ ( दादर ), दादर, मुंबई २८

८ आंध्र एज्युकेशन सोसायटी ( १९४३ ), ( १ ) टी ५७ जुनी मिलिटरी बरॅक, किंग्ज सर्कल स्टेशनजवळ. ( २ ) कुंवरकुंज, डॉ. घाटी रोड, दादर, मुंबई.

९ अंजुमान इस्लाम ( १८७५ ), ९२ हॉर्नबी रोड, मुंबई १.

१० आर्यन एज्युकेशन सोसायटी, ( १८९७ ) ७५, गिरगांव रोड.

११ आर्यसमाज, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४

१२ बाल विकास केंद्र, ३६ हनुमान रोड, विलेपार्ले.

१३ भगिनी समाज— ( १ ) हिंदू कॉलनी, दादर.
„ „ ( २ ) २१४ चर्नी रोड, मुंबई ४.
„ „ ( ३ ) २२५ खेतवाडी मेनरोड.
„ „ ( ४ ) लॅमिंग्टन रोड, मुंबई ४.

१४ भारत कल्चरल सोसायटी, २४ बी. हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

१५ भाटिया स्त्री मंडळ, मंगेश शिनेव स्ट्रीट, जी. पी. ओ. समोर.

१६ बॉम्बे एज्युकेशन लीग, ३२०, ठाकुरद्वार रोड, मुंबई ४

## निराश्रितांसाठीं केंद्रें

( १ ) ॲलब्लेस लेपर होम, ट्रॉम्बे ( मुंबई सबर्बन )
( २ ) एन्. एस्. डी. इन्डस्ट्रिअल ब्लाईंड होम, चाळ क्र. ५२, वरळी
( ३ ) चिल्ड्रेन्स एड सोसायटी, ८३ लेडी हार्डिंज रोड, माटुंगा, मुंबई

( ४ ) दादर स्कूल फॉर दी ब्लाईंड, दादर मेन रोड, दादर, मुंबई १४

( ५ ) दाते चॅरिटेबल डेफ् अँड डंब इस्टिट्यूट, काळाराम मंदीर, ठाकुरद्वार रोड, मुंबई २

( ६ ) बेनिव्होलंट सोसायटी ऑफ बॉम्बे डिस्ट्रिक्ट, २ डंकन रोड, भायखळा, मुंबई ८

( ७ ) फीमेल बेगर्स होम—चेंबूर. ध्येयः—भिक्षुक गुन्हेगारांना शिक्षण व काम वगैरे देऊन त्यांना समाजांत स्थान देणें.

( ८ ) अब्दुल्ला दाऊद बावला मुस्लीम स्त्री अनाथाश्रम, ११ चिंचपोकळी, मुंबई १२

( ९ ) खोजा ( बालिका ) अनाथाश्रम, जुव्हेलाईन कोर्टाच्या समोर, डोंगरी, मुंबई ९

( १० ) नॉर्थ कोट हिंदु बॉईज ऑर्फनेज, बाबुलनाथ क्रॉस लेन, चौपाटी

( ११ ) बाळाभाई वणिक बाला ऑफनेज ( १९३२ ), घोडबंदर रोड, विलेंपालें, मुंबई

( १२ ) श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम, श्रद्धानंद रोड, माटुंगा, मुंबई १९

**लोकवस्ती सन १६६१-१०,०००; १६७५-६०,०००; १७२७–१,३२,०००**

**१८२२ पासून कापसाच्या व्यापाराला आलेल्या तेजीपासून लोकवस्ती वाढूं लागली व शहर सुस्थितींत येऊं लागलें. त्यावर्षी ६ लाख ५५ हजार लोकवस्ती होती. ती १९३१ पर्यंत ११,५७,००० झाली व आज तर ३० लाखाचे वर वस्ती गेली आहे. प्रथम क्षेत्रफळ १५९४ मध्यें हद्द ठरवली गेली त्यावेळीं 'फोर्ट' पुरतेच धरलें जाऊन २ चौ. मैल धरलें गेलें. आजचें क्षेत्रफळ ९६ चौरस मैल आहे.**

गॅल्वनाईज्ड पत्रे, बादल्या, टमरेले, टाक्या, झाऱ्या इ. सर्व प्रकारच्या वस्तू स्वस्त दरांत किरकोळ अथवा ठोक भावानें मिळण्याचें एकमेव ठिकाण !

**हबीबअली टीनवाला**

**दुकान नं. ४ व ५, अली उमर स्ट्रीट, नळ बाजार, मुंबई ३**

उत्कृष्ट छपाई स्वस्त दरांत हवी ना ? मग आजच भेटा

**सत्य विजय प्रिंटिंग प्रेस**

खेतवाडी १२ वी गल्लीच्या नाक्यावर, खेतवाडी बॅक रोड, गिरगांव, मुंबई ४

कॉलेज विद्यार्थ्यांचे आवडतें विश्रांतिस्थान ! स्वच्छता व टापटीप. ताजे व गरम पदार्थ. थंड पेयें.

**एकदां टेस्ट घ्याच !**

**जय कॅफे**

मॅ. कॉन्ट्रॅक्टर–श्रीनिवास शेट्टी रूपारेल कॉलेजजवळ, रामवाडी माटुंगा (बी. बी.) मुंबई १६

"नम्रता व ग्राहकांचें समाधान" सरकारी कार्यालयांतील कर्मचाऱ्यांची सेवा हेंच आमचे ध्येय ! लंचच्या वेळेत चहा, कॉफी तसेच इतर गरम व ताजे पदार्थ माफक दरांत पुरवितो.

संचालक : **के. शामराव नागेश**

**लेबर ऑफिस कँटीन**, वेलिंग्टन सिनेमा बिल्डिंग, धोबीतलाव, मुं. २

सुबक छपाई व वक्तशीर काम यासाठीं लिहा अथवा भेटा

**कैलास प्रिंटिंग वर्क्स**

**कमार्शिअल आर्ट प्रिंटर्स**

खेतवाडी ९ वी गल्ली, गिरगांव, मुंबई ४.

**उत्कृष्ट छपाई स्वस्त दरांत मिळण्याचें एकमेव ठिकाण**

**ज्योति प्रिंटिंग वर्क्स**

१८० बी, गायवाडी, गिरगांव, मुंबई ४

# बृहन्मुंबईंतील व आसपासची प्रेक्षणीय स्थळें

* सौजन्य शीलता
* वक्शीरपणा
* नाविन्य — याकरितां

आज सर्वत्र सोनेचांदीच्या सर्व
प्रकारच्या वस्तूंसाठीं

★

# वामन गणेश हरचेकर

केळकर रोड, दादर, मुंबई २८

या जुन्या पेढीचेंच नांव घेतलें जाते

टेलिफोन ६०४२८

# मुंबई शहरांतील प्रेक्षणीय स्थळें

मुंबईची ऐतिहासिक माहिती या विभागांत मुंबईची पूर्वपिठिका शोधली-तिचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास अवलोकन केला. आतां मुंबई शहर व त्याच्या आवर्तीभोंवतीं असलेली ऐतिहासिक व धार्मिक स्थळें, मुंबईच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनावर ज्यांनीं कायमचा ठसा उमटविला अशा कांहीं प्रेक्षणीय इमारती, विविध सांस्कृतिक केंद्रे, उद्यानें, लेणीं, इत्यादिकांचें आपणास दर्शन घेतलें पाहिजे.

## मुंबादेवीचें देऊळ

या दर्शनाचा प्रारंभ आपण मुंबईच्या ग्रामदेवतेच्या—मुंबादेवीच्या—दर्शनानेंच करूं या. मुंबादेवीचें देऊळ आज आपणास काळबादेवी, तांबाकाटा यांचें नाक्या-



वर दिसतें पण अगदी प्रारंभीं तें तेथें नव्हतें. आजच्या बोरीबंदर रेल्वे स्टेशनच्या हद्दींत पूर्वीं एक तलाव होता. पूर्वींच्या काळीं या ठिकाणीं गुन्हेगारांना सार्वजनिकरीत्या फांशी देत. त्यांची धिंड काढण्यांत येई. म्हणून त्यास 'फांशी तलाव' म्हणत. या तलावाचें कांठीं मुंबादेवीचें मूळ मंदीर होतें. इ. स. १७३७ मध्यें कंपनी सरकारनें जुन्या मुंबई शहराची हद्द वाढविण्याचें ठरविलें. त्यावेळीं मुंबादेवीचें देऊळ त्या फांशी तलावावरून हलविण्यांत येऊन हल्लींच्या जागेंत नेण्यांत आलें. पांडु सोनार म्हणून एक वजनदार व्यापारी होता. त्यानें नवें देऊळ बांधण्याप्रित्यर्थ खूप खर्च केला व

खटपट केली. मुंबादेवीचे बाजूस जें मोठें तळें आहे तें नागरदास नवलाखिया नांवाच्या वाण्यानें बांधलें. मंदिराच्या आवारांतच श्रीगणपति, मारुति, महा-



माधवबाग मंदीर (सी. पी. टँक)



गोल देऊळ (राऊंड टेम्पल)

देव, इंद्रायणी, मुरलीधर, जगन्नाथ, नरसोबा आणि बालाजी यांचीहि लहान लहान देवळें आहेत.


**– प्रफुल्ल पेपर मार्ट –**

**कागद, बोर्ड, प्रिंटिंग इंक्स, पॅकिंग पेपर्स, केमिकल्स**
**इ. चे आयात व्यापारी व विक्रेते**

फोन २६९४२
ग्रॅम्स : कव्हरपेपर

५४, सुतार चाळ, मुंबई २

## महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वति

ग्रामदेवतेच्या दर्शनानंतर महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीच्या दर्शनास गेलें पाहिजे.



या महालक्ष्मीचें देवळांबाबत अशी एक आख्यायिका प्रचलित आहे कीं, मुसलमानांचें अमदानींत महालक्ष्मीची खूपच नासधूस करण्यांत आली होती. अखेरीस महाकाली व महासरस्वति यांचे समवेत महालक्ष्मीनें वरळीनजिक समुद्रांत जलसमाधि घेतली. मुंबई हें बेट पोर्तुगीजांचेकडून इंग्रजांकडे येईपर्यंत या समाधी अवस्थेंतच महालक्ष्मी होती. कालांतरानें महालक्ष्मी व वरळी यांना जोडणारा धक्का बांधण्याचें काम सुरू झाल्यानंतर प्रारंभीं प्रारंभीं बांधकामच टिकेना. " मला व महाकाली, महासरस्वति यांना आजच्या ठिकाणांहून दुसरीकडे योग्य जागीं हलविण्याचें वचन देशील तर मी हें बांधकाम पुरें होऊं देईन " असा दृष्टान्त रामजी शिवजी नांवाच्या एका प्रभू ठेकेदारांस झाला. रामजी शिवजीनें ही गोष्ट करण्याचें ठरविल्यानंतर हें बांधकाम पुरें झालें. यांसच हॉर्नबी वेलॉर्ड असें म्हणतात. व्याघ्रावर आरूढ होऊन महिषासुराचा वध करीत असल्याचें ध्यान महालक्ष्मीचें आहे. महालक्ष्मीचें प्राकारांतच मयुरेश्वर, रामेश्वर, धाळकेश्वर, हरिनारायण आणि विनायकादित्य यांची मंदिरे आहेत. श्री. धाकजी दादाजी यांनीं पाऊण लाखाचें वर खर्च करून धाळकेश्वराचें प्रेक्षणीय मंदीर बांधले असून तें समुद्रकांठच्या बाजूनें खूप दूरवर दिसतें. महालक्ष्मीचें मंदिरानजिक रस्त्याच्या कडेस जें तळें आहे तें इ. स. १८२४ सालीं तुळशीदास गोपाळदास नांवाच्या व्यापाऱ्यानें बांधलें. या तळ्याचें पश्चिमेस शंकर आणि रणछोडजी यांची मंदिरे आहेत. रविवारीं, सणाचे दिवशीं व मंगळवारी, शुक्रवारीं येथें खूप गर्दी असते.

## श्री वालुकेश्वर

मुंबादेवी, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वति, म्हणजे विविध नामरूपाच्या एकाच देवतेची म्हणजे देवीचीं दर्शनें आपण आजपावेतों घेतली. आपणाला आतां सांबशिवाचेंहि दर्शन घेतलें पाहिजे. मुंबादेवी ही जशी मुंबईकर जनतेची देवता आहे तशीच वाळकेश्वरचा 'श्रीवालुकेश्वर' ही गौड सारस्वत ब्राम्हणांची उपास्य देवता होय. मलबार हिलच्या अगदीं दक्षिण टोंकाला श्री. वालुकेश्वराचें मंदीर असून त्याच्या प्रतिष्ठापनेचा इतिहास प्रभु श्रीरामचंद्र सीतेच्या शोधार्थ दाक्षिणेस लंकेकडे निघाले होते त्या काळापर्यंत नेऊन भिडविण्यांत येतो. रावणानें सीतेचे हरण केल्यानंतर श्री रामचंद्र तिचा शोध करीत करीत या ठिकाणीं येऊन दाखल झाले. "तुझी धर्मपत्नी तुला प्राप्त करून घ्यावयाची असेल तर या ठिकाणीं शिवलिंगाची स्थापना करून तूं त्याची उपासना कर." असा उपदेश ऋषिमुनींनी त्यास केला. श्रीरामचंद्रांनीं आपला बंधू लक्ष्मण याची शिवलिंग आणण्यासाठीं काशीस रवानगी केली आणि या मध्यंतरीचे काळांत वाळूचें लिंग करून तो त्याची उपासना करूं लागला. पोर्तुगीजांचें काळांत या वाळूचे लिंगानें जलसमाधि घेतलीं आणि आज जें लिंग आपणांस दिसतें तें लक्ष्मणानें काशीहून आणलेल्या लिंगासारखेच आहे असें सांगण्यांत येते.

## एक हजार वर्षांचें प्राचीन मंदीर

श्री वालुकेश्वराची ही कथा सत्य असो वा नसो, एक गोष्ट मात्र निश्चित खरी आणि ती ही कीं या श्रीवालुकेश्वरास जवळजवळ एक हजार वर्षांचा इतिहास आहे. इ. स. ८१० ते १२४० या काळांत उत्तर कोंकणावर राज्य करणाऱ्या शिलाहार राजवटीमध्यें श्री वालुकेश्वरांचें मंदीर बांधण्यात आलें. प्रारंभीं मुसलमान व नंतर पोर्तुगीज यांनी मंदिराची खूपच नासधूस केली.

आजचें वाळकेश्वराचें मंदीर इ. स. १७१५ सालीं श्री. रामा कामत या नांवाच्या एका धनाढ्य व धार्मिक वृत्तीच्या गौड सारस्वत गृहस्थानें बांधलें. देवळाचें बांधकाम दगडी असून वाळकेश्वराची मूर्ति स्वयंभू आहे. मंदिराचा सभामंडप छोटासाच आहे.

## बाणगंगा

सभा मंडपासमोरच बाणगंगा या नांवाचें एक पवित्र कुंड आहे. या कुंडा-संबंधीं दोन आख्यायिका आहेत. श्रीरामचंद्राचा मुक्काम येथें असतां त्यांनीं भूमीवर बाण मारला. तो थेट पाताळांत घुसला आणि पाण्याचा झोत वर आला. त्यांसच लोक भगवती नदी म्हणूं लागले. दुसरी आख्यायिका अशी आहे कीं परशुरामानें सह्याद्रीच्या शिखरावरून बाण मारला. तो नेमका या ठिकाणीं पडून तेथें पाण्याचा झरा निर्माण झाला. त्यासच बाणगंगा असें नांव पडलें व तें एक पवित्र क्षेत्र झालें.

वाळकेश्वराचें मंदिरानजिकच श्रीगुंडी या नांवाचें एक पवित्र स्थान आहे. श्रीगुंडी, वाळकेश्वर, बाणगंगा या सर्वांना मिळून एक विशेष महत्त्व असून, कार्तिकी पौर्णिमा व महाशिवरात्रीस तेथें मोठ्या यात्रा भरत असतात आणि सर्व ठिकाणीं माणसांची एकच गर्दी उडते.

## बाबुलनाथ मंदीर

मलबार हिलवर इ. स. १९४० मध्यें म्हणजे अगदीं अलिकडे हें बांधलें गेलें आहे. बाबुल नांवाच्या एका व्यापाऱ्यानें ह्या शिवलिंगाची इ.स १७८० मध्यें स्थापना केली. त्याला हें शिवलिंग वरळीच्या समुद्रकिनाऱ्यावर सांपडलें असें म्हणतात. इ. स. १८४० मध्यें मुंबईतील लोकांनीं विशेषतः भाटिया जमातीनें, निधि गोळा करून तें नवीन तऱ्हेनें बांधून काढलें. पण त्यानंतर पारशी लोकांनीं या गोष्टीला हरकत घेऊन या संबंधी दावा लढवला व हायकोर्टानें त्यांच्या बाजूचा निकाल दिल्यामुळें इ. स. १९०० मध्यें बाजू-च्याच जागेंत परत हें भव्य मंदीर बांधण्यांत आलें. तें अतिशय लोकप्रिय देवस्थान आहे. शिखर व मध्यवर्ति गृह हें उत्कृष्ट शिल्पाचें नमुने होत. देवळावर जाऊन पाहिलें असतां शहराचा संपूर्ण देखावा दिसतो. याच बाजूनें पश्चिमेकडचा उतार हा अगदीं समुद्रांत मिळतो. तेथेंच नेपियन सी रोड व वॉर्डन रोड आहेत. सुंदर बागीचा व रेस्टॉरंट असलेला पोहण्याचा तलाव याच वॉर्डन रोडवर आहे.

## ताजमहाल हॉटेल

आशिया खंडांत अत्युत्कृष्ट अशी ख्याति ताजमहाल हॉटेल व त्याला जोडून असलेले ग्रीन्स हॉटेलची आहे. त्याची मालकी व व्यवस्था इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेडकडे आहे. हें एक टाटांचें कन्सर्न आहे.

ताजमहाल हॉटेल सन १९०४ मध्यें सुरू झालें. समुद्रकांठीं बंदराजवळ बांधलेल्या या राजेशाही हॉटेलांत ३०० स्तंभ खोल्या आहेत. हें बांधण्यास त्या वेळीं



४२,५०,००० रुपये खर्च आला. नंतर त्यांत वेळोवेळीं पुष्कळ सुधारणा होऊन आज मितीस त्याची किंमत १ कोट रुपयांपर्यंत करतात. मुंबईसारख्या राजधानींत हिंदुस्थानच्या प्रवेशद्वाराला शोभेल असें भव्य व सोयिस्कर हॉटेल पाहिजे म्हणूनच ताजमहाल सुरू केलें गेलें.

सगळ्या आधुनिक सुखसोयी त्यांत आहेत. नृत्यशाला व इतर कांहीं महाल एअर-कंडिशन्ड आहेत. पोस्ट व तार कचेरी, हर प्रकारचीं दुकानें, प्रवासी माहितीची व्यवस्था यांचीही सोय तेथल्या तेथेंच आहे.

## टाटा मेमोरिअल हॉस्पिटल

तीस लाख रुपये खर्च करून सन १९४१ मध्यें बांधलेल्या या अव्वल दर्जाच्या नमुनेदार इस्पितळांत कॅन्सरवरील उपचाराची खास सोय आहे. आशिया खंडांत यासारखें दुसरें हॉस्पिटल नाहीं.

कॅन्सरसंबंधीं सर्व प्रकारचें संशोधन चालविणारें अखिल भारतीय केंद्रहि याच इस्पितळांत आहे.

## टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस

पदवीधरांना समाजशास्त्रीय शिक्षणाचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम असलेली ही एक संस्था आपल्या देशांत एकमेव आहे. सर दोराबजी टाटा ट्रस्टमधून इ. स. १९३६ मध्यें सुरू केलेली ही संस्था अंधेरी या ठिकाणीं आहे.

पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष व्यवहारी कामहि येथें करावें लागतें. समाजसेवा करणारे कार्यकर्ते व मोठमोठ्या कारखानदारांना लागणारे वेल्फेअर अधिकारी तयार करण्याची ही शाळाच समजावी. नामांकित डॉक्टर या संस्थेच्या ' चाईल्ड गाइडन्स क्लिनिक् ' मध्यें येतात. आपल्या मुलांना सर्व प्रकारची वैद्यकीय व मानसशास्त्रीय मदत मिळते हा लोकांचा फायदा, तर मुलांच्या तक्रारी स्वभावांचा, त्यांच्या खोड्यांचा व संवयींचा अभ्यास करतां येतो, हा शिकणाऱ्या पदवीधरांचा लाभ होतो. शिकणारांना अभ्यासासाठीं थोडें वेतनही मिळते. आपल्या देशांत महत्वाच्या विषयांकडे अत्यंत दुर्लक्ष झालें असल्यानें मुलाबाळांची आबाळ व हेळसांड फार होते.

परदेशांतील प्रख्यात प्रोफेसरांना येथें व्याख्यानासाठीं बोलावतात त्यामुळें विद्यार्थ्यांचा पुष्कळ फायदा होतो.

## टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च

अखिल भारतीय स्वरूपाची, शास्त्रीय संशोधनासाठीं ही संस्था मुंबई सरकारच्या सहकार्यानें सर दोराबजी टाटा ट्रस्टनीं सन १९४५ च्या जून मध्यें काढली. गणित, विज्ञान व इतर संबंध शास्त्रें यांच्या उच्च संशोधनाची सोय या संस्थेंत आहे.

देशभरच्या पदवीधरांपैकीं निवडकांना पुढील अभ्यासासाठीं येथें प्रवेश मिळतो. शिक्षणाबरोबर निरनिराळ्या विषयावरील चर्चाहि ऐकावयास मिळतात. तूर्त मुंबईत प्रयोगशाळा आहे व तेथील आकाशांतील प्रकाश व विज्ञान शास्त्रावरील कांहीं खास प्रश्न यासंबंधीं संशोधन चालू अहे.

स्वतंत्र सोयिस्कर अशी इमारत नुकतीच बांधण्यांत आली असून तिचा खर्च ट्रस्ट व सरकार मिळून करतील. उभयतांचे प्रतिनिधी संस्थेच्या नियामक

समितींत आहेत. पं. नेहरूंच्या हस्तें तिचें उद्‌घाटन झालें. अपोलो बंदरावर या संस्थेची वरील इमारत आहे.

### "गेटवे ऑफ इंडिया"

समुद्रांत गेलेल्या एका जमिनीच्या तुकड्यावर सुव्यवस्थित बांधलेला हा धक्का, परदेशी राजाच्या ( राजे पंचम जॉर्ज व क्वीन मेरी यांच्या ) इ. स. १९११



मधील भारत भेटीनिमित्त मुद्दाम बांधण्यांत आला. दि. १२ डिसेंबर १९२४ रोजीं त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड रीडिंग यांच्या हस्तें त्याचें उद्‌घाटन झालें. तोच गेट–वे ऑफ इंडिया या नांवानें ओळखण्यांत येतो. जवळ जवळ दिवसभर बाहेरच्या लोकांची गर्दी असते. समुद्रांत एक गंमतीची चक्कर मारायची असेल तर येथें लँचेस व नावा मिळतात. ८ आणे ते १ रुपया चार्ज घेतात. यालाच अपोलो बंदर म्हणून ओळखतात. समोरच आपल्याला टेकड्यांची एक रांग दिसते. एकंदर दृष्य रमणीय वाटतें. समोर समुद्रांत बोटी व नावा नांगरलेल्या दिसतात. जवळच ताजमहाल हें सुप्रसिद्ध हॉटेल तसेंच कस्टम हाऊस इ. दिसतात. पूर्वी व्हाईसरॉय अथवा कांहीं समारंभानें जाणारे लोक याच धक्क्यावरून इंग्लंडला जात अथवा इंग्लंडहून येत. इ. स. १९४८ मध्यें शेवटच्या ब्रिटिश फौजांनीं भारताचा किनारा याच धक्क्यावरून सोडला याचें डिझाईन गुजराथेंत १६ व्या शतकांत चालू असलेल्या शिल्पकृतिप्रमाणें आहे. खिडक्या ग्वाल्हेरहून आणलेल्या आहेत.

### मलबार हिल व कंबाला हिल

मलबारी चांचे लोकांचें निवासस्थान असलेलें हें ठिकाण मुंबईचें आज अत्यंत सुधारलेलें व सुंदर असें ठिकाण असून वरील दोन्ही भागांत बगिचे

अनुक्रम



व इतर आधुनिक सुख-सोयींनीं सज्ज असलेले बंगले आहेत. श्रीमंत लोक, बडे अधिकारी, व्यापारी, मंत्री सर्व याच भागांत राहातात. मुंबईचे राज्यपाल हे याच मलबार हिलच्या टोकाला मलबार पॉइंटवर असलेल्या ‘ राजभवन ’ मध्यें राहातात. मलबार हिल गार्डन्स बघण्यासारख्या आहेत.

## राजाबाई क्लॉक टॉवर व मुंबई विद्यापीठ

युनिव्हर्सिटी लायब्ररीच्या वर असलेलें टॉवर, फोर्ट विभागांत अत्यंत उंच मान करून उभें आहे. याची उंची २६० फूट आहे. वर जायला जिना असून आपण तेथून मुंबापुरीचा उत्तम देखावा पाहूं शकतों. बाजूलाच युनिव्हर्सिटी गार्डन असून ती जनतेसाठीं सकाळीं ७ ते रात्रीं ९ पर्यंत उघडी असते. मुंबई विद्यापिठाचीं कार्यालयें याच इमारतींत आहेत. पोस्ट–ग्रॅज्युएट कोर्सचे विद्यार्थी याच इमारतींत येतात. प्रख्यात व्यापारी श्री. प्रेमचंद रायचंद यांनीं २ लाख रुपये आपल्या आईच्या ( राजाबाईच्या ) स्मरणार्थ दिले. सर गिल्बर्ट स्कॉट यांनीं फ्रेंच व गोथिक स्टाईलवरून हें डिझाईन बनविलें.



## फोर्ट विभाग



बोरीबंदर स्टेशन

हाच मुंबईचा मूळ व जुना भाग पण आज मात्र तेथें राहण्याचीं ठिकाणें कमी असून व्यापारी कार्यालयेंच अधिक आहेत. हजारों लोकांची रोज या विभागांत धांवपळ सुरू असते. शेअर बाजार याच विभागांत आहे. टाउन हॉल, सेंट्रल लायब्ररी, रॉयल एशियाटिक सोसायटी, फ्लोरा फाउंटन, म्युनिसिपल कॉर्पोरेशन बिल्डिंग, बोरीबंदर स्टेशन, कस्टम हाऊस, काळा घोडा, सेक्रेटरीयेट (बॉम्बे कॅसल), प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, धोबी तलाव, आझाद मैदान, जनरल पोस्ट ऑफिस, याच भागांत येतात. ट्राम बसेसचें याही भागांत जाळें आहे. प्रमुख बँका, इन्शुअरन्स कंपन्या, व्यापारी कंपन्या, सरकारी कार्यालयें याच भागांत आहेत. सेक्रेटरीयेटची इमारत इ. स. १८७० सालीं बांधली गेली आहे. या इमारतीची २७० फूट लांबी असून व्हेनेशिअन स्टाईलनें ती बांधली गेली आहे.



म्युनिसिपल कॉर्पोरेशन बिल्डिंग

## फोर्ट विभाग



एरॉस थिएटर—
चर्चगेट स्टेशन



सेक्रेटरीयट




चर्चगेट स्टेशन

## फोर्ट विभाग

वेस्टर्न रेल्वेचे प्रमुख कार्यालय, चर्चगेट





चर्चगेट—पुतळा



काळा घोडा

## कॉवसजी जहांगीर हॉल व रॉयल इन्स्टि. ऑफ सायन्स बिल्डिंग

सेक्रेटरीयेटच्या पाठीमागें व म्युझियमच्या पश्चिमेस ही बिल्डिंग असून सायन्स इन्स्टिटयूट तसेंच रेशनिंग हेड ऑफिस येथेंच आहे. सर कॉवसजी जहांगीर यांच्या देणगीनें व सभा समारंभाच्या-मुळें नांवाजलेल्या कॉवसजी जहांगीर हॉलचें वर्तुळाकार सभागृह बघण्यासारखें आहे. ही बिल्डिंग १९२१ सालीं बांधली.



कॉवसजी जहांगीर हॉलचें सभागृह हें मुंबईतील मोठें सभागृह मानण्यांत येते. कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें जानेवारी १९४७ मध्यें याच सभागृहांत बसून कॅबिनेट मिशन प्लॅन स्वीकारला, ज्यायोगें भारताचें स्वातंत्र्य नक्की झालें !



### अफगाण चर्च

हें कुलाब्याच्या टोंकाला असून इ. स. १८३८ ते ४३ या दरम्यान सिंध व अफगाणिस्थानच्या लढायांत मारल्या गेलेल्या शिपायांच्या स्मरणार्थ हें बांधण्यांत आलें आहे. हें चर्च १८५७ मध्यें बांधण्यांत आलें आहे. याच्याच बाजूला मिलिटरी हेडक्वार्टर्स ( बॉम्बे सब् एरिया ) आहेत व रोमन कॅथॉलिक चर्च—( वुडहाउस चर्च—सेंट जोसेफचें )— आहे.

## मुंबईचें हवामान

भौगोलिक स्थान पाहातां विषुववृत्ताचें उत्तरेस १८ अंश असल्यामुळें येथून उत्तर व दक्षिण ध्रुवाकडे नजर लावतां येते. जरी हें स्थान उष्ण प्रदेशांत येते तरी हवा साधारण समशीतोष्ण म्हणजे फार गरम नाहीं, फार थंड नाहीं, थंडी डिसेंबर ते फेब्रुवारी अशी असते. जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत सुरुवात होऊन सप्टेंबर अखेरपर्यंत पावसाळ्यांत मुसळधार पाऊस पडतो आणि अवघ्या चार महिन्यांच्या अवधींत ७५ इंच एवढा वार्षिक पाऊस पडून जातो.

## कुलाबा वेधशाळा व दीपगृह

इ. स. १८२६ मध्यें बांधण्यांत आली व ती मध्यवर्ती सरकारतर्फे चालविली जाते. हवामानाचे अंदाज प्रसिद्ध केले जातात. याच्या थोडे पुढें एक अतिशय प्रकाशमान दिवे सोडलेले कुलाबा दीपगृह समुद्रांत आहे.

## मामा हजानी हाजी अली

ही मुस्लीम साधूची कबर ५०० वार (यार्ड) आंत समुद्रांत बांधली गेली आहे. महालक्ष्मी देवळाच्या बाजूस हॉर्न्बी वेलॉर्डला लागून ती आहे. समुद्रांत जाण्याकरितां कॉजवे बांधलेला आहे. भरतीच्या वेळीं हा रस्ता पाण्यांत बुडून जातो.

## डेव्हिड ससून लायब्ररी

या वाचनालयाची स्थापना इ. स. १८४७ मध्यें झाली असून अनेक ग्रंथ, दैनिकें, साप्ताहिकें, वगैरे वाचावयास मिळतात. ही इमारत महात्मा गांधी रोडवर आहे.

## एल्फिन्स्टन कॉलेज

त्या वेळचे गव्हर्नर श्री. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या स्मरणार्थ इ. स. १८२७ मध्यें बांधलें व सुरू केलें होतें. मुंबई विद्यापिठाशीं हल्लीं संलग्न असलें तरी त्याहून तें निश्चित जुनें आहे.

## टाउन हॉल व सेंट्रल लायब्ररी

इ. स. १८२१ मध्यें बांधला गेला. त्याला ६ लाख रुपये खर्च आला. हा सर्व खर्च लॉटरीच्या रूपानें जनतेंतून जमविण्यांत आला. ही सुंदर इमारत



बांधायला पुरीं १२ वर्षें लागलीं. याच इमारतींत सेंट्रल लायब्ररी असून रॉयल एशियाटिक सोसायटीची मुंबई शाखा आहे. येथें संशोधन व उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ह्या संस्थेच्या मौल्यवान पुस्तकांचा लाभ घेतां येतो. 'आपली मुंबई' लिहितांना या संस्थेंतील पुस्तकांचा फार उपयोग झाला. याच्या बाजूलाच सरकारी जनरल स्टँप ऑफिस व कस्टम हाऊस ( कलेक्टर कचेरी ) आहे. समोर एल्फिन्स्टन (आतां टर्मिनस) गार्डन्स आहेत, मिंट आहे, रिझर्व्ह बँक आहे.

## मिंट

येथूनच मिंट रोड सुरू होतो. ही टांकसाळ भारत सरकारच्या कक्षेंत येते व ६०,००० चौरस वार क्षेत्रफळ एवढी जागा व्यापते. इ. स. १८२३ मध्यें बरीचशी जागा समुद्रांतून, माती टाकून ( Reclaim ), तयार करण्यांत आली. साधारण बॅलार्ड रोडपर्यंत वाढविण्यांत आली.

## बॅलार्ड पियर

जगांतील उच्च श्रेणींतील धक्का म्हणून ओळखला जातो. हा धक्का बॅलार्ड रोडच्या टोंकाला आहे. बहुतेक प्रमुख देशी, विदेशी, कंपन्यांचीं प्रमुख



कार्यालयें याच भागांत आहेत. नैसर्गिक धक्का असल्यामुळें तेथें मोठ्यांत मोठीं जहाजें लागूं शकतात. याच्या बाजूसच पोर्ट ट्रस्टची इमारत आहे. प्रिन्सेस, व्हिक्टोरिया, अलेक्झांड्रा इत्यादि डॉक्स त्याला लागूनच आहेत.

## जनरल पोस्ट ऑफिस

पोस्टमास्टर जनरलचें ऑफिस व या महान् नगरीचें प्रमुख पोस्ट ऑफिस



येथें आहे. तें इ. स. १९११ मध्यें बांधलें गेलें. या सुंदर इमारतीचा वरील घुमट बघण्यासारखा आहे. एका बाजूला भाटिया बाग व एका बाजूस म्युनिसिपल बिल्डिंग (२२५ फूट उंच) आणि बोरीबंदर स्टेशन आहे.

## क्रॉफर्ड मार्केट

त्या वेळचा म्युनिसिपल कमिशनर आर्थर क्रॉफर्ड यांचे स्मरणार्थ इ. स. १८७१ मध्यें हें मार्केट हॉर्नबी रोडच्या उत्तर टोंकाला बांधलें गेलें. या मार्केटमध्यें फळफळावळापासून तों मासळीपर्यंत सर्व कांहीं मिळते. आसपासच्या वस्तींत कापड, सोनें, चांदी, कपबशा, इलेक्ट्रिक गुड्स, फर्निचर सर्व कांहीं मिळतें. याच्यासमोर हेड पोलिस ऑफिस आहे.



## धोबी तलाव

एके काळीं असलेला हा तलाव नाहींसा होऊन आज तेथें प्रमुख जंक्शन बनलें आहे. येथूनच गिरगांव, काळबादेवी, या जुन्या मुंबईची हद्द सुरू होते. बाजूलाच मुंबईतील प्रख्यात चित्रपटगृह 'मेट्रो' आहे. थोडें बाजूला प्रख्यात बॉम्बे हॉस्पिटल ( इ. स. १९५० ) आहे. तसेंच लिबर्टी सिनेमा, टेरिटोरियल आर्मी हेडक्वार्टर्स, काळबादेवी रोड, मरीन लाईन्स स्टेशन व प्रिन्सेस स्ट्रीट ( दवा बाजार ) आहे. येथें ६ रस्ते एकत्र मिळतात. आझाद मैदान बाजूलाच आहे. तें पूर्वी एस्प्लनेड मैदान म्हणून ओळखलें जात होतें. महात्मा गांधी यांनीं सन १९३१ ची चळवळ याच मैदानावरून सुरू केल्यामुळें त्याला '**आझाद मैदान**' हें नांव देण्यांत आलें. एका बाजूस क्रॉस मैदान आहे. पूर्वी हें मरीन लाईन्स एस्प्लनेड म्हणून ओळखलें जात होतें. या मैदानावर पूर्वी चर्च होतें. तें चर्च नाहिसें करून मिलिटरी परेड्सकरितां जागा वापर-

ण्यांत आली. तो क्रॉस अजून तेथें आहे व त्यासमोर ख्रिश्चन भाविक मेण-बत्त्या जाळतांना दिसतात.

## फ्लोरा फाउंटन



दोन दरवाजे अथवा चर्चगेट पूर्वी होतें तेथें हें कारंजें बांधण्यांत आलें. सर बॉर्टर फ्रियर (त्या वेळचें मुंबईचे गव्हर्नर) यांच्या सन्मानार्थ इ. स. १८६७ मध्यें तें बांधण्यांत आलें. बाजूला टेलिग्राफ ऑफिस, हायकोर्ट बिल्डिंग, थोडें पुढें दलाल स्ट्रीटवर शेअर बाजार, प्रमुख व्यापारी कंपन्यांचीं कार्यालयें याच भागांत आहेत. विशेषतः ओरिएंटल लाईफ बिल्डिंग, न्यू इंडिया बिल्डिंग व नवीनच झालेली मर्कंटाईल बँक बिल्डिंग या इमारती प्रेक्षणीय आहेत. पी. डब्ल्यू. डी. सेक्रेटरीयेट जवळच आहे. हल्लींचें चर्चगेट स्टेशन येथून अगदीं जवळ आहे.



ओरिएन्टल लाईफ बिल्डिंग

## मुळजी जेठा मार्केट

कापडाची फार मोठी पेठ म्हणून पौर्वात्य देशांत ही प्रसिद्ध आहे. इ. स. १८७१ मध्यें सुरू झालें. याच्या बाजूला जुम्मा मशिद, प्रिन्सेस स्ट्रीट, दवाबाजार, शेख मेमन स्ट्रीट, जव्हेरी बाजार, सुतारचाळीचा कागदबाजार, लक्ष्मीदास मार्केट, जवळच काळबादेवी रोडवरील कॉटन एक्स्चेंज बिल्डिंग (सोनेचांदी वायदे बाजार) आहे बियाणें बाजार व तांबाकांटा या भागांत आहेत.

## दादीशेठ अग्यारी

प्रिन्सेस स्ट्रीट व गिरगांव रोडच्या नाक्यावर ही इमारत आहे. इ. स. १७१३ मध्यें ही बांधली गेली आहे व तें सर्वांत जुनें व मुंबईतील पारशांचें पहिलें अग्निमंदीर होय.

## भुलश्वर कबुतरखाना

भुलेश्वर येथें एक जुने शिवमंदीर स्वयंभू असून २०० वर्षांपूर्वी तें बांधलें गेलें. कबुतरखाना म्हणजे मोकळ्यां जागेवर, रस्त्यावर असलेल्या ट्रॅफिक आयलंडवर दानधर्म करणारे लोक धान्य टाकतात. तें खाण्याकरितां हीं कबुतरें जमा होतात. त्यांचा थवाचा थवा हिंडताना आढळतो. भुलेश्वर मंदिराची व्यवस्था मात्र ठीक नाहीं. स्वच्छता कोठेंच नाहीं. सर्वत्र पाणी सांडलेलें,

*For*

**HOARDING**

in

BOMBAY STATE, M. P. & KARNATAK

*Please Contact to :—* **B. K, NAIK**

Bharat I. Bank Building, Laxmi Road, Poona 2

*Our Patrons :—* M/s. Standard V. Oil Co.
M/s. Caltex India Ltd., M/s. India Tyre Co.,
M/s. Good year Tyre Co., E. T. C. E. T. C.

शेंकडों उपमंदिरें व भटजी लोकांची गर्दी तेथें दिसते. त्यामानानें महालक्ष्मी, वाळकेश्वर या मंदिरांची व्यवस्था चांगली आहे.

### ऑपेरा हाऊस

मुंबईचें पहिलें थियेटर व आतां तेथें सिनेमा चालतो. येथें ५ रस्ते एकत्र येतात.

### गोवालिया टँक

येथें इंडियन नॅशनल कॉंग्रेसची २८ डिसेंबर १८८५ रोजीं १ लीं सभा घेण्यांत आली व तेथूनच भारताच्या ८ ऑगस्ट १९४२ च्या महान क्रान्ति-लढ्याची सुरुवात झाली.

### माउंट प्लेझंट रोड

मुंबईतील बड्यांचें निवासस्थान असलेला हा रस्ता प्रसिद्ध आहे. तेथेंच क्रमांक १० चें घर म. जीना—पाकिस्तानचें निर्माते—यांचे व बिर्ला हाऊस येथें महात्मा गांधींचें मुंबई मुक्कामांत वास्तव्य असे.


**इंडियन प्रोग्रेसिव्ह विमा कंपनीची पॉलिसी व एजन्सी नेहमीच किफायतशीर असतें**

१९५२ अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनांत कंपनीचे अॅक्चुअरी यानीं हयातीनंतरचे व हयातींतील विम्यास दरसाल दरहजारी रुपये आठ व रुपये सात प्रमाणें बोनस वांटण्याची शिफारस केली आहे.

सढळ अटीवर व भरपूर कमिशनवर एजन्ट नेमणे आहे

**दी इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लि.**

... पुणें २ ...

हेड ऑफिस — कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणें २

चीफ एजन्सी ऑफिस : मेडोज स्ट्रीट, मेडोज हौस, फोर्ट, मुंबई

## टॉवर ऑफ सायलेन्स

पार्शी लोक मृत देह या खड्डयांत पक्ष्यांना खातां यावा म्हणून टाकून देतात. पण येथें पारशांशिवाय इतरांना मज्जाव आहे. झाडें—झुडपें यांनीं हें स्थळ वेढलेलें आहे. हॅंगिंग गार्डनच्या बाजूला आहे.

## मरीन ड्राइव्ह

बॅकबेपासून सुरू होऊन हा वर्तुळाकृति धक्का मलबार हिलच्या पायथ्याशीं संपतो. २५ वर्षांपूर्वी समुद्र मागें हटवून हा बांधण्यांत आला. याचें वैशिष्ट्य



असें आहे कीं याच्या बाजूला असलेल्या इमारती या एका मापाच्या व पद्धतीच्या बांधवून घेण्यांत आल्या आहेत. त्यामुळें ही इमारतींची रांग मोठी प्रेक्षणीय दिसते. रात्रीं जेव्हां दिवे लागतात तेव्हां आपण मरीन ड्राइव्हकडे पाहिलें तर एकाद्या रत्नहारासारखें दिसते म्हणून या भागाला 'राणीचा रत्नहार' सुद्धां म्हणतात. संध्याकाळीं शेंकडों निरनिराळ्या जमातींचे लोक रंगीबेरंगी कपडे घालून हवा खात बसतात.

## चौपाटी

मरीन ड्राईव्हचा शेवट होतो तेथून मलबार हिलच्या पायथ्यापर्यंत जो वाळूमय किनारा आहे त्यालाच चौपाटी म्हणून ओळखतात. चौपाटी म्हटली कीं हीच डोळ्यापुढें येते. नंतर दादर, वरळी, माहीम इत्यादि चौपाट्या झाल्या. मुलाबाळांचें हवा खाण्याचें ठिकाण व राजकीय सभास्थान म्हणून तीस महत्त्व आहे. लोकमान्य टिळकांच्या पार्थिव देहाला येथेंच अग्नि देण्यांत आला व त्यांचा पुतळा आजही तेथें उभा आहे. मात्र एकंदर भेळपुरीवाले, मालीशवाले, पाणी-

वाले, फळवाले व बायका मुलें यांची गर्दी इतकी होते कीं कांहीं जणांना तेथें जाणें नको वाटतें !

## भारतीय विद्याभवन

श्री. कन्हय्यालाल मुन्शी यांच्या पुढाकारानें बांधली गेलेली चौपटीजवळच ही अत्युत्तम इमारत आहे. ही इमारत १९४९ मध्यें बांधली गेली. शैक्षणिक, सामाजिक व कलाविषयक चळवळींचें हें केंद्रच आहे. नेहमीं सभा, संमेळनें, नृत्य, नाट्यप्रयोग, व्याख्यानें होत असतात.



सुंदराबाई हॉल, कॉवसजी जहांगिर हॉल, सेंट झेवियर कॉलेज हॉल या ठिकाणींहि वरीलप्रमाणेंच कार्यक्रम होत असतात. पाश्चात्य पद्धतीचें नृत्य (बॉल) शाला, ताजमहाल हॉटेल (अपोलो बंदर), ग्रँड हॉटेल (बॅलार्ड पियर) ॲम्बॅसडर (चर्चगेट), वेस्ट एन्ड (मरीन लाईन्स) पागोडा, जुहूला मे हॉटेल इ. ठिकाणीं आहेत; चेझ नौस, रिट्झ हॉटेल, ॲस्टोरिया इ. हॉटेलसही याकरतां प्रसिद्ध आहेत.

## हँगिंग गार्डन्स

हिंदुस्थानांतील एक उत्कृष्ट व विविध प्रकारच्या सौंदर्यांनीं नटलेल्या या बागेचें नांव ऐकून बऱ्याचशा लोकांचा प्रथमदर्शनी गैरसमज होतो. परंतु सकृत्दर्शनी जरी हें नांव ( Hanging Gardens ) "झुलती बाग" असें

## हँगिंग गार्डन अथवा फेरोजशा मेहता गार्डन



असलें तरी प्रत्यक्षांत मात्र तसें नाहीं. रस्त्याच्या उतारावर ही बाग असल्यामुळें आपणांस ती झुलती आहे असें दर्शविते. सर फेरोजशा मेहता यांनीं या बागेच्या प्रतिष्ठापनेस विशेष आस्था दाखविल्यामुळें त्यांचेंच नांव या बागेस स्मृतिप्रित्यर्थ देण्यांत आलें.

सुमारें ९०,००० चौरस यार्ड जागा या बागेनें व्यापलेली आहे. सन १८८९ सालीं या बागेचें बांधकाम पूर्ण झालें. या बागेच्या सौंदर्यवृद्धीस


**बी. एस. निखारगे अँड सन्स**

**सर्व भाषेंतील दैनिकें, साप्ताहिकें, मासिकें आम्ही नियमित घरपोंच करतो.**

**लेडी हार्डींज रोड, माटुंगा बी. बी. स्टेशनजवळ, मुंबई १६**

तिच्यांतील कलापूर्ण सजावट ही वर्ढ्शी कारणीभूत झाली आहे. प्रतिवर्षी तिच्यांत नवनवीन सुधारणा होत आहेत. राणीच्या बागेंतील प्राणी–संग्रहालयाच्या अनुरोधानें तेथील कुंपणें आतां निरनिराळ्या तऱ्हा करून आकर्षित करण्यांत आली. याच बागेंत खास मुलांकरितां तयार करण्यांत आलेली एक छोटी व स्वतंत्र बाग आहे व त्यांत झोंपाळे, क्रीडांगण, सी सॉ, घसरगुंडी वगैरे साधनें असल्यामुळें ती फार लोकप्रिय झाली आहे.

याच बागेंत निरनिराळ्या देशांतील मोठमोठ्या लोकांना मानपत्रें दिलीं जातात. त्याचप्रमाणें पुष्कळसे समारंभही येथें होतात.

सूर्यास्ताचे वेळीं जर येथून मुंबईचा विस्तीर्ण टापू पाहिला तर त्या वेळचें त्याचें अतुलनीय सौंदर्य डोळ्याचें पारणें फेडतें. विविध प्रकारच्या जातीधर्मांचे शेंकडों लोक येथें रोज सायंकाळीं दृष्टीस पडतात. पूर्वी या ठिकाणीं बँड वाजविला जात असे परंतु हल्लीं तो बंद करण्यांत आला आहे.

या बगिच्याचें वैशिष्ट्य असें कीं पाण्याच्या टांकीवर तीन फूट उंचीचा मातीचा थर देऊन त्याच्यावर हा बगिचा निर्माण केला आहे. तसेंच झाडें, झुडपें यांना उंट, हत्ती, मोर या स्वरूपांत कापण्याची करामत येथील माळी लोक करतात. खुली हवा खाण्याचें हें एक आदर्श केंद्र आहे.


# डेकन्स कुसुम ऑईल

मृदु व लांब केसांकरितां उत्कृष्ट

— सर्वत्र मिळतें —

**दि डेकन केमिकल वर्क्स**

३७३ सॅन्डहर्स्ट रोड, मुंबई ४

## शिवाजी पार्क

दादरजवळ हा नवीनच झालेला विस्तृत पार्क असून राजकीय चळवळीं-संबंधीं सभा भरविण्यास हें उत्कृष्ट आणि सोयिस्कर ठिकाण बनलें आहे. येथें एक व्यायामशाळासुद्धां आहे.

## कमला नेहरू पार्क



मुंबईतील रमणीय स्थळांमध्यें 'कमला नेहरू पार्क' या नवीन स्थानानें भर पडली आहे. ह्याचा एकंदर विस्तार १०,२७० चौरस फूट असून ही जागा कॉर्पोरेशननें मुंबई सरकारकडून ७ लाख रुपयांस खरेदी केली. हायड्रॉलिक इंजिनियर मि. करनॅक आणि त्यांचे बंधू मि. ॲडी, इन्स्पेक्टर ऑफ गार्डन्स, या दोघांनीं याचें डिझाईन केलेलें आहे. मुंबई शहराचें विलोभनीय दृश्य येथून पाहावयास मिळतें. लहान मुलांसाठीं येथें भरपूर करमणूक आहे 'म्हातारीचा बूट' ही अभिनव इमारत येथेंच आहे.


**एन्. बी. देवधर**

एजन्ट—वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं. लि. सातारा

ऑथराइज्ड एजन्ट—**नॅशनल सेव्हिंग्स सर्टीफिकेट्स**

सर्व प्रकारच्या विमा कामासाठीं लिहा अथवा भेटा

**माधवदास प्रेमजी बिल्डिंग, ५५।१६, मुगभाट, मुंबई ४**

## उद्यानावर लखलखाट

कमला नेहरू पार्क व त्यालगत स्त्रिया व मुलें यांच्यासाठीं असलेल्या उद्यानांत विजलीचे दिवे लौकरच येणार आहेत. या उद्यानांना भेट देणाऱ्या लोकांनीं मागणी केल्यावरून ही सोय २५,२०० रु. खर्चून करण्यांत येत आहे. या प्राथमिक खर्चाखेरीज दरवर्षी बत्त्यांसाठीं रु. २,१२० चा खर्च होणार आहे.

## तारापोरवाला ॲक्वेरियम

मुंबईच्या मरीन ड्राईव्हच्या बाजूला असलेला हा ॲक्वेरियम श्री. आणि श्रीमती व्हिकाजी तारापोरवाला यांच्या उदार देणगीमुळें अस्तित्वांत येऊं शकला. भिन्न जातींच्या माशांचें जीवन कसें असतें याची सामान्य माणसास माहिती असावी ह्या हेतूनें हा ॲक्वेरियम बांधण्यांत आलेला आहे. मासेमारीच्या धंद्यामुळें नाहींतरी एके काळीं मुंबई प्रसिद्ध होतीच ! अमेरिका व इतर पाश्चात्य देशांच्या धर्तीवर अगदीं आधुनिक पद्धतीनें हा बांधलेला आहे. टाक्यांवर प्रकाश पाडण्याची योजना तर फारच उत्कृष्ट आहे. या दोन मजली इमारतीनें ५,३२६ यार्ड जागा व्यापलेली आहे. हिंदुस्थानचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं २७ मे १९५१ रोजीं ह्याचें उद्घाटन केलें. प्रत्येकानें या ॲक्वेरियमला अवश्य भेट द्यावी. येथें २ आणे प्रवेश फी आहे.

सर्वांची आवडती —

डेक्कन टॉफी व डेक्कन श्रीखंड वडी

सर्वत्र मिळतें

डेक्कन कन्फेक्शनरी वर्क्स

मुगभाट, मुंबई ४

## प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम

काळ्या घोड्याला अगदीं जवळ असलेल्या ह्या अप्रतीम इमारतीची, त्यावेळचे प्रिन्स ऑफ वेल्स व पुढे झालेले भारताचे सम्राट पंचम



जॉर्ज यांनी, त्यांनी इ. स. १९०५ मध्यें भारताला भेट दिली त्या वेळीं, पायाभरणी केली. आज सभोवतालीं बगिचा असलेली ही इमारत रोज शेकडों लोकांच्या विश्रांतीचे व भेटीचे केंद्र बनलें आहे. ह्या इमारतींत आपल्याला तीन विभाग दिसतात. कला, पुराणवस्तु संशोधन, निसर्गसंपत्ती ! यांतील कांहीं भाग तर फारच प्रेक्षणीय आहेत. म्युझियम जनतेसाठीं सकाळीं १० ते ५-३० वाजेपर्यंत ( सुट्या व सोमवार खेरीज करून ) खुले असते. कलाप्रदर्शन भरविण्यांचे उद्देशानें या म्युझियमच्या बागेंतच जहांगीर आर्ट गॅलरी इ. स. १९५२ मध्यें बांधण्यांत आली.

## जहांगीर आर्ट गॅलरी

ता. २१ जानेवारी १९५२ रोजीं मुंबईचे तत्कालीन मुख्य मंत्री श्री. बी. जी. खेर यांनीं या गॅलरीचें उद्घाटन केलें. सर कॉवसजी जहांगीर यांच्या उदार देणगीमुळें प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमशेजारीं ही गॅलरी बांधली गेली. मुख्य हॉलमध्यें एका वेळीं ४५० माणसें मावूं शकतील. त्याच्या बांधण्यामुळें स्थानिक कलाकारांची फार मोठी गैरसोय दूर झाली. चित्रांचीं प्रदर्शनें हल्लीं येथेंच भरविण्यांत येतात. सर्व काम अत्यंत आधुनिक पद्धतीवर केलें गेलेलें आहे. भेट देण्यास योग्य असें हें ठिकाण आहे.

# उत्कर्षाचें मूळ—चांगल्या संवयी !

⁂ चांगल्या संवयी माणसाला केव्हांहि उत्कर्षाची पाऊल-वाट दाखवीत असतात. मग त्या संवयी कोणत्याहि प्रकारच्या असोत !

⁂ चित्रपटसृष्टींतील सर्व अद्ययावत् माहिती मिळविण्यासाठीं दर शनिवारीं नियमित प्रसिद्ध होणारें सर्वांचें आवडतें **'शृंगार' साप्ताहिक** वाचण्याची नियमित संवय ठेवा !

⁂ 'शृंगार'च्या प्रत्येक अंकांत चित्रपटसृष्टींतल्या ताज्या घडामोडी, 'दूरचे दिवे, जवळून असे' ही खळबळ-जनक लेखमाला, मार्मिक 'सवाल-जबाब', स्पष्ट व सडेतोड चित्रपटपरीक्षण, मुलाखती, विविध गमतीजमती, माहितीपूर्ण लेख आदि विविध साहित्य असतें. त्यामुळें 'शृंगार' म्हणजे सर्व वाचकांचें मनरंजन व ज्ञानदान करणारें लोकप्रिय साप्ताहिक ठरलें आहे !

⁂ असें लोकप्रिय 'शृंगार' साप्ताहिक नियमित मिळण्यासाठीं फक्त **सात रुपये** भरून वार्षिक वर्गणीदार व्हा.

# 'शृंगार' मराठी साप्ताहिक

(स्थापना १९४९)

: संपादक :

**बाळ बेळगांवकर**

**वि. ग. खांडेकर**

**'शृंगार' साप्ताहिक, ३२० गिरगांव रोड, मुंबई नं. २**

## राणीचा बाग

सध्यां भायखळ्याजवळ असलेला राणीचा बाग हा मुंबईतील सर्वांत जुना व प्रेक्षणीय असा बगिचा आहे. पूर्वी हा शिवडी येथें होता परंतु कालांतरानें सरकारी मदतीच्या साहाय्यानें तो सध्यांच्या स्थळीं हलविण्यांत आला (१८६२). दि. १९ नोव्हेंबर १८६२ ला ह्याचा उद्घाटन समारंभ झाला.



विस्तीर्ण अशा गवताळ भागानें सुशोभित केलेल्या राणीच्या बागेबद्दल अभिमान वाटण्यासारखा आहे. त्यांत निरनिराळ्या देशांतील विविध जातींची झाडें, फुलझाडें व अन्य उपयुक्त वनस्पति यांचा विपुल सांठा आहे. या ठिकाणीं जवळ जवळ २२० च्या वर झाडें-झुडुपें आहेत. सर्व प्रकारचे रंगीबेरंगी पक्षी, जंगली जनावरें, वाघ, सिंह, हत्ती, इत्यादि क्रूर श्वापदें व इतर अनंत प्रकारचे असंख्य पशुपक्षी यांनीं हा बगिचा पूर्णपणें व्यापला आहे. तसेंच सरपटणाऱ्या प्राण्यांचें बहुविध दर्शन येथें होऊं शकतें. या अवाढव्य बागेची व्यवस्था म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मार्फत होते. तत्प्रित्यर्थ प्रतिवर्षी जवळ जवळ २,७९,००० रुपये खर्च केले जातात. या बागेंत एक म्युझियम असून त्यांतील पुराण वस्तु–संग्रहालयाचा विभाग प्रेक्षणीय आहे.

## राणीच्या बागेंत ठेवण्यासाठीं सर्कशींतील हत्तीण

राणीच्या बागेंतील प्राणीसंग्रहलयासाठीं प्रो. देवल यांच्या सर्कशींतील एक २१ वर्षांची शिकवलेली हत्तीण अकरा हजार रुपयांना विकत घेण्याचा निर्णय म्युनिसिपल कमिशनर यांनी नुक्ताच घेतला आहे. कलकत्त्याच्या एका

कंपनीनें दहा हजार रुपयांना अशीच एक तरुण पण न शिकलेली हत्तीण आपल्याकडून मिळेल असें कळविले होते परंतु कलकत्त्याहून त्या हत्तिणीस मुंबईस आणण्याचा खर्चच तीन हजार रुपये येत असल्यानें कमिशनरनीं त्या कंपनीस नकार देऊन प्रो. देवल यांच्या सर्कशींतील हत्तीण खरेदी करण्याचें ठरविले आहे.

वरील सर्व सुखसोयींनीं युक्त असलेल्या राणीच्या बागेला दरवर्षी हजारों लोक भेट देतात. असें सांगण्यांत येते कीं १९५१ सालअखेर ३२ लाख लोकांनीं त्याला भेट दिली. यावरून त्याची लोकप्रियता दिसून येईल. राणीच्या बागेंतील ' बँड ' नेंही लोकांचें मनरंजन उत्तम प्रकारें होतें.

## जोसेफ बॅप्टिस्टा गार्डन

हें उद्यान माझगांव हिलवरील भद्रावद पाण्याच्या सांठ्यावर तयार करण्यांत आलें आहे. त्याचें क्षेत्रफळ जवळ जवळ ३५००० चौ. फूट असून तेथून बंदराचा सर्व देखावा दृष्टीस पडतो. फेरोजशा मेहता गार्डनप्रमाणेंच हेंही एक आदर्श व दर्शनीय स्थळ आहे. परंतु तें किंचित् लहान आहे. या बागेंत एक जिना असून बाग ज्या सांठ्यावर तयार होते तेथें जाऊन तो मिळतो. या बगिच्याचें सौंदर्य-वृद्धीसाठीं प्रतिवर्षी जवळ जवळ ६,६०० रुपये खर्च केले जातात.

## माणेकजी शेठ पारशी अग्यारी

पारशी लोकांचें एकमेव वस्तीचें ठिकाण—मुंबई—येथें त्यांचीं अग्निमंदिरें नसतील तरच नवल ! त्यांच्या मंदिराला अग्यारी ( Fire Temple ) अथवा दारे-मेहर ( दयेचा दरवाजा ) असेंसुद्धां म्हणतात. बनाजी भिमजीची अग्यारी इ. स. १७०८ मध्यें बांधली. ही फोर्टमध्यें आहे. हीच वाढवून इ. स. १७३३ मध्यें माणेकजी नवरोजीनीं बांधली. ह्याला जवळ जवळ एक लाख रुपये खर्च आला. इ. स. १८८१ मध्यें त्यांचा ८ वा वंशज यानें तेथें पुन्हां खर्च करून चांदीच्या भांड्यांत ( खर्च रु. ७००० ) आतश ( अग्नि ) सुरू केला. २४ तास तो जळत असतो.

अनुक्रम १५५४ ... १८०

## अन्जुमान आतश बेहराम

पारशांचा मुख्य धर्मगुरु दस्तूर जिमासार्जी यानें इ. स. १८८५ मध्यें याची स्थापना केली. २५ फूट लांब व तेवढाच रुंद असलेल्या प्रचंड आरशा-समोर एका भव्य व सुबक चांदीच्या भांड्यांत आतश (अग्नि) ठेवलेला असतो व तो २४ तास जळतो. त्याच्याच बाजूला एक ५५ फूट लांब व रुंद असलेला एक प्रार्थना खंड ठेवला आहे व वरच्या माळ्यावर त्याच्या बांधकामाला साहाय्य करणाऱ्या दादाभाई नसरवानजी कॉन्ट्रॅक्टरच्या नांवानें ठेवण्यांत आलें आहेत.

## ख्रिस्ती देवळें

मुंबईंत गोव्याहून आलेले व पोर्तुगीज अमदानींत बाटलेले असे ख्रिश्चन लोक बरेच आहेत. त्यांचेसाठीं अनेक चर्चेस बांधण्यांत आलीं आहेत. पोर्तुगीज चर्च, दादर हें सर्वांत जुनें असें सांगतात. त्याशिवाय रोमन कॅथॉलिक कॅथेड्रल कुलाबा, अफगाण चर्च, पोर्तुगीज चर्च गिरगांव, अपोलो स्ट्रीटवरील सेन्ट ॲन्ड्रयू चर्च, एस्प्लनेड रोडवरील होली ट्रिनिटी चर्च, कुलाब्याचें सेन्ट जॉन चर्च, फ्रिअर रोडचें सेन्ट निकोला चर्च, वगैरे मुख्य आहेत. फोर्ट विभागां-तील फोर्ट चॅपेल या चर्चचा इतिहास गमतीचा आहे. इ. स. १६७५ मध्यें त्याचें बांधकाम सुरू झालें व जवळ जवळ ५०,००० रुपये खर्च आला व नंतर एकाएकीं काम बंद पडलें. याचें कारण व्यवस्थापकानें पैसे खाल्ले. १५ फुटी भिंती राहिल्या व त्या बरीच वर्षें पडून होत्या. नंतर इ. स. १७१५ मध्यें गव्हर्नर स्टिफननें तें काम पूर्ण करवून घेतलें. या चर्चच्या दरवाजावरून चर्चगेट स्ट्रीट हें नांव पडलें. एन्. एस्. डी. एस्पेरेन्का हें चर्च अति प्राचीन आहे. पूर्वी हे एस्प्लनेडवर होतें. पण नंतर तें हलविण्यांत आलें. 'माउन्ट कार्मेल चॅपेल' हें इ. स. १७२१ मध्यें बांधण्यांत आलें. पण १८०५ मध्यें तें बंद करण्यांत आलें. 'वुडहाउस चर्च, कुलाबा' हें इ. स. १८०५ च्या जानेवारींत खुलें करण्यांत आलें. माहीम येथें सॅनमिमेल चर्च आहे. शीव येथें 'लेडी ऑफ गुड काउन्सेल' चें चर्च आहे. हें चर्च फ्रॅन्सिस्कन धर्मगुरुंनीं

मुळें बरीच शिल्लक राहाते. त्यांतून मुसलमान बालकांसाठीं 'मदरेसा महंमदीया' ही शाळा चालविली जाते. तिची इमारत रु. २०,००० खर्च करून इ. स. १९०२ मध्यें बांधण्यांत आली. या मशिदीचा कारभार ११ लोकांच्या मंडळातर्फें चालवला जातो. कोंकणी मुसलमानांचें हें मंडळ आहे.

## बॉम्बे हॉस्पिटल

इ. स. १९५१ मध्यें याचें बांधकाम पूर्ण होऊन तें स्व. वल्लभभाई पटेल यांचे हस्तें उघडण्यांत आलें. मरीन लाईन्स रेल्वे स्टेशनच्या बाजूस लिबर्टी सिनेमाजवळ हें आहे. जयपुरी पद्धतीची बांधणी असून प्रख्यात उद्योगपती श्रीमान् बिर्ला व इतर अनेकांनी दिलेल्या उदार देणग्यांमुळें एवढें हें भव्य हॉस्पिटल बांधण्यांत आलें. निरनिराळ्या विभागांवर शहरांतीलच प्रमुख डॉक्टर्स, त्या त्या विषयांचें तज्ञ म्हणून काम करतात. ३४० कॉट्स राहाण्याची सोय आहे.

## हाफ्किन इन्स्टिटयूट

परळ येथें या संस्थेची इमारत असून येथें सर्व औषधी संशोधनकार्य मुंबई सरकारतर्फें चालविलें जातें. सापाच्या विषाबाबत येथें विशेष संशोधन चालतें. पूर्वी याच जागेंत गव्हर्मेंट गेस्ट हाउस होतें.

## इलेक्ट्रिक हाउस

मुंबई शहरांत व ट्राम—बस वाहातुकीस, वीज पुरविण्याची जबाबदारी असलेल्या बी. ई. एस. टी. अंडरटेकिंगचें हें प्रमुख कार्यालय कुलाब्याला आहे.

## माहीमचा किल्ला

हा फार जुना असून राणा भीमदेवानें तो बांधला होता. एके काळीं महान् वैभवसंपन्न असा हा किल्ला आज माहीम पोलीस चौकीच्या बाजूला असून फुटक्या बुरुजाशिवाय तेथें कांहीं नजरेस पडत नाहीं. याच्या बाजूला लहान बंदर आहे. येथून विरार, आगाशी, येथें जाणाऱ्या होड्या, नावा नांगरतां येतात. येथें कोळी लोकांचें वास्तव्य आहे.

इ. स. १७८० मध्यें बांधलें. ह्याच्या बाजूला टेकडीवर किल्ल्यासारखा गोल भाग आहे.

## जुम्मा मशिद

मुंबईतील मुस्लीम जमातीकरतां शेख मेमन स्ट्रीटवरील जुम्मा मशिद-



मांडवीची जकेरिया मशिद, पायधुणी मशिद, मशीदबंदरवरची सनाद मशिद, मेमनवाड्याची इस्माईल हबीब मशिद, माहिमची जुनी मशिद ( अरब साधूंनी बांधलेली ), डिलाईल रोडची बावला मशिद, जुम्मा मशिदीच्या पश्चि-मेची बोहरा मशिद एवढ्या मुख्य आहेत.

जुम्मा मशिद ही मूळ डोंगरीच्या किल्ल्याजवळ बांधली होती. इ. स. १७५०–६० मध्यें ती बोर्निअरच्या अमलांत एस्प्लनेड रोडवर नेण्यांत आली. तेथून इ. स. १७७० मध्यें त्या वेळचा गव्हर्नर विल्यम हॉर्नबी याचे हुकुमावरुन ती हल्लींच्या जागेंत हल-विण्यांत आली व इ. स. १७७५ मध्यें तिचें हल्लींचें बांधकाम




पायधुणी मशीद

पूर्ण झालें. त्यांत दुकानाकरतां जागा काढण्यांत आली. त्यांचें महिना भाडें २००० रुपये येते. वार्षिक खर्च २४००० रुपयांहून अधिक नाहीं. त्या-

मुळें बरीच शिल्लक राहाते. त्यांतून मुसलमान बालकांसाठीं 'मदरेसा महंमदीया' ही शाळा चालविली जाते. तिची इमारत रु. २०,००० खर्च करून इ. स. १९०२ मध्यें बांधण्यांत आली. या मशिदीचा कारभार ११ लोकांच्या मंडळातर्फे चालवला जातो. कोंकणी मुसलमानांचें हें मंडळ आहे.

## बॉम्बे हॉस्पिटल

इ. स. १९५१ मध्यें याचें बांधकाम पूर्ण होऊन तें स्व. वल्लभभाई पटेल यांचे हस्तें उघडण्यांत आलें. मरीन लाईन्स रेल्वे स्टेशनच्या बाजूस लिबर्टी सिनेमाजवळ हें आहे. जयपुरी पद्धतीची बांधणी असून प्रख्यात उद्योगपती श्रीमान् बिर्ला व इतर अनेकांनी दिलेल्या उदार देणग्यांमुळें एवढें हें भव्य हॉस्पिटल बांधण्यांत आलें. निरनिराळ्या विभागांवर शहरांतीलच प्रमुख डॉक्टर्स, त्या त्या विषयांचें तज्ञ म्हणून काम करतात. ३४० कॉट्स राहाण्याची सोय आहे.

## हाफकिन इन्स्टिटयूट

परळ येथें या संस्थेची इमारत असून येथें सर्व औषधी संशोधनकार्य मुंबई सरकारतर्फे चालविलें जातें. सापाच्या विषाबाबत येथें विशेष संशोधन चालतें. पूर्वी याच जागेंत गव्हर्मेंट गेस्ट हाउस होतें.

## इलेक्ट्रिक हाउस

मुंबई शहरांत व ट्राम–बस वाहातुकीस, वीज पुरविण्याची जबाबदारी असलेल्या बी. ई. एस. टी. अंडरटेकिंगचें हें प्रमुख कार्यालय कुलाब्याला आहे.

## माहीमचा किल्ला

हा फार जुना असून राणा भीमदेवानें तो बांधला होता. एके काळीं महान् वैभवसंपन्न असा हा किल्ला आज माहीम पोलीस चौकीच्या बाजूला असून फुटक्या बुरुजाशिवाय तेथें कांहीं नजरेस पडत नाहीं. याच्या बाजूला लहान बंदर आहे. येथून विरार, आगाशी, येथें जाणाऱ्या होड्या, नावा नांगरतां येतात. येथें कोळी लोकांचें वास्तव्य आहे.

## ब्रेबोर्न स्टेडियम

गव्हर्नर लॉर्ड ब्रेबॉर्न याचे नांवानें हें बांधण्यांत आलें असून, प्रख्यात क्रिकेट-च्या मॅचेस, मिलिटरी परेड्स येथेंच होतात. येथेंच सुप्रसिद्ध क्रिकेट क्लब ऑफ इंडिया आहे. बड्या लोकांचें सायंकाळचें तें एक बसण्याचें ठिकाण आहे.

## वल्लभभाई पटेल स्टेडियम

हॉर्नबी वेलॉर्डच्या बाजूस असून येथें पूर्वी खड्डा होता. तेथें कचरा टाकून तो खड्डा भरण्यांत आला व जवळजवळ १८ लाख रुपये खर्चून तो इ. स. १९५२ मध्यें पूर्ण झाला. इ. स १९५३ पर्यंत त्याला सरकारनें परवानगी दिली नाहीं व नंतर कांहीं अटींवर गव्हर्नर बाजपेयी यांच्या हस्तें याचें उद्घाटन झालें. हा नुकत्याच झालेल्या अमेरिकन फ्री-स्टाईल ( किंग कॉंग-दारासिंग ) कुस्त्यांमुळें प्रसिद्धीस आला. सभोंवतालीं बाग असून तेथेंच नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडियाचें ऑफिस आहे.

## पोहण्याचे तलाव

यामध्यें चौपाटीचा मफतलाल तलाव, गोलवाला बाथ्स ( बॅक-बे ) व



मफतलाल स्वीमिंग पूल, चौपाटी

नुकताच दादर शिवाजी पार्क येथें कॉर्पोरेशननें इ. स. १९५२ मध्यें १० लाख रुपये खर्चून बांधलेला महात्मा गांधी मेमोरियल ऑलिंपिक स्वीमिंग

पूल आहे. कामगारांना स्वस्त दरांत पोहतां येण्याकरतां एक दिवस राखून ठेवला आहे.

## रेसकोर्स




हें वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबतर्फे चालवलें जातें. मेजर ह्यूजेसनें तें बांधून काढलें. तें जगांत अतिशय सुंदर आहे असें मानतात. येथें दरवर्षी नोव्हेंबर ते मार्चपर्यंत रेसेस चालतात.

## बालभवन

तारापोरवाला ॲक्वेरियमच्या बाजूस व चर्नी रोड स्टेशनला अगदीं लागून चर्नी रोड गार्डन्समध्यें ही लहानशी पण आकर्षक इमारत आहे. खास मुलांच्याकरतांच ही आहे. भारताचे पहिले राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या शुभ हस्तें दि. १४ फेब्रुवारी १९५२ रोजीं याचें उद्‌घाटन झालें. तेथें मुलांच्याकरतां वाचनालय, नाट्यशाळा, सभागृह सर्व आहे. चित्रपट दाखविण्याची सुद्धां येथें सोय आहे. रंगपट सुद्धां आहे. वाचनालयांत रंगीबेरंगी खुर्च्या ठेवलेल्या असून जवळ जवळ १०० मुलें एका वेळीं बसूं शकतील एवढी जागा आहे. तेथें हिंदी, मराठी, गुजराथी, कानडी, सिंधी, इंग्लिश इत्यादि विविध भाषेंतील मुलांकरतां असलेलीं पुस्तकें, मासिकें मुलांना वाचावयास मिळतात. दोन नक्षीदार दरवाजे 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'नें तयार केलेले आहेत तर आंतल्या दालनांत 'बालांच्या सान्निध्यांत महात्माजी' असें महात्मा गांधींचें एक भव्य पोर्ट्रेट आहे. इतरहि प्रमुख व शिकाऊ चित्रकारांनीं काढलेलीं चित्रें येथें पाहावयास मिळतात. मुलांना येथें उघड्यावर ठेवलेलीं पुस्तकें व खेळणीं हाताळता

येतात. गोष्टी सांगण्याकरतां एक फिरवतां येणारें प्लॅटफॉर्म स्टेज तयार केलेलें आहे. तें कोठेंहि हालवितां येतें. आपल्या मुलांना एकदां तरी येथें न्याच.

**स्टॅन्डर्ड व्हॅक्युअम बिल्डिंग**



ही इमारत ३२ लाख रुपये खर्च करून बॅकबेवर बांधण्यांत आली असून स्टॅन्डर्ड व्हॅक्युअम ऑईलचे साऊथईस्ट एशियन देशांचें हेडक्वार्टर तेथें राहाणार आहे. सूर्यकिरणांना परावृत्त करून त्यांचा एअर–कंडिशनिंगकरतां उपयोग करण्यांत येणार आहे. एकदंर आठ मजली इमारत आहे व काम करणाऱ्या व्यक्तींना जास्तींत जास्त सुखसोयी लाभाव्यात ही दृष्टि इमारत बांधतांना ठेवली आहे. मुंबई शहरांत अगदीं अपूर्व व अभिमानास्पद अशी ही इमारत आहे. दि. १४ जानेवारी १९५४ रोजीं मुंबईचे मुख्य मंत्री श्री. मोरारजी देसाई, यांचे हस्तें उद्‌घाटन झालें.

## शीव येथें उद्यान

शीव येथील ट्राम फांट्याच्या जंक्शनवर एक सुंदर उद्यान उभारण्यांत यावयाचे आहे. ज्याठिकाणीं हें उद्यान होणार आहे ती जागा सांप्रत घाणीचें आगर बनली आहे. या नव्या सुधारणेंमुळें जनतेला समाधान होईल यांत शंका नाहीं. यासाठीं ३१००० रु. खर्च होणार आहे.

## मुंबईच्या आसमंतांतील प्रेक्षणीय स्थळें

### मढ बीच

आंगठीमध्यें बसविलेल्या रत्नसमूहाप्रमाणें असणाऱ्या मुंबईच्या आसपास असणाऱ्या बेटांपैकीं हें एक प्रेक्षणीय बेट (स्थळ) आहे. मनोरीप्रमाणें येथें १९ मैल मालाडपर्यंत जाऊन पुढें मरवा रोडनें जावें लागतें. मरव्याच्या अलिकडे दोन मैल, रस्त्यांतून एक फांटा गेलेला आहे व तो मढ बेटाकडे जातो. तो रस्ता जरी अरुंद असला तरी हवेशीर, सुंदर व पक्क्या बांधणीचा आहे.

रजि. रक्तशुद्धी व धातुपौष्टीक
द्राक्षार्कमधु
घेण्यास सुरुवात करितांच अंगांत मुरलेली कडकी रक्तदोष, वीर्याचा पातळपणा, अजारानंतर आलेली अशक्तता जाऊन पचनक्रिया सुधारते रक्त वाढविण्याची क्रिया झपाट्यानें सुरू होते. शरीर सतेज सुदृढ बनून आरोग्य अंगीं बाणतें. सर्वत्र मिळतें.
द्राक्षार्कमधु ऑफिस निपाणी (बेळगांव)

पुढें गेल्यानंतर आपण एका ताडाच्या वाडींत शिरतो. वरील रस्ता कलेलें मढ गांवापर्यंत गेलेला आहे. वाटेंत भोजन करण्यास व विश्रांति घेण्यास बऱ्याच निवाऱ्याच्या जागा आहेत. समुद्रावरून वाहणारे गार वारे मनाला प्रसन्नता व आल्हाद देतात.

समुद्र आणि मढ बेटाचा किनारा हे रस्त्याच्या कुठल्याहि भागापासून एका हांकेच्या अंतरावर आहेत. कांहीं वर्षांपूर्वी तें एक सामान्य व विशेष प्रसिद्धी न पावलेलें असें एक शांत स्थळ होतें. परंतु अलिकडे त्याची अनेक प्रकारें सुधारणा होऊन एका प्रेक्षणीय स्थळांत त्याची गणना होऊं लागली आहे.

'जुहू' प्रमाणेंच याचीहि प्रसिद्धी झाली आहे व तें तितकेंच लोकप्रिय झालें आहे. रस्त्याच्या दुतर्फा गर्द झाडी असून विश्रांतिगृहें व दुकानें हींहि त्यांना साथ देत आहेत. दर शनिवार–रविवारीं व इतर सुटीच्या दिवशीं लोक इथें सहलीला व मौजमजा करण्याकरतां येतात.

तुलनात्मक दृष्ट्या जर आपण 'मनोरी' बेटाकडे पाहिलें तर तिकडे रहदारी किती कमी आहे! त्याचें कारण म्हणजे होडींतून खाडी तरून जाऊन नंतर एक मैलपर्यंत चालावें लागतें व थोडक्या वेळांत हें शक्यहि नसतें. याच्या उलट मढ (मधु) हें बेट सुटीचा वेळ घालविण्यास सोयिस्कर व आदर्श असें ठिकाण आहे. मनोरीपेक्षां येथील हवा थंड असून निसर्गाचें प्रसन्न वातावरण मनाला उल्हसित करतें.

लढाईच्या काळांत हें बेट लष्कराच्या (मिलिटरी) च्या ताब्यांत होतें. अजूनहि तेथें लष्करी छावण्या व छोटे अरुंद पण पक्के रस्ते अस्तित्वांत आहेत. हल्लीं तेथेंहि निर्वासित लोकांची वस्ती आहे व मुलांकरतां शाळाहि बांधलेल्या आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गर्द झाडी व रस्त्याच्या कडेला विकाऊ जमिनींच्या तुकड्यांचें माहिती-फलक लावलेले आहेत.

अशा या शांत ठिकाणीं गेल्यानें करमणुकीबरोबर आपणांस माहितीहि मिळते.

या निसर्गसुंदर अशा बेटाचा किनारा विस्तृत व रुंद आहे. जुहू-

इतकी जरी त्याची किंमत वाढलेली नसली तरी सुटीच्या दिवसांत मौज-मजा व मोकळ्या हवेचा आनंद लुटण्याकरितां तें एक आदर्श ठिकाण राहील.

## " बावा मलंग "

फारशी प्रसिद्धी न मिळालेल्या स्थलांपैकींच मुंबईजवळील बावा मलंग ही टेंकडी असून तिच्याबद्दल ब-याच दंतकथा आहेत. ही टेंकडी कल्याणला असून गांवांतून तिच्या पायथ्याशीं मोटारीनें जातांना दोन तास लागतात व टेकडीची चढण चढण्यास आणखीन दोन तास लागतात.



शहरांत आपणांस तुरळक अशा भिकाऱ्यांची संवय असते. पण बावा मलंगला जाण्याच्या रस्त्यावर आपणांस खूपच भिकारी भेटतात. त्यांचीं तीं निर-निराळ्या तऱ्हेचीं लहान लहान गलिच्छ घरें पाहून पृथ्वीवरील भिकाऱ्यांचें हें आवडतें स्थान आहे कीं काय याबद्दल एक क्षणभर आपणांस आश्चर्य वाटतें. ते सर्व भिकारी त्या टेकडीचे भक्त, पुजारी आहेत.

टेकडीवर बावा मलंगची समाधी आहे. हा भिकाऱ्यांचा समाज हें दुसरें तिसरें कांहीं नसून तो भक्तांचा एक तांडाच आहे. त्यांनीं आपला वेळ व कित्येकांनीं आपलें आयुष्य त्या साधूची भक्ति करण्यांत वाहून घेतलेलें आहे. त्या भक्तगणांत निकृष्ट पातळीच्या लोकांपासून ते उच्च कुलीन घराण्यांतील लोकांपर्यंत सर्व प्रकारचें लोक सामील झालेले दिसून येतील. केवळ बावांची सेवा करावी हाच उद्देश मनाशीं धरून कित्येक लोकांनीं येथें वास्तव्य केलें आहे.

आश्चर्याची गोष्ट हीच कीं जी टेकडी चढण्यास तरुणांना सुद्धां जड जाते ती हे भिकारी लोक सहजगत्याच चढूं शकतात.

बावा हाजी मलंग यांची समाधी ( कबर ) उंच शिखरावर असून तेथून टेकडीच्या आसमंतातील दृश्य फारच मनोहर दिसतें.

टेकडीवरील बावांची समाधी म्हणजे कबरीची एक लहान प्रतिकृतिच वाटते व तिच्याभोंवतीं भक्तगणांच्या झुंडीच्या झुंडी येतांना दिसतात. इमारतीला सुंदर नक्षीकामाचा घुमट असून पायऱ्यांपर्यंत संगमरवरी फरशी वापरली आहे. आंतमध्यें दोन समाध्या आहेत. एक बावांची व दुसरी त्यांच्या मानलेल्या मुलीची असून त्या दोन्ही कबरी फुलांनीं भारावलेल्या असतात. ही मुलगी एक राजकन्या होती.

बाबा ७०० वर्षांपूर्वी त्याच टेकडीवर, कीं जिथें ते समाधी घेण्याकरतां आले तेथें, वारले. अजूनहि त्यांची समाधी म्हणजे एक भक्तीचें व पूजनीय असें स्थान आहे.

या स्थानाचा एक विशेष असा आहे कीं जो कोणी दुःखानें त्रस्त असेल त्यांनीं तेथें जाऊन नवस करावयाचा कीं तो नवस थोड्याच दिवसांत फळाला येतो. कांहीं लोक असेंहि सांगतात कीं बावा मोठ्या वाघापासून सर्व निरनिराळीं रूपें घेत असत. अशा अनेक दंतकथा व बाबांनीं प्रसाद दिल्याच्या कथा प्रसिद्ध आहेत. एकदां भेट द्यावी असेंच हें स्थान आहे. कांहीं लोक या टेकडीचा

निटेड नेकटाय, सिल्क व कॉटन स्विमिंग ट्रंक व स्वेटर
वगैरेचे मॅन्युफॅक्चरर

**वेस्टर्न इंडिया होझीअरी वर्क्स**

C/o **सामन्त टेलर्स**

**जुनी चिखलवाडी, ग्रँट रोड, मुंबई ७**

संबंध, गोरखनाथाचे गुरु मच्छिंद्रनाथ हे येथें राहात असत व नाथ पंथाची स्थापना याच टेकडीवर झाली असा, लावतात व त्या पंथाचें वैशिष्ठ्य—किमया याच टेकडीवर वाटली गेली असें सांगतात. अनेकांना येथें कांहीं अनुभव आल्याचे सांगतात.

या स्थानाची उत्पत्ति पुरातन काळांत लुप्त झालेली आहे. पण बॉंबे गॅझेटियरमध्यें १३ व्या शतकांत आलेल्या अरब मुस्लीम धर्मोपदेशक साधूची समाधी असा उल्लेख आहे. हा दर्गा कल्याणचे काशीनाथ केतकर नांवाच्या ब्राह्मणानें दुरुस्त केला व त्यांत त्याला मृत बाबा मलंग यांचें सहाय्य झालें असें म्हणतात. १८७१ मध्यें कल्याणच्या मुसलमानांना दर्ग्याची व्यवस्था एका ब्राह्मणाकडे असावी हें पसंत नव्हतें. त्या वेळीं हैदर हाही दर्ग्याचा वंशपरंपरा व्यवस्थापक होता. यावर त्यांच्या वंशजांत तंटा उत्पन्न होऊन प्रकरण हायकोर्टांत गेलें पण निकाल लागला काशीनाथ केतकरच्या प्रतिनिधीच्या बाजूनेंच !

एकंदरीत ही टेकडी म्हणजे एक गूढ आहे एवढें खरें !


(स्थापना इ. स. १९४०) (गुजराथी व मराठी)

**वेणी सिने साप्ताहिक**

: संपादक : बदरी काचवाला | : सह संपादक : यशवंत ढापरे

सिनेमा विषयावर सांगोपांग माहिती पुरवणारे एकमेव साप्ताहिक

— दर शनिवारीं प्रसिद्ध होते —

वार्षिक वर्गणी रु १२ * किरकोळ अंकास ४ आणे

**वेणी पब्लीकेशन्स**

फॅन्सी मार्केट, वायली स्ट्रीट, आग्रीपाडा, मुंबई ११

# लॉंग-लाईफ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पुणें

सेवानिवृत्तीनंतर आपल्याला पुण्यास घर बांधावयाचे आहे काय ?

**हीच एक उत्कृष्ट संधि !**

पुणें शहराला अगदीं नजीक पण पुणें कॉर्पोरेशनच्या हद्दीबाहेर, उंचवट्यावर असलेल्या हवेशीर ठिकाणीं घरें बांधण्यासाठीं निरंतरचे करारानें, अत्यंत अल्प दरानें सोयीचे प्लॉट ही सोसायटी सभासद होणारांना देत आहे.

आमच्या सोसायटीच्या कार्यक्षेत्रांत रिक्रिएशन क्लब, पार्क, शाळा इ. संस्था निघण्याचा संभव आहे. ही सुवर्ण संधि दवडूं नका.

**सत्वर चौकशी करा !**

—: पत्ता :—
१८० बुधवार पेठ, पुणें २

**वा. चिं. भानु**
ऑनररी सेक्रेटरी

अनुक्रम
विभाग ..२१५.
क्रमांक
नों. दि

## पवई व विहार सरोवरें

मुंबईच्या उष्णतेला त्रासलेल्या लोकांना ताजेतवाने करणारें असें असलेलें पवई हें सरोवर मुंबईपासून पंचवीस मैलांवर आहे. त्याच्यासभोंवतीं टेकड्या, झाडें–झुडपें, हिरवींगार शेतें व उंचच उंच ताडाचीं झाडें पसरलेलीं आहेत. निसर्गानें या ठिकाणाला रमणीयतेच्या देणग्या दिलेल्या आहेत.

पवई तलावाला जोडूनच दुसरें एक विहार सरोवर आहे. विहार सरोवर पाहण्यासाठीं जितके लोक जातात त्याच्या एकदशांश लोकही पवई पाहण्यास जात नाहींत. तरीही माझ्या मतें पवई हें एक उत्कृष्ट प्रेक्षणीय स्थळ आहे.

ह्या ठिकाणाला भेट न देण्याचें कारण म्हणजे त्या ठिकाणापर्यंत मोटारी जाऊं शकत नाहींत हें एक असावें अगर तेथें वस्ती नाहीं असेंही असावें. पवई हें मुख्य रस्त्यावर नसल्यामुळें तें कुठें आहे हें सांगणें कठीण आहे आणि विहारकडे जाणाऱ्या रस्त्यापासूनही तें दूर आहे.

पवईला जाण्यास दोन रस्ते आहेत. एक किंग्ज सर्कल, सायन व कुर्लामार्गें व दुसरा सांताक्रूझ व अंधेरीमार्गें. दोन्हीं मार्गांचें अंतर जवळ जवळ सारखेंच आहे. दुसऱ्या मार्गानें गेल्यास अंधेरी बाजारांतून उजवीकडे वळसा घेऊन जावें लागतें आणि डावीकडे वळल्यास आपण वरसोव्याला जाऊं शकतो. उजवीकडे वळलें असतां तात्बडतोब बृहन् मुंबईतील एका प्रमुख रहदारीचें लेव्हल क्रॉसिंग लागतें. तिथून पुढें पांच मैल सरळ गेल्यावर हा रस्ता कुर्ल्याहून येणाऱ्या मुख्य रस्त्याला जोडला जातो. तेथें विहारला जाण्यास मार्ग दाखवण्याकरितां पाटी लावलेली आहे पण त्यांत पवईचा उल्लेख केलेला नाहीं.

आणखी एकदां आपणांस मुंबईचे अधिकारी लोक प्रेक्षकांना प्रेक्षणीय स्थळांकडे आकर्षण करण्याकरितां किती निष्काळजीपणा दाखवतात हें दिसून येईल. ह्या स्थळांची लोकप्रियता वाढवण्याकरितां एक मार्ग म्हणजे त्या स्थळांपर्यंत पक्के रस्ते तयार करणें हा होय.

वास्तविक तेथून फार अंतरहि नाहीं अगर फारसा खर्च येईल असेंही नाहीं. फार तर तीन चार मैलांचें अंतर असून व तेथील देखावा प्रेक्षणीय असूनसुद्धां जातांना प्रत्येक क्षणाक्षणाला शरीराला भयंकर वेदना होतात. तेवढ्या भागाला खडीचा रस्ता केला तरी चालण्यासारखें आहे. घोडबंदर रोड हाही डांबरी रस्ता नसून सुद्धां पुष्कळच चांगला आहे.

विहार—पवई मार्गावर जितकी रहदारी चालते त्याच्यामानानें यावर कांहींच खर्च झालेला नाहीं. दर आठवड्याला शेंकडों लोक विहारला जातात. परदेशी प्रवाशांना विहार सरोवर हें एक अभिमानास्पद असें स्थळ म्हणून दाखवलें जातें. जें स्थळ इतक्या अभिमानानें दाखवलें जातें त्याबद्दल अधिकारीवर्ग इतका निष्काळजी असावा याचें आश्चर्य वाटतें.

तें कांहींही असो. तीन चार मैल अंतर तोडल्यानंतर व उजवीकडे दृष्टि वळवल्यावर आपणास दोन दगडी स्तंभांजवळून जावें लागतें आणि त्या स्तंभावरून ती कोणाची तरी खासगी मालमत्ता असावी असें वाटतें. त्या स्तंभावर ' रिपल्स ' असें त्या घराच्या मालकाचें नांव कोरलेलें आहे आणि त्यामुळें त्या स्तंभाच्या आंतील मालमत्ता खाजगी आहे हें सिद्ध होतें. स्वाभाविकपणें ज्यांना हें माहीत नाहीं त्यांना असें वाटतें कीं ही खाजगी मालमत्ता आहे परंतु ती गैरसमजूत आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं तेथून पवईकडे जाण्याचा मार्ग दाखविला आहे. थोड्याच वेळांत शांत आणि गंभीर असें पवई सरोवर दृष्टीस पडतें.

सामन्त टेलर्स
युनिफॉर्म क्लोदिंग कॉन्ट्रॅक्टर्स,
जुनी चिखलवाडी, ग्रँट रोड, मुंबई ७

प्रथम आपणाला तें ' रिपल्स ' नांवाचें घर ओलांडून नंतर एक वळण घेतल्यावर आपण सरोवराच्या कांठावर येतो. इथें एक क्षणभर आपणास थांबावेंसें वाटतें. कारण तेथील देखावा आल्हाददायक आहे. याशिवाय सरोवराच्या किनाऱ्यावर तुम्हाला पुष्कळ लहान लहान बोटी व माच्छिमारीचे तराफे दृष्टीस पडतात आणि ही सर्व मालमत्ता मच्छिमारी संस्थेची असते. ह्या संस्थेकडून म्युनिसिपॅलिटी, बोटी व मच्छिमारीसाठीं तळ्याचा उपयोग करण्याकरितां ठराविक भाडें घेतें.

जेव्हां पाण्याविरुद्ध मुंबई शहरांत जास्त ओरड ऐकूं येऊं लागली त्या वेळेस पवई हें सरोवर तयार केलें गेलें आणि त्याचा मुख्य हेतु मुंबईतील पाणी पुरवठा हें होय. जनतेला उपयोगी पडणारें हें तिसऱ्या नंबरचें सरोवर आहे. ही योजना १८८९ मध्यें हातीं घेतली होती, तरी त्या आधीं विहार व तुलसी यांचें काम सुरू झालें.

जरी पवई योजना ही अयशस्वी ठरली तरी ती एका वर्षांत पूर्ण झाली व त्याकरितां साडेसहा लक्ष रुपये खर्च झाले. रोज दोन लक्ष गॅलन पाणी मिळूं लागलें तरी पाण्याच्या दर्जाबद्दल तक्रारी असल्यामुळें तें बाजूला पडलें.

सन १९१९ मध्यें नुसतें तलावांतील पाणी साफ करण्याकरितां आणखी पांच लाख रुपये खर्च केला गेला पण तेंही तानसा पुरें करण्याच्या कामांत सोडून द्यावें लागलें. एकंदरींत ह्या तलावाचें काम कॉर्पोरेशनला महाग पडलें.

सरोवराचें क्षेत्रफळ ३६५ एकर इतकें आहे. थोडें पुढें गेल्यावर दोन रस्ते जेथे बंद होतात तेथून सरोवराचा संपूर्ण देखावा दिसतो. डावीकडील रस्ता आपणास एकदम सरोवरामध्यें नेऊन सोडतो. तो सरोवराचे दोन भाग करतो आणि दोन्हीं बाजूंची थंड हवा खात ह्यावरून चालणें फार आल्हाददायक वाटतें.

मला असें वाटतें मोटारी नेण्यास इकडे मनाई आहे. एक तर यावरून मोटारी नेणें अशक्य आहे व दुसरें म्हणजे त्या रहदारीला अडथळा करतात. तरीपण मोटारलॉरीवाले आपल्या गाड्या सरोवरांत साफ करून ज्या वेळेस

वळवतात तो देखावा मजेशीर वाटतो. आपणांस टेकड्या व झुडुपें हीं फार जवळ दिसतात कारण पवई त्यांनींच वेढलेलें आहे. तेथें हिंडत असतांना एक दिवस सहज निघून जातो. दोन रस्ते फुटतात तेथूनच पांच टेकड्यांची एक लाईन दिसते. ह्या टेकड्या एकापेक्षां दुसरी उंच अशा आहेत. मग पहिलीची व शेवटचीची उंची परत सारखी आहे. जर तुम्ही तिकडे गेलांत तर आंतील एक दोन तरी टेकड्या पाहाण्याची संधि वायां घालवूं नका. तेथील वातावरण अगदीं गंभीर आहे. थोड्याच अंतरावर थोडीं झुडुपें असून, भोजन करण्यास व विश्रांति घेण्यास लायक अशा व जेथून सरोवराकांठील देखाव्याचा आनंद उपभोगतां येईल अशा अनेक जागा तेथें आहेत.

पवईच्या भोंवतालच्या वातावरणांत ऐकावयास मिळणारें पक्ष्यांचें संगीत हीं एक तेथील उल्लेखनीय गोष्ट आहे. ह्या ठिकाणाला निसर्गानें अनेक तऱ्हेचे गवई दिलेले आहेत आणि ते मधुर आवाजांत गाणें म्हणण्यांत तल्लीन होतात. परंतु त्या गोड गाण्यांचा भंग केव्हां केव्हां कावळ्याच्या ओरडण्यानें जणु एकाद्या टीकाकाराप्रमाणेंच होतो.

तुमचा या गोष्टीवर विश्वास बसणार नाहीं पण एके काळीं विहार व पवई हे दोन माणसें खाणारे वाघ आहेत असें मानलें जात होतें. पुष्कळ लोक येथें मारले गेलेले आहेत आणि त्यांपैकीं एका वाघानें तो स्वतः मरायच्या आधीं २६ माणसें मारलेलीं आहेत. येथील जंगलांत व टेकड्यांवर अजूनहि तशी

आपली किराणा मालाची कोणतीहि गरज आम्हीं भागवूं !
घरपोंच माल पोचविला जाईल
चोख माल—माफक दरांत पुरविणारे महाराष्ट्रीय व्यापारी
वैद्य ॲन्ड सन्स
न्यू विठ्ठलदास मार्केट, ग्रँट रोड, मुंबई ७

शक्यता आहे. मुंबईला परतण्यासाठीं आपणास पाठीमागें येण्याची जरुरी नाहीं. सरोवराच्या एका बाजूला वळसा घातला असतां आपण मुंबई–ठाणा या मार्गावर येतो. आपल्याला फक्त उजव्या बाजूस वळावें लागतें मग आपणाला आपली दिशा कळते आणि त्याच वेळेस जर आपणास विहार सरोवर पाहाण्याची इच्छा असली तर ज्या रस्त्यांनीं आपण आलों त्याच रस्त्यानें त्या दगडी स्तंभापर्यंत परतावें लागतें. नंतर उजव्या बाजूस वळलें असतां आपणास विहारचा मार्ग मिळतो आणि अवघ्या एक मैल अंतरांत आपण विहारपाशीं पोहोंचतों. त्या ठिकाणीं आपणास मोटार बाहेरच्या बाजूस उभी करून सरोवराकांठीं असलेल्या बागेंत हिंडावें लागतें. छायेवरून वेळ दाखवणारें असें तेथें एक दगडी घड्याळ आहे. बाग फार रमणीय आहे आणि जरी ती बाग फारशी रमणीय नसली तरी तेथें बऱ्याच सुंदर आणि निवाऱ्याच्या जागा आहेत. अशा त्या आपल्यासमोरील शांत व गंभीर सरोवरांत पुष्कळ क्रूर प्राण्यांचें संग्रहालय आहे. त्यांत इतक्या मगरी आहेत कीं आपण सरोवराकांठून थोडा वेळ चाललों असतां एकादे वेळेस त्या वर सरपटतांनाही दिसतात.

विहार सरोवर हा मुंबईचा अगदीं पहिला पाणीपुरवठा आहे. सन १८४६ मध्यें कॅप्टन क्रॉफर्ड यानें विहार या ओढ्याचें पाणी अडवून, त्याचा सांठा करून, पंपाच्या साहाय्यानें शहराला पाणीपुरवठा सुरू केला. अखेर १८५४ मध्यें सरकारनें या योजनेला पाठिंबा दिला आणि १८५६ मध्यें प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. आणखी ही गोष्ट सांगण्यास अभिमान वाटतों कीं, विहारचें धरण हें जगांत सर्वांत उंच पण मातीचें आहे. धरणाचें काम पूर्ण झाल्यानंतर तें सरोवर ९,१२० लक्ष गॅलन पाणीपुरवठा करूं लागलें.

१ मार्च १८६० मध्यें विहार सरोवराचा उद्घाटनसमारंभ झाला आणि तें सात लक्ष गॅलन रोज अगर ७ लक्ष लोकवस्ती असलेल्या शहराला माणशीं दहा गॅलन पाणी पुरवूं लागलें. परंतु लवकरच त्या पाण्याबद्दल तक्रारी येऊं लागल्या. तसेंच त्या तक्रारी अगदीं आतांपर्यंत म्हणजे तळें स्वच्छ ठेव–

ण्याची दक्षता घेईपर्यंत सुरू होत्या. १९४३ पर्यंत सरोवरांतील पाणी सुधारण्याकरितां प्रयत्न चालू होते आणि तें स्वच्छ करण्याकरितां ५५,००० रुपये खर्च ही झाला. प्रत्यक्ष विहार सरोवराचा म्युनिसिपॅलिटीनें १८६३ मध्यें ताबा घेतला आणि ही योजना संपूर्णपणें यशस्वी होण्याकरितां एकंदर ७२ लाख रुपये खर्च आला. सरोवराच्या दुसऱ्या बाजूला एक पूल चढून गेल्यावर एका एक मजली इमारतींत मुख्य ऑफिस लागतें.

आपणाला जर उत्साह असेल तर तेथें हिंडण्याकरितां निसर्गानें भरपूर वाव दिला आहे; कारण तें सरोवर जंगलांनीं वेढलेलें आहे.

## तुळसी तलाव

आपल्या सरोवर–प्रदेशांतील एक पैलू असें तुळसी सरोवर मुंबईपासून अवघ्या १० मैल अंतरावर आहे. विहार अगर पवई यांना वारंवार भेट देणारे लोक जरी पुष्कळ असले तरी कांहीं थोडे लोक, सगळ्यामध्यें लहान परंतु अगदींच एकाद्या चित्राप्रमाणें असणाऱ्या तुळसी सरोवरालाही भेट देतात.



तुळसी सरोवर

तुलनात्मक दृष्टीनें त्याला इतरांइतकी प्रसिद्धी नाहीं त्याला एक कारण आहे. तेथें प्रवेश करणें अत्यंत कठीण काम आहे. मुंबई म्युनिसिपॅलिटीनें त्याकडे

विशेष लक्ष दिलेलें दिसत नाहीं कारण तें जंगलांनीं व्यापलेलें असून तेथील संपत्तीही सामान्य वर्दळीपासून लपवून ठेविला आहे असा भास होतो.

घाटकोपरपर्यंत मोटारनें १३ मैल अंतर तोडल्यावर बाकीचें ७ मैल अंतर म्युनिसिपल रेल्वे मार्गानें आणि १॥ मैल संपूर्णपणें जंगल ओलांडल्यावर आपण उघड्यावर येतों आणि त्यावरच आपणास एका बाजूनें पोईसर, मागटन, यूर, पांचपाकडी, मुलुंड व गुंडगांव या टेकड्यांनीं वेढलेलें व पूर्व दिशेला प्रसिद्ध लेण्यांचें माहेरघर 'कण्हेरी' ही दरी असलेलें तुळसी सरोवर दृष्टीस पडतें. ज्याला म्युनिसिपल रेल्वे मार्गानें शक्य नसेल त्याला तिथें जाण्यास बरेच मैल पायीं चालावें लागेल. पण खऱ्या सौंदर्यसृष्टीच्या भोक्त्याला तेथें पोहोंचल्यावर झालेल्या श्रमांबद्दल वाईट वाटणार नाहीं.

तुळसी सरोवर फार भव्य नसलें तरी रमणीय नक्कीच आहे. खऱ्या सौंदर्यानें नटलेल्या अशा एकाद्या तरुण पण पवित्र अशा एकाद्या मुलीसारखे तुळसीचें सौंदर्य आहे. तुळसी हें जरी धरण असलें तरी त्यांतील पाणी अगदीं मर्यादित असें आहे. सभोंवतीं टेकड्या असूनसुद्धां वातावरण अगदीं शांत वाटतें. त्यामुळें बघणाऱ्यांच्या डोळ्यांची तृप्ति होते. सबंध सांवली मिळेल इतकें जंगल आहे पण तेथें किर्र झाडी नाहीं. सरोवराच्या जरा अलिकडे एक पॉवर हाउस आहे. तेथें हळुंहळुं उंच होत गेलेली आणि लहान लहान उंचवटे असलेली अशी सुंदर बाग आहे आणि तेथून सरोवराचा देखावा आपणांस दिसूं शकतो.

धारकरी महाराष्ट्राचा वारकरी सांप्रदाय भक्तीभावानें पुढें चालविण्यासाठीं "शीतल सुगंध अगरबत्तीचा" शीतल सुगंध सर्वत्र दरवळत आहे, तसेंच शुद्ध अंतःकरणाचें द्योतक शुभ्र पोषाख ठेवण्याचे एकमेव साधन "बेस्ट अल्ट्रा मरीन ब्ल्यू" घरोघर फैलावत आहे.

**श्रीधर आणि कंपनी** ३२० गिरगांव रोड, मुंबई २

एकाद्या चित्रपटगृहांत बसून ज्याप्रमाणें पडदा बाजूला होऊन पहातों त्याप्रमाणें ह्या ठिकाणापासून आपणांस आपण शेवटची पायरी ओलांडल्यावर पडदा बाजूला सरकल्याप्रमाणें सरोवराचा देखावा दृष्टीस पडतो. जरी तुळसी सरोवर इतर सरोवरांमध्यें दिसायला लहान दिसलें तरी त्याचा काल तितका कांहीं कमी नाहीं. ही योजना, २५ लक्ष गॅलन पाणी पुरवणारी शेषला योजना व ८ लक्ष गॅलन पाणी पुरवणारी केवरी योजना या पाणी पुरवणाऱ्या योजनांबरोबरच १८६८ मध्यें सुरूं झाली. फक्त तुळसी योजना अस्तित्वांत आहे. वास्तविक विहार योजनेची सहाय्यक म्हणून तुळसी योजना १८६० मध्यें तयार करण्यांत आली. परंतु १८७५ मध्यें सरकारनें तिची 'स्वतंत्र' योजना जाहीर केली. सन १८७९ मध्यें त्याचें काम पूर्ण झालें. दि. १५ मार्च १८७९ मध्यें मुंबईच्या गव्हर्नरांच्या हस्तें तुळसी धरणाचा उद्‌घाटन समारंभ झाला. तुळसी सरोवराची धारणाशक्ति २३०० लक्ष गॅलन पाण्याची असून त्याची जास्तींत जास्त उंची ४६० इंच आहे. इतर सरोवरांप्रमाणें तुळसीला भरती आली असतां त्यांतील पाणी वायां जात नाहीं. कारण ते तिचाच मोठा भाऊ जे विहार सरोवर त्याची पाण्याची पातळी उंच करण्यास


**शरीरस्वास्थ्य हीच यशाची गुरुकिल्ली !**

आयुर्वेदानें हें कार्य केले आहे ! उत्कृष्ट आयुर्वेदिक औषधें माफक दरांत मिळाली पाहिजेत ! आम्ही तीं तयार करुन पुरवितों.

**" लोहभस्म व वसंतमालिनी गोळ्या "**

क्षयाचासुद्धां पराभव करतील !

लिहा अथवा भेटा : **मोफत चिकित्सा**

**रेळे केमिकल अँड फार्मास्युटिकल**

**इंडस्ट्रीज लिमिटेड,**

सुमती भुवन, मालवीय रोड, विलेंपार्ले, मुंबई २४

मदत करते. त्याचें क्षेत्रफळ १७१४ एकर असून तें दोन धरणें मिळून तयार झालें आहे.

हल्लीं तुळसी सरोवर हें मुंबई शहराला रोज ४ लक्ष गॅलन पाणी पुरवठा करतें. प्रथम कांहीं वर्षें त्याच्या पाण्याबद्दल तक्रारी असत आणि त्या तक्रारी जवळजवळ १९२६ पर्यंत यांत्रिक फिल्टर बसवेपर्यंत चालू होत्या. पाणीपुरवठा जवळजवळ १० वर्षांवर बंद करण्यांत आला होता.

पुन्हां जेव्हां १९३० मध्यें पाण्याची जरुरी भासली तेव्हां एखादा धंदा नसलेला माणूस भिकेची याचना करतो त्याप्रमाणें तुळसीकडे म्युनिसिपॅलिटीनें पाणीपुरवठा सुरूं केला. प्रथम लोकांनीं पाण्याचा कस व रंग बघून कुरकूर केली व नंतर त्यांनीं एकदम निर्बंध केला.

वेळ मिळाल्यास तुळसी जरूर पहा.

## तान्सा तलाव आणि वैतरणा

मुंबईला मुख्यत्वेंकरून पाण्याचा पुरवठा ज्या ठिकाणाहून होतो तो तान्सा तलाव इथून सुमारें ७२ मैल अंतरावर आहे. याचा विस्तार ७ चौरस मैल



तान्सा तलाव

असून १०० फूट उंच आणि नऊ हजार फूट लांब असा याचा बंधारा ( Dam ) प्रेक्षणीय आहे. त्याची रुंदी तळाशीं ९६ फूट असून वर निमुळती

होत जाऊन बारा फूट आहे. उन्हाळ्यांत येथील पाण्याची पातळी फारच खालीं जाते. ३६० टी. एच. डी. ( म्हणजे टाऊन हॉल डेटम ) या निशाण चिन्हापर्यंत आज पाणी काढतां येते. ४२० टी. एच. डी. पर्यंत पाणी पोहोंचलें कीं तलाव वाहूं लागतो. सन १८९० पासून इथून पाणी मिळण्यास सुरुवात झाली. रोज त्या वेळीं ४० दशलक्ष गॅलनचा पाणीपुरवठा होत असे. आज १०० दशलक्ष गॅलन पाण्याचा पुरवठा होत आहे. ह्याच्यापासून थोड्या अंतरावर वैतरणा आहे. हें एके काळीं एका लहानशा नदीचें नांव होतें. पूर्वीं त्याच्याकडे कोणी फारसें लक्षच दिलें नाहीं पण आज मात्र तेथें प्रचंड हायड्रोलिक वर्क चालू आहे. यावरून पाणीपुरवठ्यासंबंधीं नवीन आशा निर्माण झाली आहे. हीं दोन्ही ठिकाणें अत्यंत रमणीय असून येथील सृष्टी-सौंदर्य मनाला चटका लावते. हौशी प्रवाशांच्या सुखसोयीकरितां एक लहान लॉज येथें सुरू झालें आहे.

## वज्रेश्वरीचे गरम पाण्याचे झरे

वसई स्टेशनपासून बसनें एका तासांत वज्रेश्वरीस जातां येते. वज्रेश्वरीचें देऊळ व वसईचा किल्ला, चिमाजी आप्पानें वसईच्या विजयाचें स्मारक-चिन्ह म्हणून, बांधला. देवळापासून सुमारें एक मैल अंतरावर हे ऊन पाण्याचे झरे आहेत. त्यांची एकंदर संख्या २१ आहे. नानाप्रकारच्या चामडीच्या रोगांवर तसेंच अर्धांगवायूवर याचें पाणी रामबाण औषध ठरतें. म्हणून अनेक लोक येथें नेहमीं हा खात्रीचा व फुकट उपाय करण्यासाठीं येतात. याच्याचजवळ रामेश्वर महादेवाचें एक अति प्राचीन मंदीर असून त्याच्यापुढील राम, लक्ष्मण व सीता या नांवाच्या तीन टांक्यांत कमिजास्त प्रमाणाच्या उष्णता-मानाचें पाणी असतें. कल्याणहूनही येथें येतां येतें. परंतु वसई स्टेशनापासून येथें बसची व्यवस्था अधिक चांगली आहे. नित्यानंद स्वामी या नांवाचे एक बुवाही याच स्थानाजवळ आहेत. येथें एक धर्मशाळा व सॅनिटोरीयम आहे. वसईचा किल्ला जरी हल्लीं मोडकळीस आलेला असला तरी पुरातन काळच्या तेथील वैभवाबद्दल मनाची खात्री होते.

# एलिफंटा केव्हज—घारापुरी गुंफा

अपोलो बंदरापासून सुमारें सात मैलांवर एलिफंटा हें एक नयनमनोहर बेट आहे. बॉम्बे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीतर्फें दर रविवारीं आणि रजेच्या



दिवशीं अपोलो बंदराहून होड्या मिळण्याची व्यवस्था आहे. घारापुरी या नांवानें एलिफंटा प्रथम ओळखलें जात असे. त्या ठिकाणच्या एका टेकडीचा आकार हत्तीसारखा दिसत असल्यामुळें 'एलिफंटा' हें नांव पडलें असावें. परंतु आतां तेथें पूर्वीचे अवशेष





एलिफंटा केव्हजमधील दृश्यें





एलिफंटा केव्हजमधील कांहीं दृष्यें

उरलेले नाहींत. ह्या बेटावर उतरल्यापासून सुमारें अर्धा मैल अंतरावर सुप्रसिद्ध लेणीं आहेत. ' एलोर ' एवढी जरी ती पुरातन नसली तरी बरीच जुनी आहेत. ८ व्या शतकांत तीं बांधलीं गेलीं असावींत असा अंदाज आहे. शिवाच्या डोक्याच्या निरनिराळ्या स्वरूपांतील आकृति फारच पाहण्यासारख्या आहेत. ' त्रिमूर्ति ' ही आकृति २० फूट उंच असून प्रत्येक डोक्याची उंची अंदाजें सहा फूट आहे. त्याप्रमाणें " अर्धनारी नटेश्वर ", " नंदी ", " गरुडावर बसलेले विष्णु ", " शिव-पार्वती " इत्यादि मूर्ति प्रेक्षणीय आहेत. पुष्कळ ठिकाणीं जरी नासधूस झालेली असली तरी पण हीं लेणीं प्रत्येकानें अवश्य बघण्यासारखीं अद्याप आहेत. पुरातन काळीं भारत देश, शिल्पकलेंत किती पुढें गेलेला होता याची खात्री झाल्यावांचून रहात नाहीं. " तांडव-नृत्य " ही कलाकृति पाहिल्यावर तर मति गुंग होते ! एकदां तरी जरूर जाच !

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २

## १८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २

महाराष्ट्राची जमीन, महाराष्ट्राचें पाणी, महाराष्ट्राचें भांडवल
यांच्या जुळणीमुळें नवीन एक हजार टनांचा साखर
कारखाना सुरूं होऊन दर दिवशीं रोज
एक हजार पोतीं, शुभ्र दाणेदार
साखर तयार होत आहे.

—•—

सिंडिकेट मुदत तीन वर्षे व्याज सात टक्के
अशा ठेवी स्वीकारते.

—•—

महाराष्ट्रांतील कॅनाल इरिगेशनवर उंसाचें पीक करणाऱ्या साखर
कारखान्यांना दहा टक्के नफ्याची शाश्वती असते.

**चंद्रशेखर गोविंद आगाशे**
मॅनेजिंग एजन्ट

## कण्हेरी पार्क व लेणीं अर्थात् कृष्णगिरी उपवन

मुंबई शहरांतील प्रत्येक व्यक्तीला हें नांव माहीत आहे. सहलीला जाणाऱ्या लोकांना तर कण्हेरी म्हणजे जणु स्वर्गच वाटतो आणि तें खरेंहि आहे. बोरीवली-पर्यंत लोकलनें जाऊन पुढें पूर्वेस ४।५ मैल गेलें असतां आपण नॅशनल पार्क-जवळ येऊन पोहोंचतों. खेड्यांतून व जंगलांतून जातांना सृष्टिसौंदर्याचा अपूर्व आनंद उपभोगतां येतो. थकल्याभागल्या शरीराला व मनाला येथील वाताव-रणानें हमखास विसांवा वाटून उत्साह वाटतो. नॅशनल पार्क १९४९ सालीं श्री. बाळासाहेब खेरांच्या प्रोत्साहनानें बांधलें गेलें. मुंबई सरकारच्या, डायरे-क्टर ऑफ पार्क्स अँड गार्डन्सच्या देखरेखीखालीं त्याची व्यवस्था होते. एकंदर क्षेत्रफळ ५००० एकर आहे. याच्या विकासाची योजना फार मोठी होती परंतु आतां ती बारगळली असें समजतें. या पार्कमध्यें हल्लींसुद्धां हॉटेलसपद्धतीनें लहान खोल्या भाड्यानें मिळण्याची व्यवस्था आहे. सहलीला जाणाऱ्या लोकासाठीं तें फार सोयीचें आहे. या पार्कवर मुंबई सरकार युद्धोत्तर पुनर्विकासाच्या पंचवार्षिक योजनेखालीं ५० लाख रुपये खर्च करणार होते. त्याचें काय झालें तें कळत नाहीं. पण तूर्त ही योजना स्थगित झाली आहे एवढें निश्चित्. या ठिकाणीं सरकारनें जुन्या बौद्ध धर्तीवर एक स्मृतिमंदीर बांधलें आहे तें प्रेक्षणीय आहे.

धेनु सी. सावन्त
इन्शुरन्स एजन्ट
२ रा माळा, रूम नं. १९,९३
ई, सनमिल रोड, मुंबई १३

पंकज भारती प्रिंटर्स
प्रो. के. जी. गांधी
६ व्हिन्सेन्ट रोड, दादर
(जी. आय. पी.) मुंबई १४



स्मृति मंदीर

सभोंवतालीं आपणाला सर्वत्र ओढे, झाडेंझुडुपें इत्यादि रमणीय दृश्य दिसेल. येथूनच पुढे २।३ मैलांवर टेकड्या व खोल भाग ओलांडून गेलें असतां आपल्याला मुख्य लेणीं लागतात. इ. सनापूर्वी दोन शतकें या काळांत हीं लेणीं बांधलीं गेलीं असावींत असा इतिहास आहे. या लेण्यांकडे आपणाला भांडुप (सेंट्रल रेल्वे) या स्टेशनवरून नॅशनल पार्कच्या उजव्या बाजूनेंसुद्धां जातां येते वाटेंत तुळशी सरोवरा-भोंवतालची एक टेकडी लागते. येथें जवळ जवळ १०० लहान मोठीं बुद्ध लेणीं असून हिंदुस्थानांत यांचा क्रमांक वरचा लागतो. अशा प्रत्येक अभिमानास्पद लेण्यांची व्यवस्था भारत सरकारच्या ऑर्क्यॉलॉजिकल डिपा-




सर्वांचे आवडते
चंपा फुलबहार
हेअर ऑईल
सर्वत्र मिळते
आर. के. बी. ॲन्ड कं.
पो. बॉ. ५५०२, मुंबई १४

र्टमेंट ( पुराण-वस्तु-संशोधन खातें ) तर्फे ठेविली जाते. २,००० वर्षांपूर्वी बांधलेल्या या शिल्पकृति अजून सुस्थितींत आहेत. त्या वेळच्या शिल्पकृतींचें कौतुक वाटतें. जेथें बौद्ध साधु तपश्चर्येसाठीं बसत तें निशाण व इतर टेकड्या यावरून पाहिलें असतां सर्व वातावरण मोठें रम्य दिसतें व आपल्या डोळ्यांचे पारणें फिटतें. मुंबईच्या उपनगराचा संपूर्ण देखावा दिसतो. तिसऱ्या क्रमांकाचीं लेणीं हीं चैत्य लेणीं म्हणून ओळखलीं जातात. तीं साधारण कार्ला येथील लेण्यांइतकीं मोठीं आहेत. तीं ८६ फूट लांब व ४० फूट रुंद असून त्यांतील दिवाणखान्यांत एकंदर ३४ स्तंभ आहेत. मुख्य मूर्ति अगदीं शेवटीं आहेत. लेण्यांच्या प्रवेशद्वारापाशीं बुद्धाचे दोन भव्य पुतळे कोरलेले आहेत. याच दिवाणखान्यांत बुद्धपंडितांच्या सभा होत असें सांगतात. १० क्रमांकाच्या लेण्यांत धार्मिक चर्चा चालत असे. ५६ क्रमांकाच्या लेण्यामागून आपल्याला समुद्राचा संपूर्ण व सुंदर देखावा दिसतो. मात्र एवढें खरें कीं येथें येतांना भरपूर खाद्य-पेयें बरोबर असावीत. चढ-उतार असल्यामुळें किती चालतों त्याचा आपल्यास पत्ता लागत नाहीं व भूक तर सपाटून लागते. तसेंच येथें येतांना मुंबईहून पहांटे लवकर निघावें म्हणजे दिवस मजेंत घालवून सर्व बघून होतें. तोंपर्यंत संध्याकाळ होते व संध्याकाळीं पांचपूर्वीच परतायला लागावें कारण मग हळूहळू अंधार पडूं लागतो व मग वाट चालायला त्रास होतो. येथें जातांना एक फोटोग्राफिक कॅमेरा जरूर न्यावा. एकंदरींत प्रत्येकानें पहावें असेंच हें स्थान आहे.



प्रवेशद्वार

## जोगेश्वरी गुहा

जोगेश्वरी या स्टेशनपासून पूर्वेस १ मैल चालत गेलें असतां या गुहा लाग-

तात. इ० सनापूर्वी ७०० वर्षे या काळांत या गुहा खडक फोडून बांधण्यांत आल्या आहेत. यांतील अनेक शिल्पकृति दगडाच्या असून नैसर्गिक खराबी-मुळें खराब होत चालल्या आहेत. त्यांची व्यवस्था होणें अवश्य वाटतें. येथून जवळच एक प्राणी-संग्रहालय चालू करण्याची नगरपालिकेची योजना आहे. पण पैशाचे अभावीं ती तूर्त स्थगित आहे. एकादी सुटी इकडे घाल-वायला हरकत नाहीं.



## जुहू बीच

सान्ताक्रूझच्या पूर्वेस विमानतळ आहे व पश्चिमेस जुहू विमानतळ व जुहू चौपाटी आहे. सुंदर वाळू व पोहं-ण्याची सोय असल्यामुळें मुंबईचें एक फॅशनेबल सहलीचें स्थान बनलें आहे. सान्ताक्रूझ स्टेशनहून उपनगरांतील 'एफ्' रूट बस जाते. अनेक हॉटेल्स तेथें खोल्या भाड्यानें देतात व १।२ दिवस मजेंत घालवितां येतात.

## वरसोवा बीच

जुहूप्रमाणेंच हाही समुद्रकिनारा रम-णीय आहे. अंधेरी स्टेशनपासून उप-नगरांतील ‘ के ’ रूट बसनें येथें जातां येतें. मच्छलीमार या स्टॉपपाशी उतरून बाजूला असलेला पिक्निक् कॉटेजीस या हॉटेलमध्यें एकादी खोली घेऊन राहि-ल्यास दिवस मजेंत घालवितां येतो.

## माउंट मेरी ( मत माउली )

माहीमहून वांद्र्याकडे गाडींतून जातांना आपण माउंट मेरी बघूं शकतों. वांद्रा स्टेशनवरून ‘ सी ’ रूट बसनें आपल्याला माउंट मेरीस जातां येतें. वांद्रा खाडींत मेरीची मूर्ति सांपडली आणि त्या डोंगरावर बसविण्यांत आली.

ती नवसाला पावते असा समज आहे. सप्टेंबर महिन्यांत येथें फार मोठी ख्रिश्चन भाविकांची जत्रा भरते व इतर धर्मीयसुद्धां येथें जातात.

## ट्रॉम्बे (तुर्भे बेट)

मुंबईपासून अवघ्या सोळा मैल अंतरावर असणाऱ्या एका मच्छिमारी चालणाऱ्या खेड्यांत एक दिवस सहज मजेनें घालवितां येतो. तें ठिकाण म्हणजे ट्रॉम्बे ( तुर्भे ) होय. टेकड्या व समुद्र या त्याला निसर्गानें दिलेल्या दोन मोठ्या देणग्या आहेत. दोन्ही जवळजवळ असून निसर्गाचे भोक्ते याची मजा निरनिराळी अगर दोन्हींची एकदम अशीही लुटूं शकतात.

समुद्रालगत असल्यामुळें ट्रॉम्बे उष्णतेपासून अलिप्त आहे. समुद्रावरील थंडगार वारे जमिनीवर आल्यामुळें एकप्रकारचें आल्हाददायक वातावरण निर्माण होतें. येथें शीव व चेंबूरमार्गें जातां येतें. सबंध रस्ता डांबरी असून चेम्बूरकडें जाणारा रस्ता जरा अरुंद आहे. चेम्बूरपासून ट्रॉम्बेपर्यंत ४ मैल उजव्या बाजूला टेकड्यांच्या व डाव्या बाजूला घरांच्या रांगा आहेत आणि मधून मधून शेतेंही आहेत. ट्रॉम्बेची हद्द आली कीं आपणांस मिलिटरी कॅम्प असलेल्या गांवाप्रमाणें तेथील घरें दिसूं लागतात. लढाईच्या वेळेला ट्रॉम्बेच्या

* कमला प्रिंटरी *

प्रिंटर्स, स्पेशालिस्ट इन प्रिंटिंग ऑफ हायकोर्ट अपील्स ॲन्ड सुप्रीम कोर्ट रेकॉर्ड्स.

उत्कृष्ट छपाई माफक दरांत वेळेवर देऊं.

मिलिटरी स्क्वेअर लेन, मेडोज स्ट्रीट, फोर्ट मुंबई १

मालक राम बी. सारंग

समुद्रांत प्रवेश करण्याची बंदी होती. आतां तो खुला झाला आहे आणि त्यामुळें लोकांचें तें एक प्रेक्षणीय स्थळ बनलें आहे.

ट्रॉम्बेमध्यें जरी आपण आंतपर्यंत गेलों तरी तेथें आपणास मिलिटरीच्या कॅम्पचें कांहींच दृष्य दिसूं शकत नाहीं. फक्त जुनीं घरें आपणांस मागें घडलेल्या गोष्टी व इतिहास यांच्याबद्दल माहिती देतात. या घरांवरून आपणास पोर्तुगीजकालाची कल्पना येते. डोंगरमाथ्यावरील पडीक चर्चेस, जुन्या घरांचे अवशेष कीं जेथें अजूनही प्राचीन मासे मारणारीं कुटुंबें रहात होतीं, बघावयास मिळतात व आपणास ट्रॉम्बेच्या अनन्यपणाची कल्पना देतात.

अजूनही ट्रॉम्बेमध्यें अशा मासे मारणाऱ्या ३०० लोकांचीं घरें आहेत. ५०० लोक हा मच्छिमारीचा धंदा करतात. ते विशेषतः ' कोळी ' असून त्यांवरच त्यांची उपजीविका चालते.

ट्रॉम्बेचें सर्वांत मोठें सौंदर्य म्हणजे त्यासमोरील समुद्र आणि सर्वांत मोठें दुर्दैव म्हणजे त्याला नसलेला समुद्रकिनारा. नाविक वर्गानें खोल समुद्रांत सिमेंटचे धक्के बांधून बोटी समुद्रांत उतरवण्याची अगर पाण्यांत जाळीं फेंकण्याची सोय केली आहे. गैरव्यवस्थेमुळें हे धक्के आतां मोडकळीस आले आहेत. रस्त्याच्या कडेला बाहेर आलेल्या भागाला जर धक्के व बांधघातले तर ट्रॉम्बेचें रूपान्तर Brighten of Bombay मध्यें होण्याची शक्यता आहे.

समुद्रकांठचा देखावा फार सुंदर आहे व कांहीं कोळी लोकांचे मचवे अगर व्यापारी बोटी त्यांत भर टाकतात. कांहीं इकडे तिकडे हिंडत असतात. कांहीं व्यापाराकरतां जाण्याकरतां अगदीं तयार तर कांहीं तयार होत असतात. ह्या सर्वांत समुद्राच्या उजव्या बाजूला असलेल्या एलिफंटा लेण्यांच्या टेकड्या, त्याच बाजूला असलेल्या नेमाश्वरम् हें व्यापारी ठिकाण आणि त्याच्या समोर व डाव्या बाजूला असलेले बेलापूर आणि दुसरीं कांहीं ठिकाणें हीं सौंदर्यस्थळें होत.

वैभवसंपन्न व शोभायमान अशा तेथील सूर्यास्ताच्या वेळीं कोळी लोक

समुद्रांतून घरीं जाण्याकरितां बाहेर पडतात. ते सांगतात कीं रोज त्याच वेळीं संध्याकाळीं जेवण करण्यासाठीं परततात व दुसऱ्या दिवशीं सकाळीं जाळीं घेऊन पुन्हां समुद्रांत येतात. ते प्रथम लहान होड्यांतून समुद्रांत खोलवर रांगेनें जातात. नंतर जेथें त्यांचे मचवे असतील तेथें जाऊन ते त्यावर उड्या मारून त्या मचव्यांच्या पाठीमागील भागाला बांधतात आणि नंतर ते जाळीं घेऊन व्यापाराला निघतात. त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक समुद्रांत मिठाचा व्यापार करतात आणि मोठाल्या मचव्यांमध्यें मिठाचीं ओझीं भरण्याचें काम हे लोक करतात. नंतर मलबार व कोचीनसारख्या दूरवर प्रदेशांत तीं नेलीं जातात.

ट्राम्बेवर मिठाचे मोठाले ढीग दृष्टीस पडतात आणि जेथें आम्ही मोटार गाडी सोडतों तेथपासून धक्क्यापर्यंत अर्धा मैल चालण्यांत सर्वांत फार मोठी मजा वाटते. मिलिटरीनें बांधलेल्या एका लहान लांकडाच्या धक्क्याळावरून एका बाजूचा समुद्राच्या पाण्याचा देखावा बघूं शकतों.

या मार्गांतील अत्यंत घाणेरडी गोष्ट म्हणजे ज्यांत कोळी लोक 'लाचर' अगर 'खेकडे' पकडण्यासाठीं मानेपर्यंत बुड्या मारतात तो दलदलीच्या भागांतील चिखल होय. ट्रॉम्बे प्रत्येक धाडसी माणसाला साहस करण्याची संधि देते आणि थकलेल्या मनाला व शरीराला चालना देण्यास माणसानें तेथें एक

– जूसब महंमद –

मिलिटरी व गव्हर्नमेंट डिपार्टमेंट्सचे फर्नीचर सप्लायर्स

तसेच आकर्षक फर्नीचर तयार करणार

मुख्य ऑफीस–
२११ चकला स्ट्रीट, मुंबई ३.
फोन नं. २५६१६

शाखा–
७४|७५ मटन स्ट्रीट,
भेंडी बाजार, मुंबई ३

दिवस नाहींतर कमींत कमी संध्याकाळ तरी घालवावी. तेथील जबाबदार मंडळींनीं शहराचें सांनिध्य पाहून तेथें निदान राहाण्याची सोय करावी.

जर प्रेक्षकाला जास्त वेळ असेल तर तो समुद्राकडें वळणावर उतरत्या होत येणाऱ्या टेकड्यांवर हिंडू शकतो. त्या नीटस टंग या नांवानें ओळखल्या जातात कारण त्याच मार्गानें त्या अस्त होत येतात. तेथें ताजी हवा मिळण्याकरतां आणि डोळ्यांचें पारणें फेडणारीं झाडें-झुडुपें आहेत.

## ऑईल रिफायनरी

येथून जवळच चेम्बूर व ट्रॉम्बेच्या मध्यावर भारत सरकारनें केलेल्या करारान्वयें स्टॅन्डर्ड व्हॅक्यूम आईल कंपनी ही तेलशुद्धीचा कारखाना उभारीत आहे. या कारखान्याला ८ कोटी रुपये खर्च होणार असून हजारों लोकांचीं यावर पोटें भरणार आहेत. शेंकडों तज्ञ इंजिनियर्स व कॉन्ट्रॅक्टर्स हें काम पुरें करण्याकरतां अहोरात्र मेहनत करीत आहेत. या कारखान्यामुळें याच्या आसपासच्या चेंबूर, तुर्भे, घाटकोपर, मानखुर्द, इत्यादि गांवांचें महत्त्व भलतेंच वाढत आहे. तसेंच या कारखान्यामुळें मुंबई शहराच्या प्रतिष्ठेंत भर पडणार आहे. हें कार्य चालू असतांना बघण्यालायक आहे मग उद्यां कारखाना प्रत्यक्ष चालू झाल्यावर प्रेक्षणीय होईल यांत शंकाच नाहीं. ह्या गांवांतील लोकांच्या जमिनी या कारखान्याकरतां सरकारनें ताब्यांत घेतल्यामुळें लोकांनीं प्रथम थोडी आरडाओरड केली पण नंतर लोक शांत झाले. येथपर्यंत बस-सर्विस आहे. या कारखान्याची तेलशुद्धीची क्षमता दिवसाला २५ हजार बॅरल इतकी भरेल. १९५२ सालच्या आंकडेवारीप्रमाणें भारताला रोज अंदाजें ८० हजार बॅरल तेल लागतें. हा हिशेब लक्षांत घेतां या कारखान्यानें भारताची १।३ गरज भागेल. पुढच्या दोन वर्षांत बर्मा शेल व कॅल्टेक्स यांचेही असलेच कारखाने निघणार आहेत. हे कारखाने तयार झाल्यावर रोज सुमारें ७५ हजार बॅरल क्रूड ऑईल शुद्ध होऊन बाहेर पडेल पण तोंपर्यंत भारताची रोजची गरज १०५ हजार बॅरल इथपर्यंत जाईल. हल्ली या कामावर ३५०० लोक आहेत. पण कारखाना सुरू झाल्यावर मात्र ५०० ते १००० लोकांचीच जरूरी भासेल.

कामगारांसाठीं अद्यावत सुखसोयींनीं युक्त घरें बांधण्यांत येणार असून त्याकरतां २५ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहे. एकंदर होणाऱ्या खर्चापैकीं ७५% खर्च डॉलर चलनांत होणार आहे. हा भारताचा फायदाच आहे.

## चीना ब्रिज

उष्ण हवेचा कंटाळा आल्यास आपणास थंड हवेकरतां रविवारीं दुपारीं चीना ब्रिजवर फेरी मारतां येते. तेथील उत्कृष्ट सृष्टिसौंदर्य वनभोजनासाठीं योग्य असलेल्या ओढ्याजवळील जागेंत समोंवतालच्या टेकड्यांमुळें बनलेलें एक नाटकगृहच आहे असें वाटतें. खेडीं टेकड्यांच्या माथ्यावर वसलीं आहेत आणि खालील सृष्टिशोभा पाहण्यालायक आहे.

'चीना' हें घोडबंदर रोडवर मुंबईपासून ३० मैल अंतरावर आहे. पुण्याला जाणारें वळण लागेपर्यंत आपणांस मुंबई—आग्रा रोडनें जावें लागतें. नंतर सरळ जावें लागतें. तोच घोडबंदर रोड आहे. रस्त्याचें सृष्टिसौंदर्य येथून सुरू होतें व आपण जसजसें पुढें जाऊं तसतसें अधिकच वाढत जातें. जेथें रुंदी जास्त आहे अशा ठिकाणाव्यतिरिक्त रस्ता डांबरी असून तो मोठमोठ्या विस्तृत झाडांच्या मधून गेलेला आहे. येथील प्रत्येक जागा ही आपलें मन हरण करून घेणारी असल्यामुळें आपण रस्त्यांत मध्यें कुठेंही भोजनाकरितां अगर सृष्टिसौंदर्य पाहण्याकरितां थांबूं शकतों.

एक तासानंतर चीनाला पोंहोंचतो. रस्त्यांत कडेनीं बरींच आडवळणें गेलेलीं असून आपण कुठेंहि गेलों तरी नवीन देखावा आपणास पहावयास मिळतो. त्यामुळें येथील वातावरणानें आपलें मन अगदीं प्रफुल्लित होतें. चीना ह्या ठिकाणाला अलीकडेच, विशेषतः नदीला पूर आल्यानंतरही रहदारी सुरळीत चालावी म्हणून, बांधलेल्या पुलामुळें जास्त महत्त्व प्राप्त झालें आहे.

हा पूल इतका अरुंद आहे कीं दोन मोठ्या गाड्या एकदम या ब्रिजवरून जाणें शक्य नाहीं. परंतु पूल फारसा लांब नसल्यानें ही अडचण विशेषतः उद्भवतच नाहीं. ब्रिजच्या दुसऱ्या बाजूला तुमची गाडी खालीं होऊन रस्त्याच्या कडेला थांबवावी लागते. इथें आपल्या उजव्या हाताला थोड्या अंतरावर एक

सुंदर मोठें व हिरवेंगार मैदान आहे आणि पावसाळ्यांत फक्त पूर येणारा पण इतर वेळेस शांत असा ओढा शेजारीं मोठ्यानें हंसून वाहात असतो. एकदां हिरवळीवर नजर टाका म्हणजे तुमच्या अगदीं समोर ब्रिज दिसेल. डाव्या बाजूला असलेल्या लहानशा टेकडीवर चीना खेड्यांतील झोपड्या दिसतील. पाठीमागें अगदीं समोर पाहिलें असतां गोवलदेवचें शिखर दिसतें.

तुमची चढण्याची इच्छा असली तर गोवलदेव तुमचें लक्ष नक्की वेधून घेईल. त्या भागांतील तें उंच शिखर आहे आणि दूरवर आपलें लक्ष्य वेधून घेण्याकरतां त्यावर दोन तीन मोठे दगड उभे करून ठेवले आहेत. परंतु येथें एक सूचना करावीशी वाटतें ती म्हणजे आपणास दिसते तितकें तें चढण्यास सोपें नाहीं. ज्युलियस सीझरप्रमाणें आपणास एक क्षणभरच असें वाटतें कीं "मी येईन, पाहीन व जिंकीन". तुम्ही तेथें याल, तें पाहाल पण त्याला जिंकणें ही एक अगदीं वेगळी गोष्ट आहे.

हें धाडस करण्याआधीं तुम्हाला जर पुष्कळ वेळ असेल तर तें खात्रीनें यशस्वी होईल. तुम्ही अगदीं वेळ पाहूनच सुरुवात केलीत तरच तुम्ही सूर्य मावळेपर्यंत खालीं येऊं शकाल. नाहींतर टेकडीवर तर ताबडतोब अंधार पडण्यास सुरुवात होते. टेकडीच्या माथ्यावरून तें वैभव फार सुंदर दिसतें. तेथें एक "मूर्ति" आहे आणि त्यामुळेंच या डोंगरास गोवलदेव म्हणतात. याची पूजा चीना व इतर आसपासच्या खेड्यांतील लोकांकडून केली जाते.

आपणांस येथें भोजन करायची इच्छा असेल तर थोडेंसें चढण चढल्यानंतर तें आपणांस सहज शक्य होतें. चढण अगदीं थोडी असून रस्ता सोपा आहे. ब्रिज ओलांडून गेल्यावर आपणांस तेथें जातां येतें आणि मग सरळ रस्ता थेट त्या ठिकाणापर्यंत जातो व दुसरा त्याच ठिकाणीं परत येतो. त्या ठिकाणीं आपणांस ग्रामीण जीवनाची कल्पना येते. चीना हें एक ६० ते १०० पर्यंत मराठे लोकांची वस्ती असलेलें, २० झोपड्या असलेलें एक अगदीं लहान खेडें आहे. तेथील लोक निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार करतात. कांहीं शेतकरी लोक स्वतःचीं शेतें पिकवतात आणि कांहीं ठराविक पगारावर इनामदारांतर्फे

जंगलांत काम करण्यास जातात. शेतकरी तांदूळ व आणखी एखादी वस्तु पिकवतात. जे इनामदारांकडे काम करतात ते जास्त गरीब असतात. मालका-करतां ते लांकडे गोळा करतात व सबंध दिवस कष्टांत घालवतात.

पुष्कळ मुलें असूनही तेथें अद्याप शाळा नाहीं कारण आम्ही ज्यावेळेस तेथें गेलों त्यावेळेस तीं भटकत होतीं. तेथें वैद्यकीय मदत नाहीं, दवाखाना नाहीं, अगर खेड्यांतील डॉक्टरही तिकडे जात नाहीं. ज्यावेळेस ते आजारी पडतात त्यावेळेस त्यांचें "बरेंवाईट" होणें हें निव्वळ त्यांच्या घरगुती उपचारावरच अवलंबून असतें.

रात्रीच्या वेळेस तेथें एका बारीकशा दिव्याशिवाय इलेक्ट्रिक लाईट वगैरे कांहीं सोय नसते. आपणासारख्या पहायला जाणाऱ्या लोकांना तें फार चमत्कारिक वाटतें तरी आपणास त्या खेड्यांतील कष्टाळू जीवनाची चांगलीच कल्पना येते. खेड्यांतून वळसा मारल्यावर पुन्हां पायथ्याशीं आलो असतां विशेष आश्चर्य हें कीं तिथें आपणास एक चहाचें दुकान दिसतें आणि तेथें पाणी अगर गरम चहा मिळतो. त्या हॉटेलचें नांव 'चिना ब्रिजचें कॅफ्टेरिया हॉटेल' असें आहे.

ठाण्यासारख्या मध्यम लोकवस्ती असलेल्या ठिकाणापासून २५ मैल दूर असलेल्या या ठिकाणचें हें हॉटेल चालतें कां ? असें विचारलें असतां त्या हॉटेलमालकानें असें सांगितलें कीं तेथील रोजच्याच वातावरणाला कंटाळलेले बरेच लोक येथें बदल म्हणून चहा पिण्यास येतात.

"चिना ब्रिज' हा घोडबंदर व ठाणा यांच्या मध्यावर आहे. आपणांस इकडे यावयाचें असल्यास घोडबंदर मार्गें यावें कारण चीना ब्रिज येथून ९ मैल अंतरावर आहे आणि तो रस्ताही चांगला आहे. तुम्ही जेव्हां घोडबंदर रोडपासून ३–४ मैल दूर असतां त्या वेळेस जरा एक मिनिट तेथेंच डाव्या बाजूचीं मिठागरें पाहण्यासाठीं थांबा. त्याबद्दल सर्व माहिती आपणांस तेथें मिळतें. तेव्हां एका मिठाच्या कणाकरतां तरी ही ट्रिप तुम्ही घ्याच !

उत्कृष्ट ब्लॉक्स, स्टीरीओज
मिळण्याचें एकच ठिकाण !

# कमल ब्लॉक्स

ब्लॉक व स्टीरीओ मेकर्स

★

२४ पीपल्स बिल्डिंग, सर पी. एम्. रोड,
फोर्ट, मुंबई १

## " मॉट पेझीर " अथवा मंडपेश्वर

हें ठिकाण पुरातन शिवमंदीर ' मंडपेश्वर ' याचाच अवशेष होय. मंडपेश्वर मंदिराचा पोर्तुगीजांकडून नाश झाला व त्यांनीं आपल्या नेहमींच्या सरावाप्रमाणें तेथें चर्च बांधलें. त्याचाच अपभ्रंश अर्थहीन असा मॉट पेझील झाला व त्याचेंच मॉट पेझीर नंतर माउन्ट पोईसर असें झालें. पोईसर येथें एक मोठा कारखाना लार्सेन टोब्रो या कंपनीने काढला आहे त्यामुळें या स्थानास थोडें महत्त्व आलें आहे. मुंबईपासून हें बावीस मैलांवर असून बोरीवली स्टेशनहून जातां येतें. ज्याला मॉट पेझीर म्हणतात त्या ठिकाणीं आपणास मोटार अगर गाडीनें सहज जातां येते. अवघ्या ४५ मिनिटांत आपण वांद्र मार्गें, पार्ले, अंधेरी, गोरेगांव, कांदीवली व बोरीवली हीं गांवें सोडलीं तर आपण पोहोंचू शकतों. बोरीवलीपासून दहा मैल दूर असलेला ' नॅशनल पार्क ', कण्हेरी लेणीं अगर ठाणा यांचा लेवल क्रॉसिंग ओलांडण्याऐवजीं डावीकडे वळून एक मैल कच्च्या रस्त्यानें पुढें जातां येतें. इतकें अंतर तोडल्यानंतर मोटारीस अगर चालणाऱ्याच्या डाव्या बाजूस चढण लागेल याची सूचना येशू ख्रिस्ताच्या हातावर टांगलेल्या पुतळ्यानें मिळते. या ठिकाणीं रस्त्याची चढण सुरू होऊन रस्ता पहिल्यापेक्षांहि कच्च्या स्वरूपाचा सुरू होऊन तो खांचखळग्यांनीं युक्त असा आहे परंतु थोड्याच वेळांत एक छोटेसें वळण घेतल्यावर उजव्या बाजूला मोडकळीस आलेल्या इमारती पाठीमागें व बाजूला शेतें असलेले एक नवीन चर्च दिसतें आणि डाव्या बाजूस ऑर्फनेजच्या भव्य इमारती आहेत आणि त्याबद्दल अशी माहिती मिळते कीं त्या फ्रान्समधील धर्मगुरुंनीं बांधल्या असून तेथें ९ वी पर्यंत वर्ग असून ४१३ मुलांना शिक्षण मिळत असे. हे धर्मगुरु अगर बंधु उपकारकर्ते असत. त्यांच्यापैकीं एकजण प्रेक्षकांना चर्चपासून अवघ्या १०० यार्ड अंतरावर मागें असणाऱ्या मॉटपीझर हें स्थळ पाहायला जायला सोबत करीत असत.

ते ८ व्या शतकापासून लहान, शांत अशा टेकडयांच्या गुहांतून सुखानें

राहत होते. तेथें एकमेकांना जोडलेलीं अशीं तीन लेणीं आहेत. सर्वांत मोठी विहाराप्रमाणें अगर एकाद्या राजवाड्यांतील दिवाणखान्याप्रमाणें असून तेथें १२ ऋषींना तपश्चर्या करण्याइतकी पुरेशी जागा आहे. ४ थ्या शतकापासून तें त्यांचें निवास-स्थान होतें.

पोर्तुगीज इकडे आल्यानंतर त्यांनीं त्या लेण्याचें एका खिस्ती देवळांत रूपान्तर केलें आणि "त्यांच्या लेडीचा पुतळा" त्यांनीं एका हॉलमध्यें चौथऱ्यावर स्थानापन्न केला. सबंध हिंदुस्थानांतील एका हिंदु मंदिराचे खिश्चन लोकांच्या प्रार्थनेच्या जागेंत रूपांतर होण्याचें तें पहिलें उदाहरण होतें.

पोर्तुगीजांनीं हीच जागा मुद्दाम शोधून काढण्याचा हेतु काय असावा तर त्या लेण्यांच्या डाव्या बाजूला एक कधींहि पाणी न आटणारी अशी विहीर अगर डबकें आहे. ह्या भागांत वाहणारे ओढे ओलांडून जाणें हें एक कठीण काम होतें आणि त्यामुळें ती एक इष्ट गोष्ट समजली जात होती. त्यावेळच्या प्रेक्षकांना ती विहीर पाहायला मिळत असे. तिचा अजूनहि उपयोग केला जातो आणि त्याबद्दल अशी दंतकथा आहे कीं 'हा झरा उन्हाळ्यांत आटेल' असा त्याला शाप दिला आहे.

पोर्तुगिजांनीं त्या मंदिराच्या बांधणीचा चर्चमध्यें रूपांतर करतांना थोडासा फेरफार केला. त्यांनीं लेण्यांच्या समोर एक भिंत घातली आणि त्याच्या प्रवेशद्वाराजवळील एका भागावर एक लेख खोदलेला असून त्यावर १५५५ हें साल खोदलेलें आहे. त्याचा काल कळण्याचें तें एक मोठें साधन आहे.

विहिरीच्या अगदीं पाठीमागें व हॉलला अगदीं जोडून अशी एक लहान गुहा अगर खोली आहे. अगदीं समोरच्या भिंतीवर ४ बाहू असलेली शिवाची प्रतिमा कोरलेली आहे आणि बाकीच्या २ डझनांहून ज्यास्त देवांच्या प्रतिमा, ज्याला 'गण' म्हणतात त्या, कोरून सुशोभित केल्या आहेत. हें कोरीव काम पोर्तुगिजांनीं ह्या लेण्यांचा ताबा घेतला त्यावेळेस एक प्रकारच्या गिलाव्यानें आच्छादून टाकलें. पोर्तुगालचा राजा तिसरा जॉन यानें देवळांत वार्षिक

वर्गणी जी जमा होते त्या पैशांत लेण्याला लागूनच पुढील बाजूस एक मोटा ५० साधूंना पुरेल-इतका आश्रम बांधला आहे.

लेण्याहून परततांना व रस्ता क्रॉस केला असतां आपण अगदीं सरळ पण थोडें दूर गेलें असतां ऑर्फनेजमध्यें प्रवेश करतो. अगदीं समोर एक जिना चढून गेल्यावर तेथें शाळेचे अधिकारी असें " ब्रदर " लोकांचा राहण्याचा आश्रम आहे आणि ही इमारत लाल असल्यानें अत्यंत आकर्षक वाटते. याच्या पाठीमागें उडी मारली असतां कोणीहि येशू ख्रिस्ताचा मनोरा पकडूं शकेल. तेथें पोहोंचण्याकरतां आपणांस आश्रमास वळसा घातल्यानंतर त्याच्या गच्चींत जाण्यास आपणांस थोड्या पायऱ्या चढून वर जावें लागतें.

तें कॅल्व्हेरियम या नांवानें ओळखलें जात असून अजूनहि तें ख्रिश्चन लोकांच्या पूजेचें स्थान व सौदागर लोकांचें प्रेक्षणीय स्थळ आहे. येथून सर्व विस्तृत देखावा दिसतो. नॅशनल पार्क व कण्हेरी केव्हज उजव्या बाजूला आहेत आणि पॅव्हेलियनमधून तर तेथील देखावा अधिकच सौंदर्यसंपन्न दिसतो. मैलच्या मैल पसरलेलें नॅशनल पार्क, हिरवेंगार गवत व जंगलें, रेल्वेमार्गावरून इकडे तिकडे धांवणाऱ्या लोकल गाड्यांमुळें मधून मधून अगदीं शांत अशीं खेडीं वसलेलीं असल्यामुळें तो देखावा स्मृतींत राहण्यासारखा झालेला आहे. ख्रिस्ताचा पुतळा पार्कच्या दिशेला तोंड करून उभा आहे आणि येशू ख्रिस्ताच्या क्रॉसबद्दल निरनिराळ्या पंधरा चमत्कारिक गोष्टी आपणाबरोबर जो वाटाड्या असतो तो सांगतो. तेथें एक शाळा आहे आणि सुतारकाम,


**वधूवर-विवाह साहाय्यक मंडळ**

**ठाकुरद्वार पोस्टामागें, मुंबई २**

डॉक्टर्स, इंजिनीअर्स, प्लीडर्स, ऑफिसर्स व क्लार्क्स इ. चीं वधूवर स्थळें आमचेकडें भरपूर आहेत. सुशिक्षित प्रथम वरांचीं नांवें विनामूल्य नोंदवितों. पोस्टेजसह लिहा- भेटा-

शिवणकाम आणि छपाईचें काम त्या शाळेंत शिकविलें जातें; त्या शाळेंत एक छापण्याचें मशीनहि आहे. त्याच्याजवळच नवीन तयार झालेली पण हळू-हळू वस्ती वाढत असलेली वल्लभनगर कॉलनी आहे.

आपला एक दिवस ' मॉंटपेझीर ' या ठिकाणीं सहज निघून जातो. आपण आपला खाना उंचावरून सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेतां घेतां घेऊं शकतों आणि त्या सभोंवतालीं हिंडून आणि प्राचीन अवशेष पाहून आपण आपल्या मनाचें समाधान करून घेऊं शकतों.

वसई येथून जवळच असलेल्या ' बसीन ' या ठिकाणीं पोर्तुगीज व मराठे यांमध्यें १७३९।४० मध्यें अनेक लढाया झाल्या आहेत. त्याचप्रमाणें मंडपेश्वर म्हणजे ज्याला मॉंट पेझीर म्हणतात या ठिकाणींही लढाई झाली होती. त्यामुळें त्यावेळेस तेथील जुन्या चर्चचा नाश झाला असल्यामुळें नवीन चर्च बांधलें. हें मी कशावरून सांगतों तर तेथील जुन्या अवशेषावरूनच !

मॉंटपेझीर इतक्या उंचीवर वसलें आहे कीं तेथें हवा नेहमीं थंड असते आणि त्याच्यासभोंवतीं झाडींत व उतारावर असलेले असंख्य छोटे व टुमदार बंगले आहेत.

## कासिमरा व घोडबंदर

आपण या एका सहलींत मागधान, कासिमरा व घोडबंदर हीं तीनहि ठिकाणें पाहूं शकतों. ही सबंध सहल ५० मैलांची होते. आपण ही सहल सकाळीं

अपूर्व शोध— नवे तसेंच जुनें — **देवीचे वण घालवा** —
व्रणविरोपण तेल किं. रु. ६. मुरुमावरील लेप कि. १२ आणे
(पो. पॅ. खर्च वेगळा ). भेटा अगर लिहा—
**जनरल सप्लायर्स** (हिंद)
**जगन्नाथ चाळ, फणसवाडी, मुंबई २**

अगर दुपारी करूं शकतों आणि एक सबंध दिवस खर्च केला असतां टेकड्या वगैरे चढून आपणास भोंवतालच्या जंगली भागांचें निरीक्षण करतां येते.

तुम्ही मागधान व कासिमराबद्दल नाहीं पण घोडबंदरबद्दल खात्रीनें ऐकलें असेल. हीं सर्व ठिकाणें एकमेकांना जोडलेलीं आहेत. आपण येथें ट्रेन, बस व मोटार ह्यापैकीं कशानेंहि जाऊं शकतो.

लोकल ट्रेननें बोरीवलीपर्यंत जाऊन नंतर तेथून पार्कपर्यंत चालत जावें लागतें. नंतर प्रथम उजवीकडे वळून मागधानपर्यंत तसेंच पुढें जावें लागते. त्या स्थानापर्यंतच्या वाईट रस्त्याबद्दल कांहीं तक्रार नसेल तर आपण अगदीं शेवटपर्यंत मोटारही नेऊं शकतों अगर घोडबंदर रोडच्या लेव्हल क्रॉसिंगपर्यंतहि नेतां येते. ते दोन मैल अगर मुंबईपासून ११ मैल अंतर तोडल्यावर आपण कासिमरा येथें पोहोंचतों आणि मला याबद्दल खात्री वाटते


# रामतीर्थ ब्राह्मी तेल

स्पेशल नं. १ (आयुर्वेद औषधियुक्त)



बुद्धीची वाढ करते. तसेंच ज्ञानतंतू व क्रियातंतु बलवान बनवतें. केंस काळे आणि मजबूत होतात. खरडा बंद होतो. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केंस येतात. खवडे, उवा, लिखा, यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोंप लागतें.

सर्व ऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळतें

**मोठी बाटली किं. रु. ३-८-०. लहान बाटली किं. २**

**श्री रामतीर्थ योगाश्रम, दादर, मुंबई १४**

योगासन चित्रपट १।। रुपयांची मनीऑर्डर केल्यानें मिळेल.

अनुक्रम विभाग

कीं, जे लोक घोडबंदरला जातात त्यांना हें ठिकाण माहीत नसल्यामुळें ते तसेच पुढें निघून जातात.

कासिमरा हें आदिवासी लोकांचें एक आदर्श खेडें बनत चाललें आहे. आदिवासी कुटुंबांना हाऊसिंग सोसायटीची १० रुपये फी भरून सभासद करून घेण्यांत येते. नंतर त्यांना दोन गुंठे जमीन, १००० रुपये मदत व स्वस्त दरांत लांकूड, कौलें इत्यादि सामान पुरवलें जातें आणि त्यांना घर कसें बांधावें याची ठराविक कल्पना दिली जाते. त्यामुळें सोसायटींतील सर्व घरें प्रमाणबद्ध व एका साच्यांत दिसतात. घरांची रांग सुरू होण्याच्या आधीं प्रत्येक रांगेत एक चांगली विहीर बांधलेली असते. येथें रविवारीं आदिवासी मुलींना, लहान मुलांना वळण कसें लावावें, आंघोळ कशी घालावी व खेडुतांच्या लहान मुलांचें रडणें बंद कसें करावें हें शिक्षण दिलें जातें. हा येथील एक मनोरंजक असा कार्यक्रम आहे.

कासिमरा भागांत राहणारे लोक हे बहुधा जंगल-मजूर आहेत. ते कॉन्ट्रॅक्टर लोकांतर्फे कामाला जातात. त्यामुळें त्यांचा फायदा होतो. त्यांच्याकडून लांकूड तोडणें, तें बांधणें, वजन करणें व मार्केटमध्यें नेणें अशासारखीं कामें क्षुल्लक पगारांत करून घेतात आणि हे कॉन्ट्रॅक्टर लोक असे निर्दय आहेत कीं लग्न करण्याची इच्छा असलेल्या गरीब व अशिक्षित अशा आदिवासी लोकांकडून क्षुल्लक बाबतींतही फायदा करून घेतात. ते त्यांच्या लग्नाला, ४।४ अगर ५।५ वर्षे बिनपगारी त्यांच्याकडे काम करणें या अटीवर त्यांना शंभर अगर थोडे ज्यास्त रुपये कर्ज म्हणून देतात. ज्यावेळेस ते आदिवासी, कॉन्टॅक्टरकडून घेतलेल्या कर्जातून मुक्त होण्याची वेळ येते व त्यांना स्वातंत्र्य मिळण्याचा समय नजिक येतो त्यावेळेस ते कॉन्ट्रॅक्टर लोक आदिवासी लोकांच्या बायकांना एका खेड्यांतून दुसऱ्या खेड्यांत पळून जायला लावतात. ते त्या दुर्दैवी नवऱ्याला एक बायको पळून गेली तरी दुसरी करण्याचा सल्ला देतात, आणखीन कांहीं पैसे कर्जाऊ देतात आणि पुन्हा मोफत काम करून घेण्याचा नवीन करार करून घेतात.

म्हणून आतां कॉन्ट्रॅक्टर लोकांच्या धमकावणीपासून बचाव करण्याकरितां व आदिवासी लोकांच्या फायद्याकरतां व त्यांना सल्ला देण्याकरतां ठाणें जिल्ह्यांत जंगल सोसायट्या स्थापन झाल्या आहे. अशा एकंदर १०० संस्था येथें आहेत तरी त्यांतील ५० संस्थांचा खरा हेतु आहे. या भागांत अशा तीन संस्था असून त्यापासून २८००० रुपये उत्पन्न येते.

कासिमऱ्याकडे जातांना २५ घरें असलेल्या लहानशा खेड्यांतून जावें लागतें आणि त्यांच्याशीं बोललें असतां त्याची सर्व माहिती आपणांस मिळते. नवीन योजनेप्रमाणें राहणाऱ्या जागेंत जनावरें बांधण्याची या आदिवासींना खेडयांतून बंदी आहे. कासिमऱ्याहून आपण कण्हेरीपर्यंत चालू शकतों.

सबंध दिवसांतील प्रवासांत आपणांस दुसऱ्यांदा घोडबंदरला थांबावें लागतें. या सुंदर स्थळीं पोहोंचण्यास ३ मैल चालावें अगर मोटारनें जावें लागतें आणि तें मुंबईपासून बरोबर २५ मैल अंतरावर आहे. या तीन मैल अंतरांत आपणांस निरीक्षण करण्यास अगर वनभोजनास जाण्यास वाटेंत असंख्य स्थळें आहेत.

घोडबंदरला पोहोंचल्यावर आपण गाडी सोडून पायीं चाललेलें बरें. कारण रस्ते संपतात. आपणास ठाण्याच्या खाडीचा सुंदर देखावा पाहण्यास मिळतो आणि त्याच्याभोंवतालीं झोंपडया असल्यामुळें त्या सौंदर्यांत अधिकच भर पडते. तांबडी माती असलेला हा रस्ता थेट घोडबंदर किनाऱ्यापर्यंत जातो. तेथें मोटारी जाण्यास बंदी आहे कारण त्यामुळें धुळीचे लोट उडतात. तो रस्ता तसाच थेट ठाण्यापर्यंत जात असल्यामुळें तेथें सतत रहदारी चालू असते. घोडबंदर येथें कोळी लोकांची वस्ती आहे. आपण तेथें गेलो असतां त्यांना आपल्याबद्दल कुतुहल वाटून ते आपल्याभोंवतालीं जमतात व त्यामुळें आपणांस त्यांच्याकडून भरपूर माहिती मिळूं शकते.

या स्थळापासून कांहीं थोडया अंतरावर ठाणे आहे आणि जर दिवस असला तर तुम्ही त्या सुंदर रस्त्यावरून मोटार चालविण्याची संधि वायां घालवूं नका.

अनुक्रम.........
विभाग
क्रमांक
नों. दि.

❋ उत्कृष्ट छपाई

❋ बुकलेट्स, कार्ड्स, लेटर हेड्स, हॅंड-बिल्स, लेजर बुक्स इ.

❋ थ्रीकलर, टू कलर

❋ गिल्डींग व बाईंडिंग

बस व सिनेमा तिकीट छपाईचे स्पेशालिस्ट

माफक दरांत वक्तशीर काम

लिहा अथवा भेटा —

# प्रोग्रेसिव्ह प्रिंटर्स

मालक—बी. आर. देसाई

सिम्प्लेक्स बिल्डिंग, पाववाला स्ट्रीट,
कृष्ण सिनेमाजवळ, गिरगांव, मुंबई ४

## मनोरी

सबंध दिवस इथें राहणें शक्य नाहीं. पण मनोरी व मरवा या दोन ठिकाणांना दुपार पुरी होते. येथें तुम्ही मनसोक्त विहार करूं शकतां. तुम्ही पाण्यांत पोहूं शकतां अगर सूर्यप्रकाशांत न्हाऊं शकतां आणि जुहूप्रमाणेंच तेथील लाटांनी धुतल्या गेलेल्या समुद्र किनाऱ्यावर अनवाणी चालूं शकतां. त्यामुळें आपणास वेळेचेंहि भान राहात नाहीं. जर समुद्राला भरती आलेली असली व तिचा आपणास कंटाळा आलेला असला तर आपण पोर्तुगीजांचें वर्चस्व असलेल्या अशा मनोरी खेडयांत एक फेरफटका मारून, कोळी मच्छिमारी लोकांच्या घरीं जाऊन त्यांच्या गप्पांत सहभागी होऊं शकतां. तेथील बरेचसे लोक मच्छिमारी व कांहीं शेती करतात.

मुंबईपासून मालाडपर्यंत जाऊन पुढें १९ मैल गेल्यावर तें कांदीवलीच्या अलिकडे आहे, मुंबई–बोरीवली रस्त्यावर मधें अर्ध्यावर डाव्या बाजूला रस्त्याशिवाय दुसरें सांगण्यासारखें असें कांहींच नाहीं.

मला असं वाटतं कीं त्या भागाची व्यवस्था पाहणाऱ्या ग्रामपंचायतीनें मोटारींच्या, आणि दुसरें मढ मरवा व मनोरी पहायला येणाऱ्या लोकांच्या, सोयीकरतां कांहीं सूचनाफलक लावावेंत.

इंटीरियर डेकोरेटर —
आजचे व उद्यांचे फर्निचर बनविणार
कॅकप्रूफ पॅनेल बोर्ड स्पेशालिस्ट
**आयडीयल फर्निचर वर्क्स**
मालक—एडवणकर बंधू
न. चिं. केळकर रोड, प्लाझा सिनेमाजवळ, दादर, मुंबई २८

तुम्ही ह्या ठिकाणीं प्रथमच गेला असाल तर अगदीं प्रथम आपणास मरव्याला असलेल्या "एस्. एस्. हमला" या नाविक शिकाऊ जहाजाचा मोठा खुणेचा फलक दिसतो. आपण मोटारीनें अगदीं सरळ रस्त्यानें गेलो तर आपण आपल्या इच्छित स्थळीं पोहोंचतों आणि डावीकडे वळलें असतां मढ व उजवीकडे वळलें असतां मरवा याठिकाणीं रस्ते जातात. तुम्ही आगगाडी अगर बसनें मालाडपर्यंत आलां असाल तर मग आपणास मालाड-मढ-मरवा बस सर्विसनें जावें लागतें. दर २५ मिनिटांनी बस सुटते. तेव्हां निदान वाहनांची तरी येथें अडचण नाहीं.

मरवा हें मालाडपासून ४ मैल अगर त्याहूनही कमीच अंतरावर आहे. परंतु या चार मैल अंतरांत ऑर्लेम, खरोडी, राठोर्डी, मालवणी हीं लहान लहान ठिकाणें आपणांस मरवा व मनोरी खाड्यांजवळ पोहोंचण्याआधीं ओलांडावीं लागतात.

मरव्याच्या डाव्या बाजूला नाविक दलाच्या 'हमला' जहाजावर शिक्षण घेणाऱ्या लोकांकरितां मोकळी जागा ठेवलेली आहे. उजव्या बाजूनें आपणांस समुद्रकिनाऱ्यावर जाऊन मनोरी बेटावर जाण्याकरितां खाडी तरून जाण्यास फेरीची वाट पाहावी लागते.

तुम्हाला जास्तींत जास्त ५ मिनिटेंच वाट पहावी लागते परंतु हीं ५ मिनिटें आपण खाडीची शोभा पाहात असलों तर केव्हांच निघून जातात. तुम्ही सौंदर्यप्रेमी असाल तर तुम्हाला येथें फार आनंददायक असा अनुभव येईल. अगदीं आपल्या डोळ्यासमोरील एका दगडफेकीच्या अंतरावर मनोरी आहे आणि अगदीं बरोबर पाठीमागें कण्हेरी टेकड्या आहेत. जर आपणाजवळ चष्मा असेल तर आपणांस नॅशनल पार्कमधून चबुतरा दिसूं शकतो आणि त्याच्यासन्निधच पुष्कळ हिरवींगार बेटें आहेत. ह्याच वेळेस आपणांस वाऱ्यांनीं भरलेलीं शिडें असलेल्या होड्यांमधील, समुद्रांत चाललेल्या शर्यती पहावयास मिळतात. व्यापारी जहाज हें एक समुद्रावरील सततचा दागिनाच समजला जातो. पण छोट्या होड्याही त्याचप्रमाणें सकाळ ते संध्याकाळपर्यंत समुद्रांत असतात.

हा कष्टाळू नावाडी जरी शरिरानें कृश दिसला तरी तो काटक असतो. कित्येक वेळां समुद्रांत वारा प्रतिकूल असला म्हणजे बोट वांचवण्याकरितां तिच्या अगदीं शिडावर चढण्यापर्यंत हरप्रयत्न करावे लागतात.

मरवा व मनोरी यामधील अंतर ३ फर्लांग ते अर्धा मैल आहे. वारा अनुकूल असला म्हणजे अंतर अवघ्या ३ अगर ४ मिनिटांत तोडतां येते पण तोच वारा प्रतिकूल असला तर तितकेंच अंतर तोडण्यास अर्धा तासहि लागतो. नियमानुसार नावाडी लोक वरील माहिती आपणास पुरवितात.

खाडी तरून जातांना बोट हालून ( कलंडून ) पाणी आंत येऊं लागलें तर भिण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या भित्रेपणाला कोळी हंसतात. कारण सबंध दिवस त्यांचें तेंच काम असतें आणि ती सर्व वाऱ्याची करामत असते. खाडी तरून गेल्यावर ‘एका ट्रिपसाठीं एक आणा’ तुमची वाट पाहाणाऱ्या दुसऱ्या तीरावरील नावाड्याला व थोडेसे पैसे तुम्हाला आणून सोडणाऱ्याला द्यावे लागतात.


डेक्कन किंग
स्वदेशी साबण
– सर्वत्र मिळतो –
डेक्कन किंग सोप फॅक्टरी
मुंबई ४

नंतर आपण मनोरी खेडें व समुद्रकिनाऱ्यावर जाऊं शकतों. पूर्वी सोय केलेली असली तर खाडीच्या कडेला वाळू असलेल्या रस्त्यांनीं बैलगाडींतून आपण जाऊं शकतों. पण बहुतेक लोक चालतच जातात. कारण तेथून अंतर एक मैलच आणि डाव्या बाजूला असलेल्या झाडांच्या खालून आपण जवळच्या रस्त्यानेंहि जाऊं शकतों. १५ मिनिटांत प्राचीन पोर्तुगीज चर्चची खूण असलेल्या मनोरींत आपण पोहोंचूं शकतों त्या चर्चच्या बॉर्डर्स पिवळ्या असून आपणांस खाडीपलीकडूनहि तें दिसतें.

तें चर्च पाहण्यासारखें आहे. तें पोर्तुगीजांनीं १५३९ मध्यें बांधलें. त्याला भोंवतालीं खंदकही आहे. समुद्राकडून हल्ला झाल्यास तिकडे मारा करण्यास चर्चच्या गॅलरीमध्यें बंदुका ठेवलेल्या आहेत. पोर्तुगीज उघडपणें खालच्या बाजूस जेवत व वरच्या बाजूस प्रार्थना करीत. १८१५ मध्यें हें चर्च मराठ्यांकडून उध्वस्त केलें गेलें व पुन्हां दुरुस्त केलें गेलें. शेवटीं १९१२ त तें पुन्हां परत नवें बांधलें गेलें. परंतु त्याच्या भिंती इतक्या मजबूत आहेत कीं, ज्यावेळेस त्याला आणखी दोन दरवाजे बसवायचे होते त्यावेळेस खालचा भाग पाडतांना मजुरांच्या डोळ्यांतून अक्षरशः पाणी निघालें. इतर कॅथॉलिक चर्चेसप्रमाणें तें आंतून अगदीं कोरलेलें आहे. त्यांत एक मोठी ख्रिस्ताची मूर्ति असून ते त्या मूर्तीची " गुडफ्रायडे " ला पूजा करतात. तसेंच तेथें पुष्कळ प्राचीन पोर्तुगीज अधिकारी पुरले गेलेले आहेत.

आंत जीं रंगीत चित्रें आहेत त्यांत जुन्या विहिरी दाखवल्या असून खेड्यांतील मुली त्यांतून पाणी काढतांना दाखवल्या आहेत.

मनोरीची लोकसंख्या जवळ जवळ २००० कोळ्यांची असून त्यांचा धर्म ख्रिश्चन व धंदा मासेमारी अगर शेतीचा आहे. तेथील रस्ते अगदीं लहान असून त्यांच्या दोन्ही बाजूला झोपड्या व घरें असलेली दिसून येतात. प्रत्येक घरावर निराळें नक्षीकाम केलेलें असतें त्यामुळें त्या लोकांची कलेची आवड कळून येतें.

तुम्हाला किनाऱ्यावर जायचें असल्यास, वाटेंत कुठेंही थांबलें असतां एक

मिनिटांत तुम्ही तिथें पोहोंचूं शकतां. मनोरीला दोन किनारे आहेत. एक खेडयाच्या अगदीं समोर व दुसरा अगदीं चांगला रस्ता असलेल्या १५ ते २० मिनिटांच्या अंतरावर आहे. दुसऱ्या किनाऱ्यावर आपणास कोळी लोक आपल्या कामांत गर्क झालेले दिसून येतात. त्यांची ती मच्छिमारी बोट, तिनें जरी नांगर टाकला असेल अगर पाण्यावर असली तरी तो एक पाहण्यासारखा देखावा असतो. ईस्टर, ख्रिस्तमस या दिवशीं त्यांचीं शिडें त्यांच्या बायकांच्या निरनिराळ्या रंगांच्या साडयांनीं मढवलेलीं असतात. त्या जिवंत पक्ष्याप्रमाणें डौलानें पाण्यावर नाचत असतात.

ज्यांना पुढें जाण्याची इच्छा नसेल त्यांना इथें स्नानहि करतां येते कारण हें पाणी अगदीं सुरक्षित आहे. त्यांना तेथें आपलें भोजनहि घेतां येते. चर्चला जोडल्या गेलेल्या या किनाऱ्यावर बरीचशीं ताडाचीं झाडें आहेत. जर तुम्हाला इच्छा असेल तर थोडें चाललें असतां आपण दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोंचतों. तो किनारा शांत व गंभीर तितकाच सुंदर आहे. जे कांहीं थोडे लोक मनोरीला जातात त्यांतील क्वचितच या दिशेला जातात; पण ही संपत्ति फक्त समुद्रप्रिय माणूसच जाणूं शकतो.

एक दिवस घालवल्यानंतर तुम्हाला तेथें जर कंटाळा आला नाहीं तर




– महाराष्ट्राची नवोदित आकांक्षा –

श्री. श्रीधर नारायण जागुष्टे या तरुण आणि महत्त्वाकांक्षी महाराष्ट्रीयानें व्यापारव्यवसायांत नुकतेच पदार्पण केले असून अल्पावधींतच त्यांनीं

**‘ शीतल सुगंध अगरबत्ती ’ व**

**‘ बेस्ट अल्ट्रा मरीन ब्ल्यू ’**

तसेंच इतर कांहीं उत्पादनें सुरू करून त्या क्षेत्रांत सुयश मिळविण्याचा चंग बांधलेला आहे. सर्व महाराष्ट्रीय मुंबईकर त्यांचेकडे आशेनें पहात आहेत.

तेथूनच दोन मैल अंतरावर असणाऱ्या मच्छिमारीचा धंदा चालणाऱ्या गोराई व आणखी ४ मैल पुढें गेल्यावर मनोरीइतकेंच मोठें असलेलें उत्तान खेडें या ठिकाणीं आपणास जातां येते.

**निर्मळः**— वसई स्टेशनहून सहा मैल अथवा नाला सोपारा स्टेशनहून ४ मैल हें दूर आहे. पेशव्यांच्या कारकिर्दीत हें देऊळ होतें. येथें कार्तिकस्वामींचें देऊळ असून एक शिवमंदीर आहे. जुन्या अवशेषावर हें देऊळ बांधलें असावें. कार्तिकस्वामींच्या देवळाचा दरवाजा आपोआप बंद होण्याची व्यवस्था आहे. या ठिकाणीं दरवर्षी जत्रा भरते. त्याला निर्मळेश्वर म्हणून सुद्धां ओळखतात.

**पोखराण तलावः**—ठाणे स्टेशनपासून तीन मैलांवर हा तलाव आहे. पुष्करिणी या नांवाचा अपभ्रंश पोखराण झाला आहे. येथें ठाणे स्टेशनपासून टांग्यानें जातां येते.

**मामा-भाचाची टेकडीः**—पोखराण तलावाजवळच ही टेकडी आहे. येथें दोन मामा-भाच्यांचें नातें असलेल्या फकिरांच्या कबरी आहेत. एक फकीर हल्लीं येथें राहातो व तो त्यांचा सांभाळ करतो.

**लोणाद गुंफाः**—कल्याणपासून सहा मैलांवर ही बौद्ध कालांतील गुहा असून ती प्रेक्षणीय आहे.

**अंबरनाथः**—इ. स. १०६० मध्यें कोंकण ठाण्याचे राजे शिलाहार यांनीं हें शिवमंदीर बांधलें. हेमाडपंथी शिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणून पाहाण्यासारखा आहे. यावरूनच त्या स्टेशनला अंबरनाथ नांव पडलें.

**दूधतलाव-सरोवरः**—या तलावाबद्दल फार थोड्यांना माहिती असेल. मुंब्रा स्टेशनहून तेथें जातां येतें. ठाण्याहूनसुद्धां टांग्यानें जातां येते.

**उरणः**—याला मोरा या नांवानेंसुद्धां ओळखतात. खुद्द उरणमध्यें पाहाण्यासारखें फारसें नाहीं पण येथून दोन मैलांवर असलेल्या सर डोसाभाई भिवंडीवाला यांचा बगिचा पाहण्यालायक असून एक दिवस तेथें मजेंत घालवितां येतो.

**नाहवाः**—घारापुरीहून अगदीं जवळच हें ठिकाण असून सर हाजी महंमद युसुफ यांच्या मालकीचा हा भाग आहे. बागबगीचे बघण्यासारखे आहेत.

**खुर्द-कोट**:—भारतांत कुठेंही पाहण्यांत नसलेला विटांचा हा प्रचंड स्तूप आहे. त्याचा परीघ २८० फूट आहे. नाला सोपारा या वेस्टर्न रेल्वेच्या स्टेशनवरून या ठिकाणीं जातां येतें.

**परोलः**—येथें अंबरनाथसारखें हेमाडपंथी शिवमंदीर असून तें १२ व्या शतकांतलें असावें. या ठिकाणीं वसईहून वज्रेश्वरीमार्गें जातां येतें.

**उल्वा-पनवेलः**—मुंबईहून पनवेलला जायला १॥ तास लागतो व तेथून पुढें सहा मैलावर उल्वा खाडी लागते. एके काळीं येथें मोठा व्यापार चालत असे. रमणीय किनारा हें त्याचें वैशिष्ट्य आहे.




आपणांस दररोज दोन आणे वांचवून एक हजाराची पॉलिसी घेतां येईल विमेदारांना एक सुंदर लो खं डी मनिसेव्हिंग सेफ मोफत देण्यांत येते.

त्रैवार्षिक बोनस रु. २४ व रु. ३०.

— एजन्सीच्या सवलतीच्या अटी मागवा —

दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲश्यु. कं. लि.

लक्ष्मी रोड, पुणें २

## वसईचा किल्ला ( BASSEIN FORT )

मुंबई सभोंवतीं जीं कांहीं इतिहासप्रसिद्ध ठिकाणें आहेत त्यांत कोणताही माणूस हिंदुस्थानांतील पोर्तुगीज लोकांच्या इतिहासाशीं निगडित असलेल्या वसई किल्ल्याला भेट देण्याची संधी दवडणार नाहीं. त्यांच्या भरभराटीच्या काळांतील पश्चिम हिंदुस्थानांतील जवळ जवळ दोन शतकें तें त्यांचें आश्रयस्थान होतें.



मुंबईपासून ४० मैल अंतरावर असल्यानें आपणास तेथें सहज जातां येतें. तो रस्ता जरी वळणें घेत गेलेला असला तरी तेथपर्यंत ट्रेन (आगगाडी) जाते. कुठल्याहि स्टेशनापासून वसई रोड स्टेशनपर्यंत ३० मैल अंतर लोकलनें तोडतां येतें. नंतर ७ मैल आपणास टांगा, बस अगर मोटारनें जातां येतें. वाटेवर लागणारा पूल बघण्यासारखा आहे.

आपणास पोर्टा-डा-हेरा अगर लँड गेटनें किल्ल्यांत प्रवेश करतां येतो. तुम्ही आंत जाऊन एक मिनिट जरा इकडे तिकडे नजर फिरविल्यास तेथील सौंदर्याची आपणास कल्पना येते. तेथें असलेल्या अवशेषावरून आपणास पूर्व वैभवाची आणि त्याचबरोबर पोर्तुगीज सरदार, व्यापारी, राज्यकर्ते व त्यांचा कारभार याविषयीं चांगलीच कल्पना येते.

वसई हें स्थळ मूळ १५३४ मध्यें गुजराथच्या सुलतानबहादुरानें वसवलें आणि नंतर पोर्तुगीजांच्या कायमचें स्वाधीन केलें. त्या दिवसापासून वसईचा काळ पालटला आणि त्यानें भरभराटीच्या व आठवणींत राहाणाऱ्या अशा काळांत पदार्पण केलें. २०० वर्षेंपर्यंत हें अगदीं वैभवांत असून उत्तरेकडील कोर्ट दरबार ( Court of North ) ह्या नांवानें ओळखलें जात असे. निरनिराळ्या तऱ्हेचे व वाटेल त्या किंमतीचे सुंदर राजवाडे, इमारती, बंगले, ऑफिसेस्, चर्चेस, आश्रम आणि आकर्षक चौक बांधलें गेलें.

समुद्रासारख्या नैसर्गिक सौंदर्याचा लाभ झालेला असल्यानें वसईला दोन तऱ्हेची संपत्ति प्राप्त झालेली होती. एक नैसर्गिक व दुसरी मानवी अगर कृत्रिम. तेथें सूर्य कधींहि मावळत नसे परंतु दुसऱ्या दिवशीं तो अधिक तेजस्वी-पणानें उगवत असे. त्या किल्ल्यांतील अस्तित्वांत राहिलेला भाग पाहिला म्हणजे कांहीं खुणांवरून पूर्वीचें त्याचें वैभव आठवून अंतःकरण दाटून येतें.

निरनिराळ्या आकाराचे जवळ जवळ दोन डझन इमारतींचे नमुने येथें पाहावयास मिळतात. त्यापैकीं पोर्तुगीजांनीं बांधलेलीं चर्चेस व वसई हीं हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत. दिवसांतील बराचसा वेळ हें बघण्यांत जातो. जुन्या व अंधाऱ्या जिन्यावरून वर चढावें लागतें आणि तेथील लॅटिन भाषेंत कोरलेल्या शिलालेखावरून ती कोणी बांधली हें लक्षांत येते. येथें येशूचें चर्च व त्याच नांवानीं असलेल्या कॉलेजच्या इमारतीचा भाग हीं चांगल्या स्थितींत आहेत. त्यावेळीं वसईतील तें प्रार्थनेचें पवित्र ठिकाण होतें आणि त्याच्या अस्तित्वाचें कारण म्हणजें परकीय हेंच होय. 'मॅट्रिझ ऑफ सेंट जोसेफ', 'चर्च ऑफ नोसा', 'सेन-व्होरा-डा-व्हिडा', 'चर्च ऑफ डॉमिनोशीयन्स' सारखीं आणखी इतर चर्चेसहि पाहण्यासारखीं आहेत. ह्या चर्चेस व मठांच्या बाजूलाच, जेथें व्यापार व राजकारण यावर चर्चा केली जात असे तें सिमेंट हाऊस व टाऊन हॉल आहे. त्यांच्या भव्यपणाचीं चिन्हें फक्त आतां शिल्लक

सोनें, चांदी व जरी गाळण्याचा जुना विश्वासपात्र कारखाना
माफक दरांत चोख काम – एक वेळ देऊन खात्री करा
## तुकाराम ज्ञानोबा आणि कंपनी
मालक—शेठ रामचंद्र ज्ञानोबा दबडे
हेदवकर मेटल प्रेसिंग वर्क्सचें मागें, हेदवकर वाडी नं. ३,
तुळसी पाईप रोड, दादर, मुंबई २८

आहेत. यावरून कार्यकारी मंडळाची कार्यं करण्याची पद्धत चमत्कारिक होती असें दिसतें. तेथें सगळी चर्चा उभ्यानेंच चालत असे असें वाटतें कारण गव्हर्नरला बसण्याकरतांसुद्धां तेथें 'सीट' (आसन) नाहीं. त्यावेळचें आणखी एक विशेष हें कीं ज्या सिमेंट हाऊसमध्यें कायदे केले जात त्याचेंच रूपांतर संध्याकाळीं खेळाडूंच्या क्लबांत होत असे. पोर्तुगीज लोकांना सर्व प्रकारच्या (घरांतील व बाहेरील) खेळांची आवड होती. त्यामुळें वसईमध्यें खेळण्याकरतां व व्यायामाकरतां मोठमोठीं मैदानें आढळून येतात.

तेथील सौंदर्यस्थळांत मांडवी बंदराचा पहिला नंबर लागतो. मांडवी बंदर हें वसई किल्ल्याचें एक टोंक असून स्टेशनपासून निघालेला रस्ता थेट तेथ-पर्यंत जातो. हाच रस्ता लँड गेटमधून, किल्ल्यांतूनहि थेट बंदरापर्यंत जातो. बवळच पोर्टा डो-मार अगर सी गेट नांवाचा वसईतील एक मजबूत बुरूज आहे.

बंदरांतून आपणांस समुद्राचा शोभायमान देखावा पाहाण्यास मिळतो. दगडी बांधकामामुळें मन हरण करणाऱ्या अशा त्या सी गेटच्या कमानीखालीं उभें राहिलें असतां आपणास इतिहासप्रसिद्ध वसईच्या मजबूत भिंतीलग-तच्या डळमळणाऱ्या प्रवेशद्वारांत आपण उभे असल्याचा भास होतो; परंतु किल्ला अजूनहि समुद्राला आव्हान देऊं शकेल.

असें म्हटलें आहे कीं चालू भरभराट ही माणसास निष्काळजी बनवतें. राष्ट्राचें संरक्षण करण्यापेक्षां स्वतःची तुंबडी भरणें हें त्यांचें ध्येय बनतें आणि ऐतिहासिक काळांत अशाच गोष्टी घडत आलेल्या आहेत. वसईच्या बाबतींतहि हेंच घडलें. वसई संपत्तीनें व्याप्त करण्याकरितां पोर्तुगीजांनीं खूप प्रयत्न केले. प्रत्येक दशकानंतर न येणाऱ्या यशामुळें त्यांचा भविष्यकाळ संकट-मय झाला. डच, मराठे, यासारख्या प्रबळ सत्तांची त्या भागावर नजर राहिली.

# शुक्राची चांदणी

~ निर्माता · कथालेखक · दिग्दर्शक ~

## प्रभाकर रानडे

पद्य-संगीत
**यशवंत देव**

संवाद
**बाळ बेळगांवकर**

भूमिका

अनंत मराठे · हिरा सावंत · चित्तरंजन कोल्हटकर ·
ओंकार देवास्कर · बळवंत परचुरे · नारायण नाईक ·
गोपाळ मंत्री आणि नवतारका स्वाति · उमा

निर्मिती प्रमुख

## वसंत रानडे

पार्श्वगीतें :~ सुधीर फडके, आशा भोंसले, सुमन हेम्माडी

· प्रांतिक हक्क ·

सी.पी. सी.आय. - शेठ मगनलाल मोतीलाल, धुळें.

मराठवाडा व मुंबई करिता लिहा -
**श्री नागचित्र** पो.बॉ. ५५१८, मुंबई १४.

श्री नाग चित्र

अखेर शेवटीं मराठ्यांच्या शूर चिमाजी आप्पानें, ज्या वसईवर पोर्तुगीजांनीं सतत १०० वर्षें ताबा ठेवला, तिचा मे १७२९ च्या भीषण लढाईनें ताबा घेतला. ह्या पोर्तुगीजांच्या पाडावाचीं मुख्य कारणें म्हणजे राज्यकारभारांतील अव्यवस्थितपणा, राज्यांतील लांचलुचपत व अधिकारी वर्गांतील द्वेष हीं होत. अगदीं शेवटच्या क्षणापर्यंत अधिकाऱ्यांनीं वसईच्या बचावाची शिकस्त केली. मराठ्यांनीं वारंवार केलेले जोरदार हल्ले परतवून त्यांना तीन महिनेपर्यंत सागरांत थोपवून धरलें. दोन्ही बाजूंचे शेंकडों वीर व सेनापति पडले. अखेर १६ मे १७२९ ला मराठ्यांकडून आपल्या शिस्तबद्ध हल्ल्यांनीं पोर्तुगिजांचा पाडाव केला गेला. त्यांचे सेनापति मारले गेले. गर्वहरण केला गेला. त्यामुळें ते हैराण झाले.

विजयी वीराची शत्रूकडूनही प्रशंसा केली जाते आणि तेंच शौर्य मराठ्यांच्या शूर वीर चिमाजी आप्पानें गाजवलें. त्यानें दुखावल्या गेलेल्या पोर्तुगीजांशीं चांगलेंच वर्तन ठेवलें. त्यांना जरी नको होतें तरी त्यानें त्यांना तेथें राहण्यास व त्यांच्या धर्मास परवानगी दिली होती. लढाईव्यतिरिक्त त्यानें त्यांचें कांहींच नुकसान केलें नाहीं.

विजेत्यांनीं दाखवलेल्या औदार्याची त्यांनीं मत्सरानें फेड केली. त्यामुळें तेथील सत्ता व वैभव यावर शेवटचा पडदा टाकला गेला. त्याचा पुन्हां उदय झाला नाहीं. तेथील लोक जरी बाटले नव्हते तरी त्यांचा ऱ्हास होण्यास मदत झाली. मराठ्यांना त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

हृदयभंग झालेल्या पोर्तुगिजांना जरी संरक्षणाचें आश्वासन व प्रार्थनेची परवानगी मिळाली होती तरी त्यांना नवीन धोरणानें राहणें शक्य झालें नाहीं. फारच थोडे लोक तेथें राहिले. वसईकडे लक्ष ठेवण्यास कोणीच राहिलें नाहीं. हल्लीं आसपास माणिकपूर, होळी, इत्यादि लहान लहान गांवें आहेत. इतका जरी त्या शहराचा ऱ्हास झाला आहे तरी सबंध दिवसाच्या परिश्रमाचा वसईच्या सूर्यास्ताचा देखावा पाहिल्यानंतर परिहार होतो.

* कार्टून प्रिंटिंग
* कार्डबोर्ड बॉक्समेकिंग
* औषधी बाटल्यांच्या लेबल्सवर रंगीत छपाई
* लेबल्स, ब्लॉटर्स, कॅलेंडर्स छपाई

## स्वस्त दरांत वेळेवर मिळण्याचें एकच ठिकाण

लिहा म्हणजे छापील बॉक्सेसचे नमुने पाठवूं
म्हणजे आमच्या कामाबद्दल आपली खात्री होईल

# सेन्ट्रल प्रिंटिंग
## ॲन्ड
# बॉक्स-मेकींग वर्क्स

चर्च कांम्पाऊंड, टाटा मिलसमोर,
परळ, मुंबई १४

## अल्डेमार किल्ला ( ALDEMAR FORT )

मुंबईकरांना फारशी माहिती नसलेला असा अल्डेमार किल्ला एक तासाच्या अंतरावर आहे. तो पाहण्यास दुपारचा वेळ पुरेसा होतो व तेथील दिवस मजेंत जातो. ते सहलीला जाण्यास योग्य असें ठिकाण असून समुद्र किनाऱ्याची ताजी हवा खेळत असल्यामुळें आपण मुंबईच्या उष्णतेपासून दूर राहतो. या किल्ल्यावरून आपणास सुंदर देखावा पाहावयास मिळतो आणि तो वैभवशाली व शांत असल्यामुळें तेथें एक प्रकारची स्फूर्ति येते.

हा पोर्तुगीजांचा प्राचीन किल्ला चढायला अगदी सोपा आहे. मुंबईपासून अवघ्या १५ मैल असलेल्या वरसोवा बस सर्व्हिसनें अगर खाजगी मोटारनें जातां येते. वरसोव्याच्या समुद्र किनाऱ्याची मजा लुटण्याकरितां पुष्कळ लोक तिकडे जातात. बस आपणास वरसोव्याच्या म्हणजेच पूर्वीच्या वेसाव्याच्या हद्दीपर्यंत नेऊन सोडतें. नंतर अगदीं खेड्यापर्यंत पोहोंचण्यास आपणास एक मैल चालावें लागतें. खेड्याजवळ गेल्यावर माशांची एक प्रकारची दुर्गंधी सुटते. अरुंद अशा रस्त्यांतून कोळी लोकांचा गजबजाट सुरू असतो. आपणाजवळ स्वतःची गाडी असल्यास ती आपण थेट जेथें होड्या उभ्या असतात त्या ठिकाणापर्यंत नेऊं शकतो.

वरसोव्याची खाडी दिसायला जरी चांगली असली तरी तिथें एक प्रकारची घाण येते. रस्त्यावर मासे इतके पसरलेले असतात कीं रस्त्यांतून जातांना वाळलेल्या अगर वाळत घातलेल्या माशावर पाय पडल्याशिवाय राहात नाहीं. वरसोव्याची खाडी ओलांडून डाव्या हाताला गेलें असतां अल्डेमार किल्ला दिसतो. होडींत चढल्यावर जवळच असलेल्या ऑलिनॉर या ठिकाणाहून माती व इमारती लांकूड वाहून आणणाऱ्या बांबूच्या बांधलेल्या जहाजांचा देखावा फार सुंदर दिसतो. हल्लीं तेथील व्यापार फार भरभराटीस आला आहे. मालमोटारी जहाजांतील माल उतरून घेण्याकरतां थेट पाण्यांत जातात. त्यामुळें तें लहानसें बंदर अगदीं गजबजलेलें दिसतें.

खाडी जेथें ओलांडावी लागते तें अंतर अगदीं कमी म्हणजे फक्त एक




सावण, केशवर्धक तेलें, उटणीं, सेंट, जर्दा, तपकीर, कातगोळ्या, विड्या, सिगारेट, गुडाखू, बाम, कोलन वॉटर, सुगंधी जल, क्रीम, पोमेड, ब्रिलियंटाईन, स्नो, फेसपावडर, टुथ पेस्ट, मेंथाल लोशन, सौंदर्यवर्धक उपकरणें, अगरबत्ती, धूप, इत्यादी अनेक वस्तू लोकप्रिय होऊन खप वाढण्यासाठीं काय वापराल ?...

प्रख्यात

## " घोडा छाप "

सुगंध, अर्क, रंग, रसायनें, तेलें, वगैरे खालीचा माल वापरा

—: सोल एजंट्स :—

# डी. जी. गोरे कंपनी मुंबई २

फर्लांग आहे. पोहणारे लोक तेथून सहज पोहून जातात. मरवा, मनोरी खाड्यांत बितर्के अंतर तोडून जावें लागतें त्यापेक्षांही हें अंतर कमीच आहे. नेहमी-प्रमाणें नावाड्याला एक आणा फी द्यावी लागते. आपल्याला नावेंत अगदीं थोडा वेळ बसावें लागतें. तेवढ्यांत उजवीकडे नजर टाकली असतां जवळच एक लहानशी टेकडी दिसते. तिच्यावर गर्द हिरवी झाडी आहे. टेकडी 'धाखली डोंगर' या नांवानें प्रसिद्ध असून तेथें शिकार करण्याची बरीच शक्यता आहे.

थोड्याच वेळांत आपण खाडीच्या दुसऱ्या बाजूला पोहोंचतो. ती बाजू म्हणजे अगदीं कमी वस्ती असलेली मढ बेटाची एक बाजू आहे. ज्यांच्या-जवळ मोटारीसारखें वाहन नसेल त्यांनीं मधु बेटावर जाण्यास हा अगदीं जवळचा मार्ग स्वीकारावा. आतां डाव्या बाजूनें पुढें गेल्यावर पुन्हां उजव्या बाजूला रस्ता लागतो तोच मधु बीचकडे जाणारा रस्ता होय.

परंतु अल्डेमार किल्ल्याकडे जाण्यास आपल्याला अगदीं सरळ जावें लागतें. तें अंतर दोन मैलांचें आहे. परंतु एका बाजूला खाडीचा प्रवाह व दुसऱ्या बाजूला ताडांचीं झाडें असल्यानें तो रस्ता सुंदर व रमणीय वाटतो. रस्ता उघडा असला तरी वाऱ्यामुळें उष्णता जाणवत नाहीं. वरील रस्ता मोटारीलाहि उपयुक्त आहे. परंतु मोटारींना मालाडच्या मुख्य रस्त्याला मिळणाऱ्या मरवा रस्त्यानें जावें लागतें. अल्डेमारकडे जाणारा रस्ता डावीकडे असून तो उतरता आहे. लढाईच्या दिवसांत हाहि रस्ता डांबरी बनवल्याबद्दल मिलिटरीचे आभार मानावे लागतात्. हें ठिकाण, जरी वस्ती नसली तरी अजूनही मिलिटरीच्या ताब्यांत आहे. डावीकडे वळल्यानंतर किनाऱ्याच्या विरूद्ध बाजूला एक मैल आंत जावें लागतें. तेथून थोडीशी जरी चढण असली तरी चढायला भीति वाटते. डाव्या बाजूला कुठल्याहि ऋतूला तोंड देईल असा काळ्या दगडांनीं बांधलेला, मोठाले उंच तट असलेला, अल्डेमार किल्ला आहे. किल्ल्याबाहेर व आंत बऱ्याच जुन्या व नव्या झोपड्या बांधलेल्या आहेत.

जर आपण मोटारनें आलों तर रस्त्याच्या कडेला मोटार उभी करावी लागते.

## उपनगरांत स्वस्त घरे

* मुंबईच्या गजबजलेल्या वातावरणापासून दूर
* मन व शरीर प्रसन्न राहण्यासाठीं खेडेगांवचे व शहरांतील संयुक्त वातावरण
* कांदीवली स्टेशनपासून अवघ्या १५ मिनिटांच्या वाटेवर पश्चिमेस ५०० ते १००० वारांचे फ्री होल्ड हवेशीर प्लॉट्स स्वस्त दरांत
* पाणी, वीज, टेलिफोन, वैद्यकीय मदत, दुकानें, बस सर्व्हिस यांची उत्तम सोय
* बरेच प्लॉट्स विकले गेले असून त्यावर कांहीं घरें बांधून पूर्ण झाली आहेत व लोक राहू लागले आहेत
* आपल्या प्लॅनप्रमाणें या प्लॉट्सवर अवघ्या १॥ महिन्यांत उत्तम पक्क्या बांधणीचें घर रु. २५०० पासून वरच्या किंमतींत बांधून देऊं

**आपली इच्छा असल्यास प्लॉट्स दाखविण्याची व्यवस्था करूं**

**लिहा अथवा भेटा :—**

# एडवणकर कन्स्ट्रक्शन
# — कंपनी —

**C/o आयडीयल फर्नीचर वर्क्स**

**न. चिं. केळकर रोड, दादर (वेस्टर्न रेल्वे), मुंबई २८**

कारण रस्त्यापासून अर्धा फर्लांग आंत गेलें म्हणजे पोर्तुगीजांनीं प्रथमच किल्ले हिंदुस्थानांत बांधले त्यापैकीं एका किल्ल्याजवळ आपण जाऊन पोहोंचतों. ह्या ठिकाणीं कोठून प्रवेश करावा हेंहि आपणास कळत नाहीं. प्रवेशद्वार मिळण्यासाठीं आम्ही गोल गोल फेऱ्या मारल्या. मला असें वाटत होतें कीं, इतर किल्ल्याप्रमाणें यालाहि मोठें प्रवेशद्वार असेल. परंतु या किल्ल्याला एकाद्या लहान खोलीप्रमाणें अगदीं लहान दरवाजा आहे. आंत प्रवेश करतांना खालीं वांकून जावें लागतें. किल्ला जरी मोठा असला तरी त्याच्या मोठेपणाला न शोभणारें असें त्याचें अरुंद प्रवेशद्वार आहे. जास्त फेऱ्या न मारतां आपणास सरळ प्रवेशद्वाराकडे जावयाचें असल्यास किल्ला दिसल्याबरोबर त्याच्या उजव्या बाजूस गेलें म्हणजे एक लहानसें दार दिसतेंच.

आंतल्या बाजूला असलेल्या कांहीं ऐतिहासिक वस्तूंवरून आपणांस किल्ल्याचें महत्त्व कळतें. तो किल्ला अशा ठिकाणीं बांधला आहे, कीं तेथील म्हाताऱ्या रखवालदाराशिवाय तेथें मनुष्यवस्ती आजिबात नाहीं. त्यामुळें रखवालदाराला फारसें लक्ष द्यावें लागत नाहीं.

मला ह्याचें नवल वाटतें कीं ह्या ऐतिहासिक अवशेषाची व्यवस्था ठेवण्यासाठीं कोणी कशी काळजी घेत नाहीं ? आंतमध्यें बरींच झाडें-झुडुपें आहेत. त्याबद्दलची तिथें कुठलीही माहिती नमूद केलेली नाहीं आणि त्या किल्ल्याभोंवतीं असलेल्या लोकांना त्या किल्ल्याचें नांवही माहीत नाहीं.

प्रथम हा किल्ला पोर्तुगीजांकडे होता पण नंतर मराठ्यांनीं तो सर केला आणि तो त्यांचा एक अजिंक्य असा किल्ला बनला. तो १६ व्या शतकांतील असावा असें वाटतें. आपण आंत प्रवेश केल्याबरोबर आपणास एक पडकें तळें दिसतें. तेथून सैन्याला पाणीपुरवठा होत असे. त्याला चार बुरूज असून बंदुका ठेवण्यास व शत्रूंच्या हालचाली पाहण्यास चिरा पाडलेल्या आहे. त्या प्रत्येक चिरेंतून सभोंवतालचा देखावा फार मजेशीर दिसतो. विशेषतः बुरुजावरून व्यापारी बोटी, मच्छिमारीच्या होड्या व बांबूचीं जहाजें उभी असलेली खाडी, त्यांच्या पाठीमागें असलेला वरसोवा, अंधेरी, जुहू

जाहिरातीचें प्रमुख माध्यम — " मुद्रण–कला "

पण ... शास्त्र व तंत्र यांस अनुसरून केलेली छपाईच
सुबक, आकर्षक नि आल्हादक होते...

अशा उत्कृष्ट छपाईकरितां —

# श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स

प्रिंटर्स, रूलर्स, बुक-बाइंडर्स, अँड टाईप फाउंडर्स
४९५।९६ शनवार पेठ, पुणें २

येथें इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेंतील ' बुक–वर्क ' आणि
' जॉब–वर्क 'चीं कामें उत्कृष्ट व वक्तशीर केलीं जातात

त्याचप्रमाणें " रेज्ड–प्रिंटिंग "चें पुण्यांतील
एकमेव ठिकाण !

★  ★

हा देखावा अगदीं संस्मरणीय आहे. तेथील बुरुजावर व तटांवर चढतां येते आणि किल्ल्याची अगदीं कानाकोपऱ्यांतून पाहाणी करतां येते. पुष्कळ वेळां आपणास वाढलेल्या झुडुपांचे कांटे बोंचतात आणि ह्या ठिकाणीं निरनिराळ्या कामगिऱ्या करून प्राण खर्ची घालणाऱ्या त्या शूर वीरांबद्दलचे विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहींत.

किल्ल्यांत आपण भोजनही करूं शकतों. परंतु आंतल्यापेक्षां किल्ल्याच्या बाहेरील भाग पसंत पडतो कारण बाहेरील बाजूस बऱ्याच चांगल्या जागा आहेत. किल्ल्यांतून बाहेर पडल्यावर डाव्या बाजूला दोन्ही बाजूला ताडाचीं झाडें असलेल्या रस्त्यानें चालत जावें. जवळच एक खडकाळ टेकडी असून लाटा त्यावर पाण्याचा मारा करतांना दिसतात. त्या टेकडीवर सरळ चढावें कारण तो ह्या सबंध सहलींतील मुख्य भाग आहे. टेकडीवर अगदीं सपाट असा भाग आहे. खाडीचें पाणी सरळ टेकडीवर येऊन धडकतें. एका बाजूस खाडीचा स्वर्गीय देखावा आणि दुसऱ्या बाजूस मधु बेटाचा देखावा या टेकडीवरून दिसतो.

त्या ठिकाणीं आपण अगदीं बेटाच्या समूहांत असतो कारण पाण्यांत पाय घातल्याशिवाय आपणांस पुढें जातांच येत नाहीं. ह्या ठिकाणाहून ताडांच्या झाडांतून आणि खेडयांतील झोपडयापाठीमागून होणारा सूर्यास्त हा फार प्रेक्षणीय असतो. ह्या टेकडीवरील त्या सपाट जागेवर थंडगार हवा खाऊन व भोजन करून ताजेतवानें झाल्यानंतर देवाला ही जागा निर्माण केल्याबद्दल धन्यवाद दिल्याशिवाय राहवतच नाहीं.

## आरे मिल्क कॉलनी

थोडया वर्षांपूर्वी आरें हें एक ऐकिवांत नसलेलें आणि आदिवासी लोकांची वस्ती असलेलें असें ठिकाण होतें परंतु आतां मुंबईतील लक्षावधी लोकांना तेथून दूधपुरवठा होत असल्यामुळें प्रत्येकाच्या तोंडावर आरे दूध कॉलनीचें नांव असतें.

त्याला दुधामुळें महत्त्व आलें हें मला येथें सांगावयाचें नाहीं तर तें एक

सर्व प्रकारचा कागद, बोर्ड्स

छापखाने व लिथो प्रेसेसना
लागणारी शाई

इ. साठीं आपण प्रथम चौकशी करावी असें
एकच ठिकाण !

# बी. एन्. त्रिवेदी
## आणि कंपनी

– डायरेक्ट इंपोर्टर्स –

गॅन्जेस प्रिंटिंग इंक फॅक्टरी
डिस्ट्रिब्यूटर्स

प्रमुख कार्यालय :
१९ हमाम स्ट्रीट, फोर्ट,
मुंबई १
फोन नं. २१०७१
तारेचा पत्ता– 'नवपद्म'

शाखा कार्यालय :
फोन नं. ७१५१४
१४ नारायणवाडी,
कांदेवाडी, मुंबई ४

प्रेक्षणीय व सौम्य असें सौंदर्यस्थान असल्यामुळें तेथें वसाहत स्थापिली गेली. प्रथम तेथें कुठल्याही तऱ्हेची वस्ती होणार नाहीं अशा तऱ्हेचा जंगली भाग होता परंतु नंतर त्याचें दैव पालटलें. मुंबईतील अत्यंत घाणेरड्या अशा गोठ्यांतून अत्यंत वाईट स्थितींत दूध देणारीं जीं जनावरें असत अशा हजारों जनावरांचें सुव्यवस्थित असें तें माहेरघर बनलें आहे. श्री. दिनकरराव देसाईसारख्या अत्यंत उत्साही अशा मंत्र्यांच्या देखरेखीखालीं 'आरे' हें शहरांतील नुसतें मुख्य व मोठें असें दूध-केंद्रच बनलें असें नव्हे तर तें एक मुंबईभोंवतालच्या प्रदेशांतील प्रेक्षणीय स्थळ झालें आहे.

त्याचें जवळ जवळ ४० लक्ष रुपये किंमत असलेलें ४००० एकर क्षेत्रफळ आहे. तेथील जंगल तोंडलें गेलें आहे. दूधकेंद्र संपूर्ण तयार झालेलें असून जवळ जवळ मुंबईच्या मूळ हद्दींतील सर्व जनावरें तेथें हलविण्यांत आलीं आहेत.

'आरे मिल्क कॉलनी' पंडित नेहरूंच्या हस्तें ४ मार्च १९४१ रोजीं उघडली गेली. नोव्हेंबर १९४५ मध्यें १००० एकरांचें आरे नांवाचें खेडें, एक हजार गाईम्हशींच्या साहाय्यानें रोज १०,००० पौंड अधिक दुधाचा पुरवठा करण्यासाठीं सरकारी डेअरी सुरूं करण्याच्या उद्देशानें मिळविलें गेलें. आज ह्या ठिकाणीं १५,००० गाई-म्हशी एक छत्राखालीं नमुनेदार वातावरणांत आहेत. त्यांचें मालक निरनिराळे आहेत. समान पातळीवर कामगिरी करण्याचा हा संयुक्त सरकारी व खाजगी प्रयत्न आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथें काढलेलें दूध आणि बाहेरून आणलेलें दूध यांचें वांटप सरकारच्या व्यवस्थेखालीं होतें. या योजनेसाठीं सुमारें दोन कोटी रुपये खर्च झाले असून अंदाजें २००० लोक येथें काम करतात. येथील नमुनेदार व्यवस्थेमुळें दूध उत्कृष्ट प्रकारचें मिळूं लागलें आहे. येथें वैद्यकीय मदत मोफत मिळते आणि गुरें-ढोरें विकत घेण्यास लागणारें भांडवल येथें स्थापन केलेल्या सहकारी बँकेकडून किफायतशीर रीतीनें मिळूं शकतें. त्या ठिकाणीं दररोज काढल्या जाणाऱ्या २००० मण दुधाचें वांटप बृहन्मुंबईतील ७०० केंद्रांमधून केलें जातें. दरसाल अंदाजें दोन कोट रुपयांचें

दूध त्या ठिकाणाहून वाटलें जातें. आरे येथील ' सेंट्रल डेअरी ' ही जगांतील मोठ्या डेअरीपैकीं असून पाकिस्तान व हिंदुस्थान येथें यास तोड नाहीं. कामकरी लोकांच्या खाण्यापिण्याच्या व्यवस्थेसाठीं एक कँटीनहि उघडण्यांत आलें आहे. त्यांचे कपडे धुण्यासाठीं लॉंड्री पण उघडली गेली आहे. ह्या ठिकाणीं रोज भरल्या जाणाऱ्या ३,६०,००० बाटल्या ५० ट्रकसच्या मदतीनें रोज दोन वेळां मुंबईस आणल्या जातात. रोज ३००० मणांपेक्षां अधिक दुधाचें वांटप होऊन त्याचा फायदा ५,५०,००० पेक्षां अधिक लोकांना मिळतो. ह्या योजनेमुळें शहरांतील नको असलेले गाईम्हशींचे गोठे नाहींसे झाले. इतकेंच नव्हे तर मोठ्या व्यापारी प्रमाणावर गाई-म्हशींची निगा कशी राखावी आणि त्यांच्या दूध-दुभत्यांचे शहरांत आधुनिक डेअरीच्या साहाय्यानें वांटप कसें करावें इत्यादि प्रश्नांविषयीं संशोधकाला माहिती मिळविणें अत्यंत सुलभ झालें. अशा प्रकारच्या सोयी जगांतील इतर कोणत्याहि देशांत मिळण्यासारख्या नाहींत. ज्याला ज्याला म्हणून शक्य आहे त्यानें या ' आरे मिल्क कॉलनी 'ला भेट दिल्याशिवाय राहूं नये.

ही कॉलनी बांधल्यामुळें आरे हें एक अत्यंत सुंदर असें ठिकाण बनलें असून रोज हजारों लोक तें पाहण्यास जातात. मुंबईहून तेथें मोटार, ट्रेन अगर बस यांपैकीं कोणत्याहि साधनांनीं जातां येतें. तें मुंबई—घोडबंदर या मुख्य रस्त्यापासून २० मैल अंतरावर आहे आणि एक खुणेचा बोर्ड असलेला रस्ता उजवीकडे दोन मैल आंत कॉलनीकडे जातो. जर आपण ट्रेननें आलों तर गोरेगांवला उतरून आपणास २ मैल चालावें लागतें अगर स्टेशनपासून कॉलनीपर्यंत जाणाऱ्या लोकल बसनें जावें लागतें. मुख्य रस्त्यापासून आरेकडे जाणारा जो दोन मैल रस्ता आहे तो अगदीं खडकाळ असा होता पण आतां तो पहिल्या प्रतीचा डांबरी रस्ता झाला आहे. त्याबद्दल अधिकारी मंडळाचे आभार मानावें तेवढें थोडेंच.

येथील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कॉलनीच्या प्रवेशद्वाराजवळच असलेल्या टेकडीवर एक चौथरा बांधला आहे. या ठिकाणांहून सबंध कॉलनीचा

आणि सभोंवतालच्या सुंदर प्रदेशाचा आश्चर्यकारक ( कौतुकास्पद ) देखावा दिसतो. या आकर्षक अशा चौथऱ्याच्या शेजारीं कॉलनीचे नकाशे आहेत व त्यांचें यथोचित वर्णन केलेलें आहे. त्या सौंदर्यात भर म्हणजे तिथें एक सुंदर बाग असून गवती पटांगण आहे. आंत भोंवतीं आपणांस हिंडायला खूप मिळतें. अर्थात् तेथील मुख्य आकर्षण म्हणजे निरीक्षण हेंच आहे. कारण ती सबंध आशियांतील सर्वांत मोठी व त्या जगतांतील एक उत्तम गणलेली अशी एक कॉलनी आहे. ३ कोटींच्या वर त्यास खर्च आलेला आहे.

परंतु ही कॉलनी पाहून झाल्यावर अगर दुसऱ्या एकाद्या वेळेस तुम्ही त्याच्यासभोंवतालच्या प्रदेशाचें निरीक्षण करा. आपणास येथें थोडे तास घालवावयाचें असल्यास पुष्कळ प्रेक्षणीय स्थळें दृष्टीस पडतात.

सुटीच्या दिवशीं मजा करण्याकरितां अथवा तेथें वनभोजनासाठीं मुद्दाम स्टोव्ह, सावली असलेल्या झाडाखालील खुर्च्या व आपली सतरंजी अशा सोयींनीं युक्त अशीं ठिकाणें तयार केलीं आहेत. इतकेंच नव्हें तर २४ तास पाणी असलेल्या नळांची तेथें सोय केलेली आहे. जनावरांनीं आंत येऊन नासाडी करूं नये म्हणून त्या ठिकाणांभोंवतीं कांटेरी तारेचीं कुंपणें घातलेलीं आहेत.

अशा तऱ्हेनें प्रेक्षकांकरितां मुद्दाम सोयी केलेलीं अशीं हीं एकंदर ११ ठिकाणें आहेत. त्यांतील पुष्कळ ठिकाणांहून सुंदर देखावे दिसतात आणि अशा चांगल्या ठिकाणापर्यंत लोकांच्या सोयीकरतां अगदीं मोटार चालवण्याइतके चांगले रस्ते तयार केले आहेत आणि त्यांत अगदीं नवीन भर म्हणजे त्याला आठवड्यांतील प्रत्येक दिवशीं भेट देणाऱ्या २५० व रविवारीं व सुटीच्या दिवशीं भेट देणाऱ्या लोकांकरितां एका नवीनच तयार केलेल्या इमारतींत एक कँटीन सुरू केलें आहे. तेथें फराळाचें, जेवण व अर्थात् दूधहि मिळतेंच.

सर्वांत मजेशीर सफर म्हणजे आरेपासून 'कण्हेरी' च्या नॅशनल पार्कपर्यंत असलेला एक मैल लांबीचा जंगलांतील रस्ता हा होय. तो एक विशिष्ट असा रस्ता नाहीं; पायवाट आहे.

# संदर्भ ग्रंथ

खालीं दिलेलीं पुस्तकें पाहतां त्यांत मुंबई शहराविषयीं बरीच माहिती आढळते. त्या पुस्तकांत आलेली माहिती एकत्र स्वरूपांत सुव्यवस्थित व त्रोटक स्वरूपांत " आपली मुंबई " तच वाचायला मिळेल.


( १ ) " टाईम्स ऑफ इंडिया डिरेक्टरी, " बेनेट कोलमन आणि कं. लि. फोर्ट, मुंबई १

( २ ) " आपणु मुंबई " प्रतिमा प्रकाशन, गांवदेवी, मुंबई ७

( ३ ) " बॉम्बे ट्रन्स्पोर्ट गाईड " प्रवासी पब्लिकेशन, मथुरादासभुवन, खेतवाडी, मुंबई ४

( ४ ) " पॉकेट बॉम्बे गाईड " हरीश बूच, मुंबई

( ५ ) " रोड्स टू ब्यूटी अराउंड बॉम्बे " होमी जे. एच. तल्यारखान एम्. एल. ए.

( ६ ) " बॉम्बे बस ट्रम गाईड " ( १९५२ ) डिस्कव्हरीवाला सेठी

( ७ ) " ए गाईड टु बॉम्बे " ग्लोब गाईड्स पब्लिशिंग कं., मुंबई ८

( ८ ) मुंबई सरकारची गॅझेटीयर्स


७३९


प्रकाशक:—**प्रभाकर यशवंत रानडे, प्रसन्न प्रकाशन,**

१७० व्हिन्सेंट रोड, एम्प्रेस महाल, बी. ब्लॉक, दादर, मुंबई १४

मुद्रक : **द. ग. गपचूप**, श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स,

४९५।९६ शनवार पेठ, पुणें २

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

REFBK-0008139




# PATEL DAIRY

• LALITA NIVAS, [illegible] MATUNGA [illegible] BOMBAY 16 •

—: दूध, लोणी, मिठाईंचे प्रमुख व्यापारी :—

मालक—पटेल बंधू







Cover printed at: KALPANA ART PRESS, Poona 2.

S. K. Patil M.P.
President
BOMBAY PRADESH CONGRESS COMMITTEE

Telegrams: CONGRESS
Telephones: 73111 (Congress)
42356 (Personal)
32073 (Residence)

Congress House
Bombay 4

२-२-१९५४

श्री. प्रभाकर रानडे यांनीं 'आपली मुंबई' नांवाची मार्गदर्शिका मराठींत काढून एक फार मोठी कामगिरी केली आहे असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. इंग्रजी आणि गुजरातींतून अशा प्रकारच्या मुंबईच्या मार्गदर्शिका असून मराठींत मात्र तेवढीच एक उणीव होती. ती उणीव या पुस्तिकेनें भरुन काढली असून मुंबईची आजपर्यंची जडण-घडण आणि आतांपर्यंतची तिची वाढ यांची सविस्तर कल्पना या पुस्तिकेवरुन मुंबईची माहिती करुन घेण्यास उत्सुक असलेल्या कुणालाहि यावयास कठीण पडणार नाहीं. या उपयुक्त कामगिरीबद्दल श्री. रानडे यांचें मी हार्दिक अभिनंदन करतों.

स. का. पाटील

REFBK-0008139

विजय/-

आहे. प्रेक्षणीय स्थळांची बरीच माहिती त्या त्या ठिकाणीं प्रत्यक्ष जाऊन मिळविली आहे. त्यामुळें त्याच त्याच प्रेक्षणीय ठिकाणीं जाऊन कंटाळलेल्यांना कांहीं अज्ञात प्रेक्षणीय ठिकाणें यांत आढळून येतील. हें पुस्तक दरवर्षी त्या माहितींत होणाऱ्या बदलासकट प्रसिद्ध केल्यास ती एक सेवा होईल असें आम्हांला वाटते व त्याप्रमाणें आम्ही हें यापुढें दरवर्षी नियमित प्रसिद्ध करणार आहोंत. तरी सर्व जनतेनें, जाहिरातदारांनीं, आम्हांला शक्य तें सक्रीय सहाय्य देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा अशी नम्र विनंति करतो. या वर्षीच्या आमच्या या पहिल्याच प्रकाशनांत ज्यांनीं मदत केली त्यांचें पुनः एकदां आभार मानून व दयाघन प्रभूनें आम्हांला हा उपक्रम दरवर्षी चालू ठेंवण्यास शक्ति द्यावी अशी त्यांचे चरणीं नम्र प्रार्थना करून हें पुरे करतो.

एम्प्रेस महाल, बी. ब्लॉक, खोदादाद
सर्कल, ट्रॅम टर्मिनस समोर,
दादर, मुंबई १४

[signature]

## आभार-पत्रिका

आम्ही प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें आम्हांला "आपली मुंबई" च्या प्रकाशनकार्यांत अनेकांची मदत झाली. तथापि खालीं नमूद केलेल्या व्यक्तींचे सहाय्य अगदीं उल्लेखनीय असून आम्ही त्यांचे ऋणी आहोत !

याशिवाय कांहीं नांवें चुकून राहिलीं असल्यास त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

१ शेठ मगनलाल मोतीलाल, धुळे
२ श्रीमान् भाऊसाहेब हरचेकर, मुंबई
३ श्री. सदानंदराव हरचेकर, मुंबई
४ श्री. बी आर. जोशी, लँग लाईफ इन्शुअरन्स कं. लि. पुणें
५ श्री. बाबूराव देसाई, प्रोग्रेसिव्ह प्रिंटर्स, मुंबई ४
६ श्री. बन्सीलाल एन्. सुरपुरीया, पुणें
७ श्री. सुंदरराव आठवले, मुंबई
८ श्री. य. ब. रानडे, पुणें
९ श्री. वामन पुरुषोत्तम देव, पुणें
१० श्री. शेठ गोवर्धनदास वाणी, प्रफुल्ल पेपर मार्ट, मुंबई
११ श्री. बी. एन्. त्रिवेदी, मुंबई
१२ श्री. अंबालाल शहा, मुंबई
१३ श्री. भाईसाहेब वैद्य, मुंबई
१४ श्री. द्वारकानाथ म्हसकर, मालक, द्वारकानाथ आणि कं., ब्लॉक मेकर्स, मुंबई ४
१५ श्री. कमल मोरे, मालक, कमल ब्लॉक्स, मुंबई
१६ श्री. डी व्ही. जोशी, ॲडव्हटॉयझिंग एजंट, तारा बाग, गिरगांव, मुंबई ४
१७ श्री. रमेश भोगटे, संपादक, नव संदेश, मुंबई
१८ श्री. शंकरराव अभ्यंकर, मुंबई
१९ श्रीमती गुलाब रानडे, मुंबई
२० श्री. सूर्यकांत टेमगिरे, टेमगिरे आठले स्टुडिओ, मुंबई ४
२१ श्रीमती शशी आठले, टेमगिरे आठले स्टुडिओ, मुंबई ४

२२ श्री. सबनीस व श्री. देशमुख, सेंट्रल प्रिंटिंग व बॉक्समेकिंग वर्क्स, मुंबई १२

२३ श्री. वि. गं. खांडेकर, ( शृंगार साप्ताहिक ) मुंबई

२४ श्री. द. ग. गपचूप, श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स, पुणें

२५ श्री. कडूसकर, कल्पना आर्ट प्रेस, पुणें

२६ श्री. वा. वि. भट, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई

२७ श्री. जगन्नाथ कृष्णा जाधव, मुंबई

२८ श्री. सोपान महादेव बरगे, मुंबई

२९ श्री. म. य. दातार, डेक्कन ॲडव्हर्टायझर्स, पुणें

३० श्री. एकबोटे, सक्सेस ॲडव्हर्टायझर्स, मुंबई

३१ श्री. व्ही. एम्. नित्सुरे, महाराष्ट्र चेंबर ऑफ् कॉमर्स, मुंबई

३२ श्री. स. रा. देशपांडे, पुणें

३३ श्री. वि. ब. देशपांडे, पुणें

३४ श्री. विनायकराव लाड, मुंबई

३५ श्री. श्री. कृ. टेमकर, मुंबई

३६ श्री. निळकंठ तळेले, मुंबई

३७ श्री. देवनाथ छ. जव्हेरी, मुंबई

३८ श्री. सुहास दे. जव्हेरी, मुंबई

३९ श्री. एन्. बी. देवधर, मुंबई






दादरच्या जव्हेरी बाजाराचे जनक

**श्रीमान् वामन गणेश तथा भाऊसाहेब हरचेकर**

यांना

अनुक्रम
विभाग

# मुंबईची ऐतिहासिक माहिती

# दि लॉंग-लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

कोणालाहि अगदी सहज झेपेल अशा कमी
दराचे हप्ते असलेल्या विम्याच्या
वेगवेगळ्या उपयुक्त योजना

**तसेंच**

महिलांच्या विम्याचे बाबतींत खास सवलती
हें आमच्या कंपनीचें एक वैशिष्ट्य

**आणि**

मुलांच्या शिक्षणासाठीं व मुलींच्या लग्नासाठीं
अगाऊं तरतूद करून ठेवतां येईल
अशा विम्याच्या अनेक योजना ! !

*

वेगवेगळ्या शहरीं उत्साही आणि होतकरूंची
पगार किंवा कमिशनचे सढळ अटीवर
नेमणूक केली जात आहे. इच्छुकांनीं
ताबडतोब समक्ष अगर
पत्रद्वारें भेटावें

**— अधिक माहितीसाठीं चौकशी करा —**

**मुंबई शाखा कचेरी**
**एम्प्रेस महाल, बी ब्लॉक**
खुदादाद सर्कल, दादर, मुंबई १४

**मुख्य कचेरी**
**१८० बुधवार पेठ, पुणें**
टे. नं. ३११०